ISSN No 2347-7075
Impact Factor- 8.141
Volume-6 Issue-33

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur (M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance And Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –8.141
Vol.6 Issue- 33 Mar-Apr-2025

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

**Bi-Monthly**

***Volume-6*** ***Issue-33***

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
***Website:*** *https://ijaar.co.in*

**Submit Your Research Paper on Email**

**Regular Issue:** 2013ijaar@gmail.com **Special Issue:** ijaar2022@gmail.com

For Publication Call On - **8888454089**

**Chief Editor**
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India
***Email:*** *editor@ijaar.co.in* ***Mob-*** *8624946865*

## Editorial & Advisory Board

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. D. Shinde** | **Dr. M. B. Potdar** | **Dr. P. K. Pandey** |
| **Dr. L. R. Rathod** | **Mr. V. P. Dhulap** | **Dr. A. G. Koppad** |
| **Dr. S. B. Abhang** | **Dr. S. P. Mali** | **Dr. G. B. Kalyanshetti** |
| **Dr. M. H. Lohgaonkar** | **Dr. R. D. Bodare** | **Dr. D. T. Bornare** |

***The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.***

**© All rights reserved with the Editors**

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor– 8.141
Vol.6 Issue-33 Mar-Apr 2025

## *CONTENT*



| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | मा. अण्णा हजारेंच्या चळवळीने झालेले कायदे.<br>**प्रा. डॉ. रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे** | 1 - 3 |
| 2 | ग्रंथालय व्यवस्थापनातील नवीन प्रवाह आणि आधुनिकीकरण<br>**डॉ.कातळे संगीता गुलाबराव** | 4 - 6 |
| 3 | नवीन शैक्षणिक धोरण 2020 मुळे प्राध्यापकांच्या माहिती विषय गरजांचा अभ्यास करताना ग्रंथालयाची भूमिका : एक अभ्यास<br>**प्रा.डॉ.विक्रम दहिफळे , प्रा.मोरे जयंत हंसराज** | 7 - 9 |
| 4 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व रोजगार क्षमता<br>**मोहन दत्तात्रय महाडिक , डॉ.राजकुमार हिरामण थोरवे** | 10- 13 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील विकसित भारत<br>**श्री. प्रविण रमेश साळवे , प्रा.डॉ.गोपीनाथ पांडूरंग बोडखे** | 14 -18 |
| 6 | लोककलावंतांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन<br>**श्री दत्ता काशिनाथ कोकाटे , प्रा.डॉ.अनिल गर्जे** | 19 -21 |
| 7 | आंबेडकरी कवितेतील समाजदर्शन आणि विकसित भारत<br>**प्रा. डॉ. अनिल गर्जे** | 22 -24 |
| 8 | ग्रंथालय शास्त्रातील वर्तमान कल<br>**श्री.विजय तात्यासाहेब जाधव , डॉ.राजकुमार हिरामण थोरवे** | 25 -35 |
| 9 | ग्रामीण विकास आणि स्वयंरोजगार<br>**डॉ. भास्कर मारुती चव्हाण , डॉ. भगवान शंकरराव वाघमारे** | 36- 39 |
| 10 | भारतापुढील सध्याची आव्हाने<br>**प्रा. डॉ. रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे.** | 40 -42 |
| 11 | दिनेश काळे यांच्या नाटकातील महानगरीय वास्तव<br>**श्री वसंत लक्ष्मण पुंड , प्रा. डॉ. अनिल गर्जे** | 43 -46 |
| 12 | विकसीत भारत व वाढत्या नागरिकरणाची भुमिका : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. आनेराव एम.एम.** | 47 -49 |
| 13 | राष्ट्रीय एकात्मता आणि मराठी साहित्य<br>**श्री योगेश आबासाहेब जपे , डॉ. गोपीनाथ पी. बोडखे** | 50- 55 |
| 14 | संत तुकारामांच्या अभंगातील लोकजीवन व लोकसंस्कृती<br>**श्री सिद्धेश्वर पांडुरंग जाधव , प्रा.डॉ.अनिल गर्जे** | 56- 58 |
| 15 | ई-कॉमर्सच्या भूमिकेबद्दल ग्राहकांचा कल<br>**डॉ. चांडक पवनकुमार विजयकुमारजी** | 59 -62 |
| 16 | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि मराठी साहित्य<br>**प्रा. डॉ. गोपीनाथ पांडूरंग बोडखे** | 63- 66 |
| 17 | हिंदी साहित्य और मानवी जीवन का उत्थान<br>डॉ. ए.बी.टाळके | 67- 70 |
| 18 | मराठी लोकगीत व भारतीय संस्कृतीचे दर्शन<br>**डॉ. राजाराम सोनटक्के** | 71 -74 |

| | | |
|---|---|---|
| 19 | समाज बदलासाठी साहित्य - एक उत्प्रेरक<br>**श्री.भिमराव कुंडलिक जमधाडे** | 75 -78 |
| 20 | साहित्य और मानव जीवन का उत्थान<br>**प्रा डॉ काझी तनवीर बेगम हाफिजोद्दिन** | 79 -86 |
| 21 | 'राघववेळ'- भुक आणि गरीबी याचे वास्तवदर्शन.<br>**डॉ.प्रा.संदीप भुजंग शेकड** | 87- 89 |
| 22 | बहुरुप्याची गीते व लोकसंस्कृती<br>**प्रा. डॉ. रमेश जयवंत खिळदकर** | 90 -92 |
| 23 | ईदगाह कहानी में नैतिकमूल्य<br>**प्रो. डॉ. महेमूद पटेल** | 93- 94 |
| 24 | लोकउपासक पोतराज - गीते व लोकसंस्कृती<br>**सविन तुकाराम मोकाशे** | 95 -97 |
| 25 | जात्यावरील ओवी गीतातून व्यक्त होणारे लोकसंस्कृतीचे दर्शन<br>**डॉ. राजाराम सोनटक्के, स्वाती शिवाजी चौधरी** | 98 -100 |
| 26 | ग्रामीण भागातील आव्हाने व उपाय - शिक्षण<br>**डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख** | 101-104 |
| 27 | १८ व्या शतकात भारतीय एकतेच्या विकासात भक्ती पंथाचे योगदान<br>**डॉ. सखाराम मारुती वांढरे** | 105-110 |
| 28 | भारताचे शासन आणि प्रशासन (१९४७-१९५२): एक ऐतिहासिक अध्ययन<br>**डॉ. रमेश एकनाथ भारुडकर** | 111-115 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# मा .अण्णा हजारेंच्या चळवळीने झालेले कायदे.

**प्रा .डॉ .रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे**
इतिहास विभाग प्रमुख आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता .आष्टी जि .बीड

DOI-**10.5281/zenodo.15573453**

**प्रस्तावना -:**

भारतात ब्रिटिशांची सत्ता असताना त्यांनी भारताची आर्थिक लोड करण्यासाठी अनेक कायदे त्यांच्या फायद्यासाठी केले होते .भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर समाजहिताचे कायदे लोकसभेत, राज्यसभेत व विधानसभेत होणे अपेक्षित होते .परंतु माहिती अधिकार कायदा व लोकपाल बिल मंजूर झाले तर भ्रष्टाचाराला मोठ्या प्रमाणात आळा बसणार होता .परंतु दोन्हीही कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अण्णा हजारेंना प्रदीर्घ असा लढा द्यावा लागला .जनतेच्या आंदोलनामुळे शेवटी सरकारला नमते घेऊन आणि कायदे पारित करावे लागले .थोडक्यात अण्णा हजारेंच्या चळवळीमुळे पुढील कायदे या ठिकाणी भारतात तयार झाले.

**माहिती अधिकार कायदा -:**

स्वातंत्र्य झाल्यानंतर भारताने लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला होता .लोकांचे लोकांसाठी लोकनियुक्त सरकार हे राज्यघटनेचे मुख्य सूत्र असल्यामुळे माहिती अधिकार कायदा भारतात प्रजासत्ताक राष्ट्र झाले त्याच दिवशी मिळाला पाहिजे होता .परंतु तसे झाले नाही .जगात माहिती अधिकाराचा सर्वात प्रथम स्वीकार स्वीडन देशाने सण 1866 मध्ये मान्य केला .भारतात सण 1923च्या कार्यालयीन गोपनीयतेचा कायदा करण्यात आला होता .हा कायदा भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर रद्द झाला पाहिजे होता .परंतु तो रद्द करण्यात आला नाही . माहिती अधिकाराचा कायदा पास व्हावा म्हणून देशात राजस्थान, मध्यप्रदेश, तामिळनाडू, गोवा इत्यादी राज्यांनी प्रयत्न केले होते .परंतु महाराष्ट्रात श्री किशन बाबुराव हजारे उर्फ अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाच्या माध्यमातून बारा वर्ष सभा, मोर्चे, मेळावे,उपोषण मौन, घंटानाद ,धरणे इत्यादी आंदोलन व जन आंदोलनाच्या माध्यमातून मोठी चळवळ महाराष्ट्रात सरकार विरुद्ध उभा केली होती .सरकार वरती मोठ्या प्रमाणात दबाव तयार झाला यामधूनच माहिती अधिकाराचा कायदा होऊ शकते हे अण्णा हजारेंनी ओळखले त्यामुळे भारतात माहिती Growth कायद्यासाठी जी आंदोलने झाली त्यात महाराष्ट्रातील अण्णा हजारे चे आंदोलन हे उल्लेखनीय असे ऐतिहासिक आंदोलन होते.

12 जानेवारी 1998 रोजी अण्णांनी महाराष्ट्र सरकारला माहिती अधिकारासाठी पहिले पत्र लिहिले . यानंतर अनेक पत्र व उपोषण आंदोलन करून महाराष्ट्रात माहिती अधिकारासाठी अण्णा हजारेंनी मोठी लोक चळवळ उभी केली शेवटी महाराष्ट्र सरकारने माहिती अधिकार नियम २००२ हा कायदा पास केला हे अण्णा हजारे यांच्या चळवळीचे मिळालेले मोठे यश होते.

**ग्रामसभेला ज्यादा अधिकार** -:

तीस-पस्तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ग्रामसभा हा शब्दही अपरिचित होता .त्यावेळी राळेगण सिद्धी ग्रामसभा आकाराला .या ग्रामसभेतून राळेगणसिद्धी एक आदर्श गाव देशात सर्वप्रथम तयार झाले .हे सर्व करण्यासाठी अण्णा हजारेंचा सिंहाचा वाटा होता .अण्णा हजारेंच्या कल्पनेतून सुंदर असे एक गाव महाराष्ट्रात देशात पाणलोटाचे तयार झाले .त्यानंतर अण्णा हजारे यांनी सरकारकडे ग्रामसभेला ज्यादा अधिकार मिळावेत असे मत व्यक्त केले .लोकसभा विधानसभेप्रमाणे ग्रामसभा ही महत्त्वाची सभा ग्रामविकासासाठी आहे .ग्रामसभा ही खऱ्या अर्थाने विधानसभा व लोकसभेची जननी आहे . कारण या दोन्ही सर्वोच्च सभागृहाची निर्मिती ग्रामसभेतून होते .ग्रामसभा ही स्थायी आहे .वयाची 18 वर्षे पूर्ण झालेला गावातील प्रत्येक नागरिक हा आपोआपच ग्रामसभा सदस्य बनतो .अण्णा हजारेंनी सहा वर्षे सातत्यपूर्ण संघर्ष केल्यानंतर 2003 मध्ये महाराष्ट्र सरकारने ग्रामसभेला ज्यादा अधिकार देणारा कायदा पारित केला.

**दप्तर दिरंगाई कायदा** -:

सामान्य नागरिकाची विविध सरकारी कार्यालयातील कामासाठी नेहमीच अनेक वेळा जावे लागते परंतु सरकारी कर्मचारी अधिकारी नागरिकांचे काम कधीच वेळेवर व पैसे घेतल्याशिवाय करत नाहीत . कार्यालयातील भ्रष्टाचार हा साखळी पद्धतीत होत असे . कुंपणात शेत खात असल्यामुळे तक्रार करून उपयोग नाही .

त्यामुळे अण्णा हजारेंनी आठ वर्ष सातत्याने आंदोलनाचा मार्ग पत्करून सरकारला दप्तर दिरंगाईचा कायदा 20 मे 2006रोजी करण्यास भाग पाडले .प्रत्येक कार्यालयाने नागरिकाची सना जाहीरपणे फलकावर लिहिणे बंधनकारक करण्यात आले .या कायद्यामुळे सरकारी कार्यालय गतिमान होण्यास मदत झाली .लाज खोरीला मोठ्या प्रमाणात आळा बसला आणि सामान्य माणसाची होणारी पिळवणूक कमी झाली .सहा दिवसात संबंधित कायदा कागद पुढे सरकला नाही तर तो का सरकला नाही याचा जा विचाराचा अधिकार सामान्य माणसाला या कायद्याने मिळाला .अशा प्रकारे लोकांना अधिकार मिळवून देणारा दप्तर दिंडाईचा कायदा हे जनआंदोलनाचे मोठे यश म्हटले पाहिजे.

**बदल्यांचा कायदा** -:

विविध सरकारी खात्यामध्ये कर्मचारी व अधिकारी यांच्या बदल्या या प्रशासकीय कामाचा एक भाग आहे .एखाद्या अधिकाऱ्याने एकच ठिकाणी दीर्घकाळ सेवा केल्यास मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतो .त्यामुळे प्रत्येक शासकीय अधिकाऱ्याची तीन वर्षांमध्ये बदली झालीच पाहिजे हा कायदा अण्णा हजारेंनी पारित करण्यास लावला.

**वाळू उपसाबंदी कायदा -:**

भारतात बहुतांशी भागांमध्ये नद्या आहेत .नदी द्वारे या ठिकाणी गावाला पाणी मिळते .या नदीमध्ये हजारो वर्षापासून वाहून आलेली वाळू असल्यामुळे नदीमध्ये पाणी मुरले जाते .व जमिनीचा रिचार्ज होतो . परंतु अलीकडील काळात खूप मोठ्या प्रमाणात नदीमधील वाळू उपसल्यामुळे पाणी मुरत नाही .त्यामुळे महाराष्ट्र शासनाला वाळू उपसण्यासाठी बंदी घालण्यात येणारा कायदा अण्णा हजारे यांनी महाराष्ट्र शासनाकडून पारित करून घेतला .आज ज्या नदीची वाळू उपसण्यात आली त्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष आहे .या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात वाळू व बंधारे आहेत त्या ठिकाणी पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.

**लोकपाल/ लोकायुक्त कायदा**-:

भारतातील संपूर्ण देशातील शासकीय कार्यालयात भ्रष्टाचाराची कीड लागलेली होती .सामान्य माणसाला पैसे दिल्याशिवाय कोणतेच काम होत नव्हते . भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर कायदे करून याची योग्य अंमलबजावणी केली तरच भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल .परंतु सरकारने मागील 75 वर्षात असे कठोर कायदे करण्याचा प्रयत्न केला नाही . माननीय अण्णा हजारेंनी महाराष्ट्रात जनतेच्या सहभागाने जनआंदोलनाने मोठ्या प्रमाणात चळवळ करून राज्यात माहिती अधिकार कायदा,ग्रामसभा,दप्तर दिरंगाई, बदल्याचा कायदा इत्यादी कायदे करण्यास भाग पाडले . सन 1966 स ***भारतात लोकपाल व लोक आयुक्त याची पदे निर्माण करून भारतातील प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी संसदेत कायदा निर्माण करण्याचे सुचविले होते 10 .मे 1986 रोजी गृहराज्यमंत्री श्री विद्या चरण शुक्ल यांनी माननीय श्री यशवंतराव चव्हाण यांच्या मार्फत संयुक्त समितीला लोकपाल बिलाचा प्रस्ताव मांडला होता .यावर 45 सदस्याची एक संयुक्त समिती स्थापन झाली परंतु हे विधायक मंजूर झाले नाही.

भारताला गेल्या 45 वर्षापासून लोकपाल विधेयक संसदेत प्रलंबित होते 1969 .मध्ये पहिल्या लोकपाल विधेयकाला चौथ्या लोकसभेने मंजुरी दिली .मात्र राज्यसभेचे मंजूर होऊ शकले नाही .ज्या ज्या वेळी हे विधेयक संसदेत अनेक वेळा मांडण्यात आले त्या त्यावेळी त्यात सुधारणा करण्याच्या हेतूने ते कोणत्या ना कोणत्या कारणाने मंजूर झाले नाही .शेवटी अण्णा हजारे व अरविंद केजरीवाल इत्यादीच्या सहकार्याने दिल्ली येथे जंतर मंतर वरती 5 एप्रिल 2011 रोजी अण्णा हजारेंनी उपोषणाला सुरुवात केली .दोन ते तीन दिवसात हे आंदोलन सर्व भारतात प्रसारित झाले लोकांनी मोठ्या प्रमाणात आंदोलनात सहभाग घेतला त्यामुळे काँग्रेस सरकारने कमिटी गठीत करून आंदोलन मागे घेण्यास सांगितले यानंतर कमिटीच्या अनेक बैठका झाल्या एक मत न झाल्यामुळे पुन्हा अण्णांनी रामलीला मैदानावर 15 ऑगस्ट 2011 रोजी सुरू केलेले उपोषण 28 ऑगस्ट 2011रोजी सोडले संपूर्ण देशात हे आंदोलन जागृती होऊन सरकारने कायदा करण्याचे ठरविले.

शेवटी 18 डिसेंबर 2013 या दिवशी लोकपाल विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले अशा प्रकारे अण्णा हजारे कडे कोणते पद नसताना वरील कायदे सरकारला करण्यात भाग पाडले या आंदोलनामुळे आम आदमी पार्टीची स्थापना होऊन अरविंद केजवाल दिल्लीचे मुख्यमंत्री झाले तर लोकसभेच्या निवडणुकीत नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान झाले हे केवळ अण्णा हजारे यांच्या चळवळीमुळेच शक्य झाले अण्णा हजारेंनी लोक चळवळीतून सरकारला कायदे करण्यास मोठ्या प्रमाणात भाग पाडले.

**निष्कर्ष** -:

अण्णा हजारेंच्या निस्वार्थ समाजसेवेमुळे लक्षात येते की, समाज हिताची चळवळ चालवली तर लोक त्याच्या पाठीमागे मोठ्या प्रमाणात येतात .याच लोक चळवळीतून चांगले समाज हिताचे कायदे पारित होऊ शकतात.तेच कायदे अण्णा हजारेंनी आपल्या चळवळीतून पारित करून घेतले आहेत .कारण की भ्रष्टाचार ही

समाजाला लागलेली कीड आहे आणि हाच भ्रष्टाचार नष्ट होण्यासाठी अण्णा हजारेंनी आपले आयुष्य पूर्ण खर्च केले . त्यांच्यात चळवळीमुळे भ्रष्टाचाराचे खूप मोठ्या प्रमाणात प्रकरण बाहेर आले .आणि त्यामुळे काँग्रेसचे सरकार या ठिकाणी महाराष्ट्रातून देशातून गेले .अशाप्रकारे अण्णा हजारे यांच्या कार्याची माहिती आपल्याला सांगता येते.

**संदर्भ ग्रंथ**-:


१) पवार के.डी., युगपुरुष अण्णा हजारे, अखिलेश प्रकाशन पुणे, २००८.

२) केंद्रीय सचिवालयातील प्राप्त झालेल्या माहितीनुसार संसदेतील कागदपत्र.

३) ठाकूर प्रदीप, जननायक अण्णा हजारे, प्रभात पेपर बॅग दिल्ली, २०१२.

४) बिजले धनंजय, लढा लोकपालाचा उद्रेक आम आदमीचा, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.

५) प्रा .डॉ .राम बोडखे, अण्णा हजारे यांचे सामाजिक कार्य एक चिकित्सक अभ्यास, शोध प्रबंध, २०१७.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# ग्रंथालय व्यवस्थापनातील नवीन प्रवाह आणि आधुनिकीकरण

**डॉ कातळे संगीता गुलाबराव.**
ग्रंथपाल कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड.
**Email.**-sangitakatale@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15573545**

**सारांश**

प्रस्तुत शोधनिबंधात माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून ग्रंथालयीन आधुनिकीकरण व व्यवस्थापनातील परिवर्तनाच्या अनुषंगाने होत असलेल्या नवीन प्रवाह आणि त्या माध्यमातून उपलब्ध सुविधांची चर्चा करण्यात आलेली आहे आधुनिक तंत्रज्ञानामुळे नवनवीन माहिती मिळविणे ,संघटन करणे, साठवणे व जास्तीत जास्त अचूक माहिती एखादा निर्णय घेताना उपलब्ध करून घेणे शक्य झाले आहेमाहितीतज्ज्ञ अथवा ग्रंथपाल यांना माहितीचे विविध स्रोत शोधून काढून पुस्तके अथवा अशी उप .इतर छापील स्वरूपातील माहिती लोकहितार्थ सुनियोजितपणे संकलित करावी लागतेयुक्त माहिती वाचनीय पुस्तके अथवा साहित्य पारंपरिक दस्तऐवज यांचे आधुनिक तंत्रज्ञानामुळे अद्ययावत व्यवस्थापन करणे सहज शक्य ठरताना दिसून येत आहे म्हणजेच आधुनिक .तंत्रज्ञानामुळे व्यवस्थापनातील नवीन प्रवाह उदयास आलेले आहेतयाच अनुषंगाने ग्रंथालयीन लव्यवस्थापनातीपरीवर्तनाच्या संधी आणि विशेषत्वाने ग्रंथालय विकासाच्या संधी बाबत चर्चा करण्यात आलेली आहेया माध्यमातून होऊ घातलेले ग्रंथालयीन व्यवस्थापनातील बदल आणि साध्य होणार असलेले परिवर्तन याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**सुचनक शब्द-** ग्रंथालय व्यवस्थापन, ग्रंथालय नवीन प्रवाह, व्यवस्थापनातील नवीन प्रवाह

**प्रस्तावना-** अलीकडच्या काळात माहिती युगाला तंत्रज्ञानाच्या प्रगतीची जोड मिळाल्यामुळे माहिती तंत्रज्ञानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. याच माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून आज डिजिटल ग्रंथालय ही संकल्पना रूढ होत आहे. अनेक नवीन कल्पना ग्रंथालयात बघायला मिळतात ग्रंथालयाचे विविध प्रकार अस्तित्वामध्ये आहेत कार्पोरेट व इंडस्ट्री क्षेत्रांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय ही तेथील कर्मचारी, व्यवस्थापक व अधिकारी, इंजिनियर्स यांच्यासाठी उपलब्ध असतात. वेळेनुसार व आवडीनुसार या ग्रंथालयाचा या लोकांना लाभ घेता येतो. तसेच आधुनिक तंत्रज्ञानामुळे नवनवीन माहिती मिळविणे संघटन करणे साठवणे व जास्तीत जास्त अचूक माहिती एखादा निर्णय घेताना उपलब्ध करून घेणे शक्य झाले आहे. माहितीतज्ज्ञ अथवा ग्रंथपाल यांना माहितीचे विविध स्रोत शोधून काढून पुस्तके अथवा इतर छापील स्वरूपातील माहिती लोकहितार्थ सुनियोजित पणे संकलित करावी लागते. अशी उपयुक्त माहिती वाचनीय पुस्त के अथवा साहित्य पारंपरिक दस्तऐवज यांचे आधुनिक तंत्रज्ञानामुळे अद्ययावत व्यवस्थापन करणे सहज शक्य ठरताना दिसून येत आहे.म्हणजेच आधुनिक तंत्रज्ञानामुळे व्यवस्थापनातील नवीन प्रवाह उदयास आलेले आहेत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशाच ग्रंथालय व्यवस्थापनातील नवीन प्रवाहा बाबत प्रस्तुत शोधनिबंधात चर्चा करण्यात आलेली आहे. त्यासाठी काही उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. ती प्रामुख्याने पुढील प्रमाणे आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. ग्रंथालय व्यवस्थापनाचा आढावा घेणे
2. ग्रंथालय व्यवस्थापनाचा उद्देश समजून घेणे.
3. ग्रंथालय व्यवस्थापनातील नवीन प्रवाह अभ्यासणे.
4. माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून ग्रंथालयीन आधुनिकीकरण व व्यवस्थापनातील परिवर्तनाच्या अनुषंगाने चर्चा करणे

**संशोधन पद्धती :** कोणत्याही विषयाचे किवा घटनेचे अध्ययन करीत असताना ते वैज्ञानिक पद्धतीने होणे आवश्यक असते. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे. संशोधन पद्धतीत सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे तथ्य संकलन करणे होय. प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालय व्यवस्थापनातील आधुनिकीकरण व बदल याचे अध्ययन करण्यासाठी हा विषय निश्चित करण्यात आला आहे. प्रस्तूत संशोधनात द्वितीयक स्त्रोतांद्वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. द्वितीयक तथ्य संकलनासोबतच विशेषतः प्राथमिक तथ्य संकलन आणि निरीक्षण पद्धतीवर अधिक भर देण्यात आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या

वापरातून ग्रंथालयीन आधुनिकीकरण व व्यवस्थापनातील परिवर्तनाचे अध्ययन पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असतो. ग्रंथालयातून ही साधने वापरण्यासाठी नेता येतात व मर्यादित कालावधीत परत केली जातात. शाळा-महाविद्यालयांना ग्रंथालय महत्त्वाचे व सक्तीचे असते. यामुळे संदर्भासहीत वाचनाची सवय लागते. लिखाण अभ्यासपूर्ण होण्यासाठी अनेक ग्रंथ एकाच ठिकाणे मिळण्याची सोय होते. बदलत्या काळात दृकश्राव्य माध्यमेही ग्रंथालयांमध्ये दिसून येतात. नवीन ग्रंथालयांचे हे संगणकीय स्वरूप अत्यंत उपयुक्त व सहजता निर्माण करणारे ठरत आहे. कारण आंतरजालाच्या उपलब्धतेमुळे कोणत्याही माहितीचा शोध सहज शक्य ठरत आहे. तसेच कमीतकमी वेळेत योग्य ते वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी आणि ज्ञान साधनांचा वाढलेला आवाका, प्रकाशनांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ इ.सारख्या अनेक घटकांचा विचार करता विविध प्रकारच्या सेवांचे आयोजन ग्रंथालयांना करावे लागत आहे. हे आधुनिक व्यवस्थापनाच्या माध्यमातूनच शक्य ठरणार आहे. या हेतूने ग्रंथालय व्यवस्थापनातील नवप्रवाह यांची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरत आहे.

ग्रंथालय व्यवस्थापनातील नवप्रवाह व व्यवस्थापनाचे आधुनिक स्वरूप : व्यवस्थापन ही संकल्पना एक महत्त्वपूर्ण अशी बाब असून व्यवस्थापनाच्या स्वरूपात कालसापेक्ष बदल झालेला आहे. कालमानानुसार बदलणाऱ्या भौतिक बाबीच्या अनुषंगाने साधनसामुग्री, पर्यावरण, आर्थिक स्रोतांचे स्वरूप, उत्पादन, विपणन व विक्री यामुळे व्यवस्थापनाच्या स्वरूपात बदल घडणे अपरिहार्य ठरते. ग्रंथालय व्यवस्थापनाचा विचार करता अगोदरच्या काळात ग्रंथालयीन स्वरूप हे हस्तलिखितासारखे होते. कालमानानुसार मुद्रित- अमुद्रित साहित्य उपलब्ध झाले. परिणामी अशा प्रलेखांचे संग्रहण व त्यावर आधारित सेवा यांचे स्वरूपही बदलले. ज्ञानाच्या माहितीचा विस्फोट व संप्रेषणातील अत्याधुनिक तंत्रज्ञान यामुळे ज्ञानाच्या माहितीच्या आदानप्रदान पद्धतीमध्ये गतीमान बदल झाला. त्याप्रमाणेच वाचकांच्या वाचन अभिरुचीमधील बदल, त्यांच्या गरजांमधील बदल यामुळे व्यवस्थापनाचे स्वरूप सतत बदलत गेले. यातूनच आधुनिक व्यवस्थापन पद्धतीचा उदय झाला. उदयाला आले. व्यवस्थापनविषयक आधुनिक दृष्टीकोनामुळे संस्थेच्या कार्यात गुणवत्तापूर्ण वृद्धी करण्यास मदत होते. याचबरोबर कोणत्याही व्यवस्थापनामध्ये व्यवस्थापन पद्धतींना महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यवस्थापनाच्या अवलंबनामुळे विविध स्तरावर समस्यांचा आढावा घेऊन समस्येचा निराकरण करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करणे सोपे होते व संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकसंध वृत्तीने कार्यरत होता येते. वेळोवेळी होणाऱ्या मूल्यांकनाद्वारे समस्या निराकरण होऊन गुणवत्तापूर्ण उत्पादने वा सेवा उपलब्ध करणे शक्य होते. संस्थेच्या ध्येयधोरणानुसार मूल्य प्रभावीतता वा मूल्यावर आधारित फायदा यांची पडताळणी करणे शक्य होते. यातूनच ग्रंथालय व्यवस्थापनाचे आधुनिक स्वरूप स्पष्ट होते.

**अद्ययावत माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार** : माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन कल्पना प्रत्यक्ष कार्यरत होताना दिसतात. या नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार ग्रंथालय व्यवस्थापनाद्वारे होणे गरजेचे आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाद्वारे ग्रंथालयीन सेवा अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्यात सुधारणा व आधुनिकीकरण साधने गरजेचे आहे.

ग्रंथालय व्यवस्थापन आणि इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे **व्यवस्थापन :** अलीकडच्या काळात ग्रंथालय व्यवस्थापनात इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वपूर्ण बाब ठरत आहे. इलेक्ट्रॉनिक संसाधने जरी इतर अद्ययावत व जतन करण्यास सोपी असली तरी अशा प्रकारच्या संसाधनांचे व्यवस्थापन करणे ही फारच महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी ग्रंथपालांनी खालील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक आणि सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर माहितीचे संग्रहण आणि उपलब्धता यावर भर देण्यात येत आहे. ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयीन सेवा अद्ययावत करून देण्यावर भर दिला जात आहे. देशभरातील आधुनिक तंत्रज्ञानाचा (आयसीटी) वापर करून अभ्यासक, संशोधक तसेच वाचक व्यक्तींसह सर्वांसाठी पुस्तकांची उपलब्धता आणि परिपूर्णता सुनिश्चित करण्यासाठी नवीन प्रवाह उपयुक्त ठरणार आहेत. ही उपलब्धता ग्रंथालय व्यवस्थापनातील नवप्रवाह यांच्या माध्यमातून निश्चित केली जाणार आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयीन आधुनिकीकरणाच्या अनुषंगाने ग्रंथालयाचा संग्रह सर्वसमावेशक असावा. आणि त्यात खालील गोष्टींचा समावेश असावा असे नमूद करण्यात आलेले आहे.

1. डिजिटल ग्रंथालयीन सुविधा
2. बहु-भाषिक ग्रंथालयीन सुविधा
3. बहु-स्तरीय पुस्तके
4. द्विभाषिक पुस्तके
5. जागतिक साहित्यासह भारतीय साहित्य
6. सर्व भाषांमधील अत्याधुनिक आणि शास्त्रीय साहित्याचे मिश्रण

7. विविध देशांतील मिथक आणि कथा

याबरोबरच ग्रंथालयीन आधुनिकीकरणाच्या अनुषंगाने अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे की, भारतीय भाषा आणि आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये उच्च-गुणवत्तेचे संस्कार करण्याव्यतिरिक्त, विद्वानांना जगातील समाजांबद्दल जाणून घेण्यास आणि त्यांचे जागतिक ज्ञान समृद्ध करण्यास मदत करण्यासाठी भाषा साक्षरतेला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. तसेच भारताचा अभिमान व्यक्त करणारी आणि प्राचीन आणि अत्याधुनिक संस्कृती आणि ज्ञान प्रणाली आणि परंपरा यांची सक्षमपणे साक्ष देणारी ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचा समावेश आहे.

**ग्रंथालयीन व्यवस्थापन आणि आर्थिक अंदाजपत्रक :** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयीन आधुनिकीकरणाच्या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक संसाधनांची केवळ एकदा खरेदी करून भागेल, असे नाही तर ती माहिती वापरण्यासाठी पाहण्यासाठी लागणारे उपयुक्त तंत्रज्ञान, तसेच ती माहिती विशिष्ट कालावधीनंतर अद्ययावत करून घेणे गरजेचे असते, तसेच त्याचे मालकी हक्क खरेदी करण्यासाठीसुद्धा आर्थिक तरतुदीची गरज असते. ग्रंथपालांना आर्थिक अंदाजपत्रक वेळोवेळी बदलून योग्य तरतूद करावी लागणार असल्याचेही अपेक्षित आहे.

**ग्रंथालयीन व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाची कालबध्दता :** तंत्रज्ञानातील उत्क्रांतीचा हा एक परिणाम आहे, की ज्यामुळे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यावर जुने तंत्रज्ञान फारसे उपयोगात आणले जात नाही आणि एका अर्थाने ते कालबाह्य ठरते. उदा. हार्डवेअरमध्ये वेळोवेळी बदल होत आहेत, नवनवीन आज्ञावली अस्तित्वात येत आहेत. त्यामुळे आपला संगणक सतत अद्ययावत करणे गरजेचे आहे.

**आधुनिक संसाधानाचे मालकी हक्क** : आंतरराष्ट्रीय ठरावानुसार बौद्धिक हक्कामध्ये कॉपीराइट हा महत्त्वाचा असून, लेखकाने प्रकाशित केलेल्या तारखेपासून हयातभर व हयातीनंतर ६० वर्षे अशा अधिकारांचा अंमल असतो. या कालावधीनंतर असे पुस्तक सार्वजनिक वापरासाठी मुक्त होते. अंकीय रुपांतरासाठी अशी ग्रंथसंपदा फक्त विचारात घेता येते किंवा पूर्वपरवानगीसह ग्रंथाचा विचार करता येतो. इलेक्ट्रॉनिक प्रकाशनामध्ये दिवसेंदिवस अतिशय वेगाने बदल होत आहेत. यामुळे आधुनिक संसाधानाचे मालकी हक्क यावर भर देण्यात येत आहे.

समारोप : ग्रंथालये ही स्वयंशिक्षणाची लोकविद्यापीठे मानली जातात. 'ग्रंथालय' या संज्ञेला विकसित देशात व्यापक आशय आहे. ग्रंथपालाला तेथे 'माहिती शास्त्रज्ञ' असे संबोधले जाते. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर ग्रंथालयांचे स्वरूप एक अद्ययावत माहिती केंद, अभ्यास केंद, संशोधन केंद असे झाले आहे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत आणि माहितीचे महाजाल विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रंथालयांना फार मोठी भूमिका व जबाबदारी पार पाडायची आहे. ही ग्रंथालयीन व्यवस्थापनाची भूमिका व जबाबदारी नवीन प्रवाहाच्या माध्यमातून आव्हानात्मक असली तरी त्याची नितांत आवश्यकता आहे. आजकाल इंटरनेट डिजिटल ग्रंथालये यांचा होत असलेला विकास व त्यांचा सर्वस्तरीय अवलंब हे ग्रंथालय संस्कृती समोरचे मोठे आव्हान आहे. ज्ञानव्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर परस्पर आदान-प्रदानता नव्या ज्ञानस्रोतांचा व बाह्य स्रोतांचा स्वीकार उदा. कोलॅबरेटिल प्लॅटफॉर्मस् रिपॉझरिपिज यांचा सापेक्ष वापर व त्यावर आधारित प्रभावी सेवा, ग्रंथालय सेवांचे माहिती सेवांत होत असलेले परिवर्तन आणि या प्रभावीपणे वाचकांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याने प्रशिक्षणास प्राधान्यक्रम प्राप्त झाला आहे. नवी प्रमाणके निर्धारित करणे निकष व नियमांचा अवलंब करणे प्रभावी सेवा देत असताना आपल्या ग्रंथालयाची सुरक्षितता जपणे व वैशिष्ट्य टिकविणे हे ग्रंथालय क्षेत्रातले आधुनिक संस्कृतीपुढील फार मोठे आव्हान आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. दै.लोकसत्ता १७ जुलै २०२२
2. महाराष्ट्र टाइम्स २५ जून २०२२
3. डॉ.सत्यप्रकाश निकोसे ग्रंथालय आणि माहितीशात्र, संशोधन पदधती, प्रज्ञा प्रकाशन,नागपूर.
4. डॉ.प्रकाश जैन, डॉ.प्रमोद डाखोळे, डॉ.दत्तात्रय देशपाडे, डॉ.खेडकर- सुलभ ग्रंथालयशास्त्र, युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे.
5. डॉ. द.ना.फडके, ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकिकरण, युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे.
6. डॉ.सत्यप्रकाश निकोसे-ग्रंथालय व्यवस्थापन, प्रज्ञा प्रकाशन,नागपूर.
7. डॉ.प्रकाश जैन आणि डॉ. मंगला हिरवाडे - सुलभ माहिती तंत्रज्ञान, प्रज्ञा प्रकाशन,नागपूर.
8. www.librarywikipedia.org
9. www.librarymodernisation .org

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# नवीन शैक्षणिक धोरण 2020 मुळे प्राध्यापकांच्या माहिती विषय गरजांचा अभ्यास करताना ग्रंथालयाची भूमिका : एक अभ्यास

**प्रा.डॉ.विक्रम दहिफळे[1] प्रा.मोरे जयंत हंसराज[2]**
[1]ग्रंथपाल व विभाग प्रमुख राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना
[2]ग्रंथपाल जनविकास महाविद्यालय, बनसारोळा
DOI-10.5281/zenodo.15573647

**प्रस्तावना :**

आधुनिक जगात ज्ञानाच्या कक्षा दिवसेंदिवस विस्तारत आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यासाठी अद्यावत माहिती आपल्या संग्रही असणे ही प्रत्येक व्यक्तीची काळाची गरज झाली आहे. नवीन तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी व वाढत्या लोकसंख्याला आधुनिक ज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण पद्धतीमध्ये बदल करणे आवश्यक झाले आहे. या बाबी समोर ठेवून नवीन शैक्षणिक धोरण 2020 लागू करण्यात आले आहे. या धोरणाला 20 जुलै 2020 मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या शैक्षणिक धोरणांतर्गत उच्च माध्यमिक व पदवीच्या विद्यार्थ्यांना सर्व शाखा मधील आवडीनुसार विषयाचे ज्ञान घेता आले पाहिजे याकरिता शैक्षणिक धोरणात लवचिकता निर्माण करण्यात आली आहे. यावरून असे म्हणता येईल की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे एक सर्वसमावेशक धोरण आहे. जे भारतामधील भविष्यातील शिक्षणाच्या दृष्टिकोनाची रुपरेषा समोर ठेवून तयार केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होणार आहे. तसेच धोरणाअंतर्गत अभ्यासक्रमात लवचिकता असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि अभिरुचीनुसार विषय निवडण्याची संधी देण्यात आली आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व समोर ठेवून अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे. वरील सर्वच बाबी पूर्णत्वास नेण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात प्राध्यापकांना अध्ययन अध्यापनासाठी लागणाऱ्या ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, शैक्षणिक साधने, माहिती विषय गरजांची पूर्तता करण्यासाठी महाविद्यालयात ग्रंथालय हा महत्त्वाची भूमिका बजावत असते. यासाठी“ नवीन शैक्षणिक धोरण 2020 मुळे प्राध्यापकांच्या माहिती विषय गरजांचा अभ्यास करताना ग्रंथालयाची भूमिका : एक अभ्यास ”या विषयाची निवड करण्यात आली आहे .यासाठी पुढील प्रमाणे अध्ययनाच्या उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) नवीन शैक्षणिक धोरणात प्राध्यापकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

2) नवीन शैक्षणिक धोरणात प्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

3) प्राध्यापकांच्या माहिती विषयक गरजा पूर्ण करण्यात महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

सदरील उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता खालील प्रमाणे संशोधनाची गृहीतके मांडण्यात आली आहेत.

**गृहीतके:**

1) नवीन शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये प्राध्यापकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

2) प्राध्यापकांच्या अध्ययन अध्यापनासाठी लागणाऱ्या माहिती विषयक गरजा पूर्ण करण्यामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालय महत्त्वपूर्ण आहे.

सदरील गृहीतकांच्या पडताळणी करिता खालील प्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणी करिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला. तर शोधनिबंधाच्या अध्ययनाकरिता दुय्यम

स्त्रोतांचा प्रकाशित व अप्रकाशित तथ्यांचा वापर करण्यात आला आहे. प्रकाशित तथ्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके, वार्षिक अंक, शासनाचे अहवाल इत्यादीचा अवलंब करण्यात आला तर अप्रकाशित तथ्यामध्ये एम .फील., पीएच.डी.चे प्रबंध, निमशासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**विषय प्रतिपादन:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे सर्व विद्याशाकीय समावेशक आहे. या शैक्षणिक धोरणाचा आकृतीबंध 5+3+3+4 असा निश्चित करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरण निश्चित करताना प्रामुख्याने विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण मिळावे, शिक्षण गुणवत्ता पूर्ण असावे, सर्व स्तरातील सर्वांसाठी शिक्षण असावे, शिक्षणात लवचिकता असावी, शैक्षणिक संशोधन व्हावे, अध्ययन अध्यापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर व्हावा इत्यादी प्रमुख शैक्षणिक उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत. ही सर्व उद्दिष्टे पूर्ण करण्यामध्ये प्राध्यापक हा केंद्रस्थानी असणार आहे. प्राध्यापकाच्या भूमिकेमुळेच शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण सुधारणा होणार आहेत. यामुळेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्राध्यापकाची भूमिका ही केवळ शिकवण्यापूर्ती मर्यादित स्वरूपाची नसून ती सखोल आणि सर्वांगीण मार्गदर्शकाच्या स्वरूपात विस्तारित केली आहे. त्यामुळे प्राध्यापकाला वेगवेगळया स्वरूपाची माहिति प्राप्त करावी लागणार आहे .अशी माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालय हे महत्त्वाचे साधन आहे.

**प्राध्यापकांच्या माहिती विषयक गरजा पूर्ण करण्यामध्ये ग्रंथालयाची भूमिका:**

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राध्यापक हा महत्त्वाचा दुवा आहे प्राध्यापकाचा माहिती विषयक गरजा, अध्ययन अध्यापनासाठी लागणारे साहित्य, क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, अध्ययनातील नवनवीन संकल्पना, समस्या इत्यादीची उकल करण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालय महत्त्वपूर्ण आहे.

**प्राध्यापकाचा अध्ययन अध्यापनात ग्रंथालयाची भूमिका:**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्राध्यापकांनी स्वतः सतत शिकणे व विद्यार्थ्यांना शिकवणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना आपल्या विषयात नवीन संशोधन, ज्ञान आणि संकल्पना समजून घेण्यासाठी ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ, संबंधित साहित्य, अध्ययन अध्यापनात येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी ग्रंथालयातून संबंधित साहित्य मिळणे आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयाला नवीन अभ्यासक्रमानुसार पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ इत्यादीची मोठ्या प्रमाणात उपलब्धता करून देणे गरजेचे आहे.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी प्राध्यापक व ग्रंथालयावर:**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी प्राध्यापकांची आहे. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या समस्येचे निरासन करणे, विद्यार्थ्याच्या तर्कशक्ती वाढण्यास मदत करणे, त्यांच्या सर्जनशीलतेत व कौशल्यात भर घालणे आवश्यक आहे. यासाठी प्राध्यापकाबरोबरच ग्रंथालयाची भूमिका देखील महत्त्वपूर्ण आहे. कारण ग्रंथालयातूनच प्राध्यापक व विद्यार्थ्यांना संदर्भित विषयानुसार पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संशोधन पेपर, ई-बुक्स मिळत असतात.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात प्राध्यापक व ग्रंथालयाचे योगदान:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक, नैतिक विकास घडवून आणण्यासाठी प्राध्यापक व ग्रंथालयाचे योगदान महत्त्वपूर्ण असेल यासाठी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून ई लर्निंग प्लॅटफॉर्म, ऑनलाईन डेटाबेस आणि डिजिटल साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत होईल.

**शिक्षणात नवीन तंत्रज्ञानाचा वापर व ग्रंथालय:**

नवीन शैक्षणिक धोरणात आधुनिक तंत्रज्ञान वापरावर भर देण्यात आला आहे. जसे की, अध्यापन करताना प्राध्यापकाने अध्यापनासाठी डिजिटल बोर्डचा वापर करावा. तसेच ग्रंथालयातूनही विद्यार्थ्यांना लिखित संदर्भ ग्रंथाबरोबरच संगणक, इंटरनेट, ऑनलाईन ग्रंथालय, संगणकीय देव-देव, ग्रंथालय वेबसाईट, वेगवेगळया वेबसाईट कशा पहाव्यात, त्यातील महत्त्वाचा घटक कसा संकलित करावा इत्यादीचे ज्ञान प्राध्यापक व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून देणे आवश्यक आहे.

**बहु विषयक शिक्षणावर भर यात प्राध्यापक व ग्रंथालयाची भूमिका:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये बहुविषयक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. यामुळे वेगवेगळया ज्ञान शाखेचे विद्यार्थी वेगवेगळया विषयाचे अध्ययन करू शकतात. उदाहरणार्थ विज्ञान शाखेतील विद्यार्थी संगीत विषयाचे अध्ययन करू शकतो. तर कला शाखेतील विद्यार्थी जीवशास्त्राचा अभ्यास करू शकतो. यामुळे प्राध्यापक व ग्रंथालयाच्या जबाबदारी मध्ये वाढ झालेली आहे. यासाठी ग्रंथालयाला वेगळी आर्थिक तरतूद करावी लागणार आहे. जेणेकरून प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणात येणाऱ्या समस्या सोडवण्यास मदत होईल.

**सारांश**:

वरील घटकाच्या विवेचनावरून असे दिसून येते की, नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजांची व्याप्ती व स्वरूपात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. यामुळे शिक्षणामध्ये प्राध्यापक व ग्रंथालयाची भूमिका बदलत आहे. प्राध्यापकांना अधिक सर्जनशील व नवोन्मेषक बनावे लागणार आहे. तसेच विषयातील आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल साधने, नवीन संकल्पना, संसाधने वापरण्यासाठी प्राध्यापकांना सतत ग्रंथालयाशी संबंध साधावा लागणार आहे. त्यामुळे महाविद्यालयातील ग्रंथालय अत्याधुनिक असणे गरजेचे आहे .ग्रंथालय हे अत्याधुनिक असेल तर प्राध्यापकांच्या सर्व माहिती विषयक गरजा ग्रंथालयातून पूर्ण होतील .यासाठी ग्रंथालयाला ग्रंथालयात मूलभूत भौतिक आणि तांत्रिक सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी, मोठ्या प्रमाणात क्रमिक व संदर्भ ग्रंथाची उपलब्धता आय.सी.टी.चा वापर, ग्रंथालय मॅनेजमेंट सॉफ्टवेअर, इंटरनेट, ग्रंथालय वेबसाईट, रिमोट कंट्रोल टेक्नॉलॉजी इत्यादीचा वापर करावा लागणार आहे.

**संदर्भसूची:**

1. डॉ.रा.ना .घाटोळे, 'संशोधनाची तत्वे आणि पद्धती', मंगेश प्रकाशन नागपूर 2002
2. पाटील एस.के., 'डिजिटल ग्रंथालय आधुनिक काळाची गरज', नाशिक 2004
3. एस.पी.पवार, सौ.सविता भडकते, आर.जी.पवार, सौ.सुनंदा जाधव, एम.व्ही .कुलकर्णी, 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर 2005
4. डॉ.उद्धव आघाव, 'ग्रंथायन', न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी 2012
5. https//www.Wikimedia. org.
6. https//www.ugc.ac.in
7. https//education.gov.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व रोजगार क्षमता

**मोहन दत्तात्रय महाडिक**[1] **डॉ.राजकुमार हिरामण थोरवे**[2]
[1]संशोधक विद्यार्थी डॉ .बा.आं .म .विद्यापीठ ,औरंगाबाद
[2]श्रीमती एस.के.गांधी कला ,अमोलक विज्ञान व पी.एच.वाणिज्य महाविद्यालय ,कडा ता.आष्टी जि .बीड
**Email: e**mohanmahadik@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15573701**

**सार:**

कुशल कामगारांच्या अनुपलब्धता व बेरोजगारी ही भारतातील सर्वात मोठी आव्हान आहेत. अनेक वेळेस समस्या ही नोकरीची उपलब्धता नसून विशिष्ट काम करण्यासाठी युवकांकडे कौशल्ये नसणे ही आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भविष्यात लोकांची रोजगारक्षमता वाढवण्यासाठी शैक्षणिक प्रणाली बदलण्यासाठी आधुनिकीकरण म्हणून काम करणार आहे तसेच याद्वारे तरुणांमध्ये कौशल्य निर्माण करण्यात येणार आहे. NEP 2020 विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये प्रदान करण्यात शिक्षणाचे मूल्य अधोरेखित करते. NEP 2020 विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या कौशल्यांसह सक्षम बनवण्यासाठी शिक्षणाच्या मूल्यावर लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट आहे. या पेपरमध्ये भारतीय पदवीधरांच्या कमकुवत रोजगारक्षमतेच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे तसेच प्रस्तुत धोरणाची मुलभूत तत्वे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 दूरदृष्टी यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**शोधसंज्ञा :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ,रोजगार निर्मिती व क्षमता ,कौशल्य विकास इ.

**प्रस्तावना:**

संपूर्ण मानवीय क्षमता साध्य करण्यासाठी, न्याय्य आणि न्याय्य समाजाचा विकास करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हे मूलभूत साधन आहे .सार्वत्रिक उच्च-गुणवत्तेचे शिक्षण हा व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या भल्यासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधने विकसित करण्याचा आणि वाढवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे .पुढील दशकात भारतात तरुणांची लोकसंख्या जगात सर्वाधिक असेल आणि त्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याची आपली क्षमता आपल्या देशाचे भविष्य ठरवणार आहे . शिक्षण आणि रोजगार ही मूलभूत तत्त्वे आहेत जी लोकांच्या क्षमतेला आकार देतात आणि राष्ट्राच्या वाढीसाठी आणि विकासात योगदान देतात" .अत्यावश्यक काम, व्यवसायाला समर्थन देणे आणि आवश्यक असल्यास प्रगतीशील व्यवसायात प्रवेश करण्याची क्षमता असणे रोजगारक्षमतेशी जोडलेले आहेत ".राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे शिक्षण व्यवस्थेमध्ये फेरबदल करणे आणि विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात सर्वांगिण व व्यावहारिक शिक्षण देणे होय .या धोरणामध्ये भारत सरकारने अभ्यासक्रम ,अध्यापन संरचना , शिक्षणासाठी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन स्वीकारणे ,राष्ट्रीय मुल्यांकन केंद्र व शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रचार करणे इ .चा समावेश होतो.

**जागतिक स्तरावर शैक्षणिक सुधारणा:**

सध्या अस्तित्वात नसलेल्या नोकऱ्या आणि कामाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने तयार असले पाहिजे या वस्तुस्थितीची जाणीव ठेवून, सिंगापूरने मेटाकॉग्निशन आणि स्व-विकासासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी व्यापक शैक्षणिक सुधारणा सुरू केल्या . सिंगापूरचे शिक्षण मंत्री ओंग ये कुंग म्हणतात, की शिकणे ही स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या कामगिरीमधील कोणत्याही तुलनेविरुद्ध सल्ला देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःचे शिक्षण विकसित करण्यास प्रोत्साहित करणे होय .दक्षिण कोरियाने आपला पारंपारिक कठोर अभ्यासक्रम बदलला आहे ज्यासाठी विद्यार्थ्यांना21 व्या शतकातील वास्तविक जीवनातील समस्या आणि आव्हानांना कसे सामोरे जावे याविषयी लवचिकता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी एकात्मिक विज्ञान आणि उदारमतवादी कला शिक्षणासह विज्ञान आणि कला यापैकी एकाची निवडीस

प्राधान्य दिले आहे .म्हणून आज परस्परसंवादा ऐवजी आता डिजिटल साक्षरता, एकात्मिक अभ्यासक्रमाचा प्रचार, चारित्र्य/नैतिक शिक्षण आणि वैयक्तित शिक्षणावर भर दिला जात आहे .याच दृष्टीकोनातून भारतातही विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या व आधुनिक युगात सक्षम बनवण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: 2020**

शिक्षण धोरण हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्जनशील क्षमतेच्या विकासावर विशेष भर देते .हे या तत्त्वावर आधारित आहे की शिक्षणाने केवळ संज्ञानात्मक क्षमताच विकसित केली पाहिजेत असे नाही तर त्यासोबत साक्षरता आणि संख्याशास्त्राची 'पायाभूत क्षमता' व 'उच्च-क्रम' संज्ञानात्मक क्षमता निर्माण करणे आहे .ज्यात कठीण समस्या सोडवणे आहे .प्राचीन आणि शाश्वत भारतीय ज्ञान आणि विचारांचा समृद्ध वारसा या धोरणासाठी मार्गदर्शक आहे .प्राचीन भारतातील शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ या जगातील जीवनाची किंवा शालेय शिक्षणाच्या पलीकडे जीवनाची तयारी म्हणून ज्ञान संपादन करणे हे नव्हते, तर आत्मस्वरूपाची पूर्ण अनुभूती आणि मुक्ती हे होते .जागतिक दर्जाच्या संस्था तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी यांसारख्या प्राचीन भारतातील बहुविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधनाचे सर्वोच्च मापदंड स्थापित केले आणि विविध पार्श्वभूमी आणि देशांतील विद्वान आणि विद्यार्थी तयार केले .भारतीय शिक्षण व्यवस्थेने चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहिरा, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, चाणक्य, चक्रपाणी दत्त, माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम, शंकरदेव, मैत्रेयी, गार्गी आणि थिरुवल्लू यांसारखे महान विद्वान व्यक्तींना निर्माण केले आहे .भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा जगावर मोठा प्रभाव आहे .जागतिक वारशाच्या या समृद्ध वारशांचे पालनपोषण आणि वंशजांसाठी जतन केले पाहिजे असे नाही तर आपल्या शिक्षणाद्वारे संशोधन, वर्धित आणि नवनिर्माण क्षमता उपयोगात आणली पाहिजे.

नवीन शैक्षणिक धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे भारतामधील राहण्याचे किंवा शिक्षण घेण्याचे स्थान कोणतेही असो, दर्जेदार शिक्षण प्रणाली प्रदान करणे आवश्यक आहे. विशेषत :ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित, वंचित आणि कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर लक्ष केंद्रित करणे .शिक्षण हे एक उत्तम आणि आर्थिक आणि सामाजिक गतिशीलता, समावेशन आणि समानता प्राप्त करण्यासाठी सर्वोत्तम साधन आहे .अशा गटांतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रणालीमध्ये प्रवेश करण्यासाठी आणि उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विविध लक्ष्यित संधी उपलब्ध करून दिल्या जातील याची खात्री करण्यासाठी पुढाकार घेणे हे उद्दिष्ट आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची उद्दिष्टे:**

1. शैक्षणिक आणि गैर-शैक्षणिक दोन्ही क्षेत्रात प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शिक्षक तसेच पालकांना संवेदनशील करून प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमता ओळखणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे.
2. शिक्षणात लवचिकता ठेवण्यात आली आहे, जेणेकरुन शिकणाऱ्यांना त्यांचे शैक्षणिक मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची क्षमता असेल आणि त्याद्वारे त्यांच्या प्रतिभा आणि आवडीनुसार जीवनातील स्वतःचे मार्ग निवडता यावेत.
3. सर्व ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी बहुविद्याशाखीय जगासाठी विज्ञान, सामाजिक विज्ञान, कला, मानवीय आणि क्रीडा यांमधील बहुविद्याशाखीयता आणि सर्वांगीण शिक्षणाची उपलब्धता.
4. बहुभाषिकता आणि अध्यापन आणि शिकण्यात भाषेच्या सामर्थ्याला प्रोत्साहन देणे.
5. नैतिकता आणि मानवी व संवैधानिक मूल्ये जसे की सहानुभूती, इतरांबद्दल आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाही भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, वैज्ञानिक स्वभाव, स्वातंत्र्य, जबाबदारी, बहुलता, समानता आणि न्याय इ ची निर्मिती करणे.
6. अध्यापन आणि शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा व्यापक वापर, भाषेतील अडथळे दूर करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रवेश वाढवणे आणि शैक्षणिक नियोजन आणि व्यवस्थापन करणे.
7. उत्कृष्ट शिक्षण आणि विकासासाठी आवश्यक संशोधनास प्रोत्साहन देणे.
8. शाश्वत संशोधनावर आधारित प्रगतीचा सतत आढावा आणि शैक्षणिक तज्ज्ञांकडून नियमित मूल्यांकन करणे.
9. स्वायत्तता, सुशासन आणि सशक्तीकरण याद्वारे नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देताना सार्वजनिक

प्रकटीकरणाद्वारे शैक्षणिक प्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि संसाधन कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी एक 'हलकी परंतु घट्ट' नियामक संस्थेची निर्मित करणे.

**NEP 2020मध्ये रोजगारासाठी संधी:**

**तांत्रिक कौशल्ये:**

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या अहवालानुसार, सुमारे 121 दशलक्ष भारतीय बेरोजगार म्हणजेच सध्या कामाच्याबाहेर आहेत .या संख्येमागील काही प्रमुख कारणे म्हणजे नोकरी शोधणाऱ्यांमध्ये मुख्य कौशल्ये आणि शिक्षणाचा अभाव असेन होय .NEP 2020 चा तांत्रिक कौशल्यावर भर असून यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स) एआय(, -3डी मशीनिंग, बिग डेटा □नालिसिस आणि मशीन लर्निंग यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये व्यावसायिकांना सुसज्ज करून शिक्षण देणे आहे . जीनोमिक स्टडीज, बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, न्यूरोसायन्स, आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वत जीवनासाठी महत्त्वाच्या ऍप्लिकेशन्ससह पदवी शिक्षणात तरुणांची रोजगारक्षमता वाढवणे आणि डिजिटल इंडिया आणि त्यापुढील गरजा पूर्ण करणाऱ्या उद्योजकांची एक परिसंस्था तयार करणे अपेक्षित आहे. .

**कृषी क्षेत्रामधील रोजगार निर्मिती:**

माजी पंतप्रधान यांनी उच्चारलेले उद्गार या ठिकाणी आठवतात ते म्हणजे जय जवान जय किसान .या ठिकाणी जय किसान या शब्दावरून भारत हा कृषीप्रधान देश आहे हे स्पष्ट होते .त्या दृष्टिकोनाचा अंतर्भाव करून NEP 2020ने भारतातील ग्रामीण शिक्षण व प्रशिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी आणि उत्साही करण्यासाठी अंतर्दृष्टी प्रकट केली आहे .भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी जमिनीची कमी होत असलेली कार्यक्षमता, पर्यावरणीय बदल, अन्नाची पर्याप्तता या मूलभूत समस्या आहेत परंतु कृषी शिक्षणाची रचना अतिपरिचित माहिती, पारंपारिक माहिती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान समजून घेण्याची आणि वापरण्याची क्षमता असलेले तज्ञ तयार करण्याकडे NEP 2020चा कल आहे .कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान आणि इंटरनेटचा समावेश करणे ,कृषी कामगार उत्पादकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून ही प्रक्रिया सुलभ करणे या संधी निर्माण करून तरुण कृषी उत्पादकांना स्पर्धेच्या युगात टिकवून ठेवणे उच्च किंमती प्रदान करणे होय.

**विविध भाषांच्या माध्यमातून दुभाषिक रोजगारची निर्मिती करणे:**

वेगवेगळया भारतीय आणि अनोळखी बोलींमध्ये सामान्य लोकांसाठी उपलब्ध असलेली आणि बोलली जाणारी सामग्री .त्यासाठी इंडियन ऑर्गनायझेशन ऑफ इंटरप्रिटेशन अँड ट्रान्सलेशन) IITI) स्थापन करण्यात येणार आहे.

**आपला वारसा आणि संस्कृती पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न:**

आपल्या राष्ट्राचा महत्त्वाचा दृष्टिकोन म्हणजे आपला वारसा आणि संस्कृती यांच्या संरक्षणासाठी वाजवी शक्यतांचा वापर न करणे .यासाठी प्रदर्शन आणि ऐतिहासिक स्थाने ज्यांना कार्य करण्यासाठी पात्र कामगारांची आवश्यकता असते .या क्षेत्रांतील रोजगाराच्या उदयामुळे विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्यशास्त्र आणि संस्कृतीचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा वाढेल .NEP 2020चा विश्वास आहे की विद्यार्थी भारताच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीची माहिती थेट उपलब्ध असावी" .एक भारत श्रेष्ठ भारत "अभ्यासक्रमाचा भाग म्हणून, देशातील 100प्रवाश्यांच्या हरकती ओळखल्या जातील .शैक्षणिक संस्था करतील विद्यार्थ्यांना या आक्षेपांवर आणि त्यांच्या अद्वितीय अनुभवांवर, तात्विक वचनबद्धतेवर, प्रथा, मूळ लेखन आणि माहितीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी पाठवा जेणेकरून या सर्व बाबतीत त्यांची समज अधिक वाढेल . मानव्य, कला आणि भाषांमध्ये प्रगत शिक्षणामध्ये असे उपक्रम आणि पदव्या निर्माण केल्यामुळे या कौशल्यांचा खरोखर फायदा होऊ शकेल अशा रोजगारासाठी आणखी विलक्षण संधी प्राप्त होते.

**कौशल्य आधारित शिक्षण:**

रोजगारक्षमतेवरील सर्वेक्षण अहवाल 13 मध्ये त्या %93 भारतीय पदवीधरांचे चित्रण करण्यात आले आहे, ज्यांच्याकडे उच्च स्तरावरील व्यावसायिक पदवी आहेत त्यांच्याकडे रोजगारक्षमता कौशल्यांचा अभाव आहे . शिक्षणाच्या उच्च स्तरावर कौशल्य-आधारित शिक्षणाच्या जाहिरातीच्या मदतीने ही महत्त्वाची दरी सुधारली जाऊ शकते .भारत सरकारने पुढाकार घेतला आहे आणि अनेक संस्था, संस्था स्थापन केल्या आहेत ज्या रोजगारक्षमतेतील अंतर भरून काढण्यासाठी कौशल्य आधारित शिक्षण देतात .राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, राष्ट्रीय

व्यावसायिक शैक्षणिक पात्रता फ्रेमवर्क, कौशल्य विकास ब्युरो हे काही उपक्रम आहेत ज्याद्वारे विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त होणार आहे आणि होत आहे .

महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात नवीन कल्पना, नवीन कौशल्ये आणि नवीन नावीन्य शोधण्याची कोणतीही संधी मिळत नाही कारण विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करून गुण मिळवावे लागतात .मुक्त अभ्यासक्रम सर्जनशीलता, नावीन्य आणि मुक्त विचारांना प्रोत्साहन हे धोरण देते

**रोजगारक्षमता मूल्यांकन आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे:**

मूलभूत संगणक साक्षरता, मूलभूत गणित, इंग्रजी वाचन कौशल्ये आणि तर्कशास्त्र इ .कौशल्य 10 वीचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना देणे आणि विविध कौशल्य विकास संस्थेच्या माध्यमातून 6-3 महिन्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण करून त्यांना रोजगारक्षम बनवणे.

**सारांश:**

NEP 2020द्वारे मांडली गेलेली उद्दिष्टे ,त्या उद्देशांना अनुसरून विद्यार्थी यांच्यामध्ये निर्माण करावायची कौशल्ये ,नवनिर्माणक्षमता ,संस्कृती विषयीची जाणीव ,डिजिटल क्षमता ,कृत्रिम बुद्धिमत्ता ,मशीन लर्निंग ,अंतराळ ज्ञान ,तंत्रज्ञान इ .विषयीची धोरणे याविषयी विवेचन करण्यात आले आहे.

**संदर्भ:**


1. A Critical Study Of NEP 2020: Issues, Approaches, Challenges, Oppertunities And Criticism Venkateshwarlu. B . Peer Reviewed and Refereed Journal: VOLUME:10, ISSUE:2(5), February:2021.
2. Hillage, J., & Pollard, E. Employability: Developing a Framework for Policy Analysis, (1998); 85(85).
3. Sachan, N. K. Skill Development through Higher Education : An Overview of Indian Scenario and UGC Initiatives. February 2017.
4. https://www.merittrac.com/blog/assessment-and-employability-national-education-policy-2020
5. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf.
6. NEP 2020 : Implementation of New Education Policy in our education system. https://www.hindustantimes.com/education/nep-2020-implementation-of-new-education-policy-in-oureducation-system/story-bw4OiekFCamI7NPoNkgAoJ.htmlOct 22, 2020.
7. https://timesofindia.indiatimes.com/blogs/edutrends-india/nep-2020education-for-employability/

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील विकसित भारत

**श्री. प्रविण रमेश साळवे[1] प्रा.डॉ.गोपीनाथ पांडूरंग बोडखे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी मराठी संशोधन केंद्र आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा,ता,आष्टी जि बीड
[2]मार्गदर्शक मराठी विभाग केंद्र आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा,ता,आष्टी जि बीड
DOI-**10.5281/zenodo.15573761**

**प्रस्तावना**

विकसित भारत करण्यासाठी अनेक समाजसुधारकांच हातभार लागलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतीराव फुले. शाहु महाराज, विनायक दामोदर सावरकर, राजाराम मोहन राय, गोपाळ गणेश आगरकर, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, ई समाजसुधारकांचा उल्लेख करता येईक, त्या पैकी आंबेडकर साहित्यातील विकसी भारत करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे._ते एक भारतीय स्वातंत्र कार्यकत्रे, कायदेतज्ञ आणि राजकीय नेते होते. ज्यानी भारतीय संविधान लिहले.आंबेडकरांच्या भारतीय साहित्यावरील विचारांमुळे आणखी एक मोठा बदल घडला तो म्हणजे दलित साहित्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साहित्याच्या एका नवीन शैलीचा उदय. या शैलीला, ज्याला कधीकधी "बहुजन साहित्य" असेही म्हटले जाते, ती उपेक्षित समुदायांच्या, विशेषतः दलितांच्या अनुभवांवर आणि दृष्टिकोनांवर लक्ष केंद्रित करून वैशिष्ट्यीकृत आहे. आंबेडकरांच्या स्वतःच्या लेखनाने, तसेच इतर दलित लेखकांच्या लेखनाने, या शैलीला जन्म देण्यास आणि भारतीय साहित्यात या लेखकांच्या महत्त्वाच्या योगदानाकडे लक्ष वेधण्यास मदत केली

सामाजिक न्यायावरील त्यांच्या कार्याव्यतिरिक्त, आंबेडकर महिलांच्या हक्कांचे एक मजबूत समर्थक होते आणि त्यांनी भारतात लैंगिक समानतेला चालना देण्यासाठी काम केले. या_विषयांवरील त्यांच्या कल्पना आणि लेखनाने अनेक भारतीय लेखकांना लैंगिक असमानतेच्या_विषयांचा शोध घेण्यासाठी आणि महिलांसाठी अधिक समतापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी_काम करण्यास प्रेरित केले.

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील करविषयक विचार्**

माझी आत्म कथा डॉ,बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकातून करविषयक विचार् मांडण्यात आले आहे

बाबासाहेबांनी कर विषयक विचार स्वतंत्र मजूर पक्षाच्या इ. स. १९३६ च्या जाहीरनाम्यात मांडले आहेत.

1. व्यक्तिगत कर हे लोकांच्या कर देयक्षमतेनुसार आकारावेत.
2. कर हे फक्त सरकारी महसुलाचे साधन नसून आर्थिक विषमता नियंत्रणाचे साधन आहे.
3. ज्याचे उत्पन्न विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा कमी असेल, त्यांना करातून सूट द्यावी.
4. शेतसारा हा ताठर नसून लवचिक आणि परिवर्तनीय असावा.
5. करात समता असावी.
6. लोकांचे जीवनमान घसरविण्यासाठी कराचा वापर करू नये.
7. कर व्यवस्था कार्यक्षम असावी.

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील शिक्षण खर्चविषयक विचार**

बाबासाहेब स्वतः उच्चविद्याभूषित असल्याने आणि त्यांचे अधिक शिक्षण परदेशात झाले असल्याने विदेशी शिक्षण व्यवस्थेचा त्यांचा अभ्यास होता. त्यामुळेच शिक्षण विकासात सरकार आणि सार्वजनिक खर्चाचे स्वरूप आणि भूमिका काय असावी, या विषयीचे विचार त्यांनी इ. स. १९४७ मध्ये लिहिलेल्या आपल्या स्टेट्स अँड मायनॉरिटिज या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथात मांडले आहेत.

1. उच्च शिक्षण विकासासाठीचा खर्च केंद्र आणि राज्य सरकारांनी करावा.
2. शिक्षणासाठी स्वतंत्र अंदाज पत्रक असावे.
3. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी आवश्यक वित्तपुरवठा राज्य सरकारांनी करावा.
4. काही क्षेत्रांत विदेशी शिक्षण अधिक गुणवत्ता प्रधान असण्याची शक्यता असल्याने त्याचा वापर देशात करावा.

5. सामाजिक वंचित गटातील विद्यार्थ्यांना परकीय शिक्षणसुविधा उपलब्ध करून द्यावी आणि त्यासाठी आवश्यक खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करावी.
6. प्राथमिक शिक्षणाच्या आधुनिकीकरणासाठी येणारा खर्च भागविण्यास केंद्र आणि राज्य सरकारांनी विशेष अनुदान द्यावे

**डॉ,बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील चलनविषयक विचार**

माझी आत्म कथा डॉ,बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकातून चलनविषयक विचार मांडण्यात आले आहे

बाबासाहेबांचे मौद्रिक किंवा चलनविषयक विचार त्यांच्या डी. एस. सी. च्या इ. स. १९२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या द प्रॉब्लेम ऑफ द रुपी या संशोधनावर आधारित ग्रंथात आढळतात

**चलनव्यवस्था विषयक**

बाबासाहेबांनी सर्वप्रथम स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतात चलनपद्धती कशी होती आणि तिच्यात कसा बदल होत गेला, हे स्पष्ट केले. त्याबरोबरच अर्थव्यवस्थेतील आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्यासाठीचे पैशांचे महत्त्वही विशद केले. अठराव्या शतकाच्या मध्यात देशात ब्रिटीशपूर्व काळात सोने आणि चांदी अशी दुहेरी चलनपद्धत होती. हिंदू राज्यांच्या काळात सोन्याच्या पैशांवर भर देण्यात आला; तर मुस्लिम राजे चांदीच्या स्वरूपात पैसा निर्माण करत होते; मात्र मुघल राजवटीचे संस्थापक अकबर काळातील पैसा सोने आणि चांदी अशा दुहेरी स्वरूपात होता. या दोन्हीही चलनाचे वजन १७५ ग्रॅम एवढे होते; मात्र त्यांच्यातील विनिमय दर निश्चित केला नव्हता. प्रत्येक राज्यात स्वतंत्र चलनपद्धत होती आणि त्यासाठी गरजांच्या दुहेरी संयोगाची गरज असायची. यातून धातूचे मूल्य भिन्न व स्थित्यंतरे होत असल्याने आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यात अडचणी निर्माण झाल्या. त्यातून चांदी या एकाच धातूचे चलन निर्माण करून एक धातू चलनपद्धत स्वीकारावी असा विचार निर्माण होऊन स्वीकारण्यात आली; मात्र चांदीच्या धातूचे कमी मूल्य आणि होणारे चढ-उतार यातून चांदीच्या स्वरूपातील पैशांच्या मूल्यात सारखी स्थित्यंतरे निर्माण होवून आर्थिक व्यवहार आणि इंग्लंडला द्याव्या लागणाऱ्या अनेक व्याज, निवृत्ती वेतन, लष्कर, प्रशासन अशा देयकांवर प्रतिकूल परिणाम होऊ लागला. त्यातून सुवर्ण चलनपद्धती स्वीकारावी असा विचार पुढे येवून तत्कालीन अर्थमंत्र्यांनी इ. स. १८७२ मध्ये स्वीकारली आणि त्या चलनास मोहर असे म्हटले जावू लागले; मात्र सोन्याच्या धातूस वाढत्या मागणीमुळे त्याचे मूल्य वाढत जावून लाभांश वाटण्यात अडचणी, उद्योगांचा व उदोजकांचा नफा, उद्योगाचा मालक व राज्याचे राजस्व यांवर प्रतिकूल परिणाम होऊ लागला.

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील मध्यवर्ती बँक विषयक विचार**

माझी आत्म कथा डॉ,बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकातून मध्यवर्ती बँक विषयक विचार मांडण्यात आले आहे.ब्रिटिश राजवटीत तत्कालीन भारताच्या चलन आणि वित्तविषयक व्यवस्थेचा अभ्यास करून सुधारणा सुचविणाऱ्या शिफारसी करण्यासाठी इ. स. १९२४-२५ मध्ये हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय रॉयल कमिशन आयोग आपल्या देशात आला. बाबासाहेबांनी चलन व वित्त आयोगाविषयी आपले विचार आणि सूचना प्रश्नावलीच्या माध्यमातून अगोदरच त्या आयोगास सादर केल्या होत्या. भारतासाठी सुवर्ण आणि सुवर्ण विनिमय चलन पद्धत योग्य नाही; कारण सुवर्ण अल्पकालीन फायद्याची, तर सुवर्ण विनिमय पैशांचे मूल्य, विनिमय दर आणि आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करू शकत नसल्याने आर्थिक वृद्धी आणि व्यापार वाढीस योग्य नाही. फक्त स्थिर किंवा मर्यादित अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धतच योग्य असून पैशांचे मूल्य, आर्थिक स्थैर्य, विनिमय दर स्थैर्य, भाववाढ नियंत्रित करून आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस उपयुक्त ठरेल, असे बाबासाहेबांनी म्हटले आहे.

देशातील वित्तव्यवस्थेत स्थैर्य प्रस्थापित करून देशाची आर्थिक प्रगती सुधारण्यासाठी स्वायत्त यंत्रणा किंवा व्यवस्था मध्यवर्ती बँक या स्वरूपात निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यातून आपली चलन व वित्तीय व्यवस्था आर्थिक व विनिमय दर स्थैर्य प्रस्थापित करून आर्थिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, विशेषतः निर्यात वाढीस, पोषक ठरू शकेल. आयोगाला ती शिफारस योग्य वाटली आणि त्यांनी ती स्वीकारली. तसेच इंग्लंड सरकारनेही ते स्वीकारले. या आयोगाच्या शीफारशींमुळे आणि बाबासाहेबांच्या सूचनेमुळे एक स्वायत्त यंत्रणा म्हणून भारतात रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. बँकेचे कर्तव्ये, जबाबदाऱ्या बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले असून ही बँक भारतीयांची मध्यवर्ती बँक म्हणून अस्तित्वात येण्यास त्यांचे संशोधन मुख्यतः जबाबदार आहे.

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील शेतीविषयक विचार**

बाबासाहेबांचा शेतीविषयक विचार हा त्यांचा विकास सिद्धांत आहे. ते प्रथम देशातील शेतीचे महत्त्व सांगतात. नंतर भारतीय शेतीच्या जमिनीचे विभाजन आणि तुकडीकरण, अल्प उत्पादकता, अतिरिक्त अवलंबित्व या प्रश्नांची चर्चा करतात. शेतीच्या योग्य आकारमानाकडे आपण नुसत्या आदानांचा वापर करणे यातूनही शेतीचे प्रश्न सोडविणे शक्य आहे. भारतीय शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी मागणी दृष्टीकोनातून न बघता पुरवठा बाजूनेही पाहणे आवश्यक आहे; कारण त्यातून आवश्यक शेती केवळ शेतीचा स्वतंत्र वेगळा विकास होत नसून त्याबरोबर जलद औद्योगिकीकरण करणे, बिगर शेती रोजगार निर्माण करणे, शेतातील अतिरिक्त लोकसंख्या काढून घेणे, शेती व औद्योगिक विकास यांसाठी एकत्रित प्रयत्न करणे आणि खंडित जमिनीचे एकत्रीकरण करणे यांसारखे उपाय बाबासाहेबांनी सूचविले आहेत. तसेच शेतातील खोती पद्धत शेतकरी आणि कुळ यांना अन्याकारक असल्याने खोती पद्धत बंद करावे, यासाठी १७ सप्टेंबर १९३७ रोजी बॉम्बे विधानसभेत त्यांनी विधेयक मांडले होते; मात्र ते मान्य झाले नाही

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील जलसिंचनविषयक विचार**

बाबासाहेब हे मंत्रिमंडळात श्रम, जल आणि उर्जा अशा तीन कॅबिनेट दर्जाचे मंत्री होते. त्यांनी जलमंत्री म्हणून देशातील जल संपत्ती विकासाचे धोरण आणि विकासासाठी खास प्रयत्न केले आहेत. त्यांच्या तत्कालीन भारताच्या जलसंपत्ती विकास धोरणात जलसिंचन सुविधा विकसित करणे, जलमार्ग, ड्रेनेज आणि देशांतर्गत जलमार्ग विकसित करणे यांचा समावेश होतो. जलविकास धोरणात नदीखोरे प्राधिकरण, प्रादेशिक आणि बहुउद्देशीय नदीखोरे विकास प्रकल्प, प्रशासकीय आणि तांत्रिक तज्ज्ञ संस्था; केंद्रीय जल, सिंचन आणि नौकानयन प्राधिकरण १९४४ या एकूण तीन घटकांचा समावेश त्यांनी केला आहे. याच कालावधीत त्यांनी दामोदर खोरे, सोन खोरे आणि महानदी खोरे विकास प्राधिकरण स्थापन करून या प्रकल्पांच्या विकासाचा पाया रचला. यातूनच शेती विकासासाठी जलसिंचन सुविधा, देशांतर्गत जलवाहतूक व्यवस्था विकसित केल्या

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील ऊर्जाविषयक विचार**

माझी आत्म कथा डॉ,बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकातून बाबासाहेबांनी इ. स. १९४२ ते इ. स. १९४६ या कालावधीत कॅबिनेट दर्जाचे उर्जामंत्री म्हणून देशात उर्जाधोरण निश्चित करून ते राबविण्याबरोबरच देशात उर्जाविकास घडवून आणला. यात त्यांनी विजेची मालकी, लोकांचे कल्याण, प्रभावी प्रशासन, प्रांतिक आणि राज्य सरकारच्या जबाबदाऱ्या यांचा समावेश केला. त्यांनी इ. स. १९४४ मध्ये केंद्रीय तांत्रिक उर्जा मंडळ स्थापन केले. यात उर्जा नियोजन, उर्जा वापर, सार्वजनिक संबध, सचिव, वित्त आणि कोषागर भाग होते. या धोरणांतर्गत उद्योगास उर्जा आवशक्यता आणि पुरवठा, ग्रामीण विद्युतीकरण, जलसिंचनास उर्जा, मापदंड, संशोधन, वीज निर्माते यांसाठी प्रयत्न करण्यात आला. त्यांनी उर्जाक्षेत्रात नाविन्यपूर्ण अशी ग्रीड पद्धत, तांत्रिक मनुष्यबळ विकास यांसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला आहे.

**डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील शिक्षण विषयक विचार**

बाबासाहेबांनी शिक्षणाला अन्नाएवढेच महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, शिक्षणाने स्वाभिमान निर्माण होतो. प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे आहे; मात्र ते पुरेसे नाही. उच्च शिक्षण अधिक महत्त्वाचे आहे; कारण उच्च शिक्षणातूनच देशाची सामाजिक, आर्थिक अशी सर्वांगीण प्रगती होऊ शकते. तसेच सामाजिक दृष्ट्या वंचित लोक शासनकर्ती जमात होऊ शकतात आणि मोक्याच्या जागा मिळवू शकतात.

**डॉ,बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील कामगार कल्याण विषयक विचार**

माझी आत्म कथा डॉ,बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकातून बाबासाहेबांनी कामगार कल्याण विषयक केलेले काम, विचार आणि धोरणे अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यांनी त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्ष्याच्या वतीने कामगारांना किमान वेतन, कामाचे तास कमी करणे, सेवेची सुरक्षितता, बढती, योग्य वेतन, पगारी रजा, आजारपणाची रजा, निवृत्ती वेतन, अपघात नुकसान भरपाई, निवारा गृहे, आरोग्य, शिक्षण इत्यादी मिळवून देण्यासाठी खास प्रयत्न केले. सप्टेंबर १९३६ मध्ये प्रांतिक विधान सभेत कामगार तंटा विधेयकाने कामगार संपास काळे विधेयक म्हणून त्यांनी विरोध केला. त्यांनी सर्व

प्रकारच्या कामगारांच्या परिषदा बोलावून, त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले.

श्रम मंत्री म्हणून त्यांनी कामगार सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यात स्त्रियांना रात्रपाळीस बंदी, गरोदरपणी पगारी रजा, कामगारांना पगारी रजा, कामगार न्यायालये निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी औद्योगिक तंटा कायदा १९४७ निर्माण व मान्य होण्यात सिंहाचा वाटा उचलला असून किमान वेतन कायदा १९४८, निर्वाह वेतन, विश्रांती, सामाजिक सांस्कृतिक संधी, व्यवस्थापनात प्रतिनिधित्व, सक्तीचे आणि मोफत शिक्षण, समान वेतन, बाल कामगार बंदी इत्यादी मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि कामगार कल्याणासाठी भरीव योगदान दिले

**डॉ,बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंब कल्याणविषयक विचार**

बाबासाहेबांवर शिक्षण, पाश्चात्य विचार आणि विचारवंत यांचा प्रभाव होता. त्यामुळे अतिरिक्त लोकसंख्या, लोकसंख्या वाढ आणि गरिबी यांचा जवळचा संबध असल्याचे त्यांची खात्री झाली होती. सामाजिक ताणतणाव आणि शेतकरी अरिष्ट यांमुळे लोकसंख्या नियंत्रण जननदर नियंत्रणातून करावे आणि त्यातूनच कुटुंब कल्याण होईल, असे त्यांचे मत होते. त्यासाठी कृत्रिम साधनांच्या वापराचा त्यांचा आग्रह होता; मात्र त्याला अनेकांचा विरोध होता. म्हणून त्यांनी आपल्या स्वतंत्र मजूर पक्ष्याच्या वतीने मुंबई विधानसभेत

इ. स. १९३८ मध्ये बिगरसरकारी जननदर नियंत्रण ठराव आणला; मात्र त्यास विरोध करून तो ठराव हाणून पाडला. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र त्यातील बराच भाग भारताने स्वीकारला आहे.

**वर्ग, जात, वर्जन व भेदविषयक**

बाबासाहेबांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना वर्ग, जातीचा उद्गम, विकास त्यांतून होणारे भेद आणि व्हर्जन यांचा सखोल अभ्यास केला आणि जाती व्यवस्थेचे उच्चाटन कसे करता येईल, तसेच जाती व्यवस्थेचे अर्थशास्त्र हे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, जातीव्यवस्था ही एक आर्थिक संस्था किंवा व्यवस्था असून ती अनेक कार्ये अर्थव्यवस्थेत करते.

ती श्रमविभाजन न करता श्रमिकांची विभागणी करते. त्यामुळे उत्पादनात अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणातील उत्पादनाचे फायदे मिळत नाहीत. ही श्रमिकांची विभागणी बंदिस्त आणि ताठर असून गतिशीलता कमी करून कार्यक्षमता कमी होते. याचा परिणाम म्हणून उत्पादन व आर्थिक विकास होण्यास आणि वाढत जाण्यास अडथळा निर्माण होतो.

बाबसाहेबांचे विकास प्रतिमान स्वीकारण्याची आज अत्यंत गरज आहे. त्यांनी नियोजन आणि विकासाचा रचलेला पाया आणि जल व उर्जा धोरण देशाच्या वर्तमान समस्या सोडविण्यास उपयुक्त आहेत. त्यांचे शिक्षणविषयक विचार आणि सूचना आपली शिक्षण व्यवस्था सुधारण्यास उपयुक्त आहे. आज कामगार सुधारणा विरुद्ध दिशेने होत असताना त्यांनी सांगितलेले कामगार कल्याण आणि सुरक्षिततताविषयक उपाय आणि धोरण गरजेचे आहे. सामाजिक वंचित, शेतकरी, कामगार, स्त्रिया इत्यादींच्या विकासासंबंधित त्यांनी सूचित केलेले उपाय आजही अत्यंत गरजेचे वाटतात.

**डॉ, बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातील विकास धोरणविषयक विचार**

बाबासाहेबांनी भारताचे आर्थिक नियोजन आणि विकासाचा पाया घातला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे हे विचार आणि धोरणे हे विचारात घेणे आवश्यक ठरते. स्वातंत्र्यपूर्व काळातच इ. स. १९४७ मध्ये त्यांनी भारतासाठीचे विकास धोरण सांगीतले आहे.

त्यामध्ये त्यांनी आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्व प्रकारच्या विषमता आणि गरिबी निर्मूलन करावे. त्यासाठी बळी ठरलेल्या लोकांना प्रगतीच्या उत्तम संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे सांगितले.

सरकारी अधिकारी आणि उद्योगांचे मालक यांनी आपले सहकारी आणि कामगार यांचे जात, धर्म, वंश, वर्ण यांवर आधारित भेद करू नये, अन्यथा तो कायद्याने गुन्हा ठरेल. महत्त्वाचे उद्योग सरकारच्या मालकीचे, तर मुलभूत उद्योग सरकार किंवा महामंडळे यांनी सुरू करावेत. विमा सरकारची मक्तेदारी असावी आणि प्रत्येक नागरिकाचा आयुर्विमा असावा.

शेतीला सरकारी उद्योगाचा दर्जा द्यावा आणि सरकारने शेती उत्पादन व विकास सामुदायिक शेती तत्त्वावर करावा, असे सामाजिक समावेशक विकास प्रारूपही बाबासाहेबांनी स्वतंत्र भारतासाठी दिले आहे.

**थोडक्यात –**

भारताला राष्ट्र म्हणून एकीकृत करण्याचे महान कार्य बाबासाहेबांकडूनः डॉ. भारत पाटणकर 'भारताला राज्यघटनेच्या माध्यमातून एक राष्ट्र म्हणून एकीकृत

करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्याचप्रमाणे हे राष्ट्र सातत्याने विकसित होईल याची तरतूदही त्यांनी घटनेत करून ठेवली, हे बाबासाहेबांचे भारताचे राष्ट्रनिर्माता म्हणून सर्वाधिक मोलाचे योगदान आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.

**संदर्भ:**

1} माझी आत्म कथा- साकेत प्रकाशन-छत्रपती सांभाजीनगर- 6दिसे 2021
2} डॉ. बाबासाहेब आंबेडके वर्तमान सदर्भात- गजानन रा लोहवे-सुधीर प्रकाशन-वर्धा-1 जानेवारी 2017
3} डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 21 शतक -गिरीश जखोरिया- मॅजेस्टिक पब्लिकेशन हाऊस- ठाणे 2015

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# लोककलावंतांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन

**श्री दत्ता काशिनाथ कोकाटे[1] प्रा.डॉ.अनिल गर्जे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता.आष्टी जि.बीड
[2]मराठी विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक एस के गांधी महाविद्यालय कडा ता.आष्टी जि. बीड
DOI-10.5281/zenodo.15573818

**प्रस्तावना**

पिढ्यानपिढ्या ज्यांनी समाजातील लोकांचे मनोरंजन आपल्या लोककलेच्या माध्यमातून केले ते म्हणजे लोकलावंत होय अशा लोक कलावंतांनी आपल्या कलेमधून समाजाचे मनोरंजन त्याचबरोबर समाजाचे प्रबोधन केले .तसेच आपल्या पारंपारिक कलेचा वारसा त्यांनी जोपासला लोककलावंतांनी आपले संपूर्ण जीवन लोकांचे मनोरंजन व समाज प्रबोधन करण्यात व्यथित केले तसेच काही कलावंतांनी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी ते लोकांच्या दारोदार फिरून त्यांनी लोकांचे मनोरंजन केले या लोककलावंतांमध्ये वासुदेव, पोतराज, शाहीर, बहुरूपी, तमाशा कलावंत गोंधळी भारुडे इत्यादी लोक कलावंतांचा समावेश होतो .तसेच काही साहित्यिकांनी आपल्या लोकसाहित्यातून समाजाचे मनोरंजन व समाज प्रबोधन करण्याचे काम केले. त्यांनी लोकांच्या मनोरंजनासाठी लोककला, लोकगीते, भारुडे, पोवाडा, तमाशा व भारुड यांच्या साद्रीकारानातून लोककलेचा रांगडेपणा दिसून येतो. खऱ्या अर्थाने लोककलावंतांनी मराठी भाषेचे वैभव जपण्याचे काम केलेले दिसते .ग्रामीण भागातील कलेसाठी लोककला हा शब्द बहुतांशी वापरला जातो. जीवनाशी संबंधित कलात्मक अविष्काराला लोककला म्हणून ओळखले जाते.

**लोककलावंतांचे सामाजिक जीवन**

पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांचे मनोरंजन करून स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत लोककलावंत जीवन जगत असतात. कला ही त्यांच्या जीवनाची बहुमूल्य अमाप अशी संपत्ती आहे. कार्यक्रमासाठी रोज ह्या गावावरून त्या गावाला जाणे हे नित्यक्रमाचे ठरलेले आहे. गावोगावी भटकंती करणे. पाल ठोकून राहणे. एका जागेवर रहिवाशी नसल्याने शासनाच्या बऱ्याच सुविधांचा त्यांना लाभ घेता येत नाही. जन्माचा पुरावा, वंशावळ दाखला त्यांना सहजासहजी मिळत नाही.

समाजाचे मनोरंजन करणे हे लोक कलावंतांचे ध्येय आहे. लोककलावंतांना समाजामध्ये आपले स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करावयाचे असते. समाजामध्ये लोककलावंत आपले समाज जीवन समाजासाठी व्यथित करण्याचे प्रयत्न करत असतात. कलावंतांना त्यांच्या घराणेशाहीतूनच लोककलेचा वारसा मिळताना दिसून येत आहे.

समाजाचे मनोरंजन करणे, त्यातून मिळणारी मिळकत यावरती आपला उदरनिर्वाह करणे. जुन्या काळात लोककलावंतांच्या कला पाहण्यासाठी गर्दी असायची परंतु आज इतर करमणुकीच्या साधनामुळे गर्दी कमी होताना दिसत आहे. समाजामध्ये जीवन जगत असताना लोककलावंत हितसंबंध जपताना दिसून येतात. आपल्या कलामधून लोकांचे मनोरंजन तर करतातच, त्याचबरोबर स्वतःचाही आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. लोककलावंत आपले संपूर्ण जीवन लोकांच्या करमणुकीसाठी घालवितात. लोककलामुळे लोककलावंतांचे समाजात स्थान उंचावताना दिसून येत आहे. परंपरा म्हणून लोककला जपणाऱ्या कलावंतांची आणि समाजाची एक बांधिलकी निर्माण होत असते. समाजामध्ये जीवन जगत असताना समाजातून अनेक चढ-उतार पहावयास मिळतात. लोककला ही एक अप्रतिम अशी देणगीच म्हणावी लागेल. समाजामध्ये वावरताना आपली मौल्यवान कला, कलावंत समाजाला दाखविताना आपण पाहत आहोत. कलावंत चांगला दिसतो त्याची कला चांगली आहे. परंतु त्याला दारोदारी जाऊन पोटाची खळगी भरावी लागते. कलावंतांना जर काम मिळाले नाही तर त्यांच्यावरती उपासमारीची वेळ येते. आपल्या कलेचे सादरीकरण हेच त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. लोककला ही पारंपारिक जीवन प्रणाली आहे. मानवी जीवनाचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण ढंग आहे. पारंपारिक लोकजीवनात लोककलेचा ठेवा आहे.

**लोककलावंतांचे लोकजीवन**

लोककलावंत आपल्या कलेमधून अविस्मरणीय कलांचा आत्मसाक्षात्कार करताना दिसून येतात.

**पोतराज-**

मरीआईचे भक्त मानले जातात. मरीआई जसे उग्र दैवत आहे तसेच पोतराज हा तिचा भक्तही आहे. पोतराजाचा पोशाख पारंपारिक असतो. त्याने केस राखून अंबाडा बांधलेला असतो. कमरेला नवे जुने हिरवे खण लोंबत असतात. घुंगराची माळ लोंबत असते. पायात वाजणाऱ्या वाळी असतात पोतराज मरीआईला प्रसन्न करण्यासाठी भीषण नृत्य करत असतो.

नृत्याच्या वेळी चार पाच फूट लांबीचा कोरडा आपल्या अंगावर मारत असतो. अंगात देवीचा संचार होतो अशी समजूत आहे. लोक निरनिराळे प्रश्न विचारतात. त्याने दिलेली उत्तरे म्हणजे देवीनेच दिलेली उत्तरे असे मानतात. त्यानंतर गावातील स्त्रिया खना- नारळाने देवीची ओटी भरतात आणि सुपाने पोतराजाला धान्य देतात. पोतराज गाणी म्हणून लोकांचे मनोरंजन करतात.

'लक्ष्मी आई तुझं लेन काही

पांढर पातळ हिरवी चोळी'

पोतराज्याच्या गाड्याविषयी अशी निदर्शनास आलेली माहिती आहे की आंब्याच्या लाकडापासून एक लहानसा गाडा तयार करून दोन लहान लाकडी मूर्ती त्यात ठेवल्या जातात. गावात प्रवेश करण्याच्या प्रत्येक रस्त्यावर नारळ, अंडी पुरले जातात आणि लाकडी मेक ठोकली जाते. यानंतर मरीआईचं चांगलं भलं म्हणत हा गाडा दुसऱ्या गावाकडे सोडला जातो. पोतराज ओवी छंदात गीत गातो मरीआईचं वर्णन करतो.

'आलिया मरीआई

गावाला ताकीद

खंडोबाची आंबील

निघालो मरीआई'

अशा प्रकारे पोतराज आपल्या कलेद्वारे गावातील समाजातील लोकांचे मनोरंजन करत असतो.

**नंदीवाला-**

नंदीवाल्याला तिरूमल असेही म्हणतात. नंदीवाले फेरीवर येतात. त्यांच्याजवळ असणाऱ्या ढोलकीवर धनुकाली सारखी काठी घासून तो गुबू गुबू आवाज करीत असतो. नंदीच्या गळयात घंटांची नाळ, पायात झांजरे, शिंगांना पितळी शेंबी, रंगबिरंगी कपड्यांचे लोंबते गोंडे, पाठीवर झूल, कपाळावर किंवा पाठीवर मारुतीचा पिवळी टाक असतो.

नंदीवाला नंदीला गावाच्या भल्यासाठी प्रश्न विचारतो आणि नंदी मान हलवून प्रतिकूल उत्तरे देतो. कधी कधी नंदी खेळही करून दाखवितो. नंदीवाला नंदीला प्रश्न विचारतो.

'गुबूगुबू यावर्षी पाऊस पडल का आणि नंदी मान हालवून उत्तर देतो.'

**लोककलावंतांचे धार्मिक जीवन**

गणपती उत्सवापासून गुढीपाडव्यापर्यंत अशा अनेक धार्मिक कार्यक्रम लोककलावंत साजरे करताना दिसतात. प्रत्येक सणावाराला देव देवताची उपासना करतात. देवीचे उपवास करतात. शारदीय उत्सवात नऊ दिवस उपवास करतात. कोणतेही कार्य करताना प्रथमतः आराध्य दैवताला नमन करून इष्ट देवताची पूजा करूनच कार्यास सुरुवात करतात. कुलदैवताची जत्रा लोककलावंताची उत्सव श्रद्धेय मानली जाते. या उत्सवांना सणाइतकेच महत्त्व देतात. कुलदैवताच्या यात्रेला घरातील लहान, थोर मोठ्या उत्साहाने येतात.

देव देवतांच्या सण-उत्सवात भाग घेऊन लोककलावंत आनंद साजरा करतात. देवीच्या यात्रेत गायन करून, लोकगीते गाऊन, पूजा करून, धार्मिक विधी लोककलावंत करतात. पोतराज देवीचे गाणे गाऊन, देवीचे महत्व सांगतो. तमाशा कलावंत श्रीकृष्णाचे स्मरण करतात. यात्रेच्या ठिकाणी आपली कला सादर करतात.

**लोककलावंतांची लोकसंस्कृती**

लोकसंस्कृती पारंपारिक साहित्य असते. पुराणकथा, दंतकथा, लोककथा, लोकसाहित्य, लोककलावंत समाजापुढे आणण्याचा प्रयत्न करतात. समाजाची करमणूक करून आपली उपजीविका भागविण्याचे साधन निर्माण करतात. लोकसंस्कृतीमध्ये लोकगीते, नृत्य, पूजा यांचा प्रामुख्याने समावेश होतो. समाजातील सर्वसामान्य नागरिकांनी निर्माण केलेली गीते, कविता, नृत्य प्रकार, पूजा, आरती यांचा समावेश लोकसंस्कृतीमध्ये होतो. लोककलावंत आपल्या लोककलामधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडवितात.

वेशांतर करून लोकांच्या मनोरंजनासाठी निरनिराळी सोंग धारण करणारा लोककलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून लोकसंस्कृतीची जोपासना करताना आढळून येतात. लोक संस्कृतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती सर्वांना सामावून घेते. लोकसंस्कृती ही बहुजनांची संस्कृती होय.

पारंपारिक जीवन जगणारी लोककलावंत समाज जीवनाशी एकरूप झालेले असतात. लोककलावंतांची लोकसंस्कृती साहित्यातून अविस्कृत होताना दिसते.

लोकसंस्कृती लोकसाहित्याचा पायाभूत घटक मांडला जातो, म्हणूनच या संस्कृतीतील देव – देवतांचे उपासक मानले जाते.

लोककलावंतांची आर्थिक परिस्थिती

बऱ्याच कलावंतांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असते. वडिलांचा जो व्यवसाय आहे. तोच मुलाने करावा असे वडीलधाऱ्या मंडळीचे मत असते. पारंपारिक व्यवसायामध्ये आज रोजी स्पर्धा होताना दिसत आहे. लोकसंख्या वाढीमुळे अशा व्यवसायाची विभागणी होताना दिसत आहे. रोज गावोगावी जाऊन दारोदारी फिरल्यामुळे कलावंत एका ठिकाणी स्थायिक होताना दिसत नाही. मुलांना शिक्षणासाठी अडचणी निर्माण होतात. एका गावाहून दुसऱ्या गावाला भ्रमंती असल्यामुळे मुलांना शिक्षणाच्या समस्या निर्माण होताना दिसून येत आहेत. कलावंतांची पारंपारिक कला सादर करणे, ही एक चांगली बाब आहे परंतु त्याचबरोबर लोककलावंतांच्या मुलांना शालेय शिक्षण स्थायिक होऊन घेणे महत्त्वाचे आहे. लोककलामधून ते उदरनिर्वाह करतात. पोटाची खळगी भरवितात परंतु यामध्ये झपाट्याने स्पर्धा निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत तग धरण्यासाठी शालेय शिक्षण घेणे खूप महत्त्वाचे ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) ढेरे रा.चि. : - लोकसंस्कृतीचे उपासक
२) भागवत दुर्गा: - लोकसाहित्याची रूपरेखा
३) मांडे प्रभाकर : - लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन संभाजीनगर आवृत्ती चौथी २०००
४) चौहान विद्या: - लोकसाहित्य, सरस्वती प्रकाशन १९८६

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# आंबेडकरी कवितेतील समाजदर्शन आणि विकसित भारत

**प्रा. डॉ. अनिल गर्जे**
प्रमुख, मराठी विभाग गांधी महाविदयालय, कडा(बीड)
**DOI-10.5281/zenodo.15573887**

**सारांश -:**1960 नंतर साठोत्तरी मराठी वाङ्मयात दलित साहित्याचा प्रवाह आला. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळीतून दलितांना जाग आली, आपल्या हक्काची जाणीव झाली. 'शिका, संघटित व्हा व अन्यायाविरूद्ध लढा' या महामंषाने दलितांमध्ये जागृतीचे वारे वाहू लागले. तरूण पिढी शिकू लागली. त्यांना अन्याय, अत्याचारांची जाणीव झाली. सततचा अन्याय, अत्याचार, अपमान आणि पिळवणूक दलित साहित्य निर्माण होण्यासाठी प्रेरक ठरली दलित कवितेचे मूळ प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंडेबकर यांची विचारधाराच आहे. अर्जून डांगळे म्हणतात, "दलित साहित्य जनसामान्यांच्या, शोषित-पिडितांच्या इच्छा-आकांक्षा चिषित करणारे साहित्य आहे. यात माणसाचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष, त्यांचे दैनंदिन प्रश्न, त्यांचा पदोपदी होणारा अपमान, त्यांचे अनुभव आणि या सगळया घटकांकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे त्या सगळयाचे प्रतिबिंब साहित्यात पडणे अपरिहार्य असेच आहे."1 दलितांच्या वेदनेचा पहिला हुंकार कवितेद्वारे झाला आहे. स्वातंष्यपूर्व कालखंडात किसन फागू बनसोड, आनंदराव टेकाडे, शाहीर घेगडे, वामनदादा कर्डक इ. कवी आंबेडकरांच्या विचाराने भारलेले होते. दलितांना जागे करण्यासाठी त्यांनी कविता लिहिली. 'नाही लढण्याविन मुक्ती'2 ही किसन फागू बनसोड यांची क्रांतिप्रणव करणारी कविता आहे. दलित समाजात क्रांतीची संजीवनी पेरणारी आहे. या कवितेने दलितांची अस्मिता जागी केली. वामनदादा कर्डक म्हणतात.

"तुफानातले दिले आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मुळी न आम्हा शिवे"3

वामनदादांची ही कविता वेदना आणि विद्रोहाने भरलेली आहे.

भारताला स्वातंष्य मिळाले. शिक्षणाच्या सार्वषीकरणामुळे शिक्षण खेडयापाडयातील खालच्या स्तरांपर्यंत पोहचले. शिकलेली नवशिक्षित तरूणपिढी उदयाला आली. बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरीत झालेली ही पिढी होती. त्यांनी आश्वासक अशी काव्य निर्मिती केली. केशव मेश्राम, दया पवार, माधव कोंडविलकर, राजा ढाले, वामन निंबाळकर, अर्जुन कांबळे, नारायण सुर्वे, ज.वि.पवार, दामोदर मोरे, यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ, उत्तम कांबळे, असे अनेक कवींनी दलितांच्या व्यथा, वेदनांना आपल्या काव्यातून मुखर केले. गावकुसाबाहेरच्या लाजिरवाण्या जिण्याची दु:खे जगाच्या वेशीवर टांगली. बाबासाहेबांचे गुणगान आणि विद्रोह तिच्यात काठोकाठ भरलेली आहे.

दलित कवींची सर्व कविता सामाजिक बांधिलकीची जाण ठेवणारी आहे. ही कविता दलितांच्या अन्यायाविरूद्ध, अमानुषतेविरूद्ध, शोषणाविरूद्ध, आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापणेसाठी तिचा लढा आहे. एक भूमिका ती मांडते. अनेक प्रश्न या कवितेने निर्माण केलेले आहेत. एक हत्यार म्हणून तिचा वापर केला जात आहे.

म.सु.पाटील यांच्या मते, " 'गोलपिठा'कार ढसाळ आणि यशवंत मनोहर आपल्या कवितेचे कवितापण ब-याच प्रमाणात जपताना दिसतात. उलट मेश्राम यांची कविता हत्यार म्हणून आकाराला येते. वर्गीय वेदना माष जवळ जवळ सा-याच कवितांतून आविष्कृत होतात. तिचे सर्वात कमी आविष्कार मेश्राम यांच्या कवितेत आढळतात. ती वैयक्तिक वेदनांना अधिक रूप देते. ढसाळ-मनोहरांच्या कवितेमधून त्यांच्या मनात मुरलेले, रक्ताच्या

पेशी-पेशीमध्ये भिनलेले वर्गीय अनुभवविश्व बाहेर येते, तसे मेश्राम यांच्या कवितेबाबत होत नाही. ते या अनुभवविश्वाच्या थोडे बाहेरचे वाटतात. त्या मानाने ढसाळ, मनोहहारांची प्रतिमासृष्टी त्यांच्या अनुभव रुपांना साजेशी वाटते. ती अंगासरशी वाटते''5 याचाच अर्थ असा की, सा-याच कविता बांधिलकी मानत नाहीत, असेच डॉ. म.सु.पाटलांना म्हणावयाचे आहे.

दलित चळवळीचा एक भाग म्हणून दलित कविता पुढे आली. त्यामुळे ती विद्रोही आणि आक्रस्तळी बनत गेली. विषमतेविरूद्ध तिने लढा पुकारला. माणूस म्हणून जगण्याच्या हक्काविषयीच्या लढयातून ती निर्माण झाली. ही कविता विद्रोहाने पेटलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करते. गतकाळातील भोगवटा मांडताना दलित कवितेने प्रचंड आशावादाची, अक्षम्य, उत्साहाची, कृतज्ञतेची गाणी गायिली आहेत. दलिता कविता प्रचंड दु:ख मनात ठेवून दुर्दम्य साहसाच्या आधारे प्रचंड आशावादाबरोबरच विद्रोहाला कुशीत घेऊन मराठी साहित्याच्या प्रांतात अवतरली आहे. असे असले तरी या कवितेने माणूस केंद्रस्थानी ठेवला आहे. 'विद्रोह' दलित कवितेचे मूलद्रव्य आहे. या संदर्भात डॉ.भालचंद्र फडके म्हणतात, ''विद्रोह मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एक मूल्य समूह नाकारून नवा मूल्य समूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो.''6 डॉ. भालचंद्र फडके यांचे म्हणने रास्त वाटते. कारण, मानवी जीवन सुंदर करणे, बंधमुक्त, दु:खमुक्त करणे हाच दलित कवितेचा ध्येयवाद आहे. आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह हे चार घटक दलित कवितेत आहेत. मराठी कवितेला नवे आयाम देणारे अनेक उत्तम कवी दलित साहित्याने दिले आहेत.

''कामगार आहे मी, तळपती तलवार आहे
सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे'' 7

असे स्पष्ट बजावत नारायण सुर्वे यांनी 1960 नंतर मराठी साहित्यात पाय ठेवला आणि क्रांतिकारी स्वर चढवला. शोषितांच्या बाजूने त्यांची कविता उभी राहिली. इथल्या जातीयतेची व पोथीनिष्ठ परंपरांची निर्भर्त्सना त्यांनी केली ते म्हणतात-

''म्हणतात! बेतलेल्याच रस्त्याने गेलात तर
स्वर्ग मिळेल, बेतलेल्याच चार खांबात थू:''

श्रमिकांचे जीवन आपल्या काव्यातून त्यांनी मांडले. परिवर्तनाच्या दिशेने झेपावताना येथल्या परंपरेला त्यांनी आपल्या कवितेतून मोठा धक्का दिला.

नामदेव ढसाळांच्या 'गोलपिठा' नावाचे जग प्रथमत:च मराठी कवितेत आणले. 'गोलपिठात' त्यांच्या प्रतिभेची सगळी ताकद एकवटलेली दिसते. भ. मा. परसवाल म्हणतात,''नामदेव ढसाळ हा दलित आशयाच्या अंगाने जसा श्रेष्ठतम कवी आहे, तसाच बहुआयामी काव्यनिर्मितीच्या अंगाने मराठी कवितेचाही तो समृद्ध व उत्त्ाुंग कवी आहे''8 खरोखरच भाषा, अभिव्यक्ती, आशय व काव्यधारणा या सर्वच बाजूने त्यांची कविता रूढ चौकटी मोडते. सर्व सामर्थ्यानिशी मराठी कवितेत प्रश्नचिन्ह बनून उभी राहते. त्यांच्या काव्याला विद्रोही तलवारीची धार आहे. 'निमित्त 15 ऑगस्ट 71' या कवितेत कवी म्हणतो-

''पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद
महाकाय भगोष्ठ।
स्वातंष्य कुठल्या गाढवीच नाव आहे।
कंचा मुलभूत अर्थ स्वातंष्याचा?''

असा प्रश्न ढसाळांची कविता उभा करते. स्वातंष्य समतेचे आणि बंधूभावनेचे आवाहन करते. त्यांच्या प्रत्येक कवितेत माणुसपणाला आवाहन व आव्हान आहे. 'माणसाने' या कवितेत कवी म्हणतो -

''माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उध्वस्त करून घ्यावे
नंतर उरल्या सूरल्यांनी कुणालाही गुलाम
करू नये ल्ाुटू नये
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी
मानून, त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने रहावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसांवरच सूक्त रचावे
माणसांचेच गाणे गावे माणसाने''9

माणसाने मानवतेची, बंधूतेची, समतेची जीवनप्रणाली स्विकारावी असा उदात्त विचार या काव्याच्या गाभास्थानी आहे.

जीवनातील वास्तव प्रश्नांना सामोरी जाणारी कविता उत्तम बावस्कर लिहितात.

"हे आमचं गाव
या गावातल्या गल्ल्या, आमच्या बापाच्या नाहीत
या गावाची वेस, ही आमची सावष आई!
त्यांच्या वराती, या वेशीतून थाटाने जातात
आमची प्रेतंही तिथून नेता येत नाहीत!"10

ही जीवघेणी वेदना कवीने शब्दबद्ध केली आहे. शरणकुमार लिंबाळे म्हणतात,

"बा, तू त्यांच्या वाटेवर दिवे लावलेस
पण त्यांनी तुझी वाट अंधारीच ठेवली रे!"

आत्मभान आलेल्या मनाचा हा हुंकार आहे. नवजागृत मनाच्या जाणिवांचा हा स्फोट आहे. दलित कविता क्रांतीकारी आहे. क्रांतीची गाणी गाणारी आहे. त्यामुळे क्रांतीची भाषा तिच्या केंद्रस्थानी दिसते.

"सोडा! झोडा! मुलांनो
काळया कुष्यांना फाडू द्या
हरामखोरांना माझा इंगा दाखवू द्या"11

असा संताप ती व्यक्त करते. संताप आणि विद्रोह दलित मनाला पेटविते.

' मग चल उठ तर
तुझा खांदा, माझा खांदा
नट बोल्टाने टाईट सांधू या
तुझे रक्त, माझे रक्त
एका बॉयलरमधे ओतूया
अणूस्फोटाचा झाला नसेल
असा प्रचंड स्फोट करुया"12

अशा स्वरुपाची आवेगता, क्रांतीप्रवणता, आवाहन क्षमता या कवितेत आहे. आवेश, क्रांती आणि आक्रमता ही विशेषता दलित कवितेची म्हणता येईल. आत्मविश्वास, सामाजिकता, क्रांतीसन्मुखता इ. वैशिष्ट्यांमुळे दलित कविता वेगळी ठरली. तिचा एक स्वतंष प्रवाह निर्माण झाला. जीवनवादी भूमिका स्वीकारून बाबासाहेबांच्या विचारप्रणालीचा पुरस्कार करणारी ही कविता आहे. परंतु आज कवितेतील 'विद्राह' क्षीण होताना दिसतो आहे. त्यामागची कारणे कोणती असावीत याचा शोध नवोदितांनी घेतला पाहिजे.

**संदर्भग्रंथ सूची** :


1. डॉ. फडके भालचंद्र, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्री विद्या प्रकाशन पुणे.
2. विद्रोही मराठी साहित्य संमेलन, तिसरे, विद्रोही सांस्कृतिक चळवळ विशेषांक, मुंबई, दि. 31 जानेवारी 2001.
3. जाधव रा.ग., निळी पहाट, श्री विद्या प्रकाशन, पुणे, तृ.आ.1991
4. ढसाळ नामदेव, गोलपीठा, नीळकंठ प्रकाशन, पुणे, द्वि.आ. 1975
5. ढसाळ नामदेव, गोलपीठा, तषैव, पृ. 12
6. लोककवी वामनदादा कर्डक (संपा) सूर्यकांत भगत, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथम आ. 2004
7. सौर पृथ्वीराज (संपा.) साहित्य आणि विद्रोह, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी 2008.
8. सुर्वे नारायण, सनद, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1994
9. भवरे महेंद्र, मराठी कवितेच्या नव्या दिशा, लोकवाङ्मयगृह नागपूर, प्रथम आ. जुलै 2007.
10. पानतावणे गंगाधर, आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्यय कविता, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जाने - 2010.
11. भवरे महेंद्र दलित कवितेतील नवे प्रवाह, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्रथमावृत्ती, फेब्रु. 2001

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# ग्रंथालय शास्त्रातील वर्तमान कल

**श्री.विजय तात्यासाहेब जाधव[1] डॉ.राजकुमार हिरामण थोरवे[2]**

[1]संशोधक विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर.

[2]ग्रंथपाल, श्रीमती एस.के.गांधी कला अमोलक विज्ञान व पी.एच.गांधी वाणिज्य महाविद्यालय, कडा

Email : mevijay.jadhav@rediffmail.com

**DOI-10.5281/zenodo.15573943**

**सारांश -:** ग्रंथालय म्हटल्यावर आपल्यासमोर पारंपरिक ग्रंथालयाचे चित्र डोळयासमोर उभे राहते यामध्ये विविध प्रकारचे मुद्रित वाचन साहित्य त्यांचे मोठ मोठे रॅक्स आणि त्यात छापील साहित्याचा ग्रंथ संग्रह परंतु आजच्या या आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये हे चित्र बदलत आहे पुस्तक त्याच्याऐवजी आता माहिती ,ज्ञान,व्यवस्थापन त्याचे डिजिटल रूपांतर ई-बुक्स ,ई-साहित्य, स्टोरेज, डेटा सायन्स, डेटा मॅनेजमेंट ,व्हर्च्युअल व आभासी तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स इत्यादी अनेक बाबींनी ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात बदलत घडवून आणला आहे आणि या सर्व बदलणाऱ्या बाबींचा थोडक्यात आढावा सदर लेखाच्या माध्यमातून या ठिकाणी घेण्यात आलेला आहे.

**शोध संज्ञा -;** माहिती साक्षरता ,ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरण , ई-संसाधने , व्हर्च्युअल रिॲलिटी आणि ऑगमेंटेड रिॲलिटी , आर्टिफिशियल इंटेलिजेंस , मशीन लर्निंग , मल्टीफंक्शनल स्पेसेस , स्मार्ट लायब्ररी.

डॉ एस.आर.रंगनाथान यांनी अतिशय अभ्यासपूर्वक मांडलेल्या पंचसूत्री पैकी पाचवे सूत्र म्हणजे ग्रंथालय हि वर्धिष्णू संस्था आहे आणि आजच्या युगात जर या सूत्राचा व्यापक अर्थाने विचार केला तर आपणास जाणवते की ग्रंथालयाच्या प्रत्येक घटकात होणारी वाढ व त्यातील मुलभूत बदल हे आपणास याची जाणीव नक्कीच करून देतात.

तंत्रज्ञानातील बदल, वापरकर्त्यांच्या गरजांमध्ये बदल, आणि शैक्षणिक वातावरणातील विकासामुळे ग्रंथालये फक्त वाचन आणि माहिती संकलन केंद्रे राहिली नसून ती माहिती व्यवस्थापन, तंत्रज्ञान, आणि समुदाय विकासाच्या केंद्रांमध्ये बदलत आहेत .

हे बदल आपण खालील मुख्य बाबींच्या आधारे पाहू.

१ .माहिती साक्षरता) Information Literacy)

२. ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरण) Knowledge Management and Sharing)

३ .डिजिटलायझेशन आणि ई-संसाधनांची वाढ

४ .डेटा सायन्स आणि डेटा मॅनेजमेंट

**माहिती साक्षरतेचे घटक**

**1.माहितीची गरज ओळखणे:**

५ .वर्च्युअल आणि आभासी तंत्रज्ञान) Virtual and Augmented Reality)

६ .आर्टिफिशियल इंटेलिजेंस) AI) आणि मशीन लर्निंग

७ .ग्रीन लायब्ररीज) Green Libraries)

८ .मल्टीफंक्शनल स्पेस) Multifunctional Spaces)

९ .आयओटी) Internet of Things - IoT) आणि स्मार्ट लायब्ररीज

१० .क्लाउड बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्स

**माहिती साक्षरता) Information Literacy)**

माहिती साक्षरता) Information Literacy) म्हणजे माहिती शोधणे, मूल्यांकन करणे, वापरणे आणि प्रभावीपणे संप्रेषण करणे याबाबतची क्षमता .माहिती साक्षरता ही कौशल्ये, ज्ञान, आणि समजण्याच्या प्रक्रियेचा एक भाग आहे जी व्यक्तींना विविध प्रकारच्या माहितीच्या स्त्रोतांचा प्रभावी वापर करण्यात मदत करते .आजच्या डिजिटल युगात, माहिती साक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे कारण ती केवळ शैक्षणिक संदर्भातच नाही तर रोजच्या जीवनातही लागू होते शोधात्मक प्रश्न तयार करणे.

समस्येचे स्पष्टीकरण करणे आणि त्या संदर्भात कोणती माहिती आवश्यक आहे हे ओळखणे.

**2.माहिती शोधण्याचे तंत्र:**

विविध स्त्रोतांमधून) पुस्तके, लेख, डेटाबेस, इंटरनेट (माहिती शोधण्याच्या पद्धती समजणे.

योग्य कीवड्र्स आणि शोध यंत्रणा वापरणे.

**3.माहितीचे मूल्यांकन:**

प्राप्त माहितीची गुणवत्ता, विश्वासार्हता, आणि वैधता तपासणे. पूर्वग्रह, प्रामाणिकता, सुसंगतता आणि स्त्रोताची प्रतिष्ठा लक्षात घेणे.

**4.माहितीचा प्रभावी वापर:**

प्राप्त माहितीचे अर्थपूर्ण विश्लेषण आणि मांडणी करणे. एखाद्या समस्या सोडवण्यासाठी किंवा निर्णय घेण्यासाठी माहितीचा योग्य वापर करणे.

**5.नैतिक आणि कायदेशीर विचार:**

माहिती वापरण्याच्या कायदेशीर आणि नैतिक नियमांचे पालन करणे. स्त्रोतांचा योग्य संदर्भ देणे आणि कॉपीराइट कायद्यांचे पालन करणे.

**6.माहितीचे प्रभावी संप्रेषण:**

विविध माध्यमांद्वारे) लेखन, सादरीकरण, डिजिटल साधने (माहिती प्रभावीपणे मांडणे. लक्षित प्रेक्षकांनुसार योग्य स्वरूप आणि भाषा वापरणे.

**माहिती साक्षरतेचे महत्त्व**

१. चांगले निर्णय घेण्यात मदत :माहिती साक्षरता असलेल्या व्यक्ती अधिक माहितीपूर्ण आणि विश्लेषणात्मक निर्णय घेऊ शकतात.
२. शैक्षणिक आणि व्यावसायिक यश :माहिती शोधणे, त्याचे विश्लेषण करणे आणि ते वापरणे हे शैक्षणिक प्रगती आणि करिअर विकासासाठी आवश्यक आहे.
३. दिशाभूल आणि फेक न्यूज यांचा प्रतिकार :माहिती साक्षरतेमुळे व्यक्तींना चुकीच्या माहितीपासून, अफवा आणि फेक न्यूज पासून स्वतःचे संरक्षण करणे शक्य होते.
४. सतत शिक्षण आणि आत्मविकास :व्यक्तींना तंत्रज्ञान, माहिती प्रणाली आणि डिजिटल साधनांशी जुळवून घेण्यात मदत करते.

**ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरण) Knowledge Management and Sharing)**

ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरण) Knowledge Management and Sharing) म्हणजे ग्रंथालयातील ज्ञानाचे संकलन, वितरण आणि प्रभावीपणे वापरणे .ज्ञान व्यवस्थापनाचा उद्देश म्हणजे संस्थेच्या/माहितीच्या नवोन्मेष क्षमता, समस्या सोडवणे आणि निर्णय घेण्याच्या क्षमतेत सुधारणा करणे.

**ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरणाचे महत्त्वाचे पैलू**

**ज्ञान संकलन आणि संग्रहण:** विविध स्त्रोतांमधून माहिती संकलित करणे आणि ती केंद्रीकृत प्रणालीत) उदाहरणार्थ, ज्ञानभांडार, इंट्रानेट किंवा डेटाबेस (संग्रहित करणे. यात तात्त्विक ज्ञान )व्यक्तिगत अनुभव, कौशल्य (आणि स्पष्ट ज्ञान) मॅन्युअल्स, प्रक्रिया इ (.दोन्हींचा समावेश होतो.

**ज्ञान सामायिकरण:** कर्मचारी, टीम किंवा विभागांमधील ज्ञानाचे वितरण. सहकार्य साधने, बैठक, कार्यशाळा, ज्ञान समुदाय, आणि मार्गदर्शनाद्वारे सोपे केले जाऊ शकते.

**ज्ञान पुनर्प्राप्ती आणि प्रवेश:** संग्रहित ज्ञान योग्य वेळी योग्य व्यक्तींना सहज उपलब्ध करून देणे. शोधयंत्रणा, एआय-आधारित चैटबॉट्स, आणि सामग्री व्यवस्थापन प्रणालींनी वापरकर्त्यांना संबंधित माहिती लवकर शोधण्यात मदत होते.

**सहकार्य आणि संवाद:** सहकार्यात्मक प्लॅटफॉर्म) उदा . Microsoft Teams, Slack) रिअल-टाइम संवाद आणि ज्ञान सामायिकरणासाठी मदत करतात.

दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली आणि सामायिक कार्यक्षेत्रे सहकारी संपादन आणि आवृत्ती नियंत्रणास समर्थन देतात.

**संस्थात्मक संस्कृती आणि प्रोत्साहन:** सामायिकरण, सहकार्य, आणि सतत शिक्षणास प्रोत्साहन देणारी संस्कृती प्रभावी ज्ञान व्यवस्थापनासाठी महत्त्वपूर्ण आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी सक्रियपणे ज्ञान सामायिकरण आणि योगदान दिले त्यांना प्रोत्साहन आणि ओळख देणे हे गुंतवणूक वाढवू शकते.

**तंत्रज्ञान आणि साधने:** ज्ञानभांडार, इंट्रानेट, सामग्री व्यवस्थापन प्रणाली, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारखी साधने ज्ञान व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मशिन लर्निंग सारख्या तंत्रज्ञानांचा उपयोग करून ज्ञान शोध आणि शिफारशी सुधारता येऊ शकतात.

**सतत सुधारणा आणि अभिप्राय:** नियमित अद्ययावतता आणि अभिप्राय यंत्रणेमुळे ज्ञान संग्रह अधिक संबंधित आणि उपयुक्त राहतो.

कर्मचारी ज्ञान व्यवस्थापन प्रक्रियांच्या सुधारणेस प्रोत्साहन द्यावे.

**प्रभावीपणाचे मोजमाप:** ज्ञान पुनर्वापर दर, वाचवलेला वेळ, वापरकर्ता समाधान, आणि योगदान स्तर यांसारख्या मुख्य कार्यप्रदर्शन निर्देशकांचे) KPIs) ट्रॅकिंग करून ज्ञान व्यवस्थापन उपक्रमांच्या प्रभावीतेचे मोजमाप केले जाऊ शकते.

**प्रभावी ज्ञान व्यवस्थापन आणि सामायिकरणाचे फायदे**

१. **निर्णय घेण्यात सुधारणा** :अचूक आणि संबंधित माहिती मिळाल्याने जलद आणि चांगले निर्णय घेण्यास मदत होते.
२. **कार्यक्षमता वाढवते** :पुनरावृत्ती कमी होते आणि माहिती शोधण्यासाठी लागणारा वेळ वाचतो, ज्या मुळे उत्पादकता वाढते.
३. **नवीन कल्पनांची निर्मिती** :विविध ज्ञान आणि दृष्टिकोनांच्या सामायिकरणामुळे नवीन कल्पना आणि उपाय सुचू शकतात.
४. **कर्मचारी विकास** :सतत शिकणे, कौशल्य विकास आणि करिअर वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण होते.
५. **संस्थेची चपळता** :सामूहिक ज्ञानाचा वापर करून बदलांना जलदगतीने सामोरे जाण्याची क्षमता मिळते.\

**डिजिटलायझेशन आणि ई-संसाधनांची वाढ**

**डिजिटलीकरण (Digitalization) आणि ई-संसाधनांची वाढ (Growth of E-Resources)** हे आजच्या डिजिटल युगातील दोन महत्त्वाचे घटक आहेत ज्यांनी ग्रंथालय विज्ञान आणि माहिती व्यवस्थापन क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणले आहेत. डिजिटलायझेशनमुळे पारंपारिक ग्रंथालये डिजिटल ग्रंथालयांत रूपांतरित होत आहेत आणि ई-संसाधनांची उपलब्धता आणि प्रवेशक्षमता खूप वाढली आहे.

डिजिटलायझेशन) Digitalization) काय आहे?

डिजिटलायझेशन म्हणजे पारंपारिक मुद्रित किंवा भौतिक स्वरूपातील माहितीचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करणे. यात पुस्तके, जर्नल्स, हस्तलिखिते, नकाशे, चित्रे, आणि इतर प्रकारच्या वाचन आणि संदर्भ साहित्याचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करणे समाविष्ट आहे. हे ग्रंथालये, संग्रहालये, आणि शैक्षणिक संस्थांसाठी उपयुक्त ठरले आहे.

**डिजिटलायझेशनचे फायदे:** सुलभ प्रवेश) Easy Access): डिजिटल संसाधने इंटरनेटद्वारे उपलब्ध असतात, त्यामुळे वाचक आणि संशोधक कुठूनही आणि कधीही त्यांचा वापर करू शकतात.

१. **दीर्घकालीन जतन (Long-term Preservation):** डिजिटल स्वरूपामुळे पारंपारिक साहित्याची दीर्घकालीन जतन करणे सोपे होते. प्राचीन हस्तलिखिते, नोंदी, आणि दुर्मिळ पुस्तके डिजिटल स्वरूपात संरक्षित केली जाऊ शकतात.
२. **शेअरिंग आणि सामायिकरण (Sharing and Collaboration):** डिजिटल संसाधनांचे सहकार्याने वापर आणि सामायिकरण सोपे होते. हे विशेषतः शैक्षणिक आणि संशोधन समुदायांसाठी उपयुक्त ठरते.
३. **स्पेस सेविंग (Space Saving):** पारंपारिक ग्रंथालयांना मोठ्या प्रमाणात भौतिक जागेची आवश्यकता असते, पण डिजिटल ग्रंथालये ही जागेची बचत करतात.
४. **सर्च आणि रिट्रिव्हल (Search and Retrieval):** डिजिटल ग्रंथालयात सामग्री शोधणे आणि मिळवणे सोपे होते. त्वरित शोध तंत्रांचा वापर करून उपयोगकर्ता हवी असलेली माहिती पटकन शोधू शकतो.

**ई-संसाधनांची वाढ) Growth of E-Resources):**

ई-संसाधने म्हणजे डिजिटल स्वरूपातील शैक्षणिक, संशोधन, आणि संदर्भ साहित्य. यामध्ये ई-बुक्स, ई-जर्नल्स, डेटाबेस, ऑडिओ बुक्स, व्हिडिओ लेक्चर्स, आणि डिजिटल आर्काइव्हज यांचा समावेश होतो. या संसाधनांचा वापर पारंपारिक मुद्रित साहित्याच्या तुलनेत वेगाने वाढला आहे.

**ई-संसाधनांचे प्रकार:**

१. **ई-बुक्स (E-Books):** मुद्रित पुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या. अनेक प्रकाशक आणि ग्रंथालये आता ई-बुक्सचा संग्रह वाढवित आहेत.
२. **ई-जर्नल्स (E-Journals):** शैक्षणिक आणि संशोधन विषयक जर्नल्सची डिजिटल आवृत्त्या. ई-जर्नल्समध्ये पेपरचे शोध, रीफरेन्स, आणि डाउनलोड करणे सोपे असते.
३. **डेटाबेस (Databases):** संशोधन, सांख्यिकी माहिती, आणि संदर्भासाठी विविध प्रकारचे डेटाबेस उपलब्ध आहेत, जसे की JSTOR, IEEE Xplore, PubMed, इत्यादी.
४. **ऑडिओ बुक्स आणि पॉडकास्ट्स (Audio Books and Podcasts):** वाचनासोबतच ऐकणे हा पर्यायही लोकप्रिय झाला आहे. हे विशेषतः दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी उपयुक्त आहे.
५. **व्हिडिओ लेक्चर्स आणि ऑनलाइन कोर्सेस:** डिजिटल शिक्षणाचा एक भाग म्हणून, अनेक शैक्षणिक संस्था आणि प्लॅटफॉर्म्स व्हिडिओ लेक्चर्स आणि कोर्सेस

ऑफर करतात, जसे की Coursera, edX, Khan Academy.

६. **डिजिटल आर्काइव्हज आणि रिपॉझिटरीज (Digital Archives and Repositories):** संशोधन पेपर, थीसीस, आणि इतर शैक्षणिक साहित्याचे डिजिटल संग्रह. उदाहरणार्थ, DSpace, EPrints.

डिजिटलायझेशन आणि ई-संसाधनांची वाढ यांचे परिणाम:

१. **शैक्षणिक आणि संशोधनासाठी सुधारित प्रवेश (Improved Access for Education and Research):** डिजिटल ग्रंथालये आणि ई-संसाधने विद्यार्थ्यांना, संशोधकांना, आणि शिक्षकांना जागतिक स्तरावरील साहित्य उपलब्ध करून देतात, ज्यामुळे संशोधनाची गुणवत्ता वाढते.

२. **कमी खर्च (Cost Efficiency):** मुद्रित पुस्तकांच्या तुलनेत ई-बुक्स, ई-जर्नल्स, आणि डिजिटल सामग्रीची किंमत कमी असते. यामुळे आर्थिकदृष्ट्या ग्रंथालयांसाठी फायदेशीर ठरते.

३. **पर्यावरणपूरक (Eco-friendly):** डिजिटलायझेशन पर्यावरणपूरक आहे कारण त्यात कागदाचा वापर कमी होतो.

४. **शिक्षणामध्ये नाविन्यता (Innovation in Learning):** ई-संसाधने वाचन अनुभव आणि शिक्षण पद्धतीत नाविन्यता आणतात. मल्टिमीडिया स्वरूपातील शिकण्याच्या साधनांचा वापर करून विद्यार्थी शिकण्याच्या प्रक्रियेत अधिक रुची घेतात.

५. **डेटा ॲनालिटिक्स (Data Analytics):** ई-संसाधनांचा वापर करून वाचकांच्या वर्तनाचे विश्लेषण करणे सोपे झाले आहे, ज्यामुळे ग्रंथालये त्यांच्या सेवा सुधारण्यासाठी डेटा-संचालित निर्णय घेऊ शकतात.

आव्हाने आणि उपाय:

१. **कॉपीराइट आणि परवाना (Copyright and Licensing):** ई-संसाधनांच्या वापरासाठी योग्य परवाना आणि कॉपीराइट धोरणांची आवश्यकता आहे. हे सुनिश्चित करणे की सर्वकाही कायदेशीर आणि नैतिक आहे.

२. **डिजिटल विभागणी (Digital Divide):** सर्वांना डिजिटल संसाधनांचा प्रवेश नाही. इंटरनेट कनेक्टिव्हिटी, डिजिटल साक्षरता, आणि साधनांची उपलब्धता या गोष्टींमुळे काही अडचणी येऊ शकतात.

३. **डेटा सुरक्षा (Data Security):** डिजिटल साहित्याची सुरक्षा आणि गोपनीयता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. सायबर हल्ल्यांपासून संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना आवश्यक आहेत.

**डेटा सायन्स आणि डेटा मॅनेजमेंट**

डेटा सायन्स) Data Science) आणि डेटा मॅनेजमेंट )Data Management) हे दोन्ही क्षेत्र आजच्या डिजिटल युगात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहेत, विशेषतः ग्रंथालय विज्ञान आणि माहिती व्यवस्थापन क्षेत्रात .दोन्ही संकल्पना माहितीचे विश्लेषण, व्यवस्थापन, आणि त्याचा प्रभावी उपयोग करण्यावर केंद्रित आहेत.

**डेटा सायन्स) Data Science) काय आहे?**

डेटा सायन्स ही शास्त्रशाखा मोठ्या प्रमाणात डेटा) Big Data) विश्लेषणासाठी सांख्यिकी, गणित, संगणक विज्ञान, आणि मशीन लर्निंग या तंत्रांचा वापर करते .डेटा सायन्सचा उद्देश आहे, महत्त्वाच्या निष्कर्षांवर पोहोचण्यासाठी डेटातून उपयुक्त माहिती काढणे.

**डेटा सायन्सचे मुख्य घटक:**

१. डेटा संकलन) Data Collection): विविध स्त्रोतांमधून डेटाचे संकलन करणे, जसे की ग्रंथालय वापरकर्ता डेटाबेस, डिजिटल ग्रंथालय वापर, सोशल मीडिया, आणि वाचन सवयी.

२. डेटा पूर्वप्रक्रिया) Data Preprocessing): कच्चा डेटा स्वच्छ करणे, गहाळ डेटा भरून काढणे, किंवा अनावश्यक डेटाचे व्यवस्थापन करणे.

३. डेटा विश्लेषण) Data Analysis): विविध विश्लेषणात्मक तंत्रांचा वापर करून डेटाचे विश्लेषण करणे .यात सांख्यिकीय मॉडेल्स, मशीन लर्निंग अल्गोरिदम्स, आणि डेटा व्हिज्युअलायझेशन समाविष्ट आहे.

४. डेटा व्हिज्युअलायझेशन) Data Visualization): डेटाचे परिणाम ग्राफ, चार्ट, आणि इतर दृश्य स्वरूपांमध्ये सादर करणे, ज्यामुळे माहितीची समज सोपी होते.

५. डेटा आधारित निर्णय) Data-Driven Decision Making): डेटाच्या निष्कर्षांवर आधारित धोरणे तयार करणे आणि सेवा सुधारणे, जसे की वापरकर्त्यांच्या वाचन सवयींवर आधारित पुस्तकांच्या शिफारसी देणे.

**डेटा मॅनेजमेंट) Data Management) काय आहे?**

डेटा मॅनेजमेंट म्हणजे डेटा गोळा करणे, जतन करणे, सुरक्षित करणे, आणि त्याचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी एकत्रितपणे केलेले सर्व क्रियाकलाप .हे डेटाच्या संपूर्ण जीवनचक्राला व्यवस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित करते.

**डेटा मॅनेजमेंटचे मुख्य घटक:**

1. डेटा गव्हर्नन्स) Data Governance): डेटा साठवणे आणि वापरण्यासाठी धोरणे, प्रक्रिया, आणि नियम तयार करणे .यामुळे डेटा गुणवत्ता, सुरक्षा, आणि गोपनीयता सुनिश्चित होते.
2. डेटा स्टोरेज) Data Storage): डेटाचे स्टोरेज सोल्यूशन्स तयार करणे, जसे की डेटा वेअरहाऊस, डेटा लेक्स, आणि क्लाउड स्टोरेज .हे डेटा स्टोरेज सिस्टम्स वेगवेगळया प्रकारच्या डेटासाठी डिझाइन केलेले आहेत.
3. डेटा सिक्युरिटी) Data Security): डेटा चोरी किंवा हॅकिंगपासून संरक्षणासाठी डेटा सुरक्षित ठेवण्याच्या तंत्रांचा वापर .यात डेटा एनक्रिप्शन, ॲक्सेस कंट्रोल, आणि सायबर सिक्युरिटी पद्धतींचा समावेश होतो.
4. डेटा क्वालिटी मॅनेजमेंट) Data Quality Management): डेटा विश्लेषणाच्या परिणामी प्राप्त झालेल्या डेटाची अचूकता, पूर्णता, आणि विश्लेषणाची विश्वसनीयता सुनिश्चित करणे.
5. डेटा इंटिग्रेशन) Data Integration): विविध डेटा स्त्रोतांमधून डेटा एकत्र करणे आणि त्याचे एकरुपीकरण करणे, ज्यामुळे वेगवेगळया प्रकारच्या डेटा सेट्समधून एकत्रित विश्लेषण करणे सोपे होते.

**ग्रंथालय विज्ञानामध्ये डेटा सायन्स आणि डेटा मॅनेजमेंटचे महत्त्व**

1. वापरकर्ता अनुभव सुधारण्यासाठी :डेटा सायन्स आणि डेटा मॅनेजमेंट तंत्रांचा वापर करून ग्रंथालये वापरकर्त्यांच्या वाचन सवयी, आवडीनिवडी, आणि वापर पद्धतींचे विश्लेषण करू शकतात .हे माहिती वापरकर्ता-केंद्रित सेवा तयार करण्यास मदत करतो.
2. संशोधन आणि माहितीच्या प्रवेशाची वाढ :डेटा सायन्सच्या मदतीने, संशोधन डेटा व्यवस्थापन, ओपन ऍक्सेस निती, आणि डेटाचे योग्य वर्गीकरण, संग्रहण आणि शोध प्रणाली अधिक प्रभावी बनवता येतात.
3. डिजिटल रिपॉझिटरीज आणि संग्रह व्यवस्थापन : डिजिटल ग्रंथालये आणि रिपॉझिटरी मॅनेजमेंटसाठी डेटा मॅनेजमेंट तंत्रांचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे . हे डिजिटल साहित्य संरक्षित ठे वण्यास, शोधण्यास, आणि शेअर करण्यास मदत करते.
4. डेटा-संचालित निर्णय प्रक्रियेतील सुधारणा :डेटा सायन्सच्या विश्लेषणात्मक क्षमतांमुळे ग्रंथालयांना त्यांच्या रणनीतींमध्ये आणि सेवा वितरणात डेटा-संचालित निर्णय घेण्यास मदत होते.
5. डेटा गोपनीयता आणि सुरक्षा :ग्रंथालयांमध्ये वापरकर्ता डेटा व्यवस्थापनाची जबाबदारी असल्यामुळे, डेटा मॅनेजमेंटच्या सुरक्षा धोरणांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक असते.

**वर्च्युअल आणि आभासी तंत्रज्ञान) Virtual and Augmented Reality)**

**व्हर्च्युअल रिॲलिटी) VR) आणि ऑगमेंटेड रिॲलिटी )AR):** काही ग्रंथालये VR आणि AR चा वापर करून वाचन अनुभव अधिक आकर्षक बनवित आहेत .संशोधन, ऐतिहासिक स्थळांची भेट, किंवा शैक्षणिक सिम्युलेशन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आणि ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयांमध्ये नवीन आणि सर्जनशील पद्धतीने केला जात आहे. येथे काही मार्ग दिले आहेत ज्याद्वारे ग्रंथालये VR आणि AR चा वापर करतात:

१. **शैक्षणिक अनुभव**: ग्रंथालये विद्यार्थी आणि अभ्यासकांना ऐतिहासिक स्थळे, खगोलशास्त्र, विज्ञान प्रयोगशाळा इत्यादींच्या व्हर्च्युअल टूरद्वारे शैक्षणिक अनुभव देण्यासाठी VR चा वापर करतात. यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक आकर्षक आणि प्रभावी होते.

२. **ग्रंथालयाचा शोध आणि माहिती सादरीकरण**: AR ॲप्सद्वारे वाचक ग्रंथालयातील पुस्तकांच्या

शेल्फवरील अतिरिक्त माहिती, व्हिडिओ किंवा डिजिटल संसाधने पाहू शकतात. हे वापरकर्त्यांना पुस्तकांच्या अधिक तपशीलांशी जोडण्यास मदत करते.

३. **संस्कृती आणि इतिहास सजीव करणे**: ग्रंथालये सांस्कृतिक वारसा आणि इतिहास सजीव करण्यासाठी VR आणि AR चा वापर करतात. उदाहरणार्थ, ऐतिहासिक इमारती किंवा जगभरातील संग्रहालयांची वर्च्युअल टूर उपलब्ध करून दिली जाते.

४. **सर्जनशीलता आणि शिकण्याचे साधन**: काही ग्रंथालये मुलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी AR आणि VR वर्कशॉप आयोजित करतात. यात विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान शिकविणे, डिजिटल डिझाइन, 3D मॉडेलिंग इत्यादींचा समावेश असतो.

५. **मानसिक आरोग्य आणि विश्रांती**: काही ग्रंथालये मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी व्हर्च्युअल मेडिटेशन स्पेसेस, रिलॅक्सेशन अनुभव किंवा नैसर्गिक निसर्गाच्या ठिकाणांचे व्हर्च्युअल अनुभव देतात.

या प्रकारे, VR आणि AR तंत्रज्ञानाने ग्रंथालयांमध्ये ज्ञानसंपादन, संशोधन आणि शिकण्याचे नवीन क्षितिजे खुली केली आहेत.

**आर्टिफिशियल इंटेलिजेंस) AI) आणि मशीन लर्निंग**

ग्रंथालय विज्ञानात AI आणि मशीन लर्निंगचा वापर ग्रंथालय सेवा, माहिती व्यवस्थापन, आणि वापरकर्ता अनुभव सुधारण्यात मोठी क्रांती घडवून आणत आहे .हे तंत्रज्ञान ग्रंथालये अधिक स्मार्ट, कार्यक्षम, आणि डेटा-संचालित बनवतात .भविष्यात, AI आणि ML तंत्रज्ञानांचा वापर वाढवून अधिक नाविन्यपूर्ण ग्रंथालय सेवा निर्माण होतील

**आर्टिफिशियल इंटेलिजेंस) AI) आणि मशीन लर्निंग) ML) म्हणजे काय?**

१. आर्टिफिशियल इंटेलिजेंस) AI): AI म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेचे गुणधर्म, जसे की विचार, शिकणे, समस्या सोडवणे, आणि निर्णय घेणे यासारख्या क्षमतांनी सुसज्ज करणे .हे मशीनला आपले वातावरण समजून घेण्याची आणि त्यावर प्रतिसाद देण्याची क्षमता देते.

२. मशीन लर्निंग) ML): AI चा एक उपप्रकार, ज्यामध्ये संगणकांना विशिष्ट अल्गोरिदम आणि आकडेवारीच्या आधारावर मोठ्या प्रमाणात डेटाचा अभ्यास करून स्वतःहून शिकण्याची आणि भविष्यवाणी करण्याची क्षमता मिळते .मशीन लर्निंग अल्गोरिदम्स वेगवेगळया प्रकारचे डेटा विश्लेषण करण्यासाठी वापरले जातात.

**ग्रंथालय विज्ञानात AI आणि ML चे उपयोग**

**1.स्मार्ट सर्च आणि रिट्रिव्हल सिस्टिम्स) Smart Search and Retrieval Systems):** AI-आधारित सर्च इंजिन्स वापरून वापरकर्ते ग्रंथालयातील माहिती अधिक सुलभतेने शोधू शकतात .AI सर्च अल्गोरिदम्स वापरकर्त्यांच्या शोध पद्धती आणि पूर्वीच्या शोधांवर आधारित प्रासंगिक परिणाम दर्शवतात.

उदाहरणार्थ, प्राकृतिक भाषा प्रक्रिया) Natural Language Processing - NLP) वापरून, ग्रंथालय शोध प्रणाली अधिक बुद्धिमान बनवता येतात, ज्या वापरकर्त्यांच्या प्रश्नांना अधिक अचूकपणे उत्तर देतात.

**2.चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स) Chatbots and Virtual Assistants):** AI-आधारित चॅटबॉट्स ग्रंथालयांमध्ये वापरकर्त्यांना त्वरित मदत आणि माहिती पुरवतात .हे चॅटबॉट्स २४/७ कार्यक्षम असतात आणि पुस्तके, संदर्भ सेवा, सदस्यता प्रक्रिया, आणि इतर माहितीबाबत सहाय्य करतात.

उदाहरणार्थ, Alexa, Siri, आणि इतर आभासी सहाय्यकांचा वापर करून, ग्रंथालये सेवा आणि माहितीपर उपक्रमांसाठी सहाय्य करतात.

**3.पुस्तक आणि संसाधन शिफारस प्रणाली) Book and Resource Recommendation Systems):**

AI आणि ML अल्गोरिदम्स वापरकर्त्यांच्या वाचन सवयी, शोध इतिहास, आणि आवडींवर आधारित पुस्तकांची आणि इतर संसाधनांची शिफारस करतात .या प्रणाली Netflix किंवा Amazon प्रमाणेच वैयक्तिकृत शिफारसी देऊ शकतात.

उदाहरणार्थ, Collaborative Filtering आणि Content-Based Filtering सारख्या तंत्रांचा वापर करून ग्रंथालये वैयक्तिकृत सेवा प्रदान करतात.

**4.डिजिटल कलेक्शन मॅनेजमेंट) Digital Collection Management):** AI-आधारित अल्गोरिदम्स मोठ्या प्रमाणात डिजिटल सामग्रीचे व्यवस्थापन आणि वर्गीकरण करण्यास मदत करतात .यामुळे दस्तऐवजांचे ऑटोमॅटिक इंडेक्सिंग, मेटाडेटा जनरेशन, आणि सामग्रीचे कॅटेगोरायझेशन करणे सोपे होते.

उदाहरणार्थ, ऑटोमेटेड कंटेंट कॅटलॉगिंग) Automated Content Cataloguing) ज्यामध्ये AI प्रणाली आपोआप पुस्तकांचा आणि जर्नल्सचा मेटाडेटा तयार करतात.

**5.डुप्लिकेट्स आणि प्लॅगिअरिझम डिटेक्शन )Duplicates and Plagiarism Detection):**

AI आणि ML आधारित तंत्रज्ञान वापरून प्लॅगिअरिझम शोधणे, दस्तऐवजांच्या नक्कल ओळखणे आणि डुप्लिकेट्स काढणे सोपे झाले आहे.

उदाहरणार्थ, Turnitin, Grammarly, आणि इतर तंत्रज्ञानांचा वापर शैक्षणिक आणि संशोधन साहित्याच्या सत्यतेसाठी केला जातो.

**6.प्रेडिक्टिव ऍनालिटिक्स) Predictive Analytics) आणि डेटा सायन्स) Data Science):** AI आणि ML चा वापर ग्रंथालये वापरकर्त्यांच्या भविष्यकालीन वर्तनाची, ग्रंथालय वापराचे आकडे, आणि संसाधनांच्या मागणीची भविष्यवाणी करण्यासाठी करतात .यामुळे त्यांना अधिक चांगले व्यवस्थापन आणि निर्णय घेण्यास मदत होते.

उदाहरणार्थ, विश्लेषणात्मक डॅशबोर्ड वापरून, ग्रंथालये सेवा अधिक योग्यरित्या वितरीत करण्यासाठी डेटा-संचालित निर्णय घेऊ शकतात.

**7.डायनॅमिक कस्टमर एंगेजमेंट) Dynamic Customer Engagement):** AI वापरून ग्रंथालये त्यांच्या वापरकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांना गुंतवण्यासाठी डायनॅमिक कंटेंट तयार करू शकतात .हे ई-मेल्स, नोटिफिकेशन्स, आणि ई-बुलेटिन्सच्या स्वरूपात असू शकते.

उदाहरणार्थ, AI वापरून, ग्रंथालयांना त्यांच्या नवीन पुस्तकांच्या संग्रहाची जाहिरात किंवा विविध कार्यशाळांची माहिती वापरकर्त्यांना वैयक्तिकृत पद्धतीने पाठवता येते.

**ग्रंथालय विज्ञानातील AI आणि ML च्या वापराची आव्हाने**

1. डेटा गोपनीयता आणि सुरक्षा) Data Privacy and Security): AI आणि ML प्रणालींमध्ये मोठ्या प्रमाणात डेटा वापरला जात असल्यामुळे डेटा चोरी, गोपनीयता उल्लंघन, आणि सायबर हल्ल्यांचा धोका संभवतो .यासाठी सखोल गोपनीयता धोरणे आवश्यक आहेत.
2. तंत्रज्ञानाचा खर्च) Cost of Technology): AI आणि ML तंत्रज्ञानाचे अंमलबजावणी खर्च जास्त असू शकतात .लहान ग्रंथालयांना या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक आव्हाने असू शकतात.
3. तंत्रज्ञानाची जटिलता) Complexity of Technology): AI आणि ML चा वापर जरी फायद्याचा असला तरी तो तांत्रिकदृष्ट्या जटिल असतो .यासाठी विशेष प्रशिक्षण आणि कौशल्याची आवश्यकता आहे.
4. नैतिक मुद्दे) Ethical Issues): AI आणि ML आधारित प्रणालींच्या वापरामुळे नैतिक प्रश्न उद्भवू शकतात, जसे की निर्णय घेण्यात मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता, स्वायत्तता, आणि पारदर्शकता.

**ग्रीन लायब्ररीज) Green Libraries)**

**ग्रीन लायब्ररी** (Green Library) ही संकल्पना शाश्वतता )sustainability) आणि पर्यावरणीय सजगता यावर आधारित आहे .ग्रीन लायब्ररी म्हणजे अशी ग्रंथालये जी पर्यावरणपूरक असतात आणि त्यांचे उद्दिष्ट संसाधनांचा टिकाऊ वापर, ऊर्जा कार्यक्षमता, आणि पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करणे आहे .या लायब्ररींचा उद्देश केवळ ज्ञान आणि माहिती पुरवणे नाही, तर पर्यावरण संवर्धनासाठी देखील योगदान देणे आहे.

**ग्रीन लायब्ररीचे महत्त्वाचे घटक**

**शाश्वत वास्तुकला आणि डिझाइन:**

1. ग्रीन लायब्ररीचे बांधकाम शाश्वत आणि पर्यावरणपूरक साधनांचा वापर करून केले जाते . उदाहरणार्थ, पुनर्वापर केलेल्या साहित्यांचा वापर, कमी ऊर्जा खर्च करणारे बांधकाम साहित्य, आणि नैसर्गिक प्रकाश व वायुवीजन व्यवस्था.
2. ऊर्जा-बचत प्रकाश यंत्रणा) LED), उर्जा कार्यक्षम एअर कंडिशनिंग प्रणाली, आणि जलसंवर्धनासाठी पाणी पुनर्वापर प्रणालींचा वापर.

**ऊर्जा कार्यक्षमता:**

1. अक्षय ऊर्जा स्रोतांचा) सौर ऊर्जा, पवन ऊर्जा (वापर करून ऊर्जा गरजा भागवणे.
2. उच्च ऊर्जा कार्यक्षमता प्राप्त करण्यासाठी सोलर पॅनल्स, ग्रीन रूफ्स, आणि इन्सुलेशन तंत्रज्ञानाचा वापर.

**पर्यावरणपूरक सेवा आणि साधने:**

1. डिजिटल सामग्रीच्या वापराला प्रोत्साहन देणे जेणेकरून कागदाचा वापर कमी होईल.
2. ई-पुस्तके, ऑनलाइन डेटाबेस, आणि डिजिटल माध्यमांचा वापर वाढवणे.

**अपशिष्ट व्यवस्थापन:**

1. रीसायकलिंग कार्यक्रम आणि सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत जागरूकता.
2. कागद, प्लास्टिक, आणि इतर कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी अलग-अलग कचरा वर्गीकरणाची सोय.

**पर्यावरणीय शिक्षण आणि कार्यक्रम:**

1. पर्यावरण आणि शाश्वततेवरील कार्यशाळा, व्याख्याने, आणि कार्यक्रम आयोजित करणे.
2. शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक समुदायासाठी पर्यावरणीय शिक्षणाचे आयोजन.

**हरित परिदृश्य आणि नैसर्गिक साज-सजावट:**

1. लायब्ररीच्या परिसरात हरित परिदृश्य) लॉन, झाडे, वनस्पती (राखणे.
2. बायोफिलिक डिझाइनचा वापर, जसे की, झाडे आणि नैसर्गिक घटकांचा समावेश असलेल्या अंतर्गत सजावटीच्या कल्पना.

**समुदाय सहभाग:**

3. स्थानिक समुदायांना पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत उपक्रमांमध्ये सहभागी करून घेणे.
4. स्वयंसेवा कार्यक्रम, वृक्षारोपण मोहीम, आणि पुनर्वापर कार्यशाळांचे आयोजन.

**ग्रीन लायब्ररीचे फायदे**

1. **पर्यावरणीय परिणाम कमी होतो:** नैसर्गिक साधनांचा जपून वापर, कमी ऊर्जा वापर आणि पुनर्वापरामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम कमी होतो.
2. **संसाधनांची बचत:** कागद, पाणी, आणि ऊर्जा यांच्या योग्य वापरामुळे संसाधनांची बचत होते.
3. **शैक्षणिक आणि जागरूकता वाढवणे:** पर्यावरण आणि शाश्वततेबद्दलची जाणीव वाढवून लोकांना जागरूक बनवते.
4. **आरोग्यदायी वातावरण:** ग्रीन लायब्ररीत नैसर्गिक वायुवीजन आणि प्रकाशामुळे एक निरोगी आणि प्रेरणादायी वातावरण तयार होते.
5. **समुदाय विकास:** लायब्ररीचे पर्यावरणपूरक उपक्रम आणि कार्यक्रम स्थानिक समुदायासाठी सकारात्मक बदल घडवतात.

**मल्टीफंक्शनल स्पेस) Multifunctional Spaces)**

मल्टीफंक्शनल स्पेसेस) Multifunctional Spaces) म्हणजे असे जागा/परिसर जे अनेक प्रकारे वापरता येतात आणि ज्यांचा उद्देश एकच नसतो .हे स्पेस विविध गरजांनुसार बदलता येतात आणि अनेक कार्यांसाठी उपयुक्त ठरतात .मल्टीफंक्शनल स्पेसेसची संकल्पना शहरीकरण, जागेची कमतरता, आणि आधुनिक जीवनशैलीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विकसित झाली आहे .हे शाश्वतता, कार्यक्षमता, आणि लवचिकतेवर भर देतात.

**मल्टीफंक्शनल स्पेसेसचे महत्त्वाचे घटक**

1. **लवचिक डिझाइन:**
   जागेचे नियोजन असे केले जाते की त्यात सहजपणे बदल करता येईल .उदा .फोल्डेबल फर्निचर, मॉड्यूलर सेटअप, पोर्टेबल पार्टिशन्स.
   एकाच जागेत विविध कार्यांसाठी उपकरणे आणि फर्निचरचे व्यवस्थापन करता येते, जसे की कॉन्फरन्स रूम, वर्कशॉप एरिया, आणि सोशल गॅदरिंग एरिया.
2. **कार्यक्रम आणि उद्दिष्टांमध्ये विविधता:**
   अशा जागा विविध प्रकारच्या कार्यक्रमांसाठी वापरता येतात, जसे की व्याख्याने, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, मीटिंग्स, आणि सहकार्यात्मक कार्यशाळा.
   शैक्षणिक संस्था, कार्यालये, आणि समुदाय केंद्रांमध्ये ही जागा विशेषतः उपयुक्त ठरतात.
3. **उपयोगातील संक्रमण:**एखादी जागा वेगवेगळया उद्दिष्टांसाठी बदलणे सोपे असते .उदा .मोठ्या हॉलचे छोटे सभागृह, वाचनालय, किंवा गॅलरीमध्ये रुपांतर. जागेचा उपयोग कसा करायचा हे वापरकर्त्यांच्या आवश्यकतानुसार बदलता येते.
4. **उच्च कार्यक्षमता :**उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त उपयोग करून संसाधनांची बचत करणे.जागेचा

मोकळेपणा, नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन यांचा विचार करून डिझाइन करणे.

5. **स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर :**मल्टीफंक्शनल स्पेसेसमध्ये स्मार्ट तंत्रज्ञानाचा) उदा .स्मार्ट लाइटिंग, स्मार्ट फर्निचर, आणि एंटरप्रायझ टूल्स (वापर करून सुविधा वाढवता येतात .ऑडिओ-व्हिज्युअल उपकरणे, प्रोजेक्टर, व्हर्च्युअल मीटिंग्ससाठी उपकरणे यांचा समावेश.
6. **शाश्वत आणि पर्यावरणपूरक डिझाइन :**रीसायकल केलेले साहित्य, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर .जागेचा जास्तीत जास्त उपयोग करतानाच पर्यावरणावर परिणाम कमी करणे.
7. **समुदायासाठी अनुकूल :**अशा जागा समुदायाच्या गरजांसाठी वापरता येतात जसे की स्थानिक कार्यक्रम, गटचर्चा, शैक्षणिक सत्रे, आणि कला प्रदर्शने. समाजातील विविध गटांना एकत्र आणण्यासाठी आणि संवाद वाढवण्यासाठी एक उत्तम साधन.

**मल्टीफंक्शनल स्पेसेसचे फायदे**

1. **खर्च आणि जागेची बचत :**एकाच जागेचा अनेक हेतूंनी वापर केल्याने बांधकाम, देखभाल, आणि संचालनाच्या खर्चात बचत होते.
2. **अनुकूलता आणि लवचिकता** :जागेच्या वापरातील लवचिकता यामुळे विविध प्रकारच्या उपक्रमांसाठी जागेचा वापर केला जाऊ शकतो.
3. समुदाय आणि सहकार्याला प्रोत्साहन :एकत्र काम करण्याचे आणि संवाद साधण्याचे वातावरण निर्माण होते.
4. **संसाधनांचा परिणामकारक वापर** :संसाधनांचा प्रभावी वापर करून शाश्वततेच्या उद्दिष्टांनुसार जागा तयार केली जाऊ शकते.
5. **रचनात्मकता आणि नवोन्मेषना उत्तेजन :**अशा जागा व्यक्तींची सर्जनशीलता आणि नवीन कल्पनांना प्रोत्साहन देतात.

**मल्टीफंक्शनल स्पेसेससाठी डिझाइन कल्पना**

1. **मॉड्यूलर फर्निचर आणि पोर्टेबल वॉल्स:**
   जेव्हा आवश्यक असेल तेव्हा विविध कॉन्फिगरेशनमध्ये वापरता येणारे फर्निचर.
   पोर्टेबल वॉल्स वापरून मोठ्या जागेला छोटे क्षेत्र किंवा खोल्यांमध्ये विभागणे.
2. **फोल्डेबल आणि रीकॉन्फिगरेबल स्पेसेस:**
   फोल्डेबल टेबल्स, चेअर्स, आणि भिंती ज्या जागेला पुनः सेटअप करू शकतात.
3. **स्मार्ट डिव्हाइसेस आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज) IoT):**
   स्मार्ट लाइटिंग, व्हॉइस कंट्रोल, आणि ऑटोमेशन साधने जागेचा वापर सुलभ करतात.
4. **मल्टीलेव्हल सेटअप:**
   उभ्या जागेचा वापर जास्तीत जास्त करण्यासाठी मल्टीलेव्हल मचान आणि जागा निर्माण करणे.

**आयओटी) Internet of Things - IOT) आणि स्मार्ट लायब्ररीज**

**IOT (Internet of Things)** आणि **स्मार्ट लायब्ररी** ही संकल्पना माहिती आणि तंत्रज्ञानाच्या एकत्रित वापरावर आधारित आहे .स्मार्ट लायब्ररी म्हणजे अशी ग्रंथालये जी IOT आणि अन्य स्मार्ट तंत्रज्ञानांचा वापर करून अधिक कार्यक्षम, उपयोगी आणि वापरकर्ता-अनुकूल असतात .हे तंत्रज्ञान लायब्ररीच्या कार्यप्रणालीला सुधारित करते आणि उपयोगकर्त्यांच्या अनुभवाला उत्कृष्ट बनवते.

**IOT आणि स्मार्ट लायब्ररीतील घटक**

**स्मार्ट असिस्टंट्स:**

1. **चॅटबॉट्स आणि वॉइस असिस्टंट्स:** पुस्तक शोधणे, माहिती प्राप्त करणे, आणि सेवा मागवणे यासाठी चॅटबॉट्स आणि वॉइस असिस्टंट्सचा वापर.
2. **स्मार्ट रिपोजिटरी:** स्वयंचलितपणे रेकॉर्ड ठेवण्यासाठी आणि डेटाबेसमध्ये प्रवेश करण्यासाठी स्मार्ट असिस्टंट्सचा वापर.

**स्मार्ट शेल्व्हिंग: RFID (Radio-Frequency Identification):** पुस्तकांची स्थिती ट्रॅक करण्यासाठी RFID तंत्रज्ञानाचा वापर .यामुळे योग्य पुस्तके सहज शोधता येतात आणि संग्रहित करणे सोपे होते

1. **स्मार्ट शेल्व्हेस:** स्वयंचलित शेल्व्हिंग सिस्टीम्स ज्यात किताब किंवा साधनांच्या स्थितीचा मागोवा ठेवता येतो.

**ऊर्जा व्यवस्थापन:**

2. **स्मार्ट लाइटिंग:** पर्यावरणाच्या स्थितीवर आधारित लाइटिंग प्रणाली जसे की पद्धतशीर प्रकाश नियंत्रण.
3. **एनर्जी-इफिशियंट उपकरणे:** उर्जा बचतीसाठी स्मार्ट थर्मोस्टॅट्स आणि इतर उपकरणे.

**स्मार्ट क्यू व्यवस्थापन:**

1. **डिजिटल क्यू सिस्टीम:** ग्राहकांची आणि वापरकर्त्यांची क्यू व्यवस्थापित करण्यासाठी स्मार्ट क्यू सिस्टीम.
2. **प्रॉब्लेम-फ्री सर्व्हिस:** आंतरविरोधी सर्व्हिस आणि व्यवस्थापन सुलभ करणारे तंत्रज्ञान.
3. **डिजिटल लेआउट आणि अनुभव:**
4. **इंटरॲक्टिव्ह टेबल्स:** डिजिटल टेबल्स ज्या वापरकर्त्यांना माहिती, संदर्भ, आणि संशोधनाचे साधन देतात.
5. **वर्चुअल रिएँलिटी) VR):** लायब्ररीतील संसाधनांची भौतिक आढावा घेण्यासाठी VR तंत्रज्ञानाचा वापर.
6. **सुरक्षा आणि निगराणी:**
7. **स्मार्ट सुरक्षा प्रणाली:** कॅमेरे, मोशन सेंसर्स, आणि अलार्मसह सुरक्षा प्रणाली.
8. **डेटा संरक्षण:** स्मार्ट तंत्रज्ञान वापरून माहिती आणि डेटाची सुरक्षा सुनिश्चित करणे.
9. **उपयोगकर्ता सहभाग:**
10. **स्मार्ट कॅबिनेट्स:** स्वयंचलित कॅबिनेट्स ज्यात सामग्री आणि साधनांची स्थिती ट्रॅक केली जाते.
11. **पर्सनल डिव्हायसेस:** स्मार्ट वॉलेट्स किंवा स्मार्ट कार्ड्स वापरून वैयक्तिक माहिती आणि सेवांचा व्यवस्थापन.

**फायदे**

1. **सहज प्रवेश:** वापरकर्त्यांना तात्काळ आणि सहज माहिती मिळवता येते. करणे .डेटा सुरक्षितता : क्लाउड स्टोरेजद्वारे डेटा बॅकअप आणि रिकव्हरी व्यवस्थापन.
2. **समयाची बचत:** स्वयंचलित प्रणालीद्वारे कार्यक्षमता वाढवली जाते, ज्यामुळे कर्मचारी आणि वापरकर्त्यांचा वेळ वाचतो.
3. **शाश्वतता:** ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि स्मार्ट तंत्रज्ञान वापरून पर्यावरणीय परिणाम कमी केला जातो.
4. **सुरक्षा:** स्मार्ट सुरक्षा प्रणालीद्वारे सुरक्षितता आणि निगराणी सुधारली जाते.
5. **संपूर्ण अनुभव:** डिजिटल टेबल्स, VR, आणि अन्य तंत्रज्ञान वापरून अधिक आकर्षक आणि व्यावसायिक अनुभव.

**IOT आणि स्मार्ट लायब्ररींसाठी डिझाइन टिपा**

1. **समन्वयित प्रणाली:** विविध स्मार्ट साधनांचा एकत्रित वापर सुनिश्चित करणे.
2. **सुरक्षा प्रोटोकॉल:** डेटा आणि सुरक्षा व्यवस्थापनासाठी सक्षम तंत्रज्ञान वापरणे.
3. **वापरकर्ता अनुकूलता:** वापरकर्त्यांच्या गरजांनुसार तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे.
4. **निरंतर अद्ययावत:** नवीनतम तंत्रज्ञानाच्या उपयोजनासाठी लायब्ररीच्या सुविधांचे नियमित अद्ययावत करणे.स्मार्ट लायब्ररी आणि IoT तंत्रज्ञानामुळे लायब्ररी व्यवस्थापन सुलभ आणि आधुनिक बनते, तसेच वापरकर्त्यांच्या अनुभवात सुधारणा करते.

**क्लाउड बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्स**

1. **क्लाउड स्टोरेज आणि सेवा :**ग्रंथालये आता क्लाउड बेस्ड सोल्यूशन्स वापरून त्यांच्या संग्रहाचा डेटा संचयित करतात आणि व्यवस्थापित करतात, ज्यामुळे माहितीचा विनिमय अधिक सोपा आणि जलद होतो. क्लाउड-बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्स म्हणजे क्लाउड तंत्रज्ञानाचा वापर करून लायब्ररीच्या सेवांचे व्यवस्थापन, साठवण, आणि वितरण यासंबंधी उपाययोजना .क्लाउड कंप्यूटिंगने लायब्ररींना अनेक फायदे प्रदानकेले आहेत,ज्यात लवचिकता,स्केलेबिलिटी,आणि खर्चकमी करणे यांचा समावेश आहे.
2. **क्लाउड-बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्सचे घटक**
3. **क्लाउड स्टोरेज:**
   डिजिटल कलेक्शन :ई-पुस्तके, इलेक्ट्रॉनिक जर्नल्स, आणि डिजिटल आर्काइव्हस यांचे संग्रहण क्लाउडवर
4. **क्लाउड-आधारित इन्फ्रास्ट्रक्चर :**सर्व्हर आणि डेटाबेस व्यवस्थापन :क्लाउड सर्व्हिसेसद्वारे लायब्ररीच्या सर्व्हर आणि डेटाबेस व्य वस्थापनाचे कार्य करणे.
   स्केलेबिलिटी :गरजेनुसार संसाधनांचे स्केलिंग, ज्यामुळे तात्काळ वाढीला समर्थन मिळते.
5. **ऑनलाइन कॅटलॉग आणि डेटाबेस:**
   क्लाउड-आधारित कॅटलॉगिंग :लायब्ररीच्या कॅटलॉगला क्लाउडवर होस्ट करणे, ज्यामुळे वापरकर्ते दूरस्थपणे प्रवेश करू शकतात.
   अथवा माहिती व्यवस्थापन :वापरकर्ता माहिती आणि स्टाफ डेटाचे व्यवस्थापन क्लाउडवर करणे

6. **क्लाउड-बेस्ड सर्च आणि डिस्कवरी:** स्मार्ट सर्च इंजिन :क्लाउडवर होस्ट केलेले सर्च इंजिन्स जे अधिक कार्यक्षम आणि अचूक शोध परिणाम प्रदान करतात.डेटा एनालिटिक्स :वापरकर्त्यांच्या शोध आणि वापराच्या ट्रेंड्सचा विश्लेषण.
7. **स्मार्ट सेवांचा समावेश :**आर्टिफिशियल इंटेलिजेंस )AI) आणि मशीन लर्निंग :AI तंत्रज्ञानाचा वापर करून डेटा विश्लेषण, सिफारशी, आणि स्वयंचलित सेवांची ऑफर .चॅटबॉट्स आणि वॉइस असिस्टंट्स : क्लाउड-आधारित चॅटबॉट्स आणि वॉइस असिस्टंट्सद्वारे वापरकर्त्यांना सहाय्य.
8. **रिमोट ऍक्सेस :**दूरस्थ प्रवेश :क्लाउडवर आधारित लायब्ररी सिस्टम्स वापरकर्त्यांना भौतिक लायब्ररीकडे न जाता डिजिटल सामग्रीवर प्रवेश देतात. मल्टी-डिव्हाइस सपोर्ट :विविध डिव्हाइसवर )लॅपटॉप, स्मार्टफोन, टॅब्लेट (प्रवेश उपलब्ध असतो.
9. **क्लाउड सिक्योरिटी :**डेटा एन्क्रिप्शन :क्लाउडमध्ये संग्रहित डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी एन्क्रिप्शन तंत्रज्ञानाचा वापर .ऍक्सेस कंट्रोल :उपयोगकर्त्यांच्या अधिकारांची व्यवस्थापन आणि अँटी-मलवेअर सुरक्षा.

**फायदे**

1. लवचिकता :आवश्यकतानुसार संसाधनांचे स्केलिंग आणि मागणीसाठी त्वरित प्रतिसाद देणे.
2. खर्च कमी करणे :कमी प्रारंभिक गुंतवणूक आणि पिअर-टू-पे-यूज मॉडेलद्वारे ऑपरेशनल खर्च कमी करणे.
3. सुलभ ऍक्सेस :विविध स्थळी आणि डिव्हाइसेसवरून सामग्री आणि सेवांचा प्रवेश.
4. सुरक्षा :डेटा बॅकअप, रिकव्हरी, आणि उच्च स्तराची सुरक्षा उपाययोजना.
5. सहयोग आणि एकत्र काम :विविध वापरकर्ते आणि स्टाफ सदस्यांमध्ये सहज संवाद आणि सहयोग.
6. आधुनिक सेवांचा समावेश :AI, मशीन लर्निंग, आणि स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करून सुधारित सेवा.

**क्लाउड-बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्ससाठी टिपा**

1. सर्व्हिस प्रोव्हायडरची निवड :विश्वसनीय आणि सुरक्षित क्लाउड सर्व्हिस प्रोव्हायडर निवडणे.
2. सुरक्षा उपाययोजना :डेटा सुरक्षा, एन्क्रिप्शन, आणि ऍक्सेस कंट्रोल उपाययोजनांची अंमलबजावणी.
3. सिस्टम एकत्रीकरण :क्लाउड सेवांनुसार विद्यमान प्रणालीसह एकत्रीकरण करणे.
4. वापरकर्ता प्रशिक्षण :स्टाफ आणि वापरकर्त्यांना क्लाउड-बेस्ड सिस्टम्सचा वापर करण्यासाठी प्रशिक्षण देणे.
5. सतत अद्ययावत :तंत्रज्ञानाची नियमित अद्ययावत करणे आणि नवीनतम सुविधांचा वापर करणे. क्लाउड-बेस्ड लायब्ररी सोल्यूशन्स लायब्ररींच्या कार्यक्षमतेला सुधारतात आणि वापरकर्त्यांना एकत्रित, सुलभ, आणि सुरक्षित अनुभव प्रदान करतात.

**निष्कर्ष :**ग्रंथालय विज्ञानातील सध्याच्या प्रवृत्ती या तंत्रज्ञानातील प्रगती, माहितीच्या स्वरूपातील बदल, आणि वापरकर्त्यांच्या गरजांमध्ये झालेल्या बदलांमुळे सतत विकसित होत आहेत .या नवीन प्रवृत्तींमुळे ग्रंथालये केवळ वाचनाचे केंद्र राहिली नसून, ती माहिती तंत्रज्ञान आणि समुदाय विकासाचे केंद्र बनली आहेत .

**संदर्भ:**


1. Jadhav, Vilas, Gaikwad, Mahesh. (2014). Challenges before Academic Library Professionals Working in Maharashtra. Changing Trends in Academic Libraries and Librarianship in Digital Environment.
2. Marmion, D. “Facing the challenge: technology training in libraries”. Information Technology Libraries 17.4 (1998): 216-18
3. Kulkarni, S.A. Best Practices in College Libraries. Seminar on National Library and Information Services in Changing Era, 22-23 January 2009. p.273 281
4. Sarrafzadeh, M. “The implications of knowledge management for the library and information professions”. act KM Online Journal of Knowledge Management 2.1 (2005)
5. Dilli K.T. library and information science in a digital era , Atlantic 2009
6. https://scholar.google.com/citations?view_op=view_citation&hl=en&user=hYAbHG8AAAAJ&citation_for_view=hYAbHG8AAAAJ:0EnyYjriUFMC
7. इंटरनेट वरील विविध माहिती स्रोत
8. बुवा जी.ए ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह , सावंतवाडी,साई प्रकाशन

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# ग्रामीण विकास आणि स्वयंरोजगार

**डॉ. भास्कर मारुती चव्हाण[1] डॉ. भगवान शंकरराव वाघमारे[2]**
[1]लोकप्रशासन विभाग प्रमुख, आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा ता.आष्टी
[2]लोकप्रशासन विभाग प्रमुख,अॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी
**DOI-10.5281/zenodo.15574018**

**प्रस्तावना :**

भारत देश शहरी आणि ग्रामीण अशा दोन भागात विभागाला गेला असून दोन्हीमध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता दिसून येते. ग्रामीण विकासाचे विविध पैलू म्हणजे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विचारात घेतले जाणारे वेगवेगळे घटक. हे पैलू गावातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचे असतात. ग्रामीण विकास हा केवळ शेतीपुरता मर्यादित नसून तो आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय, आणि तांत्रिक सर्व बाबतीत ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे. यामुळे ग्रामीण लोकांचे जीवनमान सुधारते आणि त्यांना आधुनिक जगाशी जोडण्याची संधी मिळते.

ग्रामीण हा शब्द “ग्राम” या संस्कृत शब्दावरून आलेला आहे, ज्याचा अर्थ गाव असा होतो. त्यामुळे ग्रामीण म्हणजे गावाशी संबंधित किंवा गावात राहणाऱ्या लोकांशी संबंधित असा होतो. ग्रामीण या शब्दाचा अर्थ गाव किंवा खेड्याशी असून शेती, पशुपालन, लघुउद्योग यांसारख्या पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून असलेला भाग होतो. ग्रामीण भागातील जीवनमान साधे, पारंपारिक, नैसर्गिक जीवनशैली असे असते. तसेच गावामध्ये राहणाऱ्या लोकांकडून भाषा, रितीरिवाज, सण उत्सव आणि परंपरा यांची जपणूक केली जाते लोकसंख्या कमी आणि विखुरलेली असते. शेती हा मुख्य व्यवसाय असतो. आधुनिक सोयीसुविधांची (रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्यसेवा) मर्यादित उपलब्धता असते. समाज अधिक परस्परावलंबी असतो. ग्रामीण विकास म्हणजे गावचा सर्वांगीण विकास असतो ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचे मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत ही शेती असून त्यावरच ग्रामीण समाज रचना आधारलेली असते तसेच ग्रामीण भागामध्ये गावातील संस्कृती व लोक संघटना जोपासली जाते व त्यातून ग्रामीण समुदाय विकसित होतो आज भारतात जास्तीत जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असते ग्रामीण भागात म्हणावा तसा विकास झालेला दिसून येत नाही येथे शिक्षण व आरोग्याची सुविधा अत्यंत प्रमाणात आढळून येते . ग्रामीण लोक परंपरागत सण उत्सव मोठ्या प्रमाणात साजरी करतात एकंदरीत ग्रामीण जीवन हे शहरी जीवनापेक्षा भिन्न प्रकारचे दिसून येते

**ग्रामीण विकासाचा अर्थ**: ग्रामीण विकास म्हणजे गावातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी घेतलेले प्रयत्न, ज्यामध्ये शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यास प्राधान्य दिले जाते. ग्रामीण विकासाची वेगवेगळ्या तज्ज्ञांनी आणि संस्थांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत:

1.वर्ल्ड बँक नुसार, “ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी घेतलेली योजनाबद्ध पावले. यामध्ये कृषी वाढ, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणा तसेच सामाजिक व आर्थिक न्यायाचा समावेश होतो.”

2.महात्मा गांधी: यांच्या मते, “भारताचे खरे आत्मबल गावांमध्ये आहे. ग्रामीण विकास म्हणजे गावांचे आर्थिक, सामाजिक आणि नैतिक उत्थान.”

3.राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था नुसार, “ग्रामीण विकास म्हणजे समाजातील सर्व स्तरांतील लोकांना समान संधी मिळवून देण्यासाठी आणि ग्रामीण जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी चालवलेली एकात्मिक प्रक्रिया.”

4.रॉबर्ट चेंबर्स: यांच्या मते, “ग्रामीण विकास हा ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करण्याचा आणि जीवनशैली सुधारण्याचा प्रयत्न आहे, जो स्थानिक लोकांच्या गरजांवर आधारित असतो.”

5. युनायटेड नेशन्स (UN), नुसार, “ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्याची प्रक्रिया.”

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा सर्वांगीण विकास. यामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक सुधारणा समाविष्ट असतात. ग्रामीण भागातील लोकांना सुशिक्षित करणे, रोजगाराच्या संधी वाढवणे, कृषी सुधारणा, पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज) उपलब्ध करून देणे आणि आरोग्य सेवा सुधारण्यास मदत करणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्देश आहेत.

**ग्रामीण विकासाचे मुख्य घटक:**

1. कृषी सुधारणा: आधुनिक शेती पद्धती, सिंचन सुविधा, खतांचा वापर, आणि बाजारपेठेशी जोडणी
2. पायाभूत सुविधा: रस्ते, वीज, स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा
3. शिक्षण आणि कौशल्य विकास: शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक प्रशिक्षण
4. आरोग्य आणि स्वच्छता: आरोग्य केंद्रे, रुग्णालये, स्वच्छतेसाठी शौचालय योजना
5. स्वयंरोजगार आणि आर्थिक विकास: स्वयं-सहायता गट (SHG), सूक्ष्म वित्तयोजना, लघुउद्योग प्रोत्साहन
6. पर्यावरण संरक्षण: वृक्षारोपण, जैवविविधतेचे संवर्धन, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण

**भारतामध्ये ग्रामीण विकासासाठी महत्त्वाच्या योजना:**

भारतामध्ये ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने शासन व प्रशासनावरून प्रयत्न केले जातात त्यासाठी निश्चित कृती आराखडा तयार करून विविध योजनांची निर्मिती केली जाते व या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जातो साधारणपणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या प्रमुख योजनांच्या व अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जातो. ग्रामीण विकास केवळ सरकारच्या योजनांवर अवलंबून नसतो; स्थानिक लोक, स्वयंसेवी संस्था (NGO) आणि खाजगी क्षेत्र यांचीही महत्त्वाची भूमिका असते.

ग्रामीण क्षेत्राचा विकास करण्यासाठी केद्र व राज्य शासनाकडे स्वतंत्र विभाग कार्यान्वित आहे. शेतीत नवीन तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था, जैविक शेती, लघु व कुटीर उद्योगांना चालना, स्वयंरोजगार आणि महिला सक्षमीकरण, बँकिंग व वित्तीय सेवा उपलब्ध करून देणे, मार्केटिंग आणि कृषी उत्पन्नाचा योग्य बाजारभाव देणे. तसेच शिक्षणाची सुविधा वाढवणे (शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक प्रशिक्षण), आरोग्य सेवा सुधारणा (प्राथमिक आरोग्य केंद्रे, माता-बाल संगोपन), ग्रामीण भागातील लोकांमध्ये सामाजिक समरसता आणि जागरूकता वाढवणे, महिलांचे सशक्तीकरण आणि लिंग समानता प्रोत्साहित करणे, चांगले रस्ते, वाहतूक सुविधा आणि संपर्क यंत्रणा उभारणे, स्वच्छ पेयजल आणि जलसंधारण प्रकल्प, वीज, सौरऊर्जा आणि इतर ऊर्जेचे स्रोत उपलब्ध करून देणे, गृहनिर्माण योजना (प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना), पर्यावरणीय आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, पर्यावरणपूरक शेती आणि जैवविविधतेचे संवर्धन, जंगल संवर्धन आणि जलसंधारण, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन. ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम करणे, लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासन, सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामीण औद्योगिकीकरण, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना, हस्तकला आणि पारंपरिक व्यवसायांना प्रोत्साहन, ग्रामीण पर्यटनाचा विकास, इंटरनेट आणि डिजिटल सेवांचा विस्तार, ई-शिक्षण आणि ऑनलाइन व्यवसाय संधी निर्माण करणे, स्मार्ट व्हिलेज संकल्पना विकसित करणे इत्यादी अंगाने ग्रामीण विकास साधला जात आहे.

**स्वयंरोजगार म्हणजे काय?**

स्वयंरोजगार म्हणजे स्वतःच्या कौशल्याच्या, ज्ञानाच्या आणि मेहनतीच्या जोरावर आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण करणे. यात व्यक्ती स्वतःचा उद्योग, व्यवसाय किंवा सेवा सुरू करून आर्थिक स्वावलंबन मिळवते.

**स्वयंरोजगाराचे प्रकार:**

स्वयंरोजगार अनेक प्रकारचे कार्यान्वित असल्याचे दिसून येते. लघु व मध्यम उद्योग

दुकानदारी, खाद्यपदार्थ व फूड स्टॉल, कृषी आधारीत उद्योग (डेअरी, पोल्ट्री, मत्स्यव्यवसाय), इलेक्ट्रिशियन, प्लंबर, कारपेंटर, सलून, ब्युटी पार्लर, ट्यूशन किंवा कोचिंग क्लासेस, डिजीटल मार्केटिंग, फ्रीलांसिंग, शिवणकाम, भरतकाम, हस्तनिर्मित वस्तू विक्री (कुंभारकाम, लोकरकाम), ज्वेलरी डिझायनिंग, चित्रकला,

सेंद्रिय शेती, मधमाशी पालन, औषधी वनस्पती उत्पादन, अन्न प्रक्रिया उद्योग, ई-कॉमर्स (Amazon, flipkart वर विक्री)

ब्लॉगिंग, यूट्यूब चॅनल, डेटा एन्ट्री, वेब डेव्हलपमेंट असे अनेक उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध होत असतो.

**स्वयंरोजगारासाठी आवश्यक कौशल्ये आणि शासकीय योजना:**

स्वयंरोजगारासाठी विशिष्ठ कौशल्ये असणे गरजेचे असते. व्यवसाय व्यवस्थापन आणि आर्थिक नियोजन, मार्केटिंग आणि ग्राहक व्यवस्थापन, डिजिटल कौशल्ये (सोशल मीडिया, ऑनलाइन विक्री), मेहनत, चिकाटी आणि नवकल्पना इत्यादी कौशल्ये महत्वाचे ठरते. तसेच स्वयंरोजगारासाठी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना (PMEGP), मुद्रा लोन योजना, स्टार्टअप इंडिया, दीनदयाळ अंत्योदय योजना, 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान या प्रमुख योजना कार्यान्वित आहेत.

**स्वयंरोजगाराचे महत्त्व**

स्वयंरोजगार हा केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून तो व्यक्तीला स्वावलंबन, आत्मनिर्भरता आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देतो. तसेच, तो देशाच्या आर्थिक विकासात आणि बेरोजगारी कमी करण्यास मोठी भूमिका बजावतो. व्यक्ती इतरांवर अवलंबून न राहता स्वतः रोजगार निर्माण करू शकते. स्वयंरोजगारामुळे लोक नोकरीच्या प्रतीक्षेत राहण्याऐवजी स्वतः काम सुरू करू शकतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येतो (उदा. लघुउद्योग, सेवा व्यवसाय). ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होते. नवीन कल्पनांवर आधारित व्यवसाय सुरू करून उद्योगजगताचा विस्तार करता येतो. स्थानिक उत्पादने आणि कौशल्यांना जागतिक बाजारपेठ मिळू शकते. हस्तकला, कृषी-आधारित उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग वाढीस लागतात. घरबसल्या व्यवसाय (शिवणकाम, खाद्यपदार्थ, ऑनलाइन काम) करून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात. नोकरीच्या तुलनेत स्वयंरोजगारात वेळेचे अधिक स्वातंत्र्य असते. उद्योजकता आणि नवीन व्यवसायांमुळे GDP वाढतो. नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्यांचा वापर करून स्वयंरोजगारातून नाविन्यपूर्ण सेवा व उत्पादने निर्माण केली जातात. लोक स्वतःच्या पायावर उभे राहिल्यास देशाची परावलंबित्वता कमी होते. यावरुन स्वयंरोजगाराचे महत्त्व अधिक स्पष्ट अधोरेखित होते.

**ग्रामीण विकास आणि स्वयंरोजगार यांचा परस्पर सहसंबंध**

ग्रामीण विकास आणि स्वयंरोजगार हे परस्परपूरक घटक आहेत. ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी स्वयंरोजगाराच्या संधी वाढणे आवश्यक आहे, तर स्वयंरोजगार वाढला की ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते आणि विकासाला गती मिळते. स्वयंरोजगारामुळे स्थानिक उत्पादन वाढते आणि लोकांना उत्पन्न मिळते. स्वयंरोजगारामुळे लोकांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून उपजीविकेची साधने निर्माण करता येतात. जर गावातच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, तर लोक आपल्या मूळ ठिकाणी राहूनच रोजगार मिळवू शकतात. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून डेअरी, पोल्ट्री, मधमाशी पालन, अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती यांसारखे उद्योग वाढू शकतात. शिवणकाम, हस्तकला, अन्न प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय यांसारख्या व्यवसायांत महिला मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. यामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरा टिकून राहतात. स्वयंरोजगारामुळे आर्थिक स्थिती सुधारली की रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्यसेवा यांसाठी निधी उपलब्ध होतो. यामुळे संपूर्ण ग्रामीण भागाचा विकास होतो. मुद्रा लोन योजना, PMEGP, NRLM, स्टार्टअप इंडिया, प्रधानमंत्री रोजगार योजना या योजनांचा लाभ घेतल्यास ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार वाढू शकतो. सेंद्रिय शेती, सौरऊर्जा, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन यांसारख्या स्वयंरोजगाराच्या संधी ग्रामीण भागात उपलब्ध होऊ शकतात. यामुळे टिकाऊ विकास साधता येतो. जेव्हा ग्रामीण भागात स्वयंरोजगार वाढतो, तेव्हा उत्पन्न वाढते, शिक्षणासाठी निधी मिळतो आणि आरोग्य सुधारते. यामुळे संपूर्ण समाजाचा स्तर उंचावतो आणि दारिद्र्य कमी होते.

**निष्कर्ष:**

स्वयंरोजगार हे केवळ पैसे कमावण्याचे साधन नसून व्यक्तीच्या स्वतंत्रतेचा, आत्मनिर्भरतेचा आणि आर्थिक स्थिरतेचा मार्ग आहे. स्वयंरोजगार हा बेरोजगारी कमी करण्यास मदत करतो. योग्य कौशल्य आणि सरकारी योजनांचा लाभ घेतल्यास यशस्वी व्यवसाय उभारता येतो. यामुळे केवळ व्यक्तीच नव्हे, तर समाज आणि देशाचाही विकास होतो. स्वयंरोजगार आणि ग्रामीण विकास हे एकमेकांवर अवलंबून आहेत. स्वयंरोजगाराच्या

संधी वाढल्यास ग्रामीण भागाचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास होतो. त्यामुळे स्वयंरोजगार हा ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा घटक आहे, आणि दोघेही परस्परपूरक आहेत असे असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची:**


1. Prasad B.k. (2003), Rural Development: Concept Approach and Strategy, Sarup & Sons Publishers, India.
2. Misra S.N, (1991), Decentralization in development, Mittal Publication, New Delhi, India
3. Singh Kuldeep, (2024), Gramin Vikas Evm Panchayati Raj - Ytharth, Sandarbh Evm Chunautiya, White Falcon Publishing, Delhi
4. Kapur Radhika, (2019), Rural Development Approaches and Strategies
5. चव्हाण दिनेशसिंग, पंचायतीराज एवं ग्रामीण अर्थव्यवस्था, प्रमेश युनिव्हसल प्रकाशन, भारत.
6. डॉ. नानासाहेब पाटील - ग्रामीण विकासाची तत्त्वे आणि धोरणे"
7. शहा डी.एम.- ग्रामीण विकास आणि पंचायत राज
8. https://rural.gov.in/en
9. https://labour.gov.in/hi/central-labour-service

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# भारतापुढील सध्याची आव्हाने

**प्रा .डॉ .रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे.**
इतिहास विभाग प्रमुख आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता .आष्टी जि .बीड.
**DOI-10.5281/zenodo.15574039**

**प्रस्तावना -:**भारतीय समाजातील समस्याचे विविध कारणे एकमेकात गुंतलेली आणि परस्परांशी संबंधित आहेत .कारण पारंपारिक समाज व्यवस्थेत भारतीय सध्या स्थितीतील आव्हाने मोठ्या प्रमाणात आहेत .भारतातील आर्थिक सामाजिक आणि वैचारिक बदलास सुरुवात होऊन केवळ शंभर वर्षे झाली आहेत .इंग्रज येथे आले नसते तर दळणवळण, कारखाने, रेल्वे, शिक्षण यात बदल झाला नसता .भारताला ज्या महत्त्वाच्या समस्या भेडसावीत आहेत त्या प्रमुख्याने दारिद्र्य, कुपोषण, भ्रष्टाचार,वाढती लोकसंख्या, स्त्रियावरील वाढते अन्याय इत्यादी होय .थोडक्यात या समस्यांची माहिती पुढील प्रमाणे आपल्याला सांगता येईल.

**दारिद्र्य** -: दारिद्र्य हा एक शाप आहे .दारिद्र्य ही एक लोकसंख्यातून उदयास आलेली समस्या असून ती सामाजिक व आर्थिक समस्या सुद्धा आहे .दारिद्र्य ही संकल्पना तशी वेगवेगळया स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो .दारिद्र्यालाच गरिबी असे म्हटले जाते . ज्याच्याजवळ पैसा नाही त्याला कोणी दरिद्री म्हणतात तर कोणी गरीब म्हणतात .भारतात दारिद्र्य जीवन जगणाऱ्यांची संख्या कमी नाही .ती खूप मोठ्या प्रमाणात आहे .अनेकांना पैसे नसल्याने एक वेळचे जेवण सुद्धा मिळत नाही .निवाऱ्यासाठी छप्पर नसणाऱ्या लोकांची संख्या भारतात कमी नाही .अंगभर कपडे नसणारा ची लोकांची संख्या ही मोठी आहे .भारतात ग्रामीण भागात 1988स ***दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणारा ची संख्या 41.07कोटी होती .शहरी भागात हेच प्रमाण %33.06 होती.

**दारिद्र्याची कारणे** -:दारिद्र्याची खरे कारणे त्याच्या कर्तुत्वाशी निगडित आहेत .दारिद्र्य माणसाचा आळशीपणा आणि वाईट वर्तन हे त्याच्या दारिद्र्यात भर टाकत असते . त्याची कारणे थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत.

१ (अनेक विचारवंताच्या मते दारिद्र्याची कारण हे वैयक्तिक आहेत .

२ (परंपरावादी दृष्टिकोन उदा.जातीयवाद,बलुतेदारी, मूल्य व्यवस्था, वशिला,लाचरुतपत अंधश्रद्धा इत्यादी कारणे जबाबदार आहेत.

३ (भारतीय समाजातील लोक दारिद्र्यातही समाधान मानत असतात.

४ (भारतातील वाढती लोकसंख्या हे सुद्धा दारिद्र्यासाठी कारणीभूत आहे .

५ (भारतातील कोट्यावधी लोकांना बेकारी व अर्थ बेकारीच्या समस्यांना सामोरे जावे लागते .

६ (भारतातील विषमतेमुळे श्रीमंत हा श्रीमंत होत जातो तर गरीब हा गरीबच राहतो .

७ (भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे त्यामुळे दारिद्र्य वाढले आहे.

**दारिद्र्य समाप्त करण्यासाठी उपाय योजना-:**

भारत देशामध्ये पसरलेले भयंकर दारिद्र्य हे अनेक उपाययोजना करून सुद्धा समाप्त होऊ शकले नाही .दारिद्र्य नाहीश्य करण्यासाठी खालील उपाय योजना ची मदत होऊ शकते.

१ (बेकारी नाहीसे होण्यासाठी नोकरी पाहिजे .

२ (लोकसंख्या नियंत्रणात ठेवली पाहिजे .

३ (सुधारित बी वापरले पाहिजे, शेतीमध्ये सुधारण्याची पद्धत अवलंबली पाहिजे,सिंचन व्यवस्था वाढविली पाहिजेत.

४ (भारतामधील आर्थिक विकास गती वाढविली पाहिजे .

५ (उत्पादनाचे साधन आणि संपत्तीचे वितरण समाजातील सर्व लोकांमध्ये होणे गरजेचे आहे .

६ (भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी प्रशासनाद्वारे ख कडक नियम व कायदे करणे गरजेचे आहे.

७ (भारतीय समाजातील वाईट प्रथा अस्पृश्यता हुंडा अनिष्ट रूढी परंपरा नष्ट करणे गरजेचे आहे .

८ (लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल अशा पद्धतीने शिक्षणाला व्यवसाय आणि आर्थिक विकासाशी जोडणे .

९ (लोकांना आपल्या गावाच्या जवळ बाजारपेठा उपलब्ध करून द्यावी .इत्यादी स्वरूपाच्या उपाययोजनाने भारतीय दारिद्र्य कमी होईल.

**दारिद्र्याचे परिणाम** -: दारिद्र्य ही एक भारतीय वाढत्या लोकसंख्या मुळे उदयास आलेली समस्या आहे .या समस्याचा समाजाच्या जीवनावर वाईट परिणाम होतो.

१ (दारिद्र्यामुळे समाजात भ्रष्टाचार होतो कारण दारिद्र्य जीवन जगणारे लोक भ्रष्टाचाराला खतपाणी घालून आपली आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करतात .

२ (आपल्या गरजा जेव्हा प्रामाणिकपणे प्रयत्न करूनही पूर्ण होत नाही त्यामुळे अपराध केला जातो .

३ (दारिद्र्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होऊन घटस्फोट होतो .

४ (दारिद्र्याला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात .

५ (दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या अनेक स्त्रिया आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी वेश्या व्यावसाय करतात .

६ (भारतातील भिक्षा वृत्तीचे एकमेव कारण दारिद्र्यच होय .दारिद्र्यामुळे Closing, कुपोषण, रोगराई,बेकारी अशा स्वरूपाचे परिणाम होतात.

**भ्रष्टाचार** -: भारतात भ्रष्टाचार ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या आहे .भ्रष्टाचार हा एक शिष्टाचार बनला आहे . कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही .भ्रष्टाचार हा समाजाला लागलेला कलंक आहे .गाव पातळी पासून तर देशपातळीपर्यंत भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण मन अचंबित केल्याशिवाय राहत नाही .असे एकही क्षेत्र नाही की ज्या क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार होत नाही .संरक्षण क्षेत्र,परराष्ट्र क्षेत्र,गृह क्षेत्र, अर्थ खाते,शिक्षण खाते, उद्योगधंद्याचे खाते,,समाज कल्याण खाते,असे कितीतरी खाते व विभाग आहेत की जेथे अब्जावधी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार राजरोजपणे चालू असतो .आदर्श म्हणून राजकीय पुढारी किंवा वरिष्ठ अधिकारी त्यांच्याकडे बघण्याची वेळ केव्हाच संपुष्टात आली आहे .फक्त बोटावर मोजण्या जोगेच अधिकारी भ्रष्टाचार करत नाहीत .भ्रष्टाचार करून देवाला सोन्याचा दागिना करून दिला किंवा सत्यनारायणाची पूजा केल्यास किंवा पाच दहा लोक जेवण दिल्यास किंवा मंदिर मशिदीच्या बांधकामात देणगी दिल्यास केलेला भ्रष्टाचार पुनीत होऊ लागला आहे .भ्रष्टाचाराला कोणती कारणे आहेत त्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

**भ्रष्टाचाराची कारणे -:** भारतातील बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे मूलभूत गरजा बरोबरच अनेक गरजा सुद्धा महत्त्वाच्या ठरले आहेत .समाजात प्रतिष्ठा हवी असली तर त्याच्यासाठी संपत्ती व पैसा हवा असतो .आर्थिक परिस्थिती चांगली तो प्रतिष्ठित असे समीकरण झाले आहे . पैशामुळे जगातले सर्वे सुख विकत घेता येते अशी प्रत्येक व्यक्तीची मानसिकता तयार झाली आहे .चांगले घर घरा टीव्ही रेडिओ फोर व्हीलर मोठ्या गाड्या सोन्याचे दागिने इत्यादी वस्तू हव्या असतील तर पैसा हवा लागतो .हा पैसा सरळ मार्गाने मिळणे शक्य नसते .म्हणून भ्रष्टाचार करून जास्तीत जास्त पैसा मिळवून हवे ते सुख मिळविण्याची स्पर्धा सुरू झाली आहे .ठेकेदार, गुत्तेदारीत अधिकाऱ्यांना लाज देऊन कमी पैशात काम पूर्ण करतो . बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत नोकरी करणे प्रतिष्ठितपणाचे लक्षण समजले जात आहे .नोकरी मिळविण्यासाठी ही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो .शिक्षण घेण्यासाठी ही मोठ्या प्रमाणात खर्च होतो . यामधूनच भ्रष्टाचाराच्या निर्मितीला सुरुवात होते .उत्तम नोकरी मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती अशी अवस्था निर्माण झाली आहे .त्यामुळे पैसा मिळवावा म्हणून नोकरी करावीशी वाटते .ती मिळवण्यासाठी पैशा द्यावा लागतो . आणि मिळाल्यानंतर बढती आवश्यक असते म्हणून भ्रष्टाचार करून प्रमोशन घेतले जाते .राजकारणी व वरिष्ठ अधिकाऱ्याला पैसे दिल्याशिवाय लवकर प्रमोशन मिळत नाही.

समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात अशा प्रकारचा भ्रष्टाचार निर्माण झाल्याने विविध प्रकारच्या समस्या निर्माण होऊन सामाजिक गुंतागुंत वाढली आहे . समाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा हवी असते ते मिळविण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करण्याची व्यक्तीची धडपड चालू असते .लोकांना खोटे आश्वासन देऊन गाव तालुका देशपातळीपर्यंतचे राजकारणी आपणाला स्थान प्राप्त व्हावे म्हणून पुढारी मंडळी खटाटोप करीत असतात .मतदान विकत घेऊन दारू मटणाच्या पार्ट्या वाहनाची व्यवस्था प्रचंड पैसा व्याविचार इत्यादीचा वापर करून पदी मिळविले जाते व सत्ता मिळवतात .हा प्रयोग सरपंच ते पंतप्रधानाच्या पदापर्यंत राबविण्याची प्रक्रिया भारतात सुरू आहे .साखर कारखाना सहकारी निवडणुकीत प्रचंड प्रमाणात पैसा खर्च केला जातो .हा खर्च निवड भ्रष्टाचाराच्या मार्गाने खर्च होत असतो .शासनाच्या दरबारातील मोठमोठ्या अधिकाऱ्यांना वश करण्यासाठी राजकीय पुढारी पैसे देऊन काम करून घेतात .तसेच अधिकारी सुद्धा राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरून हवा तेवढा पैसा भ्रष्टाचार करून मिळत असतात .

भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसाचे जीवन उध्वस्त झाले आहे .ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी यांची पिळवणूक करण्याची चढावळ अधिकारी वर्ग आणि राजकीय तथा सामाजिक कार्य करणाऱ्या पुढारी वर्गातून सुरू झाली आहे .तसेच शहरी भागातही खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले आहे.

**सारांश -:**भारत देशापुढे या दारिद्र्य व भ्रष्टाचार या समस्या निर्मूलनासाठी आज मोठ्या प्रमाणात प्रयत्न चाललेले आहेत .भ्रष्टाचाराला आळा बसावा म्हणून माननीय अण्णा हजारे यांनी माहिती अधिकार कायदा, जनलोपाल बिल यासाठी राज्य व देश पातळीवर मोठ्या प्रमाणात लढे उभे करून .भ्रष्टाचार निर्मूलन करण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला आहे .आज आपल्या देशातील राजकारणी अधिकारी भ्रष्टाचाराच्या प्रकरणाला भीत आहेत .त्यामुळे थोड्या का प्रमाणात होईना सुधारणा झाली आहे.

**संदर्भसूची -:**

१ (काळदाते सुधा, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, विद्या बुक प्रकाशक, औरंगाबाद, २००५.

२ (भांगे कालिदास, मुंडे चांगदेव, लोकसंख्या समज आणि समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २०११.

३ (काचोळे दा.धो., भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, २००५.

४ (काचोळे दा .धों .लोकसंख्या आणि विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१४.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# दिनेश काळे यांच्या नाटकातील महानगरीय वास्तव

**श्री वसंत लक्ष्मण पुंड[1] प्रा. डॉ. अनिल गर्जे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा, ता.आष्टी जि.बीड
[2]मराठी विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक एस .के .गांधी महाविद्यालय ,कडा ता.आष्टी जि.
DOI-10.5281/zenodo.15574070

**प्रास्ताविक**

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या धोरणामुळे भारतात अमुलाग्र बदल घडून आले. शहरात नवीन उद्योगधंदे आले. त्यामुळे नोकरीच्या शोधात ग्रामीण भागातील वेगवेगळ्या प्रांतातील लोकही रोजगार मिळण्याच्या आशाने गावाकडून शहरात दाखल झाले. वेगवेगळ्या क्षेत्रातील स्थलांतर झालेली मंडळी आपल्याबरोबर आपली संस्कृतीही घेऊन आले. रीती-रिवाज, रूढी – परंपरा सांभाळून इतरांच्याही रीती – रिवाज, रूढी - परंपरेचा त्यांनी स्वीकार केला. महानगरांना एक भाषा, एकच धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, भाषिक स्तर आणि रंग नसतो. कोणतेही महानगर घेतलं तर ते बहुस्तरीय, बहुआयामी, बहुसांस्कृतिक, बहुभाषिक असतं. महानगर हे एक अत्यंत गुंतागुंतीचे आणि अष्टपैलू व्यक्तिमत्व असते. जगाच्या पाठीवर कोणतही महानगर एकाएकी उभ राहत नाहीत. तर महानगराचा विचार करता जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणामुळे शहरांमध्ये उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ग्रामीण भागात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे, तसेच रोजगार मिळण्याच्या आशेने तेथील वेगवेगळ्या प्रांतातील वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक शहरात स्थलांतरित झाले. स्वतःबरोबर स्वतःची प्रांतिक ओळख, कौशल्य, जीवनमूल्य, भाषिक संस्कृती, पेहराव शैली, अन्न संस्कृती आणि समूहाच्या जीवन जाणिवा घेऊन शहरात आली. महानगराच्या विकासात अनेक वैशिष्ट्यपूर्ण अशा स्थलांतरित समाज गटाचा फार मोठा सहभाग आपल्याला दिसून येतो. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक समाज गट आपापल्या प्रांतातील संस्कृती महानगरात येऊनही जपताना दिसून येतो. स्थलांतरित समाज गटाच्या परस्पर संवादातून,आदान – प्रदानातून, त्यागातून नव्याने महानगरीय संस्कृतीची ओळख निर्माण झाली आहे आणि ती मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. आपण जेव्हा महानगरातील जीवनशैली संस्कृती असं म्हणतो, तेव्हा ते वेगवेगळ्या स्थलांतरित समाज गटांनी आपल्या संस्कृती बरोबरच इतरांच्या संस्कृतीचाही अंगीकार करून एक नव्या संस्कृतीचा उदय महानगरात होतो .

माहिती तंत्रज्ञानातही अमुलाग्र बदल झाले. समाज गतिमान झाला याचा परिणाम साहित्यावरही झालेला आपणास दिसून येतो. त्या अनुषंगाने महानगरीय साहित्यिक अरुण साधू, रंगनाथ पठारे, जी. के. ऐनापुरे, राजन गवस, विश्वास पाटील, कृष्णा खोत, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, अनंत काणेकर, मो. ग. रांगणेकर, वि. वा. शिरवाडकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, वसंतराव कानेटकर, विजय तेंडुलकर, सई परांजपे, बबन प्रभू, पुरूषोत्तम बेर्डे, जयवंत दळवी, चि. त्र्य. खानोलकर, केदार शिंदे, प्रशांत दळवी, प्र. ल. मयेकर, जनार्दन लवंगारे, दिनेश काळे इ. नाटककारांनीही अनेक गंभीर तसेच विनोदी आशयाची नाटके लिहिली आहेत असे दिसते. यामध्ये दिनेश काळे यांनी एक वेगळा विषय नाट्य लेखनात आणलेला दिसतो, तो म्हणजे महानगरीय जीवनावरील नाट्य लेखन होय.

प्रत्येक साहित्यिकाने साहित्यातून महानगरातील वेगवेगळे विषय हाताळले आहेत. त्यामध्ये दिनेश काळे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यांनी बाल साहित्य ते सामाजिक साहित्यापर्यंत अनेक विषय हाताळले आहेत. त्यांचे साहित्य आज विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. दिनेश काळे यांनी मराठी भाषेबरोबरच हिंदी व इंग्रजी भाषेतही आपले साहित्य निर्मिती केली. आज त्यांचे लेखन बहुभाषिक स्वरूपात उपलब्ध आहे त्यांच्या साहित्यातून सामाजिक समस्या, व्यक्तीची मानसिक जडणघडण, इतरांशी असलेले

नातेसंबंध, जीवन विषयक दृष्टिकोन, जीवन संघर्ष, सभोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक वातावरण, महानगरात कार्पोरेट क्षेत्रात काम करताना महिलेला करावी लागणारी तारेवरची कसरत, विभक्त कुटुंब इत्यादी बाबी अधोरेखित झालेल्या आहेत. त्याचा प्रत्यय त्यांच्या साहित्यातून वाचकांना वाचन करताना नक्कीच येतो.दिनेश काळे यांच्या साहित्यात महानगर केंद्रबिंदू आहे. त्यांच्या साहित्यातून महानगरातील जीवनांश अविष्कृत झाला आहे. त्यांच्या साहित्यात वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळ्या शैलीचा वापर करून महानगरातील माणूस, त्यांचा जीवन व्यवहार, त्यांच्या आयुष्यात येणारे वेगवेगळे पेज प्रसंग, स्वप्न डोळयासमोर ठेवून ती स्वप्न पूर्ण करायच्या जिद्दीने वेगवेगळया ठिकाणाहून स्थलांतरित झालेली युवा पिढी आपल्याला पाहायला मिळते. त्यांच्या साहित्यातील नायक नायिका, त्याचबरोबर दुय्यम श्रेणीतील पात्र, त्यांची वर्तन शैली, विचारधारा सर्व महानगरातील मानसिकतेच्या ठसा उमटणारी दिसून येतात. दिनेश काळे यांच्या या सर्व पात्रांचा गोतवळा आपण जवळून जर पाहिला तर या गोतावळयाची एक ठळक खासियत आपल्याला लक्षात येते. दिनेश काळे यांच्या साहित्यातून जागतिकीकरणामुळे बदललेले जीवनमान, आपल्याला पाहायला वाचायला मिळते. व्यक्ती मनातील संवेदना, मनातील भावना त्यांच्या साहित्यातून दिसून येतात. समाजात वावरताना आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे दिनेश काळे साहित्यातून वेद घेताना दिसतात. एक प्रतिमासृष्टी निर्माण झाले की त्यातून सूक्ष्म दृष्टीने ते कुटुंबाकडे पाहतात. महानगरात स्त्रीला करावी लागणारे तारेवरची कसरत त्यांच्या साहित्यातून चित्रित करतात.

दिनेश काळे यांनी आपल्या नाटकातून सभोवताली घडणाऱ्या घटनांचा अचूक वेध घेतला आहे. त्यांचे नाट्य विश्व सामाजिक जीवनावर व कौटुंबिक विषयावर आधारित आहे. त्यांच्या नाटकातील कथानकाचा केंद्रबिंदू महानगरातील मध्यमवर्गीय कुटुंब आहे. त्यांच्या नाटकातून महानगरातील स्वानुभवातून बदलत्या जीवनशैलीचे पडसाद पाहायला मिळतात. महानगरातील पती-पत्नीच्या नात्यातील वास्तव चित्रण त्यांनी नाटकाच्या कथानकातून मांडले आहे . त्यांच्या साहित्यकृतीतून समाज प्रबोधनाचा हेतू स्पष्ट होतो.

'कलेतले पक्षी' या दोन अंकी नाटकातून दिनेश काळे यांनी कौटुंबिक विषयावर भाष्य केले आहे. कलाकारांचे कला क्षेत्रातील जीवन व प्रत्यक्ष वैयक्तिक जीवन हा विषय नाटकाचा केंद्रबिंदू आहे. 'कलेतले पक्षी' या नाटकातून मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्री व्यक्तिमत्व, माधवी व्यक्तिरेखा भोवती कथानक फिरते. नाटकाच्या माध्यमातून नाटकातील कलाकारांकडे पाहण्याचा समाजातील प्रेक्षक, कुटुंब, नातेवाईक व शेजारी यांचा दृष्टिकोन मानसशास्त्रीय भूमिकेतून मांडला आहे . नाटकातील माधवीची प्रमुख भूमिका आहे. तर विश्वासराव, सुमतीबाई, साठेबाई आणि प्रभाकर ही स्त्री – पुरुष पात्रेही नाटकात वावरताना दिसतात. प्रत्येक पात्राची आयुष्याकडे बघण्याची भूमिका आणि स्वभावदर्शने वेगवेगळे आहेत. अरुण आणि माधवी कॉलेज जीवनापासून नाटकात काम करणारे कलाकार आहेत. पुढे दोघांचा प्रेमविवाह होतो. अरुण नाट्य क्षेत्रातून बाहेर पडून नोकरी करू लागतो. त्यामुळे त्याचा हा निर्णय माधवीला प्रचंड धक्का देणारा असतो. माधवीला नाटकात काम करू नये असेही सुचवतो. सासू-सासऱ्यांचे कौतुकांचे शब्द हळूहळू मानवीकडे संशयित नजरेने पाहायला लागतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला करमणूक, मनोरंजन हवे असते. त्यासाठी प्रेक्षक नाटक, सिनेमा बघतो. त्यावेळेस तो कलाकार त्या भूमिकेत जीव ओतून काम करतो. त्याचे प्रेक्षक कौतुकही करतात. परंतु अनेकदा त्या गोष्टीकडे भूमिका म्हणून प्रेक्षक पाहत नाही, तर ते जीवन खरे जीवन मानूनच त्यांची चर्चा समाजात चालू असते. याचे लोन जेव्हा कलाकाराच्या घरापर्यंत पोहोचते तेव्हा माधवीला खूप मनस्ताप होतो. तसेच माधवी सिनेमा क्षेत्रात वावरताना प्रभाकर सारख्या दिग्दर्शकांबरोबर काम करते. हेही अरुणला डिवचणारे ठरते. यावरूनच माधवी आणि अरुणचे घरात वारंवार भांडणे होतात. माधवीच्या मनाचे चित्रण करताना नाटककार स्त्री कलाकाराचे भावविश्व, मनोविश्व पंख कापण्यास मागे पुढे पाहत नाही. हीच शोकांतिका माधवीच्या आयुष्याला ग्रहण लावणारी ठरते. प्रभाकरही माधवीच्या केलेच्या भावनेचे कदर करतो परंतु आपल्या मर्यादा कधीही ओलांडत नाही. माधवी व प्रभाकर यांच्यामध्ये फक्त विश्वासाचे नाते आहे.

दिनेश काळे यांनी 'कलेतले पक्षी' या नाटकातून जीवनातील वास्तवाकडे कलात्मक जाणीवेतून बघण्याची दृष्टी दिली आहे. नाटकातून घर, संसार, कौटुंबिक जबाबदारी आणि नाटकाचे वेड या गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. दोन कलाकाराच्या मनातील संघर्ष किती टोकाला जाऊ शकतो. ते दाखवून देण्याचे काम दिनेश काळे यांनी केले आहे. सदर नाटकाच्या माध्यमातून कलाकाराच्या

मनाचा सकारात्मक विचार करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न दिनेश काळे यांनी केला आहे. एका प्रेम कथेचा शेवट मनातील संशयामुळे कसा विभक्ततेकडे घेऊन जातो. त्यांचा सुखी संसार उद्धवस्त कसा होतो. ती अस्वस्थता आपल्याला विचार करायला लावणारी आहे. 'वादळी वाऱ्यासारखं' हे नाटक कौटुंबिक विषयावर लिहिलेले आहे. जागतिकीकरणानंतर मुंबई महानगरात झपाट्याने झालेल्या जीवन शैलीतील बदलांचे पडसाद नाटकावरही पडलेले आहेत. मुंबई महानगरातील बदलत्या जीवनशैलीचे पडसाद उमटविणारे हे नाटक आहे. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था याकडे तरुणाईचा पाहण्याचा दृष्टिकोन नाटकातून मांडला आहे. महानगरात मोठ्या पदावर अधिकारी असलेली सुहासिनी सुंदर सुशील व उच्चशिक्षित आहे. तिच्या आयुष्यात नवरा म्हणून आलेल्या माधव सुहासिनीचे सुरुवातीचे आनंदाचे दिवस पुढे तिच्या आयुष्यात उध्वस्ततेकडे घेऊन जातो. माधवचा स्वभाव विकृत असतो. तो सुहासिनीचा भावनिक, मानसिक आणि शारीरिक छळ करतो. त्यामुळे सुहासिनीला प्रेम विश्वास आणि जिव्हाळा कुठेही वाटायला येत नाही.

दिनेश काळे यांनी वादळी 'वादळी वाऱ्यासारखं' या नाटकातून नात्याला विश्वासाला तडा देणाऱ्या माधवचा खरा चेहरा समोर आणला. समाजात अशा प्रकारचे अनेक व्यक्ती वावरताना दिसतात. त्यामुळे असंख्य स्त्रियांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झालेला आपल्याला दिसून येतो. दिनेश काळे यांनी माधव सारख्या लक्ष लचके तोडणाऱ्याचा चेहरा अतिशय तटस्थपणे उभा केला आहे. दिवाकर, माधव, सुहासिनी ही तीन मुख्य पात्रे तर करंदीकरबाई, मिस रोमिला, पोलीस आणि न्यायाधीश ही दुय्यम पात्रे नाटकात वैविध्यपूर्ण रंग भरताना आपणास दिसून येतात.

सामाजिक नाटकातून समाज मूल्य नीतिमूल्य जीवनमूल्य आणि आदर्शाचे रुजवणूक होणे आवश्यक आ. असे दिनेश काळे यांना वाटते. तसेच कुटुंबसंस्था विवाहसंस्था यांचे पावित्र्य राखावी ही भूमिका देखील नाटककाराची स्पष्टपणे दिसते. संपूर्ण नाटकातून आयुष्याकडे सकारात्मक बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला स्पष्ट दिसून येते. समाजात विकृत स्वरूपाच्या व्यक्ती आपल्याला पाहायला मिळतात. अशा व्यक्ती महिलांना जाणीवपूर्वक त्रास देतात. त्यांच्या संशयी वृत्तीमुळे सुखी संसाराचे स्वप्न उद्ध्वस्त होते. हाच धागा पकडून नाटकाचे कथानक पूर्णत्वास जाते. सदर नाटकातून शौकात्मिकेकडून सुखात्मितेकडे जाणारा प्रवास चित्रित केला आहे . 'स्वप्नातले मन' मानवाला स्वप्नात अस्वस्थ करणारे आहे. दोन अंकी नाटक कौटुंबिक विषयाभोवती फिरणारे आहे. मुख्य पुरुष पात्र श्रीकांत मराठी भाषेचा प्राध्यापक आहे. मुख्य स्त्रीपात्र सविता. श्रीकांतची बायको ती सुद्धा शिक्षिका आहे. स्त्रीची होणारी ससे होलपट. तिच्या आयुष्यात मानसिक दृष्ट्या कशी हताश करता येईल याचे भावचित्रण दिनेश काळे यांनी केले आहे. लग्नानंतर अद्यापही मूलबाळ नाही यावरून सविताला होणारा मानसिक भावनिक त्रास फक्त एक स्त्री समजू शकते. श्रीकांत हे पात्र मेंदूत केवळ विचार विचार आणि विचारच घेऊन जगताना दिसतो. सविताची मानसिकता श्रीकांतच्या कधीच लक्ष देत नाही. श्रीकांत बरोबर पंधरा वर्षे संसार करूनही आयुष्याला पूर्णत्व आलं नाही अशी सविताची भावना आहे. अनेक ग्रंथ आणि जगाला वाचणारा श्रीकांत आपल्या बायकोच्या मनाला ओळखू शकत नाही. सविताला बाळ नसल्याची सल आयुष्यभर टोचत राहते. सविता श्रीकांत पासून मनाने फार दूर निघून जाते. तिचे एकाकीपण वेदनादायी ठरते. तिच्या स्वभावाचे मनस्थितीचे भाव विश्वाचे दिनेश काळे यांनी हळुवारपणे रेखाटले आहे. सदर नाटकात फ्लॅशबॅक तंत्राचा वापर दिनेश काळे यांनी केला आहे. त्यातून सविताच्या मनाची केवळ वेदनाच दिसून येते की जी काळाच्या ओघात पूर्ण शांत झालेली असते.

शेवटी नाटक अशा वळणावर येते विश्वाच्या निर्मितीचा विचार करणारा विचार आपल्यातील अपूर्णत्व पूर्ण करण्याचा विचार श्रीकांत सविताला बोलून दाखवतो परंतु त्यावेळेस सविता त्याच्यापासून मनाने खूप दूर गेलेली असते. श्रीकांतच्या मनातील मूल जन्माला घालण्याचा विचार या संपत आलेल्या आयुष्याच्या वळणावर ती स्पष्टपणे नाकारते आणि तेही स्वाभाविकच आहे. श्रीकांत हतबल होतो आणि विचारांच्या गर्दीत नेहमीसारखा हरवून जातो. दिनेश काळे यांनी मानवी मनातील गुंतागुंत, वास्तव दर्शपणे रेखाटलेली आहे. पती पत्नीच्या नात्यातील हे वास्तव चिंतनशील स्वरूपाचे आहे. पती-पत्नीचा दोघांचाही आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्यांच्या वैचारिक पातळीतील विरोधाभासाचे वास्तव चित्रण नाटकातून आले आहे.

समारोप

दिनेश काळे यांनी 'कलेतील पक्षी' नाटकातून महानगरातील आजच्या काळातील स्त्रीचे वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. महानगरात स्त्रीला कुटुंब आणि समाज अशा दुहेरी भूमितीतून संघर्षवत जीवन जगावे लागते याचा जीवनपट नाटकातून चित्रित केला आहे. नाटकातील माधवीची समस्या ही समस्त स्त्री जातीची समस्या आहे

का ? असे अनेक प्रश्न उभे राहतात. सामाजिक परिप्रेक्षात स्त्रीच्या वाटेला येणाऱ्या दुःखद वेदनादायी जीवनानुभवाचा पदर नाटकातून उलगडतो. नाटकातून मध्यमवर्गाच्या वृत्तीतील अवस्थांतरे टिपलेली आहेत. तसेच त्यांची पारंपरिक रुढी परंपरा जतन करण्याची वांझोटी धडपड ही वाचकांच्या ध्यानात येण्यावाचून राहत नाही. तर 'वादळी वाऱ्यासारखं' या नाटकातून नात्याला, विश्वासाला तडा देणाऱ्या माधवचा खरा चेहरा समोर येतो. समाजात अशा प्रकारच्या अनेक व्यक्ती वावरताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे असंख्य स्त्रियांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झाल्याशिवाय राहत नाही. मानवी जीवनामध्ये निर्माण झालेल्या पोकळीचे वास्तववादी चित्रण नाटकातून केलेले दिसते. 'स्वप्नातले मन' या नाटकातून पती-पत्नीच्या जीवनातील पंधरा वर्ष संसार करूनही आयुष्याला पूर्णत्व आलं नाही अशी सविताची भावना आहे श्रीकांतला याची जेव्हा जाणीव होते तेव्हा पत्नी सविता त्याच्या पासून मनाने खूप दूर गेलेली असते. एकंदरीत या नाटकातून पती-पत्नीचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व वैचारिक पातळी पातळीतील विरोधाभास याचे चित्र दिनेश काळे यांनी अचूकरित्या रेखाटले आहे. आधुनिक युगातील प्रयोगशील महानगरीय नाटककार म्हणून दिनेश काळे यांचा निश्चितच उल्लेख करावा लागेल.

**संदर्भ सूची**


1. वाटाणे, राजेंद्र ( ५ जुलै २०२०) 'दिनेश काळे यांचे कादंबरी विश्व स्वरूप आणि समीक्षा', चंद्रकांत प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती.
2. देशमुख, प्रियदर्शनी (२०२२) 'दिनेश काळे यांचे कादंबरी विश्व : एक आकलन', वरदा प्रकाशन.
3. सुतार बाळासाहेब व देशमुख प्रियदर्शनी (संपादक) ८ मार्च २०२४ दिनेश काळे यांचे कथनात्मक साहित्य कोमल प्रकाशन मुंबई प्रथम आवृत्ती.
4. गर्जे अनिल (संपादक ) (१५ जानेवारी २०२४ ) दिनेश काळे यांचे समग्र वागणे शोध व बोध वर्धा प्रकाशन पुणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# विकसीत भारत व वाढत्या नागरिकरणाची भुमिका : एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. आनेराव एम.एम.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड ता. लोहा जि. नांदेड
**DOI-10.5281/zenodo.15574109**

**प्रस्तावना :-**

भारत देश हा विविधता, संस्कृती आणि वारसा यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारत हा सुरुवातीपासूनच लवचिकता आणि संभाव्यतेशी संबंधित असलेला देश आहे. विकसित भारत किंवा विकसित भारताचे प्रत्येक भारतीयांचे स्वप्न आहे. समृद्धी, तांत्रिक उपलब्धी, सामाजिक समानता आणि टिकाऊपणाद्वारे वैशिष्ट्यकृत जागतिक मंचावर अभिमानाने असलेल्या भारताचे हे एक स्वप्न आहे. 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे एक लक्ष ठेवले आहे. आज भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. काही वर्षातच तो जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था असणारा देश म्हणून पुढे येणार आहे. सद्यस्थितीत भारताचा आर्थिक विकास हा अत्यंत जलद गतीने होत आहे. एकविसावे शतक हे भारताचे असणारे आहे. भारत आज निर्णायक टप्प्यावर उभा आहे. विशेषतः गेल्या दहा वर्षात भारताने ज्या आत्मविश्वासाने जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना ज्या संधी साधल्या, जो लौकिक प्राप्त केला तो उल्लेखनीय अशाच आहेत. 2027 पर्यंत भारताची जीडीपी पाच ट्रिलियन डॉलर असेल असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला आहे. म्हणजेच तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ओळखली जाईल. देशातील वाढता मध्यम वर्ग, तांत्रिक प्रगती आणि धोरणात्मक सुधारणामुळे देशाचा विकासाचा मार्ग लक्षणीय असाच आहे .

भारतात सध्या परिवर्तन घडवून आणण्यासाठी सुयोग्य काळ असल्याचे मानले जाते. भारताला विकसित राष्ट्र व्हायचे असेल तर, 30 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था व्हावे लागेल. एकुणच विकसित भारत हे केवळ महत्त्वाकांक्षा नसून आर्थिक परिवर्तनाचा तो आदर्श असा रोडमॅप आहे. 2047 कडे वाटचाल करत असताना या संधी भारताने साधल्या तरच तो जगातील महासत्ता म्हणून नक्कीच पुढे आलेला असेल. विकसित भारत बनविण्यासाठी अनेक घटकांचा सहभाग असणार आहे. प्रत्येक घटकाची ती समान जबाबदारी असणार आहे. त्यात आज जलद गतीने वाढणारे शहरीकरण हे विकसित भारत बनविण्यामधील त्याचे योगदान किंवा आर्थिक विकासासाठी वाढत्या शहरीकरणाचे योगदान हे अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

2047 पर्यंत भारतास विकसित भारत बनविण्याचे ध्येय आखले आहे. आणि त्या दृष्टीने भारत मार्गक्रमन सुद्धा करत आहे. त्यामध्ये वाढत्या शहरीकरणाचा विकसित भारत बनविण्यात काय भूमिका आहे हे जाणून घेण्याकरिता आणि शोधनिबंधाला योग्य दिशा मिळवणे यासाठी प्रस्तुत शोध निबंधाची काही उद्दिष्टे निर्धारण करण्यात आलेली असून ती पुढील प्रमाणे आहेत.

1.1 विकसित भारताची प्रक्रिया आकलन होण्याच्या दृष्टीने अध्ययन महत्त्वाचे आहे.

1.2 विकसित भारतात शहरीकरणाचे योगदान अभ्यासणे आवश्यक आहे

**शोधनिबंधाचे गृहीतकृत्ये :**

शोधअध्ययन निश्चित केल्यानंतर संशोधकास आपले संशोधन कार्य पूर्त्वास नेत असताना गृहीतकृत्यामुळे संशोधनास निश्चित दिशा प्राप्त होत असते. या अनुषंगाने शोधनिबंधाचे गृहीत कृती खालील प्रमाणे आहेत.

2.1 आज भारतात शहरीकरणाची प्रक्रिया जलद गतीने होत आहे.

2.2 विकसित भारत बनवण्यात शहरीकरणाचा मोठा हातभार आहे.

2.3 शासनाने आर्थिक धोरण हे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करून तथ्य संकलित करण्यात आलेली आहेत. अध्ययन विषयाशी अनुषंगिक दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, शासकीय, निमशासकीय अहवाल, मासिके, साप्ताहिकी, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका, प्रकाशित अप्रकाशित शोधअध्ययन, संकेतस्थळे इत्यादी माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण :**

संयुक्त राष्ट्र संघाच्या जुलै 2014 मध्ये प्रकाशित 'जागतिक नागरीकरणाचे परिदृष्य' (World Urbanisation Prospect) अहवालामध्ये आज जगभरात 54% लोकसंख्या नागरी भागात राहत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे .तसेच पुढील 2050 पर्यंत हे प्रमाण 66% पर्यंत पोहचले .यामध्ये सर्वाधिक वाढ भारत, चीन व नायजेरिया या देशामध्ये) 37%) होईल .भारत 404 दशलक्ष रहिवाशांची तर चीन 292 दशलक्ष आणि नायजेरिया 212 दशलक्षांची भर टाकेल .याच अहवालानुसार नागरी भागांचे नियोजन करणे ही सर्वात महत्त्वाची समस्या विकसनशील राष्ट्रांना भेडसावणार आहे .परंतु जर योग्य नियोजन केले तर 'शाश्वत नागरीकरण' देशाच्या आर्थिक विकासासाठी व लोकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी साहाय्यक ठरेल, भारतामध्ये 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी 31.16% (37.7 कोटी (लोकसंख्या नागरी भागामध्ये वास्तव्य करत आहे .हेच प्रमाण 2001 च्या जनगणनेनुसार 27.81% (28.6 कोटी (एवढे होते .म्हणजेच मागील दहा वर्षांमध्ये नागरी लोकसंख्येमध्ये जवळपास दहा कोटी एवढी वाढ घडून आली आहे .भारतामध्ये नागरीकरणाच्या लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने वाढत आहे .1901 च्या जनगणनेनुसार 10.84% (2.58 कोटी (लोकसंख्या नागरी भागात होती, तर 1951 मध्ये 17.29% (6.24 कोटी (इतकी होती .यावरून सध्या नागरी लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ घडून आल्याचे दिसते .तसेच हे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

भारतामध्ये सध्या नागरीकरणाच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे .या वाढत्या लोकसंख्येची अनेक कारणे आहेत. सध्या नागरी लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे .कारण नागरी भागाचा विकास करण्यासाठी व लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सरकार विविध धोरणे राबवित आहे .उदा .SEZ, उद्योगांचे विकेंद्रीकरण, स्मार्ट सीटी प्रकल्प .परिणामी ग्रामीण भागातील लोक विविध सेवा सुविधांची व रोजगाराची उपलब्धता यामुळे शहरी भागाकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर करत आहेत .भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रकारच्या अत्याधुनिक आरोग्य सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अनेक रोगांचे उच्चाटन झाले .त्यामुळे मृत्यूदरामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली .पण शासनास जन्मदरामध्ये नियंत्रण ठेवण्यास अपयश आले .त्यामुळे जन्म आणि मृत्यू दरामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत निर्माण झाली .परिणामस्वरूप लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली .याच वाढीला 'लोकसंख्येचा विस्फोट' म्हणून ओळखले जाऊ लागले .या प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे नागरी लोकसंख्येची वाढही मोठ्या प्रमाणात घडून आली आहे .1951 मध्ये नागरी भागाची लोकसंख्या 6.2 कोटी होती .यामध्ये वाढ होऊन ती 2011 मध्ये 37.7 कोटीवर पोहचली आहे.

भारताची अर्थव्यवस्था सातत्याने वाढत आहे .सध्या भारताची अर्थव्यवस्था GDP नुसार जगातील 10 वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, तर PPP (Purchasing Power Parity) नुसार ती तिसरी आहे .यावरून आपल्याला भारतीय अर्थव्यवस्थेचा मोठ्या प्रमाणावर विकास होत असल्याचे समजते. पण या विकासाचे निरीक्षण केले तर हा विकास नागरी भागातच केंद्रित झाल्याचे आपणाला दिसून येते .यामुळे नागरी भागामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या व त्याकडे आकर्षित होऊन लोकांचे मोठे स्थलांतर घडून आले .तसेच अनेक लहान शहरे मोठ्या शहरांच्या स्वरूपात परावर्तित झाली. मान्सूनवर आधारित शेती, शेतीची लहान-लहान तुकड्यांमध्ये विभागणी, कमी उत्पन्न अशा प्रकारच्या कारणांमुळे शेतीवर आधारित लोक शेती सोडून शहरांकडे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात वळत आहेत .त्यामुळे सध्या कृषी व्यवसायाचे प्रमाण कमी असून याचा परिणाम नवीन शहरांचा उदय व शहरांची लोकसंख्या वाढण्यावर होत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये नागरी भाग सध्या एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत .भारताच्या एकूण GDP (Gross Domestic Product) पैकी 63% हिस्सा नागरी भागाचा आहे .यावरून नागरी भागांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थान लक्षात येते .नागरी भागामध्ये द्वितीय व तृतीय क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विकास झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे .या शहरी विकासाला खऱ्या अर्थाने वेग 1990 च्या नंतर प्राप्त झाला .1990 साली एकूण GDP मध्ये नागरी भागाचा वाटा 45% होता .1990 च्या औद्योगिक धोरणानंतर भारतामध्ये परदेशातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ लागली .तसेच भारतामध्ये मोठ्या प्रमाणात स्वस्त

मजूरपुरवठा होत असल्यामुळे या उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली .यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर मोठ्या शहरांचा उदय, नागरी सोयीसुविधा, नागरी लोकसंख्येच्या उत्पन्नात वाढ होत आहे .यामुळेच आता क्रयशक्तीच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या स्थानावर आहे.

भारत सरकारने 1990 मध्ये नवीन औद्योगिक धोरण स्वीकारल्यामुळे परदेशी गुंतवणुकीवरील बंधने शिथिल करण्यात आली .परदेशी गुंतवणूक देशात मोठ्या प्रमाणामध्ये होऊ लागली .ही गुंतवणूक मुख्यतः शहरी भागामध्ये करण्यात आली . त्यामुळे शहरी भागाचे एकूण GDP मधील प्रमाण सातत्याने वाढत आहे. 1990 मध्ये एकूण GDP मध्ये नागरी भागाचा वाटा 45% एवढा होता .तो वाढून सध्या 63 टक्क्यांवर पोहचला आहे .नुकत्याच प्रकाशित झालेल्या बर्कलेच्या) Barclays) अहवालानुसार पुढील 20 वर्षांमध्ये देशातील एकूण GDP मधील नागरी हिस्सा 70-75% एवढा असेल असे म्हटले आहे . यावरून भारताच्या नागरी भागामधील GDP चा होत असलेला विकास स्पष्ट होतो .हा विकास मुख्यतः द्वितीय व तृतीय क्षेत्रामध्ये होत असलेल्या प्रगतीमुळे होत आहे. भारतामध्ये सध्या नागरीकरणाचा मोठ्या प्रमाणात विकास होत असला तरी अनेक प्रकारच्या समस्यांमुळे या विकासावर मर्यादा येत आहेत.

**निष्कर्ष :**

भारतातील नागरी अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबरच प्राथमिक क्षेत्राव्यतिरिक्त द्वितीयक आणि तृतीय क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे प्राथमिक क्षेत्रावरील विशेषतः शेतीवरील पडणारा ताण कमी होऊ लागला आहे. शहरी भागांमध्ये उद्योगधंद्याचे केंद्रीकरण झाले असल्यामुळे तसेच तृतीय क्षेत्राचा म्हणजेच बँक, परिवहन, वैद्यकीय, शिक्षण आदि क्षेत्राचा विकास होत असल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहे. त्यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगार मिळत आहे. तसेच शहराच्या विकासाबरोबरच मानवी विकासाचा ही वेग वाढला आहे. हेच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे. विकसित भारत हे केवळ एक स्वप्न नाही तर एक ध्येय आहे. या ध्येयप्राप्तीसाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन मार्गक्रमण करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण. आरोग्य. रोजगार आणि सामाजिक न्याय यासारख्या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून आपण विकसित भारताचे ध्येय साकारू शकतो.

**संदर्भ :-**

1. घोडके अमोल, 2013, “भारतातील मानव संसाधन विकास” द युनिक □कॅडमी, पुणे.
2. तिवारी शारदा, 2011, “नागरी समाजशास्त्र”, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली.
3. जगताप आर.डी., पाटिल डी.जी. वाणी निता, 2016 “भारतीय अर्थव्यवस्थचे परिदृश्य”, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
4. रमेश सिंह, 2016, “भारतीय अर्थव्यवस्था” मॅग्रोहिल एज्युकेशन प्रा. लि. चेन्नई.
5. तुकाराम जाधव (संपा), नोव्हेंबर 2014, बुलेटिन ऑफ युनिक □कॅडमी, पुणे.

**प्रा. डॉ. आनेराव एम.एम.**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# राष्ट्रीय एकात्मता आणि मराठी साहित्य

**श्री योगेश आबासाहेब जपे[1] डॉ. गोपीनाथ पी. बोडखे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी एम. ए. मराठी सेट आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा, तालुका आष्टी जिल्हा बीड.
[2]संशोधक मार्गदर्शक मराठी विभाग प्रमुख आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय , कडा, तालुका आष्टी जिल्हा बीड.
DOI-10.5281/zenodo.15574129

**प्रस्तावना**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेक भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा असूनही, देश म्हणून आपण सर्व एकत्र राहतो. हीच भावना म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. राष्ट्रीय एकात्मता टिकवणे आणि तिचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. साहित्य, विशेषतः मराठी साहित्य, राष्ट्रीय एकात्मतेच्या जोपासनेत महत्त्वाची भूमिका बजावते. मराठी साहित्याच्या माध्यमातून विविध कालखंडांमध्ये एकात्मतेचा संदेश दिला गेला आहे. संतसाहित्य, भक्तिसाहित्य, सामाजिक सुधारणा चळवळीतील साहित्य, आधुनिक साहित्य आणि स्वातंत्र्यलढ्यातील साहित्य या सर्वांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या वृत्तीला बळ दिले आहे.

**राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ आणि महत्त्व**

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय?

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविधतेत एकता. भारतात अनेक भाषा, धर्म, जाति, प्रांत आणि भौगोलिक विभाग असले तरी, सर्व भारतीय एकाच राष्ट्राचा भाग आहेत. एकमेकांबद्दल बंधुभाव, सहिष्णुता आणि समन्वय ठेवणे हे राष्ट्रीय एकात्मतेचे लक्षण आहे.

राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व

1. **देशाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक**: एकात्मतेमुळे देशात शांतता आणि स्थैर्य राहते. जर समाजात फुटीरतावादी प्रवृत्ती वाढल्या, तर देशाची सुरक्षा धोक्यात येऊ शकते.
2. **सामाजिक विकास:** एकतेमुळे समाजातील विविध घटक परस्पर सहकार्याने पुढे जातात. त्यामुळे देशाच्या प्रगतीला चालना मिळते.
3. **आर्थिक प्रगती**: देशात एकता असल्यास उद्योग, व्यापार आणि शेती यांचा विकास अधिक वेगाने होतो.
4. **संस्कृतीचे जतन:** विविधतेतील एकतेमुळे भारताची समृद्ध संस्कृती टिकून राहते आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते.
5. **लोकशाहीची मजबुती**: भारत एक लोकशाहीप्रधान देश आहे. राष्ट्रीय एकात्मतेमुळे लोकशाही प्रणाली अधिक बळकट होते.

**मराठी साहित्य आणि राष्ट्रीय एकात्मता**

मराठी साहित्य हे भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला आहे. संतसाहित्यापासून ते आधुनिक काळातील साहित्यपर्यंत, विविध लेखकांनी सामाजिक समता, बंधुभाव आणि राष्ट्रभक्तीवर भर दिला आहे.

**संत साहित्याचा उदय आणि त्याचा प्रभाव**

संत साहित्य मुख्यतः १२व्या ते १८व्या शतकादरम्यान विकसित झाले. हा कालखंड धार्मिक व सामाजिक सुधारणांसाठी महत्त्वाचा ठरला. या काळातील संतांनी आपले विचार सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी ओवी, अभंग, भारूड आणि कीर्तन यांसारख्या सहजसोप्या काव्यप्रकारांचा वापर केला. संतांनी "भक्ती मार्ग" स्वीकारून समाजातील विषमता दूर करण्यासाठी कार्य केले. त्यांच्या शिकवणींनी जातिभेद नाकारला आणि मानवतावादी दृष्टिकोन मांडला. मराठी संत साहित्य हे राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रचारासाठी आणि सामाजिक समतेसाठी एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. संतांनी समाजातील भेदभाव, जातीव्यवस्था, धार्मिक तेढ आणि विषमता नष्ट करण्यासाठी आपल्या साहित्याचा प्रभावी वापर केला. संत साहित्याच्या माध्यमातून त्यांनी प्रेम, करुणा, समता आणि बंधुभाव यांचे महत्त्व पटवून दिले.

**मराठी संत आणि त्यांचे राष्ट्रीय एकात्मतेतील योगदान**

१) संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६)

संत ज्ञानेश्वर महाराजांचे अभंग आणि राष्ट्रीय एकात्मता

संत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे अनमोल वैभव आहे. महाराष्ट्राच्या संत परंपरेमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजात प्रेम, समता आणि बंधुता यांचे मूल्य रुजवले. विशेषतः त्यांची विचारधारा ही राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरते.

संत ज्ञानेश्वरांचे अभंग : एक सामाजिक समन्वय

संत ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या अभंगांमध्ये समाजातील विषमता नष्ट करून मानवतेचे तत्त्वज्ञान रुजवण्याचा प्रयत्न आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या संकल्पनेला अनुसरून त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला समता, प्रेम आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांचे अभंग केवळ भक्तीपर नसून समाजप्रबोधन करणारेही आहेत.

उदाहरणार्थ, त्यांनी त्यांच्या अभंगांमध्ये सांगितले -

"जो जो जिव्हाळा तो तो भगवान।
जेथे जाणा तेथे पंढरी॥"

या अभंगातून ते सांगतात की भगवंत कोणत्याही एका जाती, धर्म किंवा वर्गापुरता मर्यादित नाही, तर प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येकाच्या हृदयात आहे. हीच भावना राष्ट्रीय एकात्मतेच्या मूलभूत तत्त्वाशी सुसंगत आहे.

ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि राष्ट्रीय एकात्मता

१. **जातिव्यवस्थेचा निषेध** : ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांच्या अभंगांमधून सर्व मानव समान आहेत, असे प्रतिपादन केले. ते म्हणतात –

"अज्ञानी जन नाही जाती पंथ।
जाणेल तो पांडुरंग॥"

यातून जात, धर्म, वर्ण यांच्या पलीकडे जाऊन मानवता हीच खरी ओळख आहे, असा संदेश मिळतो. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात हा विचार राष्ट्रीय ऐक्य वाढवण्यास मदत करणारा आहे.

2. **सर्वधर्मसमभाव** : ज्ञानेश्वर महाराजांनी केवळ हिंदू धर्मापुरते मर्यादित विचार न ठेवता सर्व धर्मांना समान मानले. त्यांच्या अभंगांमध्ये संपूर्ण मानवजातीसाठी प्रेम आणि करुणेचा संदेश आहे.

3. **भाषिक एकात्मता** : ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील भगवद्गीतेचा मराठीत भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या ग्रंथाद्वारे अनुवाद केला. त्यामुळे लोकांना मातृभाषेतून ज्ञान मिळू लागले. हीच गोष्ट आजही राष्ट्रीय ऐक्यासाठी महत्त्वाची आहे, कारण विविध भाषांमध्ये संवाद साधल्याने समजूतदारपणा वाढतो.

अभंगांचे आजच्या काळातील महत्त्व

आज भारत विविधता आणि अनेकता असलेला देश आहे. अनेक जाती, धर्म, भाषा असूनही भारत एकसंध आहे. या एकात्मतेचा पाया हा संत परंपरेच्या तत्त्वज्ञानावर उभा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात आणि सामाजिक तणावांच्या परिस्थितीत ज्ञानेश्वर महाराजांचे अभंग हा लोकांना प्रेम, समता आणि बंधुभाव शिकवणारा दीपस्तंभ आहे.

**मत:**

संत ज्ञानेश्वर महाराजांचे अभंग राष्ट्रीय एकात्मतेसाठी मार्गदर्शक आहेत. त्यांनी जातिभेद, धर्मभेद, भाषाभेद नाकारून "विश्वात्मक देव" या संकल्पनेतून सर्वांना जोडण्याचे कार्य केले. त्यांच्या अभंगांचा गजर आजही महाराष्ट्रातील गावोगावी होत असतो. त्यांच्या विचारांवर आधारित जीवनशैली अंगीकारली तर राष्ट्रीय एकात्मतेला आणखी बळकटी मिळेल. म्हणूनच, ज्ञानेश्वर महाराजांचे अभंग म्हणजे भारतीय समाजाच्या ऐक्याचे प्रतीक आहेत.

**संत नामदेव (१२७०-१३५०)**

संत नामदेव यांचे अभंग आणि राष्ट्रीय एकात्मता

संत नामदेव महाराज हे वारकरी संप्रदायातील एक थोर संत कवी होते. त्यांच्या अभंगांमध्ये ईश्वरभक्तीबरोबरच सामाजिक समता, बंधुभाव आणि मानवतावाद यांचा ठसा आहे. त्यांनी समाजातील जातीभेद, धर्मभेद आणि विषमतेला विरोध करत सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणीमधून राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा आधार मिळतो.

संत नामदेव यांचे अभंग : सामाजिक समतेचा संदेश

संत नामदेव महाराजांनी त्यांच्या अभंगांमधून सर्व मानवांना एकसमान मानले. त्यांनी भक्तीला कोणत्याही जात, धर्म किंवा वर्गाच्या चौकटीत अडकवले नाही. ते म्हणतात –

"कलियुगामाजी एक भक्ती। जातीपाती न विचारावी।"

या अभंगातून ते सांगतात की भक्तीमध्ये कोणताही भेदभाव नसावा. मानवाने जातीपातीचा विचार न करता ईश्वरभक्ती करावी. हा विचार आजच्या भारताच्या सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

जातिभेदाचा विरोध आणि समानतेचा विचार

नामदेव महाराजांनी जातिभेदाविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यांना स्वतःला जातीय भेदभाव सहन करावा लागला, पण त्यांनी त्यावर सकारात्मक दृष्टिकोन ठेवत समाजात समतेचा संदेश दिला. त्यांनी असे स्पष्ट सांगितले की –

"अभंग म्हणे नामदेव। विठ्ठल सर्व जनांसी देव॥"

यातून ते सांगतात की विठ्ठल हा सर्वांचा आहे, कोणत्याही जाती-धर्माची मर्यादा त्याला लागू होत नाही. अशा विचारसरणीमुळे भारतीय समाजात सर्वधर्मसमभावाची आणि समतेची भावना वृद्धिंगत होते.

सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय एकात्मता

संत नामदेव महाराज केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी पंजाबमध्येही आपली भक्ती आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. त्यांच्या काही रचना श्री गुरुग्रंथसाहिब मध्ये समाविष्ट आहेत, यावरून त्यांच्या विचारांची व्यापकता दिसून येते. ते म्हणतात –

"हिंदू तरी साजणे, मुस्लिम तरी साजणे।
सर्वहिं चि पांढरांग॥"

या अभंगातून ते सांगतात की हिंदू असो वा मुसलमान, सर्वांचा परमेश्वर एकच आहे. हा विचार राष्ट्रीय एकात्मतेला बळकट करणारा आहे.

**भाषिक आणि सांस्कृतिक एकात्मता**

संत नामदेव महाराजांनी मराठीसोबतच हिंदी, पंजाबी आणि अन्य भाषांमध्येही अभंग रचले. यामुळे ते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतभर प्रसिद्ध झाले. विविध भाषांमध्ये त्यांनी ईश्वरभक्तीचा आणि सामाजिक समतेचा संदेश दिला, हे त्यांचे राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोठे योगदान आहे.

आजच्या काळातील महत्त्व

आज भारत विविध धर्म, जाती आणि भाषांचा संगम आहे. अशा परिस्थितीत संत नामदेव महाराजांचे अभंग आपल्याला समता, बंधुभाव आणि प्रेम शिकवतात. त्यांची शिकवण आचरणात आणल्यास सामाजिक आणि राष्ट्रीय एकता अधिक मजबूत होईल.

**मत:**

संत नामदेव महाराजांचे अभंग म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा मंत्र आहे. त्यांनी जातीभेद, धर्मभेद आणि भाषाभेद नष्ट करून मानवतावादाचा प्रचार केला. त्यांच्या अभंगांमधून आजही प्रेम, समता आणि बंधुतेचा संदेश मिळतो. म्हणूनच, त्यांचे विचार अंगीकारल्यास भारतीय समाज अधिक मजबूत आणि एकसंघ होईल.

**संत एकनाथ (१५३३-१५९९)**

संत एकनाथ महाराजांचे अभंग आणि राष्ट्रीय एकात्मता

संत एकनाथ महाराज हे मराठी संतपरंपरेतील थोर संत, कवी आणि समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या अभंगांमधून मानवतेचा संदेश दिला आणि जाती-धर्मभेदाच्या विरोधात ठाम भूमिका घेतली. त्यांचे विचार केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठीच नव्हे, तर राष्ट्रीय एकात्मतेसाठीही महत्त्वाचे आहेत. त्यांच्या अभंगांमध्ये सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता आणि परोपकार यांचा प्रभावी प्रचार दिसून येतो.

संत एकनाथ महाराजांचे अभंग : समानतेचा संदेश

संत एकनाथ महाराजांनी आपल्या अभंगांमधून जात-पात, उच्च-नीच भेद मिटवून सर्वांना एकाच दृष्टीने पाहण्याचा संदेश दिला. ते म्हणतात –

"एका जनार्दनी भेद नाही रे कधी।
भक्तीची सोंधी तेथे पाहे॥"

या अभंगातून ते स्पष्ट करतात की ईश्वराच्या दृष्टीने सर्व भक्त समान आहेत. मानवाने एकमेकांत भेदभाव न करता

प्रेमभावनेने जगले पाहिजे. हा विचार आजही राष्ट्रीय एकात्मतेसाठी महत्त्वाचा आहे.

**जातिभेदाचा विरोध आणि समता**

संत एकनाथ महाराजांनी समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता यांना कठोर विरोध केला. त्यांच्या काळात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना त्यांनी स्नानासाठी गोदावरीच्या घाटावर आणले. यामुळे त्यांना समाजाकडून विरोध झाला, पण त्यांनी समानतेचा विचार सोडला नाही. त्यांच्या एका अभंगात ते म्हणतात –

"काय दुजा काय नीचा। पंढरीचा तोची साचा॥"

या ओळीतून ते सांगतात की कोणताही माणूस उच्च किंवा नीच नाही. पंढरपूरच्या विठोबाच्या दृष्टीने सर्व भक्त समान आहेत. हा विचार भारतीय समाजाच्या ऐक्यासाठी आणि सामाजिक समतेसाठी प्रेरणादायी आहे.

**सर्वधर्मसमभावाचा संदेश**

संत एकनाथ महाराज हिंदू-मुस्लीम ऐक्याचे समर्थक होते. त्यांनी मुसलमान शेख महंमद या त्यांच्या शिष्याला ज्ञान दिले. त्यांच्या अभंगांमध्ये धर्मभेद न करता मानवता हा सर्वोच्च धर्म असल्याचा संदेश आहे.

"जो जो जीव तो तो देवा।
नाही दुजा कोई हवा॥"

या अभंगातून ते सांगतात की प्रत्येक जीवामध्ये ईश्वर आहे आणि कुणालाही कमी लेखू नये. हा विचार राष्ट्रीय एकात्मतेसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

**भाषिक आणि सांस्कृतिक एकात्मता**

संत एकनाथ महाराजांनी संस्कृतमधील ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले, ज्यामुळे सर्वसामान्य लोकांपर्यंत ज्ञान पोहोचले. त्यांनी प्राकृत, हिंदी आणि मराठी भाषांमध्येही लेखन केले. त्यामुळे वेगवेगळया भाषिक गटांमध्ये बंधुभाव वाढला.

**आजच्या काळातील महत्त्व**

आज भारत विविध धर्म, जाती आणि भाषांचा संगम आहे. अशा परिस्थितीत संत एकनाथ महाराजांचे अभंग समता, बंधुभाव आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी प्रेरणादायी ठरतात.

**मत:** संत एकनाथ महाराजांचे अभंग म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. त्यांनी सामाजिक समता, जातीय सलोखा आणि सर्वधर्मसमभाव यांचा प्रचार केला. त्यांच्या विचारांवर आधारित जीवनशैली स्वीकारल्यास भारत अधिक एकसंघ आणि शांततामय होईल.

**संत तुकाराम (१६०८-१६४९)**

संत तुकाराम महाराजांचे अभंग आणि राष्ट्रीय एकात्मता

संत परंपरेत संत तुकाराम महाराजांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांचे अभंग समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन ठरले. त्यांनी आपल्या वाणीच्या माध्यमातून समता, प्रेम, न्याय आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणीतून सामाजिक एकता, जातिभेदाचा विरोध आणि मानवतावादाची स्पष्ट झलक दिसते. या सर्व विचारांचा राष्ट्रीय एकात्मतेशी थेट संबंध आहे.

संत तुकाराम महाराजांचे अभंग आणि सामाजिक समता

तुकाराम महाराजांनी समाजातील विषमता नष्ट करून समानतेचा संदेश दिला. त्यांच्या अभंगांमध्ये माणूसकीचा महिमा गाताना ते म्हणतात –

"एक दिवा लागो झोताता। तैसे वैकुंठ निःसंदेह॥"

या अभंगातून ते सांगतात की एकाचा उद्धार झाल्यास संपूर्ण समाजाचा उद्धार होतो. त्यांची ही भावना राष्ट्रीय ऐक्य आणि सामाजिक समरसतेला बळकटी देणारी आहे.

**जातिभेदाचा विरोध आणि मानवता**

तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमधून जातिभेदाला कठोर विरोध केला. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की –

"काय जात, काय पात। हरीला नाही ती गात्र॥"

यातून ते मानवाला जातीधर्माच्या चौकटीत अडकवण्याऐवजी त्याच्या कर्मावर भर देतात. भारतीय समाजात अनेक जाती-धर्म असले तरी माणुसकी हाच खरा धर्म आहे, हा संदेश त्यांच्या अभंगांमधून मिळतो. आजच्या बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक भारतासाठी हा विचार महत्त्वाचा आहे.

**सर्वधर्मसमभावाचा संदेश**

संत तुकाराम महाराजांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे महत्त्व सांगितले. त्यांनी कोणत्याही धर्माच्या अनुयायांमध्ये भेदभाव केला नाही. त्यांच्या अभंगांमधून समजते की

ईश्वर एक आहे, फक्त तो वेगवेगळया नावांनी ओळखला जातो.

"आळंदीचे देव पंढरीं पाहो। पंढरीचे देव आळंदीस जावो॥"

यातून ते दर्शवतात की सर्व तीर्थक्षेत्रे, सर्व देवता एकाच ईश्वराच्या विविध रूपांमध्ये आहेत. हीच भावना राष्ट्रीय एकात्मतेला पूरक आहे.

**सामाजिक न्याय आणि परोपकार**

संत तुकाराम महाराजांनी गरीब, शेतकरी, कष्टकरी यांच्याविषयी विशेष आत्मीयता व्यक्त केली. त्यांचे अभंग समाजातील दुर्बल घटकांना आधार देणारे आहेत. ते म्हणतात –

"जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥"

या विचारांमधून सामाजिक न्याय, समानता आणि परोपकाराचे महत्त्व अधोरेखित होते. राष्ट्रीय एकात्मतेसाठी ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत.

**आजच्या काळातील महत्त्व**

आज भारत विविधता असलेला देश आहे. भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक भिन्नता असूनही आपल्याला राष्ट्रीय ऐक्य टिकवून ठेवायचे आहे. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचे अभंग हा मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ ठरतो. त्यांच्या विचारांवर आधारित जीवनशैली अंगीकारली तर समाजातील भेदभाव दूर होतील आणि एकात्मतेला बळ मिळेल.

**मत**:

संत तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा पाया आहेत. त्यांनी मानवतेला सर्वोच्च मानले आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या अभंगांमधून आजही भारतीय समाजाला प्रेम, शांतता आणि ऐक्याचा संदेश मिळतो. म्हणूनच, संत तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा अखंड मंत्र आहे.

**संत साहित्याच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार**

**१) जातीय भेदभावाच्या विरोधात लढा**

संतांनी जातीव्यवस्थेवर प्रखर टीका केली आणि सर्वांना समानतेचा संदेश दिला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांनी जातिभेदाच्या विरोधात आपले विचार मांडले.

**२) हिंदू-मुस्लिम ऐक्य**

संत नामदेव आणि संत एकनाथ यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. त्यांनी धार्मिक सहिष्णुतेचा प्रचार केला आणि सर्वधर्मसमभाव शिकवला.

**३) स्त्री-पुरुष समानता**

सर्व संताच्या अभंगांतून स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडला गेला. त्यांनी समाजातील स्त्रियांना शिक्षण आणि हक्क याबाबत जागरूक केले.

**४) स्वराज्य आणि राष्ट्रभक्ती**

संत रामदास व संत तुकाराम महाराजांनी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रसेवेसाठी प्रेरित केले.
त्यांचे विचार राष्ट्रभक्तीला बळकट करणारे होते.

**५) सामाजिक समता आणि न्याय**

संत तुकाराम, संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांनी गरिबांना आणि शोषितांना समानतेचा संदेश दिला.
त्यांनी सांगितले की, ईश्वर सर्वांसाठी समान आहे आणि तो कोणत्याही जाती-धर्मात अडकलेला नाही.

**राष्ट्रीय एकात्मतेसाठी संत साहित्याचा महत्त्वाचा संदेश**

१. सर्वधर्म समभाव: संतांनी धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार केला.

२. सामाजिक न्याय: त्यांनी जात, धर्म, लिंग यांच्या भेदभावाविरुद्ध आवाज उठवला.

३. राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यभाव: संत रामदासांनी राष्ट्रभक्ती आणि स्वराज्याची भावना जागवली.

4. सहिष्णुता आणि समता: संत साहित्याने सर्वांना समानतेचा आणि प्रेमाचा संदेश दिला.

**राष्ट्रीय एकात्मतेसाठी मराठी साहित्याची भूमिका**

1. सामाजिक समता वाढवणे: संतसाहित्य, स्वातंत्र्यपूर्व साहित्य आणि आधुनिक साहित्याने सामाजिक समतेचा संदेश दिला आहे.

2. देशभक्ती निर्माण करणे: मराठी साहित्याने देशप्रेम वाढवले आहे.

3. संविधानाच्या मूल्यांचा प्रचार: समता, बंधुता आणि स्वातंत्र्य यांचे महत्त्व पटवून दिले आहे.

4. शिक्षण आणि जनजागृती: साहित्याच्या माध्यमातून लोकांमध्ये बौद्धिक आणि भावनिक जागरूकता निर्माण होते.

5. सांस्कृतिक एकता: विविध प्रांत, जाती, धर्म यांना जोडणारे साहित्य लोकांमध्ये ऐक्य निर्माण करते.

**उपसंहार**

राष्ट्रीय एकात्मता ही भारताच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी साहित्याने विविध पद्धतींनी राष्ट्रीय एकात्मतेचा प्रचार केला आहे. संतसाहित्य, स्वातंत्र्यलढ्यातील साहित्य आणि आधुनिक साहित्य यामधून राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागवण्यात आली आहे. आजच्या युगातही, मराठी साहित्य हे सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या जोपासनेसाठी एक प्रभावी साधन आहे. संत साहित्य हे केवळ धार्मिक साहित्य नाही, तर ते समाजसुधारक साहित्य आहे. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेचा अत्यंत प्रभावी संदेश दिला जातो. संतांनी जातीभेद, धार्मिक तेढ, स्त्री-पुरुष असमानता यांसारख्या समस्यांवर भाष्य करून समता, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाची शिकवण दिली. त्यामुळे आजही संत साहित्य हे राष्ट्रीय एकात्मतेच्या जोपासनेसाठी आणि समाज सुधारण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

"एकता हीच आपली खरी ताकद आहे, आणि ती टिकवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत!"

**संदर्भ** :


१) संत साहित्य आणि सामाजिक समता
लेखक: प्रा. रा. चिं. ढेरे
विषय: या ग्रंथात संत साहित्याचा सामाजिक सुधारणा आणि समतेसाठी कसा उपयोग झाला आहे, याचे विवेचन आहे.

२) ज्ञानेश्वरी – संत ज्ञानेश्वरांची गीता
लेखक: संत ज्ञानेश्वर (संपादक – साने गुरुजी)
विषय: भगवद्गीतेवरील संत ज्ञानेश्वरांचे विवेचन, ज्यातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मिळतो.

३) तुकाराम गाथा
लेखक: संत तुकाराम (संपादक – वि. स. बुवाजी)
विषय: संत तुकाराम यांच्या अभंगांचे संकलन, ज्यात सामाजिक समतेचा विचार मांडला आहे.

४) भारतीय संस्कृती आणि संत साहित्य
लेखक: ना. सी. फडके
विषय: संत साहित्याचा भारतीय संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मतेवरील प्रभाव यावर सखोल चर्चा.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# संत तुकारामांच्या अभंगातील लोकजीवन व लोकसंस्कृती

**श्री सिद्धेश्वर पांडुरंग जाधव[1] प्रा.डॉ.अनिल गर्जे [2]**

[1]संशोधक विद्यार्थी मराठी विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक एस के गांधी महाविद्यालय कडा
ता.आष्टी जि.बीड

[2]आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता.आष्टी जि. बीड

DOI-**10.5281/zenodo.15574329**

**प्रास्ताविक :** संत तुकारामांच्या अभंगात लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांचा अनुबंध अगदी निकटवर्ती आहे. लोकजीवनातील रुढी, लोकसमजुती संकेत, लोकभ्रम इत्यादींचे दर्शन संत तुकारामांच्या अभंगातून आढळते. लोकरूढीचे, अंधश्रद्धेचे उच्चाटन करण्याच्या हेतूने व लोकांना अनिष्ट प्रथापासून दूर ठेवण्याच्या हेतूने अतिशय परखड भाषेत त्यांनी आपल्या अभंगातून प्रबोधन केले. लोकजीवन आणि लोकसंस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकसंस्कृतीला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असते.

वर्तमान काळात आपण जो संस्कृती शब्द वापरतो तो इंग्रजीतील 'Culture' चा पर्यायवाचक शब्द आहे. 'Culture' या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील 'कोलर' धातूपासून सिद्ध होणाऱ्या 'कुल्टुरा' 'Culture' शब्दापासून झाली आहे. 'Culture' शब्दाचा अर्थ 'पूजा करणे' वा 'कृषी संबंधी कार्य करणे' संस्कृती मानवी जीवनातील उच्च मूल्यांची जोपासना करते. हिंदू संस्कृती जगातील अति-प्राचीन संस्कृती आहे. ही संस्कृती आजपर्यंत टिकून आहे याचा अर्थ तिच्यात मूलभूत तत्त्वज्ञान वा विचारमूल्यात शाश्वत अशी उत्कृष्ट मूल्ये आहेत. जगात अनेक संस्कृती उदयाला आल्या. कालौघात नष्टही झाल्या. भारतीय संस्कृती रामायण, महाभारत आणि वेद या महाकाव्याधिष्ठीत असलेली संस्कृती आहे.

मानवी जीवनाशी संबंधित असणाऱ्या देवदेवता आचार-विचार, तत्त्वज्ञान, विविध शास्त्रे, कला, व्यवसाय, विज्ञान इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश संस्कृती शब्दात होतो. संस्कृतीच्या संदर्भात डॉ. बलदेव प्रसाद मित्र म्हणतात, " संस्कृती मानवी जीवन की सजी तथा संवारी हुई अंतस्थिती है | वह मानवी समाज की परिमार्जीत मती रुची, और प्रवृत्ती पुंज का माला है |[१] डॉ. मिश्र यांचे विचार मला समर्थनीय वाटतात. कारण संस्कृतीच्या प्रभावामुळेच मानवी जीवनात सकारात्मक परिवर्तनाची दिशा मिळते. संस्कृतीचे स्वरूप व्यापक आहे. संस्कृतीमध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. त्यातील घटकाचे दोन गटात वर्गीकरण करता येईल.

**१. एक आध्यात्मिक विभाग**
**२. दोन लौकिक विभाग.**

पापपुण्य, मोक्ष, साधन मार्ग, आदर्श, मृत्यू, स्वर्ग इत्यादींचा समावेश अध्यात्मिकतेमध्ये होईल तर सण उत्सव, खाद्य पदार्थ, रूढी, परंपरा, चालीरिती, लोकविश्वास, लोककला, वेशभूषा, संस्कार, मनोरंजनाची साधने यांचा समावेश लौकिक गटात करता येईल? लोकसंस्कृती हा समाज जीवनाचा पाया असतो. लोकसंस्कृतीचा विशालपट विचारात घेता कोणताही पृथ्वीतलावरील माणूस लोकसंस्कृतीच्या प्रवाहापासून स्वतःला दूर ठेवू शकत नाही.

कुठल्याही साहित्यिकाच्या रचनेवर कळत नकळतपणे तत्कालीन लोक जीवन व लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले दिसते. मध्ययुगीन कालखंडातील मराठी साहित्यामध्ये महानुभाव साहित्य, वारकरी संप्रदायातील संतांचे साहित्य यामध्ये मोठ्या प्रमाणात लोक संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. चक्रधर, म्हाईभट, म्हदंबा, नरेंद्र त्याचबरोबर संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम इत्यादी संत कवींच्या अभंगातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

**लोकजीवन आणि लोकसंस्कृती परस्पर संबंध :**

संत तुकारामांनी लोकजीवन स्पष्ट करताना लोकमाध्यमांचा स्विकार केला आहे. यासाठी त्यांनी लोकसंस्कृतीचा आधार घेतलेला आहे. लोकजीवन आणि लोकसंस्कृती समजून घेत असताना आपल्या पूर्वजांच्या जगण्याच्या रीती कशा होत्या तसेच मूल्ये, परंपरा, श्रद्धा या आधारे कसे जीवन जगत होते, त्यांना जगत असताना ऊर्जा कशापासून मिळत होती. ज्ञात-अज्ञात जगाशी त्यांचे

नाते कसे होते अशा अनेक गोष्टी लोकसंस्कृतीच्या मुळाशी दिसून येतात. तुकारामांच्या अभंगात याचा उल्लेख येतो याविषयी श्री.र. कुलकर्णी म्हणतात, "लोकजीवन घडवायचे असेल तर लोकांना परिचित असलेल्या माध्यमांचा उपयोग प्रभावीरीत्या होऊ शकतो. हे लक्षात घेऊनच प्राचीन व मध्ययुगीन संप्रदायाची साहित्य निर्मिती झालेली आहे."[२] श्री. र. कुलकर्णी यांच्या मतानुसार मध्यगीय साहित्याच्या मुळाशी लोकसंस्कृतीची विविध रूपे दिसतात. त्यांचा आविष्कार लोक जीवनातूनच होत असतो संस्कृती संदर्भात भालचंद्र नेमाडे म्हणतात, "वारकरी पंथांनी आपल्या अनेक मौखिक शैलीचा विकास केला, पुराण, प्रवचन, पारायण, पाठ यासारख्या धार्मिक प्रकाराबरोबरच ओवी, अभंग, पद, भूपाळी ,पाळणे ,गण ,गवळण, वीरानी, श्लोक, कृष्णलीला, पद्य चरित्र यासारख्या नाट्यात्मक आणि संगीतात्मक प्रकारांचाही काही प्रसंगी प्रयोग होतो. मंत्र, नामस्मरण आणि हरिपाठ हे वैयक्तिक पूजेसाठी तर कथा, पोथी, सप्ताह, काला, पालखी, दिंडी, वारी, भजन या गोष्टी मोठ्या समूहाच्या एकत्र येण्यावर अवलंबून असतात. या सर्व कला प्रकारांमध्ये खेड्यातील लोकांच्या विविध भूमिका फार महत्त्वाच्या असल्याने त्यांच्यातील सर्जक गुणांच्या अविष्काराला भरपूर वाव मिळतो."[३] भालचंद्र नेमाडे यांचे मत समर्पक वाटते. कारण लोक माध्यमे ही लोकजीवनातूनच येत असल्यामुळे लोकांचे जीवन घडवण्यास कारणीभूत ठरतात. लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांचा परस्परांशी संबंध येतो. लोकसंस्कृतीतूनच मनुष्य जीवन जगत असतो. पाश्चात्य विचारवंत गोमे म्हणतात, " लोकसंस्कृतीचा केवळ समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करणे म्हणजे एकांगी भूमिका स्वीकारणे होय. लोकसंस्कृती लोक रूपाने ही आवश्यक आहे. कारण लोकजीवना इतकाच लोक संस्कृतीचा विस्तार आहे. यामध्ये आत्मा-परमात्मा या विषयापासूनच तो जादूटोणा या विषयापर्यंत सारे विषय येतात. त्यात उद्योग येतो, व्यवसाय येतो, भविष्य येते, नवस येतो, लोक समजुती येतात. ग्राम जीवनात खाद्यपदार्थापासून प्रबोधनापर्यंत सारे विषय येतात. भाविकांनी रचलेल्या देवदेवतांच्या कथा आणि कहानी येतात. एवढा व्यापक तिचा विस्तार आहे."[४] गोमे यांचे मत योग्य असून लोकसंस्कृतीमुळे माणसाशी, देशाची ओळख पटते. मानवी जीवनातील सर्व गोष्टींचा ऊहापोह संस्कृतीमुळे झालेला असतो, त्यामुळेच संस्कृती हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. संस्कृती विषयी प्रत्येकाच्या मनात सार्थ अभिमान असतो.गोमे यांच्या मतानुसार लोकसंस्कृती नुसारच मनुष्य जीवन जगत असतो. लोक जीवनाची प्रतिबिंबच लोकसंस्कृतीत पडते. संत तुकारामांच्या अभंगातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. तुकारामांच्या अभंगावर तिचा प्रभाव दिसून येतो.

**तुकारामांच्या अभंगातील तत्कालीन लोक जीवन व लोकसंस्कृतीचे दर्शन :**

संत तुकारामांनी लोकसंस्कृतीतील परंपरांचा आधार घेत लोकजीवनाचे समृद्ध दर्शन आपल्या अभंग रचना मधून घडविले आहे. तुकारामांची लोकजीवनाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी होती. जनरंजनापेक्षा सामाजिक प्रबोधन हाच तुकारामांच्या अभंगाचा विशेष जाणवतो. जीवनाकडे गंभीरपणे पाहणाऱ्या कलावंतांची दृष्टी त्यांच्याकडे होती. तुकारामांच्या अभंगात खोलात जाऊ तसतसे या लोकश्रद्धांचा, लोकमानसाचा अर्थ उलगडतो. विशुद्ध मानवी जीवनाचे दर्शन घडते. तुकारामांच्या काळी होत असलेल्या व्रतवैकल्य, सणवार, धार्मिक बाबी यांचा लोक जीवनावर अंमल होता. आचार-विचार, प्रथा, परंपरा या धर्म जाणिवेशी संबंधित होत्या. तुकारामांवरही या गोष्टींचा प्रभाव जाणवतो. समाजात प्राचीन काळापासून रूढी, परंपरा आढळतात. विविध देवदेवता, कला, क्रीडा, यांचे निरीक्षण करून त्यांचे बाह्यांग स्वीकारून अंतरंगात तुकारामांनी अध्यात्म भरला. त्याचा लोकमानसावर विलक्षण प्रभाव पडला. त्यातील विचार लोकसंस्कृतीतील अनिष्ठांचा परिहार करणारे आहेत याविषयी लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक रा.ची. ढेरे म्हणतात, " लौकिक अलौकिक यांचे नाते चिरंतन आहे. स्नेहाच्या ओथंबलेल्या वातीतून ज्योती फुलवताना अन जीवनाने ओलावलेल्या मातीतूनच चैतन्याचे उन्मेष अंकुरतात. एवढेच नव्हे तर वातीतल्या ज्योती प्रमाणेच सुगंध होऊन अवतरतो, वारा विसाव्याचे रूप घेतो, अमृतालाही मातीशी नाते सांगणाऱ्या मृत्यूचा ध्यास लागतो."[५] हे रा.ची. ढेरे यांचे मत रास्त वाटते कारण, मानवी जीवनातील चैतन्य अनेकांगानी व्यक्त होते. लोक संस्कृतीचे व्यापकत्वही जाणवते.

लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या अंगाने विचार करताना तत्कालीन ग्रामीण जीवनाचे अनेकांगी चित्रण प्रकर्षाने जाणवते. लोकसंस्कृतीचे रक्षण करताना विविध प्रकारच्या लोकजाणिवा प्रगटतात. लोकमानसात या जगण्याला वेगळा अर्थ प्राप्त होतो. वासुदेव, गोंधळी, भराडी, वाघ्या, मुरळी यांच्या लोकगीतातून लोकसंस्कृतीचे भाव व्यक्त होतात. ग्राम जीवणातील लोककलांचे ते उपासक असतात. ही लोक संस्कृती चिरंतन अभिव्यक्त होते. यासंदर्भात रा.ची. ढेरे म्हणतात, "

लोकसंस्कृती अखंड जय शालिनी आहे ती अनेक रंग रूपाने नटलेली आहे. मानवाच्या विद्यमान उच्च संस्कृतीच्या सर्व अंगापांगांनी क्रांती ही लोकसंस्कृतीच्या जीवनामुळेच विलसत राहिली आहे."[६] रा.ची. ढेरे म्हणतात ते अगदी योग्यच आहे. कारण की तुकारामांनी आपल्या अभंगातून लोकसंस्कृतीची विविध रूपे सहजपणे चित्रीत केलेली आहेत.

**व्रतवैकल्ये :**

लोकमानसात धर्मभावना प्रबळ असल्याकारणाने प्रभाव गाजवते. धर्माशी निगडित प्रथा, परंपरा, आचार-विचार,रितीरिवाज समाजात पाळले जातात. तुकारामांच्या अभंगावर याचा प्रभाव पडला आहे. व्रताचारासंबंधी समाज जीवनात प्राचीन काळापासून व्रतवैकल्ये रूढ झालेली आढळतात. व्रताचरणावर लोकांचा विश्वास असतो. विशिष्ट फलप्राप्तीसाठी, इच्छापूर्तीसाठी व्रताचलन केले जाते. हा शब्द व्रत धातूपासून 'त' प्रत्येय लाऊन झाल्याचे मानले म्हणजे व्रत याचा अर्थ संकल्प केलेले कृत्य अथवा संकल्प अथवा इच्छा असा होऊ शकतो. अधिकार अथवा सत्ता असणाऱ्या व्यक्तीची इच्छा ही इतरांना आज्ञेसाठी अथवा कायद्यासारखी होते.

एखाद्या वरिष्ठ दर्जाच्या व्यक्तीने केलेल्या आज्ञेमध्ये त्या आज्ञेचे परिपालन करण्याचा कर्तव्याचा अंतर्भाव होतो. आज्ञा बहुत कालपर्यंत पालन केल्या गेल्या अथवा कर्तव्य एकाच प्रकाराने बहुत होते. तसे आचरण आवश्यक ठरते. देवांच्या अज्ञांना अनुसरून काही विशिष्ट कृत्ये केली पाहिजेत अशी श्रद्धा लोकांत उत्पन्न झाली अथवा लोकांना तसे वाटू लागले म्हणजे अशा कृत्यांना धार्मिक उपासनेचे अथवा कृत्याचे स्वरूप प्राप्त होते. जर एखाद्या व्यक्तीने देवाची कृपा व्हावी म्हणून आपल्या स्वतःच्या वर्तनाच्या बाबतीत अथवा अन्नाच्या बाबतीत काही विशिष्ट निर्बंध घालून म्हणजे अशा निर्बंधांना पवित्र प्रतिज्ञाचे अथवा धार्मिक नियमांचे स्वरूप प्राप्त होते. अशा रीतीने 'वृ' धातूपासून झालेल्या वृत्त शब्दांचे 'आज्ञा अथवा कायदा, आज्ञापालन अथवा कर्तव्य, धार्मिक अथवा पवित्र स्वरूपाची प्रतिज्ञा आणि समाजाचा एक घटक या नात्याने अथवा एक स्वतंत्र व्यक्ती या नात्याने मनुष्याने करावयाच्या आचरणासंबंधी निर्बंध एवढाच मर्यादित अर्थाने वापरण्यात येऊ लागला.'[७]

यामधून तत्कालीन लोकसंस्कृती आपल्यासमोर उभी राहते तत्कालीन कालखंडातील कृषीजीवन, आर्थिक, राजकीय, पशुपक्षी, वनस्पती जगत यांचा प्रत्यय ही त्यांच्या अभंगातून येतो. अन्य देवतांची पूजा करणाऱ्या ढोंगी, कर्मठ साधू समाजात होते. त्यांचा समाचार तुकारामांनी घेतला आहे. त्यांनी आपल्या अभंगातून समाज प्रबोधन केले.

**ठळक निष्कर्ष :**

१) लोकसंस्कृती ही लोकजीवनाचा गाभा आहे.

२) संस्कृती हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग असून त्याविषयी प्रत्येकाच्या मनात सार्थ अभिमान असतो.

३) तुकारामांनी लोककलेद्वारे लोकजीवन पद्धतीचा प्रवाह समृद्ध केला आहे.

४) समाज जीवनात प्राचीन काळापासून व्रतवैकल्ये रूढ असून व्रताचरणावर लोकांचा विश्वास दिसून येतो.

५) विशिष्ट फलप्राप्तीसाठी, इच्छापूर्तीसाठी व्रताचरण केले जाते.

६) आपला देश कृषीप्रधान असल्यामुळे आणि ही कृषी निसर्गाशी नाते जोडणाऱ्या सण, प्रथा आपल्याकडे विशेष असणे स्वाभाविकपणे आहे.

७) मौखिक वांड:मय प्रकारातील लोकरुढी हा प्रकार आहे.

८) रुढी या लोकजीवनाचा भाग असून त्याचे पालन केले जाते. रूढीच्या मुळाशी लोकसमजुती असतात.

**संदर्भ आणि टिपा :**

१) मिश्र बलदेव प्रसाद, भारतीय संस्कृती को गोस्वामी तुलसी का योगदान, चौथंबा, वाराणसी, प्रथम आवृत्ती ,१९५३

२) कुलकर्णी श्री.रं. मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार, राजहंस प्रकाशन, पुणे ,प्रथम आवृत्ती, १९९५.

३) नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९०.

४) भोसले द.ता. संस्कृतीच्या पाऊलखुणा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१.

५) ढेरे रा.ची. लोकसंस्कृतीची क्षितिजे, विश्वकर्मा,साहित्यालय, पुणे,१९७१.

६) तत्रैव, पृ.क्र.७,८.

७) काणे भ.म. भट व भा.धर्मशास्त्राचा इतिहास उत्तरार्ध,पृ.१६०.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# ई-कॉमर्सच्या भूमिकेबद्दल ग्राहकांचा कल

**डॉ. चांडक पवनकुमार विजयकुमारजी**
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा. जि बीड.
DOI-10.5281/zenodo.15574584

**सारांश:** ग्राहकांसाठी इंटरनेट हे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य ठरत आहे. भारतात ११० दशलक्षाहून अधिक इंटरनेट वापरकर्ते आहेत, त्यापैकी निम्मे लोक ऑनलाइन खरेदी करतात आणि दरवर्षी ही संख्या झपाट्याने वाढत आहे. हे खरे आहे की सर्व ग्राहक खरेदी, गुंतवणूक, पेमेंट, इंटरनेट बँकिंग इत्यादी विविध उद्देशांसाठी ऑफलाइनपेक्षा ऑनलाइन खरेदीला प्राधान्य देतात. उत्पादने आणि इतर सेवा खरेदी करणे ई-व्यवसायात ग्राहकांसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. लाखो ग्राहक ई-कॉमर्सद्वारे विविध व्यवहार करतात. या पेपरचे उद्दिष्ट ई-कॉमर्सच्या भूमिकेबद्दल ग्राहकांच्या धारणाच्या पातळीवर पद्धतशीरपणे डिझाइन करणे आहे.

**परिचय**: इंटरनेट मार्केटिंग हे इतर मार्केटिंग चॅनेलपेक्षा संकल्पनात्मकदृष्ट्या वेगळे आहे आणि इंटरनेट विक्रेता आणि अंतिम वापरकर्त्यामध्ये 24 तास ग्राहक सेवेसह एक ते एक संवादाला प्रोत्साहन देते. आज, व्यवसाय इंटरनेट मार्केटिंग हा ऑनलाइन व्यापाराचा सर्वात वेगाने वाढणारा विभाग आहे. पारंपारिक आणि ऑनलाइन विक्रीमधील प्रमुख फरक म्हणजे ग्राहक आणि विक्रेत्यामधील परस्परसंवादाची व्याप्ती. तंत्रज्ञानाची उपलब्धता, माहितीची उपलब्धता आणि इंटरनेटद्वारे संवाद साधण्याची क्षमता वाढत आणि विकसित होत असताना लोकांची संख्या वाढत आहे. इंटरनेटच्या स्पष्ट क्षमतांमध्ये माहिती गोळा करण्याचे, उत्पादन खरेदी करण्याचे किंवा सेवा प्रदान करण्याचे मार्ग समाविष्ट आहेत. इंटरनेट तंत्रज्ञानातील या प्रगतीमुळे पारंपारिक पद्धतींपेक्षा जास्त वेळ घेणाऱ्या खरेदी पर्यायांचा विस्तार करण्यास अनुमती मिळते. ऑफलाइन खरेदी पद्धतींसह भौतिकरित्या माहिती गोळा करण्याच्या समस्या कमी होतात आणि ग्राहक त्यांचा वेळ कार्यक्षमतेने वापरण्यास सक्षम होतात. उदाहरणार्थ, किंमतींची तुलना करण्यासाठी किंवा वर्तमानपत्रांमधील गोलाकार पत्रकांवर अवलंबून राहण्याऐवजी, ग्राहक इंटरनेटद्वारे आवश्यक माहिती शोधू आणि पुनर्प्राप्त करू शकतो. ग्राहक आता संशोधन, संप्रेषण, ऑनलाइन बँकिंग आणि अगदी खरेदी यासारख्या विविध उद्देशांसाठी इंटरनेटचा वापर करू शकतात. अशा फायद्यांसह, इंटरनेट हे जलदगतीने संवादाचे आणि सोयीस्करपणे व्यवसाय करण्याचे मुख्य साधन बनत आहे. खरेदी, गुंतवणूक, पेमेंट आणि ऑनलाइन बँकिंग करण्यासाठी घरे इंटरनेट आणि ई-कॉमर्सच्या जगाकडे वळत असल्याने, हे व्यवहार सुरक्षित करण्यासाठी नवीन तांत्रिक प्रगती करावी लागेल. तथापि, इंटरनेटच्या तेजीचा भाग म्हणून सर्व ग्राहक ऑनलाइन व्यवहारांमध्ये सहभागी होत नाहीत. अधिकाधिक व्यवसाय ऑनलाइन उपस्थिती स्थापित करत असताना, त्यांना असे आढळून येत आहे की काही ग्राहक अजूनही त्याच दिशेने जाण्यास नाखूष आहेत. विविध ग्राहकांसाठी सुरक्षितता आणि इंटरनेटवरून वैयक्तिक डेटा पास करण्याबद्दल अजूनही चिंता आहेत.

**ग्राहकधारणा:** धारणा म्हणजे अशी धारणा जी एखादी व्यक्ती पाच इंद्रियांद्वारे गोळा होणाऱ्या येणाऱ्या उत्तेजनांना श्रेय देते - दृष्टी, श्रवण, स्पर्श, चव आणि वास. निश्चितच खरेदीदाराचे वर्तन एखाद्या वस्तू किंवा सेवेबद्दलच्या त्याच्या धारणांद्वारे प्रभावित होते. संशोधक आता हे ओळखतात की लोकांची धारणा ही प्रत्यक्ष उत्तेजनांइतकीच त्यांना काय समजायचे आहे यावर अवलंबून असते. एखाद्या व्यक्तीची वस्तू किंवा

घटनेबद्दलची धारणा दोन प्रकारच्या घटकांच्या परस्परसंवादातून उद्भवते.

१. **उत्तेजक घटक**: आकार, रंग, वजन आणि आकार यासारख्या भौतिक वस्तूची
वैशिष्ट्ये.
२. **वैयक्तिक घटक**: व्यक्तीची अद्वितीय वैशिष्ट्ये, ज्यामध्ये केवळ संवेदी प्रक्रियाच नाही तर समान इनपुट आणि मूलभूत प्रेरणा आणि अपेक्षांचा अनुभव देखील समाविष्ट आहे.

ग्राहक धारणा ही एक मार्केटिंग संकल्पना आहे जी कंपनी किंवा तिच्या ऑफरबद्दल ग्राहकाची छाप, जागरूकता आणि जाणीव समाविष्ट करते. धारणा ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे आपण जगाचे अर्थपूर्ण चित्र तयार करण्यासाठी माहिती इनपुट निवडतो, आयोजित करतो आणि अर्थ लावतो. जाहिराती, पुनरावलोकने, जनसंपर्क, सोशल मीडिया, वैयक्तिक अनुभव आणि इतर घटकांमुळे ग्राहकाची धारणा प्रभावित होते. सर्वसाधारणपणे, धारणा म्हणजे पाहणे, ऐकणे, स्पर्श करणे, चाखणे, वास घेणे आणि संवेदना याद्वारे माहिती गोळा करणे. धारणा ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे या उत्तेजनांची निवड, संघटित आणि अर्थ लावला जातो. ग्राहक धारणा मार्केटिंग व्यवस्थापकाला ग्राहक एखाद्या उत्पादन किंवा सेवेकडे कसे पाहतो हे समजून घेण्यास आणि नंतर त्यानुसार धोरण तयार करण्यास सक्षम करते.

**ग्राहकांच्या आकलनाची वैशिष्ट्ये**: एखादी व्यक्ती एखाद्या उत्तेजनाला किंवा माहितीला कसे समजते हे त्याच्या आकलनाच्या अनेक वैशिष्ट्यांवर अवलंबून असते. एखाद्या व्यक्तीची विशिष्ट माहितीची प्रक्रिया, मूल्यांकन आणि स्पष्टीकरण हे मुख्यत्वे आकलनाच्या वैशिष्ट्यांवर किंवा वैशिष्ट्यांवर अवलंबून असते. ते आहेत

१. आकलनात्मक संकेत;
२. ज्ञानेंद्रियांची निवडक्षमता;
३. ज्ञानेंद्रियांची संघटना; आणि
४. बोधात्मक मर्यादा.

**ग्राहकांच्या आकलनाचे टप्पे**: जेव्हा एखादा ग्राहक सुरुवातीचा संपर्क साधतो तेव्हा आकलन उत्पादन किंवा ब्रँडबद्दलचा अर्थ स्थापित करते आणि त्याला ग्राहक माहिती प्रक्रिया असे वर्णन केले जाते. ब्रँड मार्केटिंग संदेश प्राप्त करताना या टप्प्यावर सर्व इंद्रिये गुंतलेली असतात. ग्राहक माहिती प्रक्रियेदरम्यान आकलनाचे चार वेगळे टप्पे होतात: संवेदना, लक्ष, अर्थ लावणे आणि धारणा.

१. संवेदना संवेदना एखाद्या व्यक्तीच्या इंद्रियांना सुरुवातीला उत्पादनाच्या बाह्य उत्तेजनाच्या संपर्कात आणले जाते तेव्हा काय होते याचे वर्णन करते. दृष्टी, ध्वनी, वास, चव आणि पोत याद्वारे ग्राहकाचे संवेदी रिसेप्टर्स उत्पादन किंवा ब्रँड संकेतांद्वारे गुंतलेले असतात.
२. ग्राहक माहिती प्रक्रियेत उत्पादन किंवा ब्रँडच्या बाह्य उत्तेजनाकडे लक्ष, जेव्हा एखादी व्यक्ती रेंगाळते आणि मानसिक प्रक्रिया क्षमता देते तेव्हा लक्ष येते.
३. अर्थ लावणे उत्पादन किंवा ब्रँड मार्केटिंगचे अर्थ लावणे तेव्हा होते जेव्हा एखादी व्यक्ती संवेदी उत्तेजनाला अर्थ देते. आकलन अपेक्षा आणि ओळखीद्वारे सहाय्य केले जाते. ब्रँड किंवा तत्सम ब्रँडसह मागील अनुभव पुनर्प्राप्त करण्यासाठी ग्राहक त्याची स्मृती स्कॅन करतो.
४. धारणा ग्राहक धारणा प्रक्रियेचा निष्कर्ष म्हणजे धारणा टप्पा आणि तो अल्पकालीन आणि दीर्घकालीन स्मृतीमध्ये उत्पादन किंवा ब्रँड माहिती साठवण्याद्वारे दर्शविला जातो.

**संशोधन उद्दिष्टे:**

१. सध्याच्या युगात ई-कॉमर्सच्या भूमिकेबद्दल ग्राहक धारणा ही संकल्पना समजून घेणे.
२. ऑनलाइनद्वारे उत्पादने आणि सेवा खरेदी करण्याच्या बाबतीत विविध ई-कॉमर्स
क्रियाकलापांचा अभ्यास करणे.
३. ग्राहक धारणाचे महत्त्व अभ्यासणे आणि विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धत**: सध्याचा अभ्यास वर्णनात्मक स्वरूपाचा आहे. हा अभ्यास दुय्यम डेटावर आधारित आहे आणि विविध पुस्तके, प्रतिष्ठित जर्नल्स, लेख आणि वेबसाइट्सवरून गोळा केला गेला आहे.

**साहित्याचा आढावा** इंटरनेटवरून व्यवसाय व्यवहारांच्या अंमलबजावणीला ई-व्यवसाय म्हणतात. ई-व्यवसाय

क्रियाकलाप माहिती सामायिकरण, विक्री क्रियाकलाप, ऑर्डरिंग आणि ऑर्डर ट्रॅकिंग इत्यादी सक्षम करून इंटरनेटवर पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढवतात. कंपन्या त्यांच्या सर्व उत्पादनांची विविधता प्रदर्शित करण्यासाठी आणि उत्पादन डिझाइनमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी इंटरनेटचा वापर करू शकतात.

**निकाख्तर आणि जियानझेंग (२०११):** यांनी पुरवठा साखळी व्यवस्थापनात ई-कॉमर्सचा शोध घेतला आणि आजच्या स्पर्धात्मक जगात पुरवठा साखळी आणि त्याच्या सर्व गरजा आणि आवश्यकतांचे वर्णन करताना ई-कॉमर्स प्रक्रियेचा तपशीलवार विचार सादर केला. त्यांनी इलेक्ट्रॉनिक पुरवठा साखळीच्या वापराद्वारे स्पर्धात्मक फायदा मिळविण्याचे मार्ग देखील स्पष्ट केले. त्यांनी प्रोग्रामर आणि निर्णय घेणाऱ्यांना ग्राहक केंद्रित धोरण सुचवले. त्यांनी पुरवठा साखळीच्या पुढील समन्वय आणि एकत्रीकरणासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांचा फायदा घेणारी प्रभावी पुरवठा साखळी सुचवली.

**यांग (२०१२):** यांनी प्रभावी पुरवठा साखळी व्यवस्थापन हे दृढ स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी धोरण पर्याय म्हणून ओळखले आणि प्रभावी ऑपरेशनल पुरवठा साखळी व्यवस्थापनासाठी महत्वाचे साधन प्रदान करण्यासाठी ई-कॉमर्स सुचवले. ग्राहक, किरकोळ विक्रेते, उत्पादक, पुरवठादार आणि नियोक्ते यांच्याशी पूर्णपणे संबंध जोडण्यासाठी, एंटरप्राइझ व्यवस्थापनाची पातळी मोठ्या प्रमाणात सुधारण्यासाठी, पुरवठा आणि मागणी दोन्ही व्यवस्थापित करण्यासाठी, अगदी कमी वेळात बाजार माहिती गोळा करण्यासाठी, उत्पादन दर आणि आर्थिक लाभ सुधारण्यासाठी, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि उत्पादनांचे परिसंचरण वाढविण्यासाठी आणि एंटरप्राइझची मुख्य स्पर्धात्मक शक्ती वाढविण्यासाठी त्यांनी नेटवर्क प्लॅटफॉर्मचा वापर सुचवला. त्यांनी असा निष्कर्ष काढला की ई-कॉमर्स तंत्रज्ञानाच्या मदतीने, पुरवठा साखळी व्यवस्थापन अधिक विकसित केले जाऊ शकते आणि एंटरप्राइझ बाजारपेठेच्या संधी मिळवू शकते. अलरुबाई , अलशैबी आणि अल- बायाती (२०१२) यांनी कोव्हेरिअन्स-आधारित स्ट्रक्चरल समीकरण मॉडेलिंग वापरून विविध उद्योगांमधील कंपन्यांद्वारे ई-कॉमर्स फायदे आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यांच्यातील संबंधांवर ई-मार्केटप्लेस वापराच्या मध्यस्थ प्रभावाचे परीक्षण करून B2B ई-कॉमर्स फायदे, ई -मार्केटप्लेस वापर आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यांच्यातील परस्परसंबंधांचे संशोधन केले. त्यांनी ई-मार्केटप्लेस वापरावर ई-कॉमर्स फायद्यांचा मजबूत आणि सकारात्मक परिणाम ओळखला परंतु ई-कॉमर्स फायदे आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यांच्यात कोणताही महत्त्वपूर्ण थेट संबंध नाही. त्यांनी असा निष्कर्ष काढला की ई-कॉमर्स विक्रेते आणि खरेदीदार दोघांनाही अनेक फायदे प्रदान करते; विक्रेते व्यापकपणे वितरित अरुंद बाजार विभागांमध्ये प्रवेश करू शकतात तर खरेदीदार कमी खर्चात विविध विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात उत्पादन उपलब्धतेसह जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश करून फायदा घेऊ शकतात. शेवटी, ते शिफारस करतात की व्यवस्थापकांनी B2B ई-कॉमर्स तसेच ई-मार्केटप्लेस वापर त्यांच्या व्यवसाय धोरणाचा अविभाज्य भाग बनवण्यावर लक्ष केंद्रित करावे.

**कुमारन आणि गणेशन (२०११):** यांनी एसएमईच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनात ई-व्यवसायाच्या प्रभावाचा देखील अभ्यास केला आणि खरेदीदार-पुरवठादार इंटरफेसवर संप्रेषणासाठी ई-व्यवसाय तंत्रज्ञानाची शक्ती ओळखली. त्यांनी एसएमईच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनात ई-व्यवसाय सुचवला जेणेकरून खरेदी निर्णय, पोर्टफोलिओ जबाबदाऱ्या आणि ग्राहकांच्या मागणीचा अंदाज आणि लीड टाइम कपात यासाठी धोरणे तयार करण्यासाठी वेग, अचूक आणि बुद्धिमान निर्णय घेऊन कंपनीची कामगिरी वाढेल. त्यांनी अहवाल दिला की एसएमई त्यांच्या ग्राहकांच्या आणि पुरवठा साखळीच्या वेगवेगळ्या गरजांशी जुळणारी अंतर्गत नियंत्रण प्रणाली विकसित करण्यास सक्षम असावेत जेणेकरून ते टिकून राहतील. त्यांनी एसएमईंना त्यांचे एससीएम वाढविण्यासाठी विविध प्रकारच्या व्यावसायिक ईआरपी प्रणाली वापरण्याची शिफारस केली.

**निष्कर्ष:** असे आढळून आले आहे की ग्राहक खरेदी करणे, गुंतवणूक करणे, पेमेंट करणे, इंटरनेट बँकिंग इत्यादी

विविध कारणांसाठी ऑफलाइनपेक्षा ऑनलाइन शॉपिंगला प्राधान्य देतात.

१. नवीन ट्रेंड्समुळे तंत्रज्ञानामुळे विविध वेबसाइट्सद्वारे उत्पादने खरेदी करणे आणि सेवा
   घेणे खूप सोपे आणि जलद झाले आहे.
२. असेही आढळून आले आहे की तरुणांमध्ये डिजिटल उद्योजकता विकसित करण्यात
   किंवा तयार करण्यात ई-कॉमर्स महत्त्वाची भूमिका बजावते.
३. ग्राहकांना विविध ब्रँड खरेदी करताना सुरक्षित वाटणाऱ्या विविध वेबसाइट्सवर पूर्ण
   विश्वास आहे.
४. हा अभ्यास ई-कॉमर्सबद्दल विश्वास, विश्वासार्हता आणि खात्रीच्या बाबतीत ग्राहकांच्या
   धारणा पातळीबद्दल जाणून घेण्यास मदत करतो.
५. असे देखील आढळून आले आहे की ई-कॉमर्स सध्याच्या युगात ग्राहकांच्या
   जीवनशैलीचा नमुना बदलत आहे.

नवीन ई-व्यवसाय क्रियाकलापांच्या अंमलबजावणी आणि विकासाची मोठी संधी आहे जी या वर्तमान शतकात ग्राहकांच्या गरजा आणि मागण्या पूर्ण करते आणि पूर्ण करते, विशेषतः तरुण पिढी विविध इलेक्ट्रॉनिक पद्धतींद्वारे सोयीस्कर व्यवहारांना प्राधान्य देते. जरी, अशा लहान किंवा स्थानिक ई-कॉमर्स वेबसाइट्स आहेत ज्या त्यांच्या उत्पादनांवर सवलती, ऑफर, प्रमोशन इत्यादी युक्त्या वापरून त्यांच्या व्यवसायाच्या विस्तारासाठी संधी मिळवत आहेत.

**संदर्भ पुस्तके:**

[1] राजन सक्सेना, “मार्केटिंग मॅनेजमेंट”, (2020) पृ.121-124

[2] कुट्झ्झ आणि बून, “समकालीन मार्केटिंगची तत्त्वे”, (2020) पृ.135-139

**जर्नल्स:**

[3] चुलीपॉर्न चांगचित , “ऑनलाइन शॉपिंगचे ग्राहकांचे विचार”, माहिती प्रणालींमधील
मुद्दे, खंड सातवा, क्रमांक २, २००६ पृ.१७७-१८१

**लेख:**

**डॉ. चांडक पवनकुमार विजयकुमारजी**

१. निकाख्तर , एन. आणि जियानझेंग , वाय. (२०११). खर्च कमी करण्यासाठी पुरवठा
२. साखळी व्यवस्थापनात ई-कॉमर्सची भूमिका. आफ्रिकन जर्नल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट
३. यांग, एम. (२०१२). ईकॉमर्स पर्यावरण अंतर्गत पुरवठा साखळी व्यवस्थापन.
४. इंटरनॅशनल जर्नल ऑफ इनोव्हेशन, मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी
५. कुमारन , एएल आणि गणेशन , आर. (२०११). एसएमईच्या पुरवठा साखळी
६. व्यवस्थापनात ई-व्यवसायाचा प्रभाव . युरोपियन जर्नल ऑफ सोशल सायन्सेस

**वेबसाइट्स:**

१. https://www.ijsdr.org/papers/IJSDR1811025.pdf
२. https://www.grin.com/document/377453

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# भारतीय स्वातंत्र्यलढा आणि मराठी साहित्य

**प्रा .डॉ .गोपीनाथ पांडूरंग बोडखे**
मराठी विभाग प्रमुख आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता आष्टी, जि बीड.
DOI-10.5281/zenodo.15574622

**प्रस्तावना**

मानवी जीवन सुकर होण्यासाठी अनेक बाबींची आवश्यकता असते .अन्न, वस्त्र व निवारा या तर माणसाच्या मुलभूत गरजा आहेत .परंतु माणसाच्या जीवनातील अनेक वेगवेगळ्या इच्छा, आकांक्षा असतात, त्या पुर्ण करावयाच्या असतात .त्या पूर्ण करण्यासाठी स्वातंत्र्यचा समावेश होतो .किंबहुना स्वातंत्र्य असल्याशिवाय मानवी गरजांची परिपूर्ती होत नाही .स्वातंत्र्य सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक पातळीवर असते .राजकीय स्वातंत्र्य नसेल तर सगळयाच स्वातंत्र्यावर गदा येते . स्वातंत्र्याशिवाय माणसाची प्रगती होत नाही .म्हणून मानवी जीवनात स्वातंत्र्य ही महत्त्वाची गोष्ट आहे.

भारतीय लोक इग्रंजी सत्तेच्या अधिपत्याखाली अनेक वर्षे होते .इंग्रजांची दीडशे वर्षाची सत्ता १५ ऑगस्ट १९४७ साली उलथून टाकून आपण स्वतंत्र झालो .पुढे १९५० साली आपल्या देशाची राज्यघटना स्वीकारली .भारतीय राज्यघटनेने सर्व माणसांना समान अधिकार दिले .स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असे भेद न मानता राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या गोष्टी स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वाच्या आहेत .स्वातंत्र्योत्तर काळात माणूस मोठ्या प्रमाणात आत्माविष्कार करू लागला .रूढी-पंरपरा आणि समाजरचना यांना प्रश्न विचारण्याचे सामर्थ्य लेखक कवींना प्राप्त झाले .मानवी विकासाच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टींच्या विरोधात जसे प्रश्न विचारले गेले त्याप्रमाणे त्या प्रश्नाचा शोध घेण्याचाही प्रयत्न झाला.

भारतीय स्वातंत्र्यलढा आणि मराठी साहित्य यांच्यात एक गहिरा आणि अप्रत्यक्ष संबंध आहे .भारतीय स्वातंत्र्यलढा ही एक ऐतिहासिक घटना होती, ज्यात लाखो भारतीय नागरिकांनी ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध आपला संघर्ष सुरू केला . स्वातंत्र्यलढ्याच्या महान आंदोलनाने समाजातील प्रत्येक क्षेत्रावर प्रभाव टाकला .त्यात साहित्य क्षेत्रही अपवाद नाही .मराठी साहित्याच्या

प्रगल्भतेला या लढ्याने महत्त्वाची दिशा दिली आणि मराठी साहित्यकारांनी स्वातंत्र्यलढ्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे स्वरूप**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची प्रारंभिक लढाई १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामापासून सुरु होते, 'भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध' म्हटले जाते .या युद्धाने भारतीय जनतेत स्वातंत्र्याची एक नवीन भावना जागवली, परंतु या लढ्याचे पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाही .मात्र, यानंतरच्या दशकामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळींनी भारतीय जनतेच्या मनात स्वातंत्र्याची तीव्र इच्छाशक्ती निर्माण केली.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा एक दीर्घकालीन आणि कठीण संघर्ष होता, जो भारताला १५० ते २०० वर्षांच्या इंग्रजी साम्राज्याच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी लढा होता.

१८५७ चा स्वातंत्र्यलढा एक मोठा लोकांमध्ये संचारलेल्या असंतोषाचा परिणाम होता .त्यामध्ये भारतीय सैन्य, शेतकरी, व्यापारी, सैनिक, राजे आणि बहुसंख्य लोक सामील झाले .त्यातील प्रमुख नेत्यांमध्ये राणी लक्ष्मीबाई, नाना साहेब, बहादूर शाह जफर समावेश होता .तथापि, १८५७ च्या बंडाला पूर्णपणे दडपले गेले .

स्वातंत्र्यलढ्याच्या संपूर्ण कालखंडात, भारतीय जनता आणि त्यांचे नेतृत्व आपल्या उद्दिष्टासाठी संघर्ष करत राहिले .१८८५ मध्ये, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस )Indian National Congress - INC) स्थापन झाली . काँग्रेसने प्रारंभात इंग्रजी सरकारसोबत शांततेने संवाद साधण्याचे धोरण स्वीकारले .हे सर्वसामान्य भारतीयांच्या

शिक्षणाला, स्वायत्ततेला आणि समानतेला महत्त्व देणारे होते.

महात्मा गांधींनी १९१५ मध्ये भारतात प्रवेश केला आणि त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपली भूमिका अधिक सक्रिय केली .गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक व्यापक आणि शांततामय बनला .त्यांनी अहिंसा आणि सत्याग्रहाचे तत्त्व स्वीकारले आणि त्याच्या माध्यमातून ब्रिटिश साम्राज्याविरोधात संघर्ष केला .गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९१९ मध्ये रॉलेट कायदा आणि १९३० मध्ये दांडी मार्चसारखे महत्त्वाचे आंदोलन होऊ लागले.

महात्मा गांधींनी १९४२ मध्ये" चले जावो " आंदोलन सुरू केले, ज्यामुळे भारतभर ब्रिटिश सरकारविरोधी मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली . ब्रिटिश सरकारने हा आंदोलन दडपला, पण यामुळे भारतीय जनतेत स्वातंत्र्याची जाणीव आणली . गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतभर अनेक आंदोलनांची इंग्रजी सत्तेची होळी केली, जसे की मीठाचा सत्याग्रह आंदोलन .यामुळे इंग्रजी सरकारला चांगला धक्का बसला.

ब्रिटिश साम्राज्याने भारताच्या संसाधनांचा शोषण केले .त्यातच भारतीय समाजातील असमानता, भेदभाव, आणि राजकीय अपारदर्शिता यामुळे सामान्य नागरिकांचा असंतोष वाढला .गांधीजींच्या शांततामय संघर्षाचा वळण घेत, भारतीय स्वातंत्र्यलढा अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाने पुढे चालला.

गांधीजींच्या नेतृत्वाखाली, स्वतंत्रतेच्या कक्षेत व्यापक लोकशाही मूल्यांचा समावेश झाला .त्यातून भारतीय समाजाच्या साहित्य, सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक विविधतेला महत्त्व देणारे विचार लोकांपर्यंत पोहोचले.

भारतीय स्वातंत्र्यलढा केवळ एक राजकीय लढा नव्हता, तर तो एक साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक बदल घडवणारा लढा होता .या लढ्यात विविध समुदाय, जात, धर्म, आणि प्रांतिक स्वातंत्र्याची भावना जोपासली गेली .महात्मा गांधींनी अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाने स्वातंत्र्याची मागणी केली . १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, परंतु त्या स्वातंत्र्याचा संघर्ष एका ऐतिहासिक कथेचा भाग आहे, जो अनेक दशके आणि हजारो लोकांच्या कष्ट आणि बलिदानांचा परिणाम होता .असहकार आंदोलन, असहमती आंदोलन, भारत छोडो आंदोलन इत्यादी .या सर्व आंदोलकांचा उद्देश एकच होता - भारताला स्वतंत्रता मिळवून देणे.

**मराठी साहित्याचे योगदान**

स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात मराठी साहित्याचे मोठे योगदान होते .मराठी साहित्याने केवळ लोक जागृतीसाठीच काम केले नाही, तर त्यात अनेक साहित्यिकांनी आपल्या लेखनातून स्वातंत्र्यलढ्याला सामर्थ्य दिले .साहित्याने संघर्षाची आणि बंडाची भावना जनमानसात रुजविण्याचे काम केले.

स्वातंत्र्यलढ्यात प्रबोधनात्मक कवितांचा वापर एक प्रभावी साधन म्हणून केला जात होता .मराठीत अनेक कवींनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला समर्थन देणारी गाणी रचली .वि .दा .सावरकर यांनी - ने मजसी ने मातृभूमीला

सागरा, प्राण तळमळला
भूमातेच्या चरणातला तुज धूतां
मी नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य दशिं चल जाऊ
सृष्टिची विविधता पाहू ।

वि .दा .सावरकरांच्या कवितेत स्वाभिमान आणि उत्कंठ राष्ट्रप्रेम भरलेले आहे .तर साने गुरुजींनी बलसागर भारताचे स्वप्न वास्तवात उतरण्याचे अपेक्षा कवितेतून अभिव्यक्त केली आहे.

'बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो
हे कंकन करि बांधियले, जनसेवे जीवन दिधले
राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिध्द मरायाला हो ।

सातंत्र्याचा कालखंड भारावलेला होता .अन्यायी, जुलमी इग्रजी राजवट केव्हा संपेल याची वाट सर्वसामान्य जनता पाहत होती .नव्हे तर मराठी कवितेच्या माध्यमातून त्या अंगाने समाजप्रबोधन सतत चालू होते . ग.दी.माडगूळकरांनी" वन्दे मातरम् "मधून म्हटले -

वेदमंत्राहून आम्हा वंद्य, वंदे मातरम्
वंद्य वंदे मातरम्
माऊलीच्या मुक्ततेचा, यज्ञ झाला भारती
त्यात लाखो वीर देती, जीविताच्या आहूती
आहुतींनी सिध्द केला, मंत्र वंदे मातरम्

पराक्रम, शौर्य गाथेतून स्वातंत्र्याविषयी ओढ व अतुरता व्यक्त होत होती .स्वत:च्या संसारावर तुळशीपत्र ठेऊन देशासाठी अहोरात्र काम करणारी माणसे त्या कालखंडात होती. त्यांचे जीवन सर्वसामान्य माणसासमोर मांडावे व

त्यांची ध्येयवादी भूमिका कळावी म्हणून ग .दी . माडगूळकर कवितेच्या माध्यमातून म्हणतात.

माणुसकीच्या शुत्रुऊसंगे
युध्द आमचे सुरू
जिंकू किंवा मरू
लढतिल सैनिक, लढू नागरिक
लढतिल महिला, लढतिल बालक
शर्थ लढ्याची करू, जिंकू किंवा मरू

स्वातंत्र्य कालखंडात सर्व सामान्य लोकांवर कविता व गीतांचा प्रभाव पडत होता .त्यामुळे त्यांची स्वातंत्र्यविषयी भूमिका अधिक प्रखर बनण्यास मदत होत होती .विविध धर्मातील लोक परकीय शक्तीशी व त्यांच्या विचारांशी लढताना त्यांना कवितेच्या माध्यमातून सामर्थ्य मिळत होते .मराठी साहित्यिकांनी तर वाड्मय प्रकाराच्या वेगवेगळया माध्यमातून देशव्यापक संवाद गाठला होता .

"हे राष्ट्र देवतांचे

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आ चंद्र-सुर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे
कर्तव्यदक्ष भूमी सीतारघुत्तमाची
रामायणे घडावी, येथे पराक्रमाची
शीर उंच उंच व्हावे, हिमवेत पर्वतांचे
आ सुर्य चंद्र नांदो स्वातंत्र्य भारताचे

मानसिक आणि सामाजिक जीवनमान उंचवुन स्वातंत्र्यलढा तेवत ठेवण्यासाठी मराठी साहित्यिकांनी वेगवेगळया अंगांनी प्रेरणा देण्याचे काम केले .कुसुमाग्रज यांची 'क्रांतीचा जयजयकार', 'वेडात वीर दौडले सात' तसेच कवी केशवसुत यांची 'तुतारी' होय .कविता व गीते विशेषत :महाराष्ट्रात लोकप्रिय झाले .यामध्ये राष्ट्रीय एकतेचा, वीरतेचा आणि मातृभूमीसाठी बलिदान देण्याची भावना व्यक्त होत होती .साहित्यिकांच्या वाड्मयातून प्रेरणा घेऊन अनेक लोक उत्फुर्तपणे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते.

कवी विनायक) विनायक जनार्दन करंदीकर - ( कवी विनायक'अहल्या', 'राणी दुर्गावती', 'संयोगिता', 'तारा', 'वीरमती', 'मोहानंतर' ही कथाकाव्ये लिहिली .या माध्यमातून देशाच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडविले .आपल्या काव्यातून त्यांनी देशभक्तीचा व राष्ट्रीयत्वाचा आविष्कार मांडला .पारतंत्र्याचा त्वेष त्यांनी आपल्या कवितेतून मांडला .त्यासाठी पूर्वजांचा वैभवाचे व वीरवृत्तीचे स्फूर्तीदायक स्मरण त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केले .पारतंत्र्य निवारणाची तळमळ त्याच्या काव्यातून व्यक्त होते .त्यांना त्यामुळे राष्ट्रीय कवी म्हटले जाते .त्याच्या कवितेचा मुळआत्मा देशभक्ती हाच आहे.

गोविंद) गोविंद त्र्यंबक दरेकर (यांची'टिळकांची भूपाळी'ही त्याची गाजलेली कविता .स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सहवास लाभला होता .त्यामुळे कवितेतून देशभक्तीची गाथा दिसते .स्वातंत्र्यप्राप्ती, अन्यायाची चीड त्यांच्या कवितांतून दिसते. दु .वा .तिवारी यांनीही आधुनिक मराठीत राष्ट्रीय कवितेचे दालन समृद्ध केले.

मराठीतील साहित्यकारांनी स्वातंत्र्यलढ्याच्या विचारधारेला आपल्या लेखनातून प्रकट केले .यामध्ये प्रमुख नाव आहेत, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 'गितारहस्य' ग्रंथाच्या माध्यमातून भारतीय जनतेला प्रेरणा मिळवून देण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले .त्यांचा 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हा घोष अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अनेक लेखकांनी कादंब-या आणि लघुनिबंधांद्वारे सामाजिक आणि राष्ट्रीय साक्षात्काराची भावना लोकांपर्यंत पोहोचवली .राम गणेश गडकरी यांच्या काव्यपूर्ण लेखनाने स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणेला नविन दिशा दिली .ते भारतीय समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचे घटक होते.

मराठी साहित्याचे निबंध, कथा आणि नाटक यांमध्येही स्वातंत्र्यलढ्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला .'विजयी विश्व तिरंगा प्यारा' या गाण्याने आणि 'स्वराज्य माझा हक्क' या धर्तीवरील लेखनाने लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली .काही कादंब-या आणि लघुनिबंधांनी स्वातंत्र्यालढ्यात प्रभाव निर्माण केला . अन्याय, अत्याचार यांविरुद्ध उठाव या लेखनातून दाखवले गेले.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मराठी साहित्यिकांची भूमिका निभावली .हे साहित्य आंदोलनाचे एक प्रेरक बल ठरले .मराठी साहित्यकांचा काव्य आणि कथा लेखनाच्या माध्यमातून लोकांना लढ्याची प्रेरणा दिली.मराठी साहित्यकारांना लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि समानतेच्या विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी नवनवीन वळणांचा स्वीकार केला .आणि त्यामुळे ते आपल्या लहान वयातील मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, सर्वांपर्यंत पोहोचले.

**निष्कर्ष**

भारतीय स्वातंत्र्यलढा आणि मराठी साहित्य यांच्यातील संबंध प्रगल्भ व बहुआयामी आहे .मराठी साहित्याने केवळ स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली, तर त्या

संघर्षाच्या गतीला वेग दिला .विविध मराठी साहित्यकारांचे कार्य स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अनमोल ठरले .त्यांच्या काव्य, कथा, निबंध आणि नाटक यांचे योगदान भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात कधीही विसरता येणार नाही .स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्येक संघर्षाच्या धगधगत्या क्षणाला या साहित्याने स्वतःची वेगळेपण सिद्ध केले .जे की,पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरली.

**संदर्भ**


1. प्र.न.जोशी , अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास )१८०० ते १९६० (
2. गो .म .कुलकर्णी, आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी) १९९४(, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे .
3. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मराठी वाङ्मयाचा इतिहास) खंड १ ते ४ (
4. डॉ .वसंत बिरादार) इ.स.१८१८ ते १८९९(, (१९९९(, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
5. नरहर कुरुंदकर, धार आणि काठ, (१९७१(, देशमुख आणि कंपनी, पुणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# हिंदी साहित्य और मानवी जीवन का उत्थान

डॉ. ए. टाळके.बी.
सहयोगी प्राध्यापक, भगवान महाविद्यालय, आष्टी जिबीड .
ईमेल -apparaotalke@gmail.com

DOI-10.5281/zenodo.15574681

**भूमिका:**

हिंदी साहित्य भारतीय संस्कृति, समाज और मानवीय मूल्यों का दर्पण है। यह न केवल मनोरंजन का साधन है, बल्कि समाज सुधार, विचारों के प्रसार और मानवीय चेतना के उत्थान का एक प्रभावी माध्यम भी है। हिंदी साहित्य के माध्यम से व्यक्ति अपने जीवन में नैतिकता, सत्य, प्रेम, करुणा, त्याग और आदर्शों को आत्मसात करता है। साथही समाज का वास्तव स्वीकार करते हुए, संघर्ष करने के लिए तैयार हो जाता है। इस शोधालेख में हम हिंदी साहित्य के विभिन्न युगों, विधाओं और रचनाकारों के योगदान को समझेंगे और यह जानेंगे कि कैसे साहित्य ने मानवीय जीवन के उत्थान में महत्वपूर्ण भूमिका निभाई है।

**हिंदी साहित्य का संक्षिप्त परिचय:**

हिंदी साहित्य का विकास आदिकाल, मध्यकाल भक्तिकाल), रीतिकालऔर आधुनिक काल इन युगों में ( हुआ है, जिनमें प्रत्येक युग ने अपने समय की राजनीतिक, सामाजिक, धार्मिक और सांस्कृतिक परिस्थितियों को प्रतिबिंबित किया है। जिसके माध्यम से तत्कालीन मानवी जीवन की वास्तविकता हमारे सन्मुख उपस्थित होती है। हिंदी साहित्य को निम्नलिखित मुख्य युगों में विभाजित किया जाता है :-

**आदिकाल सन) वीरगाथा काल/769 से 1400 ई(.**

इस काल में मुख्यतः वीर रस प्रधान काव्य का निर्माण किया गया। जिसका कारण था उस वक्त की राजनीतिक परिस्थिती। वीर रस प्रधान काव्य के प्रमुख कवि हैं, चंदबरदाई (पृथ्वीराज रासो), जगनिक अल्हा ) (खंड, नरपति नाल्ह (बिसलदेव रासो), आदि।

इनके साथसाथ इस युग मे अमीर खुसरो की - पहेलिया और विद्यापति के पद भी बडे प्रसिद्ध हुए। इनके अतिरिक्त सिद्ध, नाथ और जैन साहित्य भी इस युग मे लिखा गया। जैन साहित्य के बारे में डॉक्टि ने माधव सोनट . लिखा है, "आचार्य शुक्ल जी के बाद आदिकालीन साहित्य पर काफी अनुसंधान हुआ है, जिससे स्पष्ट हुआ है कि आदिकाल में विपुल ग्रंथ रचना हुई है।शुक्ल जी की ... औसतवादी दृष्टी से देखा जाए तो इस काल में 'वीरगाथा' की अपेक्षा 'जैन साहित्य' अधिक औसत में मिलेगा। " जयपुर, बिकानेर, जैसलमेर, अहमदाबाद, आबू, पाटण आदि स्थानों के भंडारों से लगभग 500 कृतियाँ उपलब्ध हुई हैं। जिसमें जैन साहित्य अधिक मात्रा में दिखाई देता है।

इस युग ने धार्मिकता, वीरता, त्याग और देशभक्ति की भावना को बढ़ावा दिया।

**भक्तिकाल सन )1400 से 1650 ई(.**

हिंदी साहित्य मे भक्तिकाल से तात्पर्य उस काल से है, जिसमे मुख्यतः भागवत धर्म के प्रचार तथा प्रसार के परिणामस्वरूप भक्ति आंदोलन का सूत्रपात हुआ था और उसकी लोकोन्मुखी प्रवृत्ती के कारण धीरेधीरे - भावना की अभिव्यक्ति का -लोकप्रचलित भाषाएं भक्ती ती गई और कालांतराने भक्ती विषयक साहित्य माध्यम बन प्रचूर मात्रा मे लिखा गया। यह काल धार्मिक, आध्यात्मिक और नैतिक उत्थान का युग था। इस कालके संत कवियों ने समाज सुधार, मानवता और भक्ति को प्रमुखता दी।

इस काल के प्रमुख कवि है; कबीर, सूरदास, तुलसीदास, मीराबाई, जायसी, रसखान, नानक, रैदास आदि।

इस युग में जातिधर्म की दीवारों को तोड़ने और प्रेम व - करुणा के संदेश को फैलाने का कार्य हुआ।

**रीतिकाल सन) शृंगारकाल/1650 से 1850 ई(.**

इस युग का काव्य अधिकतर शृंगार रस प्रधान था, किंतु नीति और समाज के आदर्श भी प्रस्तुत किए गए। इस युग में रीतिबद्ध, रीतिसिद्ध और रीतीमुक्त काव्य का निर्माण हुआ।

इसके प्रमुख कवि हैंकेशवदास :, बिहारी, भूषण, मतिराम, घनानंद, रहीम, नृपशंभु, पद्माकर आदि।

इस युग ने सौंदर्य, प्रेम और नीति संबंधी विचारों को साहित्य में स्थान दिया। बिहारी के दोहे तो गागर में सागर भर देने वाले थे। जैसे; "नहिं पराग, नहिं मधुर मधु, नहिं विकास इहि काल।
अलीकली ही सो विन्ध्यियों-, आगे कौंन हवाल।।"

**(घ सन) (गद्यकाल) आधुनिक काल (1857 से आज तक(**

आधुनिक भारत के इतिहास की प्रथम महत्वपूर्ण घटना है सन 1857 ईका स्वतंत्रता संघर्ष जो एक प्रकार . से आधुनिक युग की पहिली सीमा रेखा है। यह आंदोलन वास्तव में मध्ययुग की समाप्ति और आधुनिक युग के आरंभ का पहला उद्घोष था। इसकारण सन1857 से आधुनिक युग का आरंभ मानना अधिक संगत होगा। राष्ट्रीय चेतना और राजनैतिक जागरण के इस युग के साहित्य में वास्तविक अर्थों में आधुनिक जीवन की आवश्यकताओं, समस्याओं और इसके महत्त्वपूर्ण प्रश्नों को रुपायित किया गया और विशेष रूप से इसका गद्य साहित्य जीवन के यथार्थ चित्रण का विषय बना। इस प्रकार साहित्य मे जीवन का अधिक व्यापक चित्रण होने से वो हमारे आधुनिक जीवन के अधिक निकट आ सका। इस युग में साहित्य ने सामाजिक, राजनीतिक और आर्थिक समस्याओं को प्रतिबिंबित किया। गद्य का लेखन भी इसी काल में विकसित हुआ। जिसमें कहानी, उपन्यास, नाटक, एकांकी, निबंध, पत्रकारिता और आत्मकथा जैसी विधाओं का विकास हुआ।

आधुनिक काल को दो खंडो में विभाजित किया जा सकता है -1.स्वतंत्रता पूर्वकाल )1857 से 1950 तक (

**स्वातंत्र्योत्तर काल )1950 से आज तक(**

सर 1857 से जिस चेतना का उद्भव माना जाता है उसका प्रतिफलन सन 1947 की आजादी में हुआ है, अत इस कालखंड :को आधुनिक काल का प्रथम खंड माना जा सकता है। सन 1950 से प्रजातंत्रीय व्यवस्था का आरंभ भारतीय इतिहास में एक महत्त्वपूर्ण घटना है। यहाँ से हमारी आधुनिक सोचविचार तथा चेतना का दूसरा दोर - शुरू होता है, इसलिए इसे आधुनिक काल का दूसरा खंड माना जा सकता है।

इस काल के प्रमुख रचनाकार हैंभारतेंदू : हरिश्चंद्र, महावीरप्रसाद द्विवेदी, प्रेमचंद, जयशंकर प्रसाद, सूर्यकांत त्रिपाठी 'निराला', महादेवी वर्मा, मैथिलीशरण गुप्त, हरिवंश राय बच्चन, सच्चिदानंद हिरानंद वात्सायन 'अज्ञेय', धर्मवीर भारती, रामधारीसिंह दिनकर, जगदीशचंद्र माथुर, मोहन राकेश, उपेंद्रनाथ अश्क आदि।

भारतेंदु हरिश्चंद्र को इस काल के गद्य और पद्य साहित्य के प्रणेता के रूप में माना जाता है। भारतेंदु जी की प्रेरणा और प्रयास से नवीन और आधुनिक साहित्य का जो बिजारोपण हुआ, महावीर प्रसाद द्विवेदी जी ने उसे विकसित होने के लिए पर्याप्त अवसर दिया। प्रेमचंद को तो कहानी और उपन्यास सम्राट माना जाता है। वे इस युग की बहुत बडी देन हैं। उन्होने अपने साहित्य के माध्यम से अपने युग की प्रायसभी समस्याओं का चित्रण किया है। : इस युग के काव्य तथा गद्य साहित्य की श्रीवृद्धि में जयशंकर प्रसाद का बहुमूल्य योगदान रहा है। निरभरी दुख की बदली चीर वेदना की साधिका महादेवी वर्मा 'आधुनिक मीरा' के रूप में जानी जाती है। इनकी कविता संगीत, चित्र तथा काव्य कला का अपूर्व संगम है। उनके बारे में दुधनाथ सिंह लिखते है, 'महादेवी इस देश की पहली मुक्त स्त्री है जिसके सिर पर आंचल है।'

इस युग में समाज सुधार, स्वतंत्रता संग्राम, नारी उत्थान और आधुनिकता को स्वर दिया गया हैं।

**हिंदी साहित्य का मानवीय जीवन पर प्रभाव:**

**नैतिकता और मूल्यों की स्थापना**

हिंदी साहित्य ने सदैव नैतिकता, धर्म, करुणा, प्रेम और मानवता की शिक्षा दी है। कबीर, तुलसीदास और रहीम जैसे संत कवियों की रचनाएँ हमें सत्य, ईमानदारी, परोपकार और संयम का संदेश देती हैं।

उदाहरण: कबीरदास की साखियाँ हमें सादगी, परिश्रम और सच्चाई का पाठ पढ़ाती हैं—

“बड़ा हुआ तो क्या हुआ, जैसे पेड़ खजूर।
पंछी को छाया नहीं, फल लागे अति दूर॥”

**सामाजिक सुधार और जागरूकता**

हिंदी साहित्य ने सामाजिक कुरीतियों जैसे जातिवाद, छुआछूत, नारी दमन और अशिक्षा के विरुद्ध आवाज उठाई।

प्रेमचंद के उपन्यास 'गोदान, सेवासदन और निर्मला' समाज की विषमताओं को उजागर करते हैं। प्रेमचंदने आदर्शोन्मुख यथार्थवाद को बढावा दिया।

महादेवी वर्मा और सुभद्रा कुमारी चौहान ने नारी जागरूकता और स्वतंत्रता संग्राम को स्वर दिया।

**राष्ट्रीय चेतना और स्वतंत्रता संग्राम में योगदान**

हिंदी साहित्य ने भारतीय स्वतंत्रता संग्राम को भी प्रेरित किया। कवियों और लेखकों ने अपनी रचनाओं के माध्यम से जनमानस में देशभक्ति की भावना जागृत की। जिसमे भारतेंदु हरिश्चंद्र अग्रणी थे।

रामधारी सिंह दिनकर की कविता 'सिंहासन खाली करो, जनता आती है' ने लोगों को क्रांति के लिए प्रेरित किया।

सुभद्रा कुमारी चौहान की कविता 'झाँसी की रानी' ने स्वतंत्रता संग्राम की वीरांगनाओं की गाथा गाई।

**आध्यात्मिक उत्थान और आत्मचिंतन**

हिंदी साहित्य में योग, ध्यान और आत्मचिंतन को भी महत्वपूर्ण स्थान मिला है। जैन साहित्य, संत साहित्य और सूफी काव्य ने धर्म, आत्मा की शुद्धि, भक्ति और मानव प्रेम की बात की।

**आधुनिक युग में हिंदी साहित्य और जीवन के विविध आयाम**

आज हिंदी साहित्य केवल किताबों तक सीमित नहीं, बल्कि डिजिटल मीडिया, ब्लॉग, सोशल मीडिया और फ़िल्मों के माध्यम से भी लोगों तक पहुँच रहा है।

हिंदी सिनेमा और थिएटर भी साहित्य को आम जनता तक पहुँचाने का कार्य कर रहे हैं।

**हिंदी साहित्य की प्रमुख विधाएँ और उनका योगदान:**

**काव्य साहित्य**

कविताएँ समाज में क्रांति और जागरूकता लाने का कार्य करती हैं। उदाहरणस्वरूप, दिनकर की राष्ट्रवादी कविताएँ और बच्चन की प्रेरणादायक रचनाएँ। बच्चन की काव्य साधना का आरंभ मधु गीतों से हुआ। 'जीवन दुखों से भरा है और अनिश्चित भी है, अतसब कुछ भूलकर प्राप्त : क्षणों का भरपूर उपयोग करो, सभी दूश्चिंताओं से परे होकर जीवन उत्सव में अपने आपको भूल जाओ।' इस तरह की मानसिकता बच्चन के गीतो में अभिव्यक्त होती है।.

**कथा साहित्य (उपन्यास और कहानियाँ)**

प्रेमचंद, यशपाल, फणीश्वरनाथ रेणु जैसे कथाकारों ने ग्रामीण जीवन, सामाजिक विषमताओं और संघर्षों को प्रस्तुत किया। प्रेमचंद के पूर्व उपन्यास मात्र मनोरंजन का साधन था। प्रेमचंद ने उसे जीवन के आदर्श और यथार्थ का दस्तावेज बनाया।

**नाटक और निबंध साहित्य**

भारतेन्दु हरिश्चंद्र, जयशंकर प्रसाद, हरीकृष्ण प्रेमी, मोहन राकेश लक्ष्मीनारायण मिश्र, लक्ष्मीनारायण लाल और उपेंद्रनाथ अश्क ने नाटक के माध्यम से समाज सुधार को गति दी।

रामचंद्र शुक्ल, हजारीप्रसाद द्विवेदी जैसे निबंधकारों ने गहन चिंतन प्रस्तुत किया।

**पत्रकारिता और हिंदी साहित्य**

हिंदी पत्रकारिता ने स्वतंत्रता संग्राम और सामाजिक आंदोलनों में महत्वपूर्ण भूमिका निभाई।

**हिंदी साहित्य का भविष्य और डिजिटल युग में विकास:**

आज हिंदी साहित्य डिजिटल प्लेटफॉर्म्स पर भी लोकप्रिय हो रहा है। ऑनलाइन ब्लॉग, ईपुस्तकें और - सोशल मीडिया साहित्यके प्रसार में सहायक हो रहे हैं।

भविष्य में संभावनाएँ:

हिंदी साहित्य का वैश्विक प्रचारप्रसार बढ़ेगा।-

आर्टिफिशियल इंटेलिजेंस और तकनीक से साहित्य की नई विधाओं का विकास होगा।

**निष्कर्ष:**

हिंदी साहित्य न केवल मनोरंजन का साधन है, बल्कि यह समाज सुधार, नैतिक उत्थान, राष्ट्र प्रेम और आध्यात्मिक विकास का माध्यम भी है। विभिन्न युगों में हिंदी साहित्य ने समाज को दिशा दी और मानवीय जीवन के उत्थान में महत्वपूर्ण भूमिका निभाई। भविष्य में भी हिंदी साहित्य का योगदान अमूल्य रहेगा और यह आनेवाली पीढ़ियों के लिए प्रेरणा का स्रोत बना रहेगा।

**संदर्भ सूची-**

1. हिंदी साहित्य का इतिहासरामचंद्र शुक्ल-, मलिक एंड कंपनी, जयपुर)2015)।
2. हिंदी साहित्यहजारीप्रसाद -परंपरा और प्रवृत्तियाँ : द्विवेदी, साहित्य भवन, इलाहाबाद)2016)।

3. गोविंद चातक के नाटक एवं नाट्यलोचना - अप्पासाहेब टाळके.डॉ, शैलजा प्रकाशन, कानपूर)2012)4. कवियों के प्रतिहरिवंश राय - बच्चन राजपाल एंड संस, नई दिल्ली)1997)।
4. कहानीनामवर सिंह-नयी कहानी :, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली)1987)।
5. हिंदी साहित्य का इतिहासमाधव सोनटक्के .डॉ -, विकास प्रकाशन, कानपूर)2009)
6. संस्कृति के चार अध्यायरामधारी सिंह दि -नकर, साहित्य अकादमी, नई दिल्ली)1954)।
7. भारतेन्दु हरिश्चंद्र )1870). भारतदुर्दशा और अन्य - भारतेंदू हरिश्चंद्र -नाटक, काशी नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी)1870)।
8. हिंदी साहित्य युग और प्रवृत्तीयाँशिवकुमार .डॉ - शर्मा, अशोक प्रकाशन, नई दिल्ली)1997)।
9. महादेवी -दूधनाथ सिंह, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली)2009)।

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# मराठी लोकगीत व भारतीय संस्कृतीचे दर्शन

**डॉ. राजाराम सोनटक्केनटक्के**
ॲड .बी डी .हंबर्डे महाविद्यालय, आष्टी जिल्हा बीड
DOI-**10.5281/zenodo.15574730**

लोकगीते म्हणजे लोकांनी सण-उत्सव विविध समारंभ प्रसंगी गांभीर्याने गायिलेली गाणी असे म्हणता येईल. देवतांसाठी कष्टाची कामे करता करता, कष्टाचे डोंगर उपसतांना जी श्रमपरिहार्य स्वयंस्फुर्तीने ओठातून बाहेर पडली त्या सर्व गीतांना 'लोकगीते' असे म्हणता येईल. मानवी जीवनातील भावभावनेला लोकवाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे. लोकवाङ्मयात ही भावभावना महत्त्वाची असते. वाङ्मयामध्ये माणसाच्या मनाला आवाहन असते. आणि भावनांची कंपने, स्पंदने, मनात संवेदना जागृत करुन एक प्रकारे भावानुभवाच्या अनुभवातून मानवी मनाला एक प्रकारे आनंद होत असतो. भावानुभव आणि जीवनातील सुख-दुःख यांचा घनिष्ट असा संबंध आहे. मानवी जीवनाची उभारणी अनेक सुख-दुःखाच्या खाचखळग्यांनी झालेली असल्याने त्या जीवनातील सुख-दुःखाच्या भावानुभावांना त्यांच्या जीवनात आणि ते जीवन ज्या वाङ्मयातून आविष्कृत होते त्या वाङ्मयाला आस्वाद प्रक्रियेत महत्त्व असते. लोकगीतांमध्ये जे विविध विषय जाणवतात त्यामध्ये भाव-भावना हा एक महत्त्वाचा विशेष आहे. लोकगीतांचा उगमच मुळात मानवी जीवनातील भावाविस्काराला मुक्त करण्याच्या हेतुने झालेला दिसतो. आपल्या मनातील भावना, आपल्या मनातील विचार इतरांना सांगणे हा मानवी गुण आहे. यातून मानवाच्या तो ज्या प्रसंगी ज्या त-हेने कार्य पार पाडले जात असतांना काहीशा लयबध्द ओळी तोंडातून बाहेर पडल्या यालाच लोकगीत असे म्हणतात. मानवी जीवन आणि लोकगीते यांचा घनिष्ट संबंध आहे. मानवी मनातील विविध भावभावनांचा अविष्कार लोकगीतातून झाला आहे. "लोकगीते म्हणजे लोकजीवनाची भावगंगा आंतरीच्या उमाळयाने, जिवाच्या जिव्हाळयाने थिबून वाहतांना दिसते. अशा या भावगंगेत डुंबण्याचा एक प्रकारचा आनंद आपल्याला लोकगीतांचा आस्वाद घेतांना मिळातो." असे लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. शरद व्यवहारे यांना वाटते. लोकगीतांची निर्मितीच मुळात समाजातून झालेली असल्यामुळे त्यातून समाजमनातील भावभावना व्यक्त झालेल्या दिसतात. लोकगीतांची निर्मिती जरी अशिक्षित समाजात झालेली असली तरी विविध भावतरंग लोकगीतातून दिसतात. इतर वाङ्मय ललित कलाकृतीप्रमाणे लोकगीतातही सौंदर्यभाव असतात. एखादे लोकगीत दिसते कसे ? याला काहीही महत्त्व नाही; परंतु त्या लोकगीतातून कोणते भाव प्रकट होतात. हे पाहणे महत्त्वाचे असते. लोकगीतातून व्यक्त होताना भावविष्काराचे स्वरुप येथे समजावून घ्यावयाचे आहे. मानवी मन अनेकविध भावानुभावांनी समृध्द असते. ज्यावेळी हे भावनुभावाच्या माध्यमातून व्यक्त होतात तेव्हा त्यातील प्रत्येक भाव आपल्या संवेदनक्षम मनावर एक चित्र चित्रित होते. यालाच भावानुभावाची अभिव्यक्ती म्हणतात.

कारण डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, "भावविश्वात रसिकाला तादात्म्य पाऊन घेण्याचे विलक्षण सामर्थ आहे. या भावविश्वात तादात्म्य पावताना एक प्रकारचा आनंदाचा प्रत्यय येत असतो. आपल्याला विरंगुळा वाटतो हा विरंगुळा मानवी जिवनात अत्यंत मोलाचा आहे." लोकगीतातील ही भावाभिव्यक्ती माणसाच्या मनाला हळुवार स्पर्श करतात. मनाला आनंदी करतात. त्याचप्रमाणे कधी कारुण्याने डोळेही पाणवतात. लोकगीतातील वेगवेगळया जीवनानुभवातून व्यक्त झालेल्या लोकगीतांचा अभ्यास करावा लागणार आहे. यामध्ये प्रामुख्याने

1. कौटुंबिक जीवनातील भावसंबंध.
2. संसारातील, स्त्री जीवनातील सुख दुःखात्मक भावानुभव.
3. धार्मिक श्रध्दाशील मनातील भावविश्व
4. उपरोक्त जीवनानुभवातून आविष्कृत होणाऱ्या लोकगीतातील भावाभिव्यक्तीचा येथे अभ्यास केला जाणार आहे.

**कौटुंबिक जीवनातील भावाभिव्यक्ती**

मराठी लोकगीत आणि कुटुंब यांचा जवळचा संबंध आहे. सामाजिक दृष्ट्या जीवनातील वेगवेगळया क्षेत्रातील भावभावनांचा आविष्कार लोकगीतातून झालेला आहे. पूर्वीची कौटुंबिक परिस्थिती पाहता कौटुंबिक जीवन फारच जिव्हाळयाचे होते, परंतु आजच्या यंत्र संस्कृतीच्या

युगात धक्काधक्कीच्या काळात कौटुंबिक जीवन दुरावलेले दिसते. आजच्या कुटुंबातील अवस्था पाहिली तर आपल्याला असे दिसते की, आज मुलगा आणि वडील यांची सुट्टीच्या दिवसांत भेट होते. कारण मुले उठण्याच्या अगोदर वडिलांना नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडावे लागते आणि संध्याकाळी मुले झोपल्यानंतर घरी परतावे लागते. अशी स्वतःच्या मुलांच्या बाबतीत आवस्था झाली आहे. तेंव्हा येथे इतर नातेसंबंधाचा विचार करणे दुरच रहाते, परंतु पुवींच्या काळी कौटुंबिक जीवन इतके जिव्हाळयाचे होते की, त्याची आज आपण कल्पनादेखील करु शकत नाही. या नात्यासंबंधीचे वर्णन त्या काळातील लोकगीतून आपल्याला आज पहायला मिळते. कौटुंबिक जीवनातील विविध नाते-संबंधाविषयी लोकगीतातून भावाविष्कार अभिव्यक्त झालेले आहेत. यामूळे लोकगीतातील हे भाव विश्व आजही मानवाच्या मनाला भुरळ घालते. कौटुंबिक नात्यामध्ये, आई-वडिल, बहीण-भाऊ, पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसी, ननंद- जावा, सासू सासरे, सखी-शेजारीण असे विविध नातेसंबंध लोकगीतातून आविष्कृत झालेले दिसतात. कुटुंबातील अनेक जीवनानुभवांशी या नात्याचा संबंध येत असतो. "कौटुंबिक जिव्हाळयाची ओवी गीते म्हणजे स्त्री जीवनाची गाथा ! ओथंबून वाहणारी स्त्री मनातील भावगंगा ! या स्वरुपाच्या ओवीगीतातून स्त्री-जीवनाच्या अनेकविध पैलूंचे दर्शन घडते. कौटुंबिक नात्यातील भावसंबंध स्त्री जीवनातील सुखदुःखे स्त्रियांच्या आवडी-निवडी, आचार-विचार, रुढी-प्रथा, भाव-भावना इत्यादींची निर्मळ प्रतिबिंब या ओवीगीतात पहावयास मिळते." लोकगीतामध्ये स्त्री गीतांचा भरणा अधिक आहे. अर्थात स्त्री ही हळव्या मनाची असल्याने तिच्या कुटुंबातील पती, सासु-सासरे, ननंद-दीर, भाऊजय, आई-वडिल, बहीण-भाऊ इ. नात्यासंबंधाबल ती लोकगीतातून मनातील भाव व्यक्त करते. कौटुंबिक नात्यामध्ये स्त्री ही भावनीक असते. स्त्री ओवी गीतातील प्रत्येक ओवी म्हणजे एक भावचित्र असते. कौटुंबिक जिव्हाळयाच्या नातेसंबंधातील, संसारातील जीवनातील जीवनानुभूती पहावयास मिळते. स्त्री जीवनामध्ये सासर आणि माहेर या दोन ठिकाणांना विशेष महत्त्व आहे. घरातील प्रमुख स्त्री भोवती संपुर्ण कुटुंबाची नाळ जोडलेली असते. भावा-भावातील प्रेमाचे उत्कृष्ट उदाहरण .लोकगीतांचा उल्लेख करता येईल

"राम चाले वाटे । लक्ष्मण झाडी काटे

उपरोक्त लोकगीतातील ओळीमधून बंधू प्रेमाचे त्याच्चप्रमाणे लहान भाऊ मोठ्या भावाचा आदर करतो याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

अगदी मानवाच्या जन्मापासून ते त्याच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंतचे अनेकविध नातेसंबंधाविषयी भाव-भावना, सुख-दुःख लोकगीतामध्ये स्वी गीतांचा भरणा अधिक आहे. माहेरी चार दिवस सुखाचे आनंदाने घालवून स्वी जेव्हा सासरी नांदण्यासाठी जाते त्यावेळी तिच्या तोंडून माहेरच्या व्यक्तीविषयीच्या भावभावना ती गीतातून अभिव्यक्त करते.

नांदायला आल्यानंतर मुलीला प्रथम तिच्या आईची वेळोवेळी आठवण येते. दळण दळतांना जात्यावर बसल्यानंतर नकळत तिच्या तोंडून शब्द बाहेर पडू लागतात.

"नदीला येतो पूर लवणाला बाई फेस
गंगा वाहे बारा मास, माय हरण माझी।
किंवा
बाबा आणि बया माझी अमराई पाडाची,
किंवा
माय बाई माझे शेवंतीचा मळा."

या ओव्यामधून मुलीच्या मनातील आई वडीलाविषयीचे प्रेम ओसंडून वाहतांना दिसते. यामध्ये आईवडिलांसाठी गंगा, हरण, शेवंतीचा मळा आमराई इ. उपमा देऊन आई वडिलांच्या हृदयातील मुळाचे स्थान दाखवून दिले आहे. स्त्रियांच्या ओवीगीतांमध्ये आई-वडिल, बहिण-भाऊ या नात्याविषयी अधिक प्रमाणत कृतज्ञता व्यक्त होतांना दिसते

"गोतामंदी गोत मायबाई गोत।
पोथी मंदी भागवत, दिसं शोभिंवत
किंवा
अस्तुरी मिळल लेण्या लुगड्यानं झ्याक
नाही मिळत माया बाप मोजलेत रुपये जरी लाख।।
किंवा
येड्या माझ्या जीवा तुला उलीस कळना
माय बाप सारखं कुठं दौलत मिळना ।।

उपरोक्त ओव्यामधून आई वडिलांविषयीची आत्मियता कृतज्ञता व्यक्त झाली आहे. उपरोक्त ओळीमध्ये जीवनासंबंधीचे अनेक भाव व्यक्त होतात. तसा विचार केला असता स्त्रीच्या एकूनच जडण-घडणीत आई-वडीलांचा मोलाचा वाटा असतो. तिच्यावर आई-वडिलांचे संस्कार झालेले असतात. जीवन जगत असतांना समाजात कसे वागावे, कसे जगावे याविषयी आई-वडील आपल्या मुलांवर संस्कार करत असतात. एखाद्या अलंकारामध्ये

भगवंताचे स्थान ज्या प्रमाणे शोभिवंत दिसते तसेच नात्यामध्ये आईचे स्थान आहे. असे या ओळीमधून व्यक्त झाले आहे. मुलाचे जीवन घडवण्यात आईचा जितका वाटा असतो. तेवढाच वाटा वडीलांचा सुध्दा असतो. सासरी गेल्यानंतर प्रत्येक स्त्रीला आपल्या पित्याचे नाव कमवावे असे वाटत असते.

"आई माझी गंगा काशी पिता माझा रामेश्वर,
देवाला नको जाया माझ्या घरी देव थोर ।।"

यासारख्या ओव्यामधून आई वडीलांचा थोरपणा व्यक्त होतो. त्याचप्रमाणे भाऊ-बहिणी विषयीचे अनेक गीतांतून वर्णन केलेले दिसते. स्त्रीच्या मनात आई वडिलांविषयी जेवढी आत्मीयता दिसते तेवढीच आत्मीयता भाऊ बहिणीच्या गीतातून दिसून येते. आपल्या भावाविषयी बहीण पुढील प्रमाणे आत्मीयता प्रकट करतांना दिसते.

"सावली भावजय, शुक्राची चांदणी चंद्र डुलतो तो अंगणी,
भाई राजस माझा ।।
किंवा
मालन कुंकू लावी बारीक गव्हावाणी
बांधवाचं रुप बाई माझ्या, देवावाणी ।।
किंवा
आमी दोघी बहिणी दोन गावच्या बारवा
मध्ये चंदन हिरवा ।।"

ओवाळणीसाठी चोळी लुगड्यासाठी एक तरी भाऊ असावा असे प्रत्येक स्त्रीला मनोमनी वाटत असते. उपरोक्त गीतातुन एक बहीण भावाचे सुखी संसाराचे स्वप्न पहातांना, त्याचप्रमाणे भावासाठी 'चंदना' ची उपमा देऊन भाऊ चंदनाप्रमाणे सुगंधाचा प्रत्यय देतो असे स्पष्ट होते. सासरी होणारा सासुरवास कोणाला सांगावा यासाठी प्रत्येक बहिणीला एक भाऊ असावा असे वाटते. त्याचप्रमाणे कुटुंबातील भावजय, मामा-मामी, सासु-सासरे, पती, दीर यासारख्या अनेक कौटुंबिक नात्यासंबधीचे चित्रण लोकगीतातून आलेले पहायला मिळते.

संसारातील, स्त्री जीवनातील सुखदुःखात्मक भावानुभव

लोकपरंपरेतील स्त्री ही कुटुंब व्यवस्थेचा केंद्रबिंदु आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, लोकपरंपरेत जीवन जगत असतांना स्वीला अनेक प्रकारच्या भूमिका निभवाव्या लागतात. रुढी प्रथेप्रमाणे स्त्रीला एका चौकटीतच जीवन जगावे लागते. स्त्री ची भूमिका आईची असो अगर सासूची असो, अथवा मुलगी, बहीण, भावजय, ननंद, जाऊ, सवत, सासू, आत्या, मावशी, काकू, आजी, मैत्रिण अशा विविध भुमिकेतून तिला अनेक संकटाना सामोरे जावे लागते .

"स्त्री जीवन म्हणजे सुखदुःखात्मक भावचित्राची निसर्गानेच केलेली अभिव्यक्ती असे म्हणावयास हरकत नाही मराठी लोकगीतातून आविष्कृत होणाऱ्या स्त्री जीवन चित्रात दुःखात्मक भावानुभावाचा अधिक प्रत्यय येतो."
असे डॉ. शरद व्यवहारे म्हणतात. डॉ. व्यवहारे यांच्या मताचा विचार केला तर ते योग्य आहे. कारण फार पुर्वी पासून आपल्याकडे पुरुषसत्ताक पध्दती अस्तित्वात आहे. आणि आजवर स्त्रीला अनेक हक्क अधिकार नाकरले गेलेले दिसतात. त्यामुळे स्त्री ही एक अन्यायग्रस्त आहे. ती चूल आणि मुल यातच आपले सर्वस्व मानत असे. पतीच्या सुखासाठी पत्नी अहोरात्र कष्ट करुन पतीविषयी आदरभाव, श्रध्दा, निष्ठा, घराण्याचे आचार विचार याचे पालन करुन जीवन जगते.

"नको मज बिंदी नको मज चंद्रहार,
गळीचे मंगळसुत्र हाच माझा अलंकार।।
किंवा,
देवा नारायना, तुझी धैर्याची लेक
माझ्या कपळीचं कुंकू फुलामधी राख।।
नारायना बाप्पा सुखाचे उगव,
माझ्या कुंकांच बगवं, शेल्या पदरी जपावं।।"

येथे एक स्त्री लोकगीतातून तिच्या मनातील भावना व्यक्त करताना म्हणते, बिंदी, चंद्रहार, यासारखे मौल्यवान अलंकार नकोत माझ्या गळयातील मंगळसूत्र हाच माझा सर्वात मोठा अलंकार आहे. आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभावे यासाठी ती सूर्याला हात जोडून विनंती करते की पतीच्या सुखासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तिची तयारी आहे. ती स्वतंत्र नाही. तिला नियमांच्या बंधनातच जीवन जगावे लागते. याविषयीची एक बोलकी ओवी.

"लेकीचा जन्म कोणा घातला येड्यानं
पराया घरी, बैल राबतो भाड्यानं ।।

किंवा,

लेकीचा जन्म जसा बाभळीचा पाला,
वाऱ्या वावटळीनं गेला धनी कोण कुणाचा झाला।।"

उपरोक्त दोन्ही ओव्यामधून स्त्री मनातील एक दुखरी भावना स्त्री व्यक्त करताना दिसतो. येथे स्त्री ची तुलना शेतात राबणाऱ्या बैलाशी केली आहे. सासरी नांदत्या घरी होणाऱ्या छळामुळे त्रासलेली स्त्री दळण-कांडण करताना तिचे दुःख अशा प्रकारच्या ओव्यातून व्यक्त करताना दिसते. अशा प्रकारच्या लोकगीतांमध्ये स्त्रीचे माहेरी सासरी तसेच समाजात जीवन जगत असताना आलेले चांगले वाईट अनुभव अभिव्यक्त झालेले दिसतात. माहेरी आई-वडिलांनी केलेले लाड आणि सासरी गेल्यानंतर

होणारा छळ, कोंडमारा, अन्याय अत्याचार या सारख्या सुखदुःखाच्या अनुभवाचे चित्रण ती लोकगीतातून अभिव्यक्त करते. त्याचप्रमाणे पतीनिधनाने आई वडीलांच्या निधनाने होणारे दुःख ती लोकगीताच्या माध्यमातून चित्रित करते. लोकगीतातून स्त्रीगीतातून स्त्रीचे करुण भावचित्र अभिव्यक्ती अधिक प्रमाणात प्रत्ययास येते.

**धार्मिक श्रध्दाशील मनातील स्त्रीचे भावविश्व**

धार्मिक लोकजीवन आणि लोकगीत यांचा अतुट संबंध आहे. आपल्या येथे आदर्श मानल्या जाणाऱ्या धर्माचा उगम शोधायचा झाल्यास आपल्याला लोकगीतांचाच आधार घ्यावा लागतो. फार पुर्वीपासून स्त्री जीवनातील धार्मिक भावचित्रे लोकगीतातून अभिव्यक्त होतांना दिसतात. यामध्ये प्रामुख्याने राम-सीता, श्रीकृष्ण, द्रौपदी, श्रीयाळ, चांगुणा, हरीश्चंद्र तारामती यासारख्या अनेक पौराणिक स्त्री-पुरुषांचे संदर्भ देता येतील. देवत्व प्राप्त झालेल्या पौराणिक स्त्री-पुरुषांविषयी लोकगीतातून अत्यंत भाविक वृत्तीने व्यक्त झालेला दिसतो. लोकगीतांच्या निर्मितीमध्ये धर्माचाही महत्वपूर्ण असा वाटा आहे. लोकगीतातून धार्मिकतेचे विविध पैलू आविष्कृत होतांना आपल्याला पहायला मिळतात. उदा. धर्म विधी प्रसंगी म्हटले जाणारे गीत असे आहे -

"नवखंड पृथ्वी अंबे तुझं गं राज्य
दैत्य वधारीला, आबाद केलं गं राज्य
अंबे तुझ्या गं नावानं घट मांडियेला
नव दिवसांचे नव गं उपवास मला
येईन दर्शनाला तुझ्या गं घटाला
हिरवा चुडा गं हाताला
येईन तुझी वटी भरायला।।"

पारंपारिक लोकजीवनामध्ये विविध देवदेवतांना सण-उत्सव विधी यांना फार महत्त्व आहे. याचे प्रतिबिंब आजही आपल्याला अनेक लोकगीतामधून पहायला मिळते. धार्मिक लोकगीतांविषयी डॉ. शरद व्यवहारे म्हणतात "स्त्री गीतात ही अभिव्यक्ती अधिक उत्कट बनलेली आह.

अशा प्रकारच्या विविध लोकगीतामधून धार्मिकतेविषयी अनेक दाखले आपल्याला पहायला मिळतात .लोकगीतांचा वाङ्मयीन दृष्टीने विचार केला असता वाङ्मयातील सर्व गुणविशेष लोकगीतातून अभिव्यक्त होतातत्याचप्रमाणे मानवी मनातील विविध . भावाविष्कार लोकगीतातून प्रकट होतात.

**संदर्भ**


1. डॉव्यवहारे शरद ., लोकसाहित्य उद्गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९७९.
2. डॉशिंदे विश्वनाथ ., लोकसाहित्य मिमांसा (२भाग ) प्रथम आवृत्ती २००६, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे.
3. डॉकालभूत पुरुषोत्तम., लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती १० जानेवारी २००७
4. डॉव्यवहारे विद्या ., लोकसाहित्य लोकसंस्कृती, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ औदुंबर अपार्टमेंटस, नवा विष्णु चौक पुणे.
5. डॉमांडे प्रभाकर लोकसाहित्याचे स्वरूप ., सविता प्रकाशन औरंगाबाद.
6. डॉढेरे राची ., लोकसंस्कृतीचे उपवासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# समाज बदलासाठी साहित्य - एक उत्प्रेरक

**श्री.भिमराव कुंडलिक जमधाडे**
संशोधक विद्यार्थी, मराठी संशोधन केंद्र. आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा ता.आष्टी जि.बीड414202.
**Email:**jamdhade.bk@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15574794**

## प्रस्तावना

साहित्य हा समाजाचा आरसा आहे आणि समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे .मानवाच्या भावना, विचार, स्वप्ने आणि वास्तव यांचे प्रतिबिंब साहित्यातून उमटते .साहित्य केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून, ते समाजाला नवीन दिशा देणारे, विचारांना चेतना देणारे आणि कृतीसाठी प्रेरणा देणारे उत्प्रेरक आहे .इतिहास साक्षी आहे की, साहित्याने अनेकदा क्रांतीला जन्म दिला, अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आणि सामाजिक सुधारणांना गती दिली .मग ते संत साहित्य असो, क्रांतिकारी कविता असोत किंवा आधुनिक कादंबऱ्या, प्रत्येक स्वरूपाने समाजात बदल घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे . साहित्य हे समाजाच्या प्रगतीचे सूचक आहे आणि त्याचबरोबर प्रगतीचा मार्गदर्शकही आहे .ते समाजातील चुकीच्या प्रथा, अंधश्रद्धा आणि शोषणाला उघड करते आणि लोकांना त्याविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते.साहित्य कसे समाजाला प्रभावित करते, त्याची ऐतिहासिक उदाहरणे काय आहेत, आधुनिक काळात त्याची बदलती भूमिका काय आहे आणि त्याच्या सामर्थ्यासह मर्यादा काय आहेत, याचा विचार करू .साहित्याच्या या सामाजिक प्रभावाचा आढावा घेताना आपण त्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणार आहोत.

## साहित्याचे स्वरूप आणि समाजावरील प्रभाव

साहित्य हा समाजाचा आत्मा आहे .ते समाजातील सत्य, विसंगती आणि शोषण उघड करते .कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मकथन किंवा लेख यांद्वारे लेखक आपले विचार व्यक्त करतात आणि समाजाला नवीन दृष्टिकोन देतात .साहित्याचा प्रभाव हा भावनिक आणि बौद्धिक दोन्ही पातळीवर असतो .जेव्हा एखादी कविता मनाला भिडते किंवा कथा अंतर्मनाला स्पर्श करते, तेव्हा ती व्यक्तीला विचार करण्यास भाग पाडते आणि कृतीसाठी उद्युक्त करते .उदाहरणार्थ, महात्मा जोतिबा फुले यांच्या" गुलामगिरी "या पुस्तकाने भारतीय समाजातील जातिव्यवस्थेवर प्रहार करत शोषितांना जागृत केले .त्याचप्रमाणे, प्रेमचंद यांच्या" गोदान " कादंबरीने ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे आणि शोषणाचे चित्रण करून समाजाला अंतर्मुख केले. साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते व्यक्तीच्या मनात बदल घडवते आणि हा बदल पुढे समाजात परिवर्तन आणतो . साहित्य समाजाला प्रश्न विचारायला शिकवते" - आपण जे पाहतो ते योग्य आहे का? आपण ज्या व्यवस्थेत राहतो ती बदलण्याची गरज आहे का?" हे प्रश्नच माणसाला जागृत करतात आणि समाज सुधारणेची प्रक्रिया सुरू होते . साहित्य हे केवळ शब्दांचा खेळ नसून, ते एक शस्त्र आहे जे अन्यायाविरुद्ध लढते आणि नव्या विचारांचे बीज पेरते . साहित्याच्या या प्रभावामुळे समाजात नव्या चळवळी जन्माला येतात .उदाहरणार्थ, मराठी साहित्यातील संत ज्ञानेश्वर यांच्या" ज्ञानेश्वरी"ने सामान्य माणसाला अध्यात्माची दारे खुली केली आणि धार्मिक एकाधिकारशाहीला आव्हान दिले .त्याचप्रमाणे, कुसुमाग्रज यांच्या" विशाखा "काव्यसंग्रहाने स्वातंत्र्याच्या भावनेला चेतना दिली .साहित्य हे समाजाच्या बदलाचे पहिले पाऊल आहे, कारण ते विचारांना जन्म देते आणि विचारच माणसाला कृतीकडे घेऊन जातात.

## ऐतिहासिक उदाहरणे

साहित्याने समाज बदल घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे अनेक ऐतिहासिक दाखले आहेत . भारतात मध्ययुगात संत साहित्याने सामाजिक समतेचा संदेश दिला .संत कबीर यांच्या दोह्यांनी जात-पात आणि धार्मिक ढोंगावर प्रहार केला, तर संत तुकाराम यांच्या

अभंगांनी भक्तीच्या माध्यमातून सामान्य माणसाला आत्मसन्मान शिकवला .या साहित्याने भक्ती चळवळीला चालना दिली आणि समाजातील अंधश्रद्धा आणि असमानतेला आव्हान दिले .संत नामदेव आणि एकनाथ यांनीही आपल्या लेखनातून सामाजिक सुधारणांचा पाया रचला.

**फुले, शाहू, आंबेडकर यांच्या चळवळी आणि साहित्याचा प्रभाव**

भारतातील उपेक्षित आणि वंचित समाजाच्या उत्थानात साहित्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे, आणि याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळी .या तिन्ही समाजसुधारकांनी साहित्याला आपल्या चळवळीचे प्रभावी माध्यम बनवले आणि त्याद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवले. महात्मा जोतिबा फुले यांनी आपल्या" गुलामगिरी " )१८७३ (या पुस्तकातून भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या क्रूर वास्तवावर प्रकाश टाकला .त्यांनी ब्राह्मणवाद आणि त्याच्या अन्यायी परंपरांवर कठोर टीका केली आणि शूद्र व अतिशूद्र समाजाला आपल्या हक्कांची जाणीव करून दिली .फुले यांनी लिहिले, "जातिव्यवस्था ही समाजाला पोखरणारी कीड आहे," आणि या साहित्याद्वारे त्यांनी शोषित समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला .त्यांच्या" सार्वजनिक सत्यधर्म "या पुस्तकानेही सामाजिक समतेचा संदेश दिला .फुले यांनी साहित्याबरोबरच" सत्यशोधक समाज "स्थापन केला, ज्याने शिक्षण आणि समता यांचा पुरस्कार केला .त्यांच्या या साहित्यामुळे बहुजन समाजात आत्मसन्मान जागृत झाला आणि शिक्षणाचा प्रसार झाला .विशेषतः स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे साहित्याच्या प्रेरणेतूनच उद्भवले होते .त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही कविता आणि लेखनातून स्त्रियांच्या मुक्तीचा संदेश दिला" .काव्यफुले "या काव्यसंग्रहातून त्यांनी शिक्षणाचे आणि समतेचे महत्त्व अधोरेखित केले .फुले यांच्या साहित्याने उपेक्षित समाजाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा दिली आणि सामाजिक सुधारणांचा पाया रचला .

राजर्षी शाहू महाराज यांनीही साहित्याला आपल्या समाज सुधारणेच्या कार्यात महत्त्वाचे स्थान दिले . कोल्हापूर संस्थानाचे अधिपती असूनही त्यांनी वंचित समाजाच्या उत्थानासाठी आपले जीवन समर्पित केले .शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार आणि जातिव्यवस्थेविरुद्ध लढा यासाठी साहित्याचा वापर केला .त्यांनी" मराठा " आणि" हंटर "या नियतकालिकांना प्रोत्साहन दिले, ज्यामध्ये समाज सुधारणांवर लेख प्रसिद्ध होत .त्यांनी आपल्या भाषणांतून आणि लेखनातून" जात नाही, गुण पाहिजे "हा संदेश दिला .शाहू महाराजांनी बहुजन समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला, आणि या निर्णयाला साहित्यातून जनमताचा पाठिंबा मिळवला .त्यांनी फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला पाठिंबा दिला आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समतेचा विचार पुढे नेला .त्यांच्या प्रयत्नांमुळे मराठा आणि इतर मागासवर्गीय समाजात शिक्षणाचा प्रसार झाला आणि सामाजिक जागृती वाढली .शाहू महाराजांचे साहित्य आणि त्यांच्या प्रेरणेने लिहिले गेलेले लेख यांनी वंचित समाजाला आत्मविश्वास दिला आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवला.

डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी साहित्याला आपल्या चळवळीचे सर्वात प्रभावी शस्त्र बनवले .त्यांचे "Annihilation of Caste" (१९३६ (हे पुस्तक भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे ठरले .या पुस्तकात त्यांनी तर्कशुद्ध आणि निर्भीडपणे जातिव्यवस्थेची चिकित्सा केली आणि ती नष्ट करण्याची गरज अधोरेखित केली .त्यांनी लिहिले, "जातिव्यवस्था ही मानवतेच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा आहे ". त्यांच्या" Who Were the Shudras?" आणि" The Buddha and His Dhamma" या पुस्तकांनीही उपेक्षित समाजाला इतिहासाची आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली .आंबेडकरांनी" मूकनायक", "जनता " आणि" प्रबुद्ध भारत "ही वृत्तपत्रे सुरू केली, ज्यामुळे दलित समाजाच्या व्यथा आणि हक्कांचा आवाज जनतेपर्यंत पोहोचला .त्यांच्या लेखनाने दलित समाजात शिक्षणाची आणि स्वाभिमानाची ज्योत पेटवली .१९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला, आणि या परिवर्तनातही त्यांच्या साहित्याचा मोठा वाटा होता .आंबेडकरांच्या साहित्याने दलित आणि वंचित समाजाला केवळ जागृतच केले नाही, तर त्यांना कायदेशीर हक्क आणि संविधानाद्वारे सन्मान मिळवून दिला .त्यांच्या या कार्यामुळे उपेक्षित समाजात शिक्षण, समता आणि स्वातंत्र्याची भावना रुजली आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडला.

फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या साहित्याचा प्रभाव हा केवळ लेखनापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांनी या साहित्याद्वारे चळवळी उभ्या केल्या .फुले यांच्या

सत्यशोधक समाजाने, शाहू महाराजांच्या शिक्षण सुधारणांनी आणि आंबेडकरांच्या संवैधानिक लढ्याने उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणले .या तिन्ही समाजसुधारकांनी साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जागृती निर्माण केली, आणि त्यामुळे वंचित समाजात आत्मविश्वास, शिक्षण आणि समानतेची भावना निर्माण झाली .त्यांच्या साहित्याने जातीभेद, अंधश्रद्धा आणि शोषणाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवले.

आधुनिक काळातही साहित्याने क्रांती घडवली . राजा राममोहन रॉय यांनी आपल्या लेखनातून सती प्रथेच्या क्रूरतेवर प्रकाश टाकला आणि ती बंद करण्यासाठी जनमत तयार केले .त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि १८२९ मध्ये सती प्रथा बंद झाली .स्वातंत्र्य संग्रामातही साहित्याने मोलाची भूमिका बजावली .बंकिमचंद्र चटर्जी यांच्या" आनंदमठ "मधील" वंदे मातरम् "या गीताने भारतीयांना स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले, तर सुभद्रा कुमारी चौहान यांच्या" झाँसी की रानी "कवितेने स्त्रियांनाही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले . मराठीत लोकमान्य टिळक यांच्या" केसरी "मधील लेखांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती केली. जागतिक स्तरावरही साहित्याने समाज बदल घडवले .थॉमस पेन यांच्या "Common Sense" या पुस्तकाने १७७६ मध्ये अमेरिकन क्रांतीला चालना दिली .या पुस्तकाने सामान्य लोकांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठण्याचे धैर्य दिले . त्याचप्रमाणे, हॅरिएट बीचर स्टोव्ह यांच्या" Uncle Tom's Cabin" या कादंबरीने अमेरिकेत गुलामगिरीच्या क्रूरतेवर प्रकाश टाकला आणि ती बंद करण्याच्या चळवळीला गती दिली .रशियन साहित्यातही लियो टॉल्स्टॉय आणि मॅक्सिम गोर्की यांच्या लेखनाने साम्यवादी विचारांना चालना दिली .या उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, साहित्याने केवळ समाजाला जागृतच केले नाही, तर ठोस बदलही घडवले.

**साहित्याचे माध्यम आणि आधुनिक काळ**

आधुनिक काळात साहित्याचे स्वरूप आणि माध्यम बदलले आहे .छापील पुस्तकांपासून ते डिजिटल मंचापर्यंत साहित्याचा प्रवास झाला आहे .सोशल मीडिया, ब्लॉग, ई-पुस्तके आणि ऑनलाइन लेख यांमुळे साहित्य आता अधिक व्यापक आणि तात्काळ लोकांपर्यंत पोहोचते . अनेक कविता, कथा आणि लेखांनी महिलांच्या व्यथांना वाचा फोडली आणि लैंगिक शोषणाविरुद्ध जागतिक जागृती निर्माण केली .भारतातही" दलित लाइव्हज मॅटर " चळवळीत कविता आणि लेखांनी दलितांच्या संघर्षाला नवीन मंच दिला. आधुनिक साहित्याचा एक फायदा म्हणजे त्याची गती आणि व्याप्ती .एखादा लेख किंवा कविता क्षणार्धात लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते .तथापि, यात काही आव्हानेदेखील आहेत .डिजिटल युगात माहितीचा अतिरेक झाला आहे, ज्यामुळे खरे साहित्य आणि उथळ मजकूर यात फरक करणे कठीण झाले आहे . शिवाय, साहित्याचा व्यावसायिकरणाचा धोका वाढला आहे, ज्यामुळे त्याचा मूळ उद्देश हरवण्याची भीती आहे . तरीही, साहित्याची समाज बदलातील भूमिका कमी झालेली नाही .उलट, नव्या तंत्रज्ञानामुळे त्याला नवे परिमाण मिळाले आहे .उदाहरणार्थ, पर्यावरण संरक्षणासाठी लिहिल्या जाणाऱ्या कविता आणि कथा आता तरुणांना हवामान बदलाविरुद्ध कृती करण्यास प्रेरित करत आहेत .मराठीतही सविता दामले यांसारख्या लेखिकांनी डिजिटल मंचावरून सामाजिक प्रश्नांवर लेखन सुरू केले आहे.

साहित्य हे समाज बदलाचे प्रभावी उत्प्रेरक आहे, पण त्याला काही मर्यादाही आहेत .सर्वच साहित्य समाजावर परिणाम करू शकत नाही .त्याला योग्य वेळ, संदर्भ आणि प्रेक्षकांची गरज असते .उदाहरणार्थ, जर एखादे साहित्य फक्त मनोरंजनापुरते असेल किंवा समाजाच्या वास्तवापासून अलिप्त असेल, तर त्याचा प्रभाव कमी होतो .दुसरीकडे, जर साहित्य अति आक्रमक असेल, तर ते प्रेक्षकांपासून दूर जाऊ शकते .साहित्याचा प्रभाव हा त्याच्या सौंदर्य आणि सत्याच्या संतुलनावर अवलंबून असतो. साहित्याचे सामर्थ्य हे त्याच्या भावनिक आणि बौद्धिक आवाहनात आहे .जेव्हा साहित्य माणसाच्या हृदयाला आणि मेंदूला एकाच वेळी स्पर्श करते, तेव्हा ते बदल घडवते .परंतु, साहित्य एकट्याने क्रांती घडवू शकत नाही; त्याला सामाजिक चळवळी, नेतृत्व आणि लोकांचा सहभाग यांची जोड हवी .उदाहरणार्थ, महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला साहित्याने प्रेरणा दिली, पण त्याला गांधींचे नेतृत्व आणि लोकांचा सहभाग यामुळे यश मिळाले .साहित्य हे बदलाची सुरुवात करते, पण त्याचा परिणाम समाजाच्या तयारीवर अवलंबून असतो .तरीही, साहित्याचे महत्त्व कमी होत नाही, कारण ते जागृती निर्माण करते आणि समाजाला नव्या दिशेने घेऊन जाते . साहित्य हे समाज बदलाचे एक शक्तिशाली उत्प्रेरक आहे .

ते समाजाला जागृत करते, अन्यायाला आव्हान देते आणि नव्या विचारांचा पाया रचते .इतिहासातून ते आजपर्यंत साहित्याने आपली ही भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे .आधुनिक काळात त्याचे स्वरूप बदलले असले, तरी त्याचे मूळ उद्दिष्ट - समाजाला प्रेरणा देणे - कायम आहे . भविष्यातही साहित्य नव्या माध्यमांतून समाज परिवर्तनाचे कार्य करत राहील .साहित्य हे केवळ शब्दांचे संग्रहण नसून, ते एक चैतन्य आहे, जे समाजाला नव्या युगाकडे घेऊन जाते .साहित्याच्या या सामर्थ्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडतात आणि मानवतेची प्रगती होते .म्हणूनच साहित्याला समाजाचा आत्मा आणि परिवर्तनाचा मापदंड म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ**


1. पीमहात्मा फुले आणि " .(१९९१) पाटील .जी . .लोकवाङ्मय गृह :मुंबई."सत्यशोधक चळवळ
2. नरेंद्र जाधव, :राजर्षी शाहू महाराज" .(२००३) . ."समाज सुधारणांचा मेरुदंड
3. जयसिंगराव पवार शाहू महाराजांचे " .(१९९८) ."सामाजिक कार्य
4. यशवंत कदमआंबेडकरांचे साहित्य .डॉ" .(२०१०) आणि समाज परिवर्तन ."
5. नाकुलकर्णी .ग ., मराठी साहित्याचा " .(१९९०) ."सामाजिक प्रभाव
6. सुधा देसाई साहित्य आणि समाज " .(२००५) ."परिवर्तन

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# साहित्य और मानव जीवन का उत्थान

**प्रा डॉ काझी तनवीर बेगम हाफिजोद्दिन**
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा.ता.आष्टी.जि.बीड.
DOI-**10.5281/zenodo.15574807**

साहित्य मानव जीवन का एक अहम हिस्सा है। यह न केवल मनुष्य की भावनाओं विचारों और संस्कृतियों को व्यक्त करता है बल्कि समाज में सकारात्मक बदलाव लाने में भी महत्वपूर्ण भूमिका निभाता है। साहित्य के माध्यम से व्यक्ति अपनी सोच और संवेदनाओं को शब्दों में व्यक्त करता है जिससे समाज की चेतना जागृत होती है। साहित्य का उत्थान मानव जीवन के उत्थान से जुड़ा हुआ है क्योंकि यह जीवन के विविध पहलुओं पर प्रकाश डालता है जैसे कि प्रेम संघर्ष नैतिकता और सामाजिक कुरीतियाँ।

साहित्य का मतलब है किसी भाषा में लिखे गए या बोले गए कलात्मक लेखन. साहित्य में कवितागद्य उपन्यास लघु कथा आत्मकथा निबंध यादें वगैरह शामिल होते हैं. साहित्य को कलात्मक अभिव्यक्ति और रूप का प्रयोग करते हुए लिखा जाता है. साहित्य को गुणवान या महत्वपूर्ण माना जाता है.

साहित्य की परिभाषा:- साहित्य लिखित कार्यों का एक समूह है. साहित्य किसी भाषा के वाचिक और लिखित (शास्त्रसमूह) को कहते हैं. साहित्य कलात्मक शब्द के रूप में लिखित कार्यों को संदर्भित करता है. साहित्य अपने व्यापक अर्थ में कोई भी लिखित कार्य है. साहित्य वह लेखन है जिसमें साहित्यिक योग्यता होती है.

साहित्य की श्रेणियां: काव्य साहित्य गद्य साहित्य चंपा साहित्य.

**साहित्य की उत्पत्ति:-**

दुनिया में सबसे पुराना वाचिक साहित्य संस्कृत भाषा में मिलता है. साहित्य की उत्पत्ति और भी पहले हुई थी और कुछ पहले लिखित कार्य पहले से मौजूद मौखिक परंपरा पर आधारित हो सकते हैं.

**साहित्य का प्रभाव:-**

१. **सामाजिक जागरूकता**:- साहित्य समाज में व्याप्त कुरीतियों भेदभाव और अन्याय को उजागर करता है। इसके माध्यम से लोग समाज में हो रहे गलत कार्यों के प्रति जागरूक होते हैं और बदलाव की ओर प्रेरित होते हैं।

२. **मानवाधिकार और समानता**:- साहित्य ने हमेशा मानवाधिकार समानता और स्वतंत्रता के मुद्दों को उठाया है। अनेक साहित्यकारों ने अपने लेखों के माध्यम से समानता और न्याय के लिए संघर्ष किया है जिससे समाज में सुधार आया है।

३. **संस्कारों का निर्माण**:- साहित्य व्यक्ति की मानसिकता और संस्कारों को आकार देता है। अच्छे साहित्य का पढ़ना व्यक्ति के चरित्र और सोच को प्रगति की दिशा में ले जाता है।

४. **मानवीय संवेदनाओं की अभिव्यक्ति**:- साहित्य मनुष्य की भीतरी भावनाओं जैसे दर्द प्रेम संघर्ष और शांति को व्यक्त करता है। यह उन भावनाओं को साझा करता है जो मानवता के लिए सार्वभौमिक हैं और जीवन के मूल्य को समझाने में मदद करता है।

साहित्य मानव जीवन के उत्थान में एक आवश्यक साधन है। यह न केवल व्यक्तिगत विकास को बढ़ावा देता है बल्कि समाज में सामूहिक चेतना और सुधार की दिशा में भी कार्य करता है। साहित्य के माध्यम से हम अपने अनुभवों विचारों और संवेदनाओं को एक दूसरे के साथ साझा करते हैं जिससे हम एक बेहतर समाज की ओर अग्रसर होते हैं।

५. **साहित्य मानव जीवन का दर्पण**:- साहित्य जीवन के विभिन्न पहलुओं को दर्शाने और समझने का एक माध्यम है जो हमें अपनी भावनाओं अनुभवों और समाज के बारे में सोचने के लिए प्रेरित करता है.

६. **साहित्य ज्ञान और समझ का स्रोत**:- साहित्य हमें नई संस्कृतियों विचारों और दृष्टिकोणों से परिचित कराता है जिससे हमारी समझ और ज्ञान में वृद्धि होती है.

७. **साहित्य सामाजिक सुधार का माध्यम**:- साहित्य समाज में व्याप्त बुराइयों अन्याय और असमानता को उजागर करने और सुधार के लिए आवाज उठाने में मदद करता है.

८. **साहित्य मानवीय मूल्यों का संवर्धन**:- साहित्य हमें नैतिकता सामाजिक जिम्मेदारी और मानवीय संवेदनशीलता जैसे मूल्यों का महत्व सिखाता है

९. **साहित्य रचनात्मकता का पोषण**:- साहित्य हमारे रचनात्मक और कल्पनाशील विचारों को प्रोत्साहित करता है जिससे कला विज्ञान और संस्कृति का विकास होता है

१०. **साहित्य इतिहास का अध्ययन**:- साहित्य किसी भी समाज या काल के बारे में जानने और समझने का सबसे अच्छा स्रोत है, जिससे हम अपनी संस्कृति, परंपरा और इतिहास को जान सकते हैं।

११. **जीवन में साहित्य का महत्व है** :-

१.साहित्य का जीवन में बहुत महत्व है. यह हमें जीवन के कई पहलुओं को समझने में मदद करता है.

२.साहित्य के ज़रिए हम अपनी भाषा और समाज को समझते हैं. यह हमें मनोरंजन के लिए भी प्रेरित करता है.

३.साहित्य से ही हमारी बौद्धिक और आध्यात्मिक विकास होता है

४.साहित्य से हमें जीवन के विभिन्न पहलुओं को समझने और अनुभव करने की क्षमता मिलती है.

५.साहित्य से हमें नए विचारों और दृष्टिकोणों की ओर मोड़ने में मदद मिलती है

६.साहित्य से हमारी भाषा और समाज को समझने में मदद मिलती है

७.साहित्य से हम मनोरंजन के लिए प्रेरित होते हैं

८.साहित्य से हमारी सांस्कृतिक विरासत को संरक्षित रखने में मदद मिलती है

९.साहित्य से हमें पहचान कल्पना और सहानुभूति की अवधारणाएँ विकसित होती हैं साहित्य से हम अपने जीवन, खुद को और अपने आस-पास की दुनिया को बेहतर ढंग से समझने में मदद मिलती है

१०. साहित्य से हमारी संवेदनशीलता का गुण विकसित होता है

११.साहित्य से हम प्रकृति के प्रति और हर जीव के प्रति लगाव विकसित करते हैं

**साहित्य:** -(अर्थ परिभाषाएँ स्वरुप एवं भेद)

**साहित्य शब्द की व्युत्पति**

इंदू सिंह -'सहितस्य भाव साहित्य अथार्त 'सहित का भाव साहित्य है।

सहित- स + हित = अर्थात जिसमे सभी के हित का भाव हो वह साहित्य है।

सहित- शब्द और अर्थ का स्वभाव संयोजन है।

**साहित्य की परिभाषाएँ:-**

१.**विश्वनाथ क्र शब्दों में**- वाक्यं रसात्मक काव्य रसात्मक वाक्य काव्य है)

२.**आचार्य भामह के शब्दों में**- शब्दार्थौ सहितौ काव्यम् गद्दं पद्दं च तद्धिधा (शब्द और अर्थ सहित साहित्य काव्य है, जो गद्द एवं पद्दु के भेद से दो प्रकार का होता है।)

३.**आचार्य जगन्नाथ के शब्दों में**- रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्। (रमणीय अर्थ का प्रतिपादन करने वाला शब्द काव्य है।)

४.**महावीर प्रसाद के शब्दों में**- ज्ञान राशि के संचित कोश का नाम साहित्य है।

५.**महावीर प्रसाद के शब्दों में**- अंतः कारण की वृतियों का चित्र काव्य है।

६.**डॉ नगेन्द्र के शब्दों में**- साहित्य आत्माभिव्यक्त जीवन की अभिव्यक्ति है।

७.**प्रेमचंद के शब्दो में**- "साहित्य जीवन की आलोचना है।

८.**प्रेमचंद के शब्दो में**- साहित्य उसी रचना को कहेंगे जिसमे कोई सच्चाई प्रकट की गई हो, जिसमे दिल और दिमाग पर असर डालने का गुण हो

९.**बालकृष्ण भट्ट के शब्दों में**- साहित्य जन समूह के हृदय का विकास है।

१०.**श्यामसुन्दरदास के शब्दों में**- साहित्य वह है जिसमे जो कुछ लिख गया है। वह कला के उद्देश्यों की पूर्ति करता है।

११.**प्रेमचंद के शब्दो में**- हमारी कसौटी पर वही साहित्य खड़ा उतरेगा जिसमे उच्च चिंतन हो स्वाधीनता का भाव हो सौंदर्य का सार हो।

१२.**अज्ञेय के शब्दों में**- कविता सबसे पहले और अंत में शब्द है।

१३.**कॉलरिज के शब्दों में**- सुंदर शब्दों का सुंदर पद क्रम काव्य है।

१४.**हडसन के शब्दों में**- भाव और कल्पना के माध्यम से जीवन की व्याख्या काव्य है।

**साहित्य के तत्व:-**

साहित्य के निम्न चार तत्व हैं- भाव तत्व बुद्धि तत्व कल्पना तत्व शैली तत्व

१. **भाव तत्व**- भावतत्व काव्य का सबसे महत्वपूर्ण तत्व है। इसे भारतीय आचार्यों ने साहित्य की आत्मा माना है। भाव तत्व के अभाव में साहित्य निष्प्राण व निर्जीव हो जाता है। सांसारिक बंधनों से मुक्त होकर जब साहित्यकार उद्दात भावभूमि पर पहुँचकर कुछ सीखता है तभी वह रचना सत् साहित्य की महिमा से विभूषित होती है।

२. **बुद्धि तत्व**- इसे विचार तत्व भी कहा जाता है। बुद्धि तत्व, भाव एवं कल्पना तत्वों में समन्वय करता है। यह तत्व साहित्य को विश्वसनीय बनाता है।

विलियम्स ने बुद्धि तत्व के बारे में लिखा है- बुद्धि या विचार तत्व काव्य को ग्राह्य बनाता है।

३. **कल्पना तत्व**- कॉलरिज के शब्दों में- "कल्पना काव्य की सृजन शक्ति है काव्य में आनंद का समावेश भाव व कल्पना तत्वों से ही होता है।

**कॉलरिज के शब्दों में-** कल्पना के माध्यम से हम अतीत एवं भविष्य की वस्तुवों का साक्षात्कार कर सकते है।

४. **शैली तत्व** काव्य के प्रथम तीन तत्व भाव पक्ष से संबंधित है तथा शैली तत्व का संबंध कला पक्ष से है।

टी. एस. इलियट के शब्दों में- कथन का विशिष्ट तरीका शैली है तथा शैली ही काव्य है।

**साहित्य का स्वरुप-**

साहित्य को मुख्यत तीन भागों में बाँटा गया है- १. पद्य २. गद्य ३. चंपू

१. **पद्य-** पद्य के दो भाग हैं

(क) प्रबंध काव्य

(ख) मुक्तक काव्य (चालीसा शतक सतसई हजारा पच्चीसी दशक बावनी पच्चीसी आदि)

प्रबंधकाव्य के तीन भेद हैं (क) महाकाव्य (ख) एकांतककाव्य (ग) खंडकाव्य

२. **गद्य-** (गद्य विचार प्रधान रचना है।)

गद्य के दो प्रकार है- (क) दृश्य (ख) श्रव्य

दृश्य- नाटक एकांकी रूपक भाण डिम वीथी उप-रूपक प्रहसन समवकार सट्टक ईहामृग

श्रव्य- निबंध, कहानी उपन्यास रेखाचित्र संस्मरण फीचर यात्रावृत्त जीवनी आत्मकथा साक्षात्कार डायरी आदि।

३. चंपू- गद्द-पद्द मिश्रित रचना चंपू काव्य है।

**पद्य की परिभाषा-**

नलिन विलोचन शर्मा के शब्दों में भाव व लय प्रधान रचना पद्द है।

पाणिनि के शब्दों में- छंद युक्त रचना पद्द है।

पद्द के मुख्यतया दो भेद है- (क) प्रबंधकाव्य (ख) मुक्तक काव्य

प्रबंधकाव्य की परिभाषा- वह काव्य रचना जिसमें पद एक दूसरे से पूर्वापर संबंध रखते हो एक को हटा देने पर दूसरा पद अधूरा प्रतीत हो उसे प्रबंध काव्य कहते है।

**प्रबंधकाव्य-**

**परिभाषा-** वह रचना जिसके पद परस्पर एक दूसरे से जुड़े हो तथा एक दूसरे पर निर्भर हो उसे प्रबंध काव्य कहते है।

जैसे- महाभारत रामायण प्रियप्रवास प्रबंध काव्य है।

प्रबंधकाव्य के तीन भेद है- (क) महाकाव्य (ख) खण्ड काव्य (ग) एकांतिक काव्य

**महाकाव्य -**

महाकव्य का अर्थ- महान् काव्य / विशाल काव्य

परिभाषा- महाकाव्य के लिए अंग्रेजी में (एपिक) शब्द का प्रयोग किया जाता है। महा काव्य भारतीय साहित्य की सर्वश्रेष्ठ प्राचीन एवं लोकप्रिय विधा है। "वह काव्य जिसमे महान् चरित्र, महान उद्देश्य और गरिमामय उद्दात शैली होती है उसे महाकाव्य कहते है।"

**महाकाव्य-** रामचरितमानस पद्मावत कामायनी साकेत आदि।

**महाकाव्य के लक्षण**: - १.महाकाव्य सर्गबद्ध होना चाहिए।

२.महाकाव्य में कम से कम आठ सर्ग होना चाहिए। सर्गों का नामकरण कथा के आधार पर होना चाहिए और प्रत्येक सर्ग के अंत में आगामी कथा की सूचना होनी चाहिए।

३.महाकाव्य का नायक देवता या उच्च कुल में उत्पन्न धीरोदात्त गुणों से संपन्न होना चाहिए।

४.महाकाव्य का कथानक ऐतिहासिक पौराणिक या लोक प्रसिद्ध होना चाहिए।

५.महाकाव्य का प्रधान रस श्रृंगार वीर शांत होना चाहिए तथा उसमे सभी रसों का चित्रण भी होना चाहिए।

६.महाकाव्य का उद्देश्य धर्म अर्थ काम तथा मोक्ष की सिद्धि होना चाहिए।

७.महाकाव्य का आरम्भ मंगलाचरण अथवा आशीर्वचनों से होना चाहिए।

८.महाकाव्य में दुष्टों की निंदा तथा सज्जनों की प्रशंसा होनी चाहिए।

९.महाकाव्य का नामकरण नामक, नायिका या वृत के आधार पर होना चाहिए

१०.महाकाव्य में वर्णन विविधता होनी चाहिए।

११.महाकाव्य में सभी ऋतुओं का चित्रण होना चाहिए।

१२.महाकाव्य की भाषा पात्रानुकूल होना चाहिए।

१३.महाकाव्य में तत्कालीन संस्कृति की भी झलक होनी चाहिए।

१४.महाकाव्य में जीवन से संबंधित संपूर्ण पक्षों का चित्रण होना चाहिए।

१५.महाकाव्य सुखांत, और उदात्त भाव होना चाहिए ।

**महाकाव्य के तत्व:-**

**कथानक** ऐतिहासिक पौराणिक लोकप्रसिद्ध मुख्य कथा के साथ गौण कथाएँ हो कथानक सर्गों में विभक्त हो।

चरित्र चित्रण- महाकाव्य का नायक देवता या क्षत्रिय हो, चरित्र धीरोदात गुणों से समन्वित हो।

युग चित्रण महाकाव्य में चित्रित घटनाओं पर युग का प्रभाव हो तत्कालीन संस्कृति की झलक हो।

रस-भाव श्रृंगार वीर शांत रस की प्रधानता तथा सभी रसों का चित्रण उदात भाव हो।

छंद योजना- प्रत्येक सर्ग में एक छंद हो में सर्ग के अंत छंद परिवर्तन हो।

भाषा-शैली- भाषा शैली उन्नत और गरिमामय उदात हो।
उद्देश्य- धर्म अर्थ काम मोक्ष की सिद्धि या महान उद्देश्य हो

**खण्डकाव्य:-**

खण्डकाव्य का अर्थ- खण्डकाव्य प्रबंध काव्य का लघु रूप है इसमें जीवन की किसी एक घटना अंग या पक्ष का चित्रण रहता है।

खण्डकाव्य- पंचवटी जयद्रथ बध सुदामा चरित तुलसीदास आदि।

**खण्डकाव्य के लक्षण:-**

१.खण्डकाव्य प्रबंध काव्य का लघु रूप है।

इसमें जीवन के किसी एक पक्ष का चित्रण सीमित रूप में होता है। कथानक संक्षिप्त होता है।

२.खण्डकाव्य अपने आप में संपूर्ण होता है। प्रासंगिक कथाओं का प्रायः अभाव होता है। सर्ग विभाजन अनिवार्य नहीं है। उद्देश्य महाकाव्य के सामान धर्म अर्थ काम मोक्ष की सिद्धि होता है। इसमें एक ही रस की प्रधानता होती है। मंगलाचरण या आशीर्वचन आवश्यक नहीं है।

**खण्डकाव्य के तत्व:**

कथावस्तु- (ऐतिहासिक, पौराणिक या काल्पनिक)

संक्षिप्त जीवन के किसी एक पक्ष या घटना का चित्रण, प्रासंगिक कथाओं का अभाव, सर्ग विभाजन जरुरी नहीं है।

चरित्र चित्रण- चरित्र के एक अंश की ही झलक हो पात्रों की संख्या कम होना चाहिए।

संवाद- संवाद संक्षिप्त सरल रोचक और कथानक को गति देने वाला हो।

देशकाल/ वतावरण- देशकाल वातावरण का चित्रण पात्रों के माध्यम से व्यक्त हो।

रस- जीवन के किसी एक ही घटना या प्रसंग से संबंधित होने के कारण खण्डकाव्य में में एक ही रस का पूर्ण परिपाक होता होता है।

भाव-शैली- गरिमामय एवं उदात्त प्रसंगानुकूल हो

उद्देश्य- धर्म अर्थ काम मोक्ष की सिद्ध आदर्श की स्थापना हो।

**मुक्तक / अनिबद्ध काव्य)**

मुक्तक काव्य का अर्थ वह काव्य रचना जिसके पदों में पूर्वापर संबंध नहीं हो प्रत्येक पद में एक स्वतंत्र भाव हो उसे मुक्तक काव्य कहते है। जैसे- बिहारी सतसई यमक सतसई रहीम सतसई मीरा के पद रसखान के पद कबीर की साखियाँ सूरदास के पद परमानंद दास के पद वीर सतसई आदि।

**मुक्तक काव्य की परिभाषाएँ:-**

रामचंद्र शुक्ल के शब्दों में- मुक्तक में प्रबंध के सामान रस की धारा नहीं रहती है जिसमें में कथा प्रसंग की परिस्थिति में अपने को भुला हुआ पाठक मग्न हो जाता है और हृदय में एक स्थायी प्रभाव को ग्रहण करता है। इसमें तो रस के छींटे पड़ता हैं जिनमें हृदय कलिका थोड़ी देर के लिए खिल उठती है। यदि प्रबंध एक विस्तृत वनस्थली है तो मुक्तक चुना हुआ गुलदस्ता है।

गोविंद त्रिगुणायत के शब्दों में- मेरी समझ में मुक्तक उस रचना को कहते है जिसमे प्रबंधत्व का अभाव होते हुए भी कवि अपनी कल्पना की समाहार शक्ति के सहारे किसी एक रमणीय दृश्य परिस्थिति घटना या किसी वस्तु का ऐसा चित्रात्मक एवं भावपूर्ण वर्णन प्रस्तुत करता है जिससे पाठकों को प्रबंध जैसा आनंद आने लगता है।

**मुक्तक के भेद-**

मुक्तक के निम्नलिखित भेद हैं-

मुक्तक, संदानिक विशेषक कुलक संघात गीतिकाव्य ग़ज़ल कोश संहिता।

मुक्तक- प्रसंग वश किसी एक रस से युक्त पद जो अपने आप में पूर्ण हो उसे मुक्तक कहते है। जैसे- घनानंद के पद मीरा के पद आदि।

1. कोश- विभिन्न कवियो कवियों द्वारा रचित मुक्तक पदों का संग्रह कोश कहलाता है।
2. संदानिक- दो मुक्तक पद जो परस्पर संबंध रखते हो उसे संदानिक कहते है।
3. विशेषक- तीन मुक्तक पद जो परस्पर संबंध रखते हो उसे विशेषक कहते है।
4. संहिता- ऐसे मुक्तक जिनमे अनेक वृतान्त हो उसे संहिता कहते है।
5. संघात- किसी एक प्रशंग पर रचित एक ही कवि के मुक्तक संघात कहते है।
6. कुलक- चार मुक्तक पद जो परस्पर संबंध रखते ही उसे कुलक कहते है।

**ग़ज़ल-** प्रेमी प्रेमिका की भावपूर्ण बातचीत ग़ज़ल कहलाता है।

**गीतिकाव्य-** गीतिकाव्य भाव प्रधान गेय रचना है।

**गीतिकाव्य-** गीतिकाव्य को अंग्रेजी में लिरिक कहते हैं। गीतिकाव्य का मूल आधार भाव है। यह भाव किसी प्रेरणा के कारण गीत के रूप में फूट पड़ता है। गीतिकाव्य की रचना उसी समय होती है जब भाव घनीभूत होकर आवेश के साथ काव्योचित भाषा में अभिव्यक्त करते है।

गीतिकाव्य कवि के हृदय का स्पंदन है, इसमें कवि प्रेम विरह, वेदना हर्ष-विषाद का वर्णन करता है इसमें कवि

अपनी सुख-दुःख की तीव्रता अनुभूति को संगीत प्रधान कोमल कांत पदावली अभिव्यक्त करता है।

**गीतिकाव्य की परिभाषाएँ:-**

महादेवी वर्मा के शब्दों में- सुख दुःख की भावावेशमयी अवस्था विशेष को गिने-चुने शब्दों में स्वर साधना के उपयुक्त चित्रण कर देना ही गीतिकाव्य है।

डॉ गंपतिचंद्र गुप्त के शब्दों में- गीतिकाव्य एक ऐसी लघु आकर एवं मुक्तक शैली में रचित रचना है जिसमे कवि निजी अनुभूतियों या किसी एक भावदशा का प्रकाशन संगीत या लयपूर्ण कोमल पदावली में करता है।

**गीतिकाव्य की विशेषताएँ:-**

१.व्यक्तिगत अनुभूति की प्रमुखता या प्रधानता होती है।
२.गीतिकाव्य का संबंध बुद्धि से न होकर हृदय से होता है।
३.गीतिकाव्य भावावेश की प्रबलता रहती है।
४.गीतिकाव्य में गेयता और संगीतात्मकता होती है।
५.गीतिकाव्य की भाषा सरल कोमल और मधुर होती है।
६.गीतिकाव्य में संक्षिप्तता का गुण होता है।

**गीतिकाव्य के तत्व:-** इसके निम्नलिखित तत्व होते है- वैयक्तिकता तीव्र भावावेश, संगीतात्मकता, संक्षिप्तता कोमलकांत पदावली।

**ग़ज़ल:-**

ग़ज़ल का अर्थ- ग़ज़ल अरबी भाषा का शब्द है जिसका अर्थ है। प्रेमीका से वार्तालाप यह एक ऐसा काव्य रूप है जिसका मुख्य विषय प्रेम या इश्क होता है। यह भारतीय साहित्य की अत्यंत लोकप्रिय विधा है।

**परिभाषाएँ:**- नालंदा शब्द सागर के अनुसार- ग़ज़ल का अर्थ है, फ़ारसी और उर्दू में श्रृंगार रस की कविता।

हिन्दी-उर्दू शब्द कोश के अनुसार- प्रेमिका से वार्तालाप उर्दू फ़ारसी कविता का एक विशेष प्रकार जिसमे पाँच से ग्यारह तक शेर होते हैं ग़ज़ल है।

ग़ज़ल के अंग- शेर मिसरा काफिया रदीफ़ मतला मक्ता

शेर- शेर शब्द का अर्थ है बाल या केश यह अरबी भाषा का शब्द है नारी के सौंदर्य को बढ़ाने में केशों की भूमिका सर्वाधिक होती है उसी तरह ग़ज़ल के सौंदर्य को निखारने में शेर की भूमिका होती है। ग़ज़ल का प्रत्येक शेर स्वतंत्र भावों की अभिव्यक्ति करता है।

**उदाहरण-** कोई मुश्किल नहीं हिंदु या मुसलमाँ होना हाँ बड़ी बात है इस दौड़ में इंसां होना।

मिसरा- शेर की हर पंक्ति को मिसरा कहते है। प्रत्येक शेर में दो पंक्तियाँ होती हैं। शेर के पहले मिसरे को मिसर-ए-ऊला तथा दूसरे मिसरे को मिसर-ए-सानी कहते हैं।

**उदाहरण-** अनुभव के पाठशाला ने सिखया है बहुत (मिसर-ए-ऊला)

जो सिखाया है वो मेरे काम आया है बहुत (मिसर-ए-सानी)

काफिया- काफिया का अर्थ होता है बार-बार। काफिये का प्रयोग तुक मिलाने की दृष्टि से किया जाता है। इसे उपांत्य-यमक भी कहा जाता है।

**उदाहरण-** दो रोटी के अलावा, चार (काफिया) की बातें नहीं करते (मिसर-ए-ऊला)

करोड़ो लोग कोठी कार (काफिया) की बातें बही करते (मिसर-ए-सानी)

रदीफ़- रदीफ़ का अर्थ है पीछे-पीछे चलने वाला। ऐसा शब्द समूह जो काफिये के बाद में दोहराया जाता है उसे रदीफ़ या अंत्य-यमक कहते है।

उदाहरण- दो रोटी के अलावा चार की बातें नहीं करते।
करोड़ों लोग कोठी कार की बातें नहीं करते।।

**मतला-** ग़ज़ल के पहले शेर को मतला कहा जाता है। इसका अर्थ है भावोदय का स्थान। मक्ता- ग़ज़ल का अंतिम शेर मक्ता कहलाता है। इसे तखल्लूस भी कहते हैं।

**समय समाज और साहित्य**

समय ना ठहरा है कभी बदली कभी न चाल। जिसके जैसे कर्म हैं उसका वैसा हाल।।

समय लेटिन भाषा का शब्द है। समयका निर्माण सृष्टि के निर्माण के साथ हुआ होगा। समय पिछले युगों में था इस युग में है और आनेवाले युग में भी रहेगा।

**काव्य के लक्षण :-**

काव्य - कवि के द्वारा जो कार्य संपन्न हो उसे काव्य कहते हैं।

लक्षण- किसी वस्तु अथवा विषय के 'असाधारण अथार्त विशेष धर्म के विषय में कथन करना उसका लक्षण कहलाता है।

काव्य शब्द की व्युत्पत्ति - काव्य शब्द कवि में य प्रत्यय के योग से बना हैं

भारतीय काव्यशास्त्र  प्रमुख संप्रदाय और सिद्धांत : 'रस संप्रदाय

काव्यशास्त्र काव्य और साहित्य का दर्शन तथा विज्ञान है। भारतीय काव्यशास्त्र के अंतर्गत काव्य या साहित्य को उसके विभिन्न अवयवों की व्याख्या विभन्न संप्रदायों और उनके संस्थापक आचार्यो द्वारा की गई है। भारतीय काव्यशास्त्र का आधार संस्कृत भाषा है। संस्कृत काव्यशास्त्र का आरंभ भरतमुनि के नाट्यशास्त्र से माना जाता है।

**भारतीय समाज के नवनिर्माण में साहित्य की भूमिका -**

किसी का सत्य था
मैंने संदर्भ में जोड़ दिया।
कोई मधुकोष काट लाया था
मैंने निचोड़ लिया।

यो मैं कवि हूँ आधुनिक हूँ नया हूँ
काव्य-तत्त्व की खोज में कहाँ नहीं गया हूँ"

उपर्युक्त पंक्तियाँ सच्चिदानंद हीरानंद वात्स्यायन अज्ञेय की नया कवि आत्म-स्वीकार से उद्धृत हैं। अज्ञेय ने रचना सृजन के दौरान की मनोस्थिति को बहुत ही सुंदर तरीके से अभिव्यक्त किया है। साहित्य का आविर्भाव भी इसी समाज से होता है जिसे रचनाकार अपने भावों के साथ मिलाकर उसे एक आकार देता है। यही रचना समाज के नवनिर्माण में पथप्रदर्शक की भूमिका निभाने लगती है। अज्ञेय मानते हैं कि साहित्यकार होने के नाते अपने समाज के साथ उनका एक विशेष प्रकार का संबंध है- समाज से उनका आशय चाहे हिंदी भाषी समाज रहा हो जो कि उनका पहला पाठक होगा, चाहे भारतीय समाज जिसके काफी समय से संचित अनुभव को वे वाणी दे रहे होंगे चाहे मानव समाज हो जो कि शब्द मात्र में अभिव्यक्त होने वाले मूल्यों की अंतिम कसौटी ही नहीं बल्कि उनका स्रोत भी है ।

हम पाते हैं कि साहित्य वह सशक्त माध्यम है जो समाज को व्यापक रूप से प्रभावित करता है। यह समाज में प्रबोधन की प्रक्रिया का सूत्रपात करता है। लोगों को प्रेरित करने का कार्य करता है और जहाँ एक ओर यह सत्य के सुखद परिणामों को रेखांकित करता है वहीं असत्य का दुखद अंत कर सीख व शिक्षा प्रदान करता है। अच्छा साहित्य व्यक्ति और उसके चरित्र निर्माण में भी सहायक होता है। यही कारण है कि समाज के नवनिर्माण में साहित्य की केंद्रीय भूमिका होती है। इससे समाज को दिशा-बोध होता है और साथ ही उसका नवनिर्माण भी होता है। साहित्य समाज को संस्कारित करने के साथ-साथ जीवन मूल्यों की भी शिक्षा देता है एवं कालखंड की विसंगतियों विद्रूपताओं एवं विरोधाभासों को रेखांकित कर समाज को संदेश प्रेषित करता है, जिससे समाज में सुधार आता है और सामाजिक विकास को गति मिलती है।

**साहित्य में मूलत:** तीन विशेषताएँ होती हैं जो इसके महत्त्व को रेखांकित करती हैं उदाहरणस्वरूप साहित्य अतीत से प्रेरणा लेता है वर्तमान को चित्रित करने का कार्य करता है और भविष्य का मार्गदर्शन करता है। साहित्य को समाज का दर्पण भी माना जाता है। हालाँकि जहाँ दर्पण मानवीय बाह्य विकृतियों और विशेषताओं का दर्शन कराता है वहीं साहित्य मानव की आंतरिक विकृतियों और खूबियों को चिह्नित करता है। सबसे महत्त्वपूर्ण बात यह है कि साहित्यकार समाज में व्याप्त विकृतियों के निवारण हेतु अपेक्षित परिवर्तनों को भी साहित्य में स्थान देता है। साहित्यकार से जिन वृहत्तर अथवा गंभीर उत्तरदायित्वों की अपेक्षा रहती है उनका संबंध केवल व्यवस्था के स्थायित्व और व्यवस्था परिवर्तन के नियोजन से ही नहीं है बल्कि उन आधारभूत मूल्यों से है जिनसे इनका निर्णय होता है कि वे वांछित दिशाएँ कौन-सी है और जहाँ इच्छित परिणामों और हितों की टकराहट दिखाई पड़ती है वहाँ पर मूल्यों का पदानुक्रम कैसे निर्धारित होता है

समाज के नवनिर्माण में साहित्य की भूमिका के परीक्षण से पूर्व यह जानना आवश्यक है कि साहित्य का स्वरूप क्या है और उसके समाज दर्शन का लक्ष्य क्या है? "हितेन सह इति सष्टिमूह तस्याभाव: साहित्यम्"। यह वाक्य संस्कृत का एक प्रसिद्ध सूत्र-वाक्य है जिसका अर्थ होता है साहित्य का मूल तत्त्व सबका हितसाधन है। मानव अपने मन में उठने वाले भावों को जब लेखनीबद्ध कर भाषा के माध्यम से प्रकट करने लगता है तो वह रचनात्मकता ज्ञानवर्धक अभिव्यक्ति के रूप में साहित्य कहलाता है। साहित्य का समाजदर्शन शूल-कंटों जैसी परंपराओं और व्यवस्था के शोषण रूप का समर्थन करने वाले धार्मिक नैतिक मूल्यों के बहिष्कार से भरा पड़ा है। जीवन और साहित्य की प्रेरणाएँ समान होती हैं। समाज और साहित्य में अन्योन्याश्रित संबंध होता है। साहित्य की पारदर्शिता समाज के नवनिर्माण में सहायक होती है जो खामियों को उजागर करने के साथ उनका समाधान भी प्रस्तुत करती है। समाज के यथार्थवादी चित्रण, समाज सुधार का चित्रण और समाज के प्रसंगों की जीवंत अभिव्यक्ति द्वारा साहित्य समाज के नवनिर्माण का कार्य करता है।

साहित्य समाज की उन्नति और विकास की आधारशिला रखता है। इस संदर्भ में अमीर खुसरो से लेकर तुलसी कबीर जायसी रहीम प्रेमचंद भारतेन्दु निराला नागार्जुन तक की श्रृंखला के रचनाकारों ने समाज के नवनिर्माण में अभूतपूर्व योगदान दिया है। व्यक्तिगत हानि उठाकर भी उन्होंने शासकीय मान्यताओं के खिलाफ जाकर समाज के निर्माण हेतु कदम उठाए। कभी-कभी लेखक समाज के शोषित वर्ग के इतना करीब होता है कि उसके कष्टों को वह स्वयं भी अनुभव करने लगता है। तुलसी कबीर रैदास आदि ने अपने व्यक्तिगत अनुभवों का समाजीकरण किया था जिसने आगे चलकर अविकसित वर्ग के प्रतिनिधि के रूप में समाज में स्थान पाया। मुंशी प्रेमचंद के एक कथन को यहाँ उद्धृत करना उचित होगा जो दलित है पीड़ित है, संत्रस्त है उसकी साहित्य के माध्यम से हिमायत करना साहित्यकार का नैतिक दायित्व है।

प्रेमचंद का किसान-मज़दूर चित्रण उस पीड़ा व संवेदना का प्रतिनिधित्व करता है जिनसे होकर आज भी अविकसित एवं शोषित वर्ग गुज़र रहा है। साहित्य में समाज की विविधता जीवन-दृष्टि और लोककलाओं का संरक्षण होता है। साहित्य समाज को स्वस्थ कलात्मक

ज्ञानवर्धक मनोरंजन प्रदान करता है जिससे सामाजिक संस्कारों का परिष्कार होता है। रचनाएँ समाज की धार्मिक भावना भक्ति समाजसेवा के माध्यम से मूल्यों के संदर्भ में मनुष्य हित की सर्वोच्चता का अनुसंधान करती हैं। यही दृष्टिकोण साहित्य को मनुष्य जीवन के लिये उपयोगी सिद्ध करते हैं।

साहित्य की सार्थकता इसी में है कि वह कितनी सूक्ष्मता और मानवीय संवेदना के साथ सामाजिक अवयवों को उद्घाटित करता है। साहित्य संस्कृति का संरक्षक और भविष्य का पथ-प्रदर्शक है। संस्कृति द्वारा संकलित होकर ही साहित्य 'लोकमंगल' की भावना से समन्वित होता है। सुमित्रानंदन पंत की पंक्तियाँ इस संदर्भ में कहती है कि-

वही प्रज्ञा का सत्य स्वरूप
हृदय में प्रणय अपार
लोचनों में लावण्य अनूप
लोक सेवा में शिव अविकार"।

उन्नीसवीं एवं बीसवीं शताब्दी को भारतीय साहित्य के सांस्कृतिक एवं समाज निर्माण की शताब्दी कहा जा सकता है। इस शताब्दी ने स्वतंत्रता के साथ-साथ समाज सुधार को भी संघर्ष का विषय बनाया। इस काल के साहित्य ने समाज जागरण के लिये कभी अपनी पुरातन संस्कृति को निष्ठा के साथ स्मरण किया है तो कभी तात्कालिक स्थितियों पर गहराई के साथ चिंता भी अभिव्यक्त की। आठवें दशक के बाद से आज तक के काल का साहित्य जिसे वर्तमान साहित्य कहना अधिक उचित होगा फिर से अपनी सांस्कृतिक जड़ों से जुड़कर समाज निर्माण की भूमिका को वरीयता के साथ पूरा करने में जुटा है। वर्तमान साहित्य मानव को श्रेष्ठ बनाने का संकल्प लेकर चला है। व्यापक मानवीय एवं राष्ट्रीय हित इसमें निहित हैं। हाल के दिनों में संचार साधनों के प्रसार और सोशल मीडिया के माध्यम से साहित्यिक अभिवृत्तियाँ समाज के नवनिर्माण में अपना योगदान अधिक सशक्तता से दे रही हैं। हालाँकि बाजारवादी प्रवृत्तियों के कारण साहित्यिक मूल्यों में गिरावट आई है परंतु अभी भी स्थिति नियंत्रण में है।

आज आवश्यकता है कि सभी वर्ग यह समझें कि साहित्य समाज के मूल्यों का निर्धारक है और उसके मूल तत्त्वों को संरक्षित करना जरूरी है क्योंकि साहित्य जीवन के सत्य को प्रकट करने वाले विचारों और भावों की सुंदर अभिव्यक्ति है।

साहित्य मानव जीवन का एक अनिवार्य हिस्सा है जो समाज और व्यक्ति दोनों के उत्थान में महत्वपूर्ण भूमिका निभाता है विचारों और भावनाओं को व्यक्त करने और साझा करने के लिए एक शक्तिशाली माध्यम है

साहित्य मानव जीवन का दर्पण:- साहित्य जीवन के विभिन्न पहलुओं को दर्शाने और समझने का एक माध्यम है जो हमें अपनी भावनाओं अनुभवों और समाज के बारे में सोचने के लिए प्रेरित करता है

साहित्य ज्ञान और समझ का स्रोत:- साहित्य हमें नई संस्कृतियों विचारों और दृष्टिकोणों से परिचित कराता है जिससे हमारी समझ और ज्ञान में वृद्धि होती है

साहित्य, सामाजिक सुधार का माध्यम:- साहित्य समाज में व्याप्त बुराइयों अन्याय और असमानता को उजागर करने और सुधार के लिए आवाज उठाने में मदद करता है

साहित्य मानवीय मूल्यों का संवर्धन:- साहित्य हमें नैतिकता सामाजिक जिम्मेदारी और मानवीय संवेदनशीलता जैसे मूल्यों का महत्व सिखाता है

साहित्य रचनात्मकता का पोषण:- साहित्य हमारे रचनात्मक और कल्पनाशील विचारों को प्रोत्साहित करता है, जिससे कला विज्ञान और संस्कृति का विकास होता है

साहित्य इतिहास का अध्ययन:- साहित्य किसी भी समाज या काल के बारे में जानने और समझने का सबसे अच्छा स्रोत है जिससे हम अपनी संस्कृति परंपरा और इतिहास को जान सकते हैं

**भारतीय साहित्य का धार्मिक योगदान**

१. **धार्मिक साहित्य का प्रसार** : वेद उपनिषद रामायण महाभारत गीता और पुराण जैसे धार्मिक ग्रंथ भारतीय साहित्य में व्याप्त हैं। इन ग्रंथों में धार्मिक मूल्यों, नैतिकता और मानवीय मूल्यों का उल्लेख है।

२. **धार्मिक विचारों का प्रदर्शन** : हिंदू धर्म बौद्ध धर्म जैन धर्म सिख धर्म और इस्लाम सब भारतीय साहित्य में चित्रित हैं। यहाँ भक्ति साहित्य धार्मिक कहानियां और उपन्यास शामिल हैं जो धार्मिक मूल्यों को चित्रित करते हैं।

३. **धर्मयुद्ध का चित्रण** : भारतीय साहित्य धार्मिक संघर्षों को व्यापक रूप से चित्रित करता है। यहाँ कविताएं कहानियाँ और उपन्यास शामिल हैं जो धार्मिक चर्चाओं को चित्रित करता है।

४. **धर्म का प्रसार** : भारतीय साहित्य में धार्मिक विचारधारा व्याप्त है। लेखक मोक्ष कर्म धर्म और ध्यान के महत्वपूर्ण सिद्धांतों पर चर्चा करते हैं और धार्मिक जीवन के कई पहलुओं पर प्रकाश डालते हैं।

५. **सामाजिक सेवा का प्रोत्साहन** : धार्मिक साहित्य ने सामाजिक सेवा के महत्व को प्रोत्साहित किया है और लोगों को अपने धर्म के माध्यम से सत्य शान्ति आनंद तथा सेवा करने के प्रेरित किया है। यह छात्रों को उत्कृष्टता, निस्वार्थ सेवा और धर्मनिष्ठा के महत्व को समझने में मदद करता है।

**भारतीय साहित्य में ग्रामीण क्षेत्रों का चित्रण**

१. **घरेलू जीवन का चित्रण**: भारतीय साहित्य में गाँव की जीवनशैली का व्यापक चित्रण किया गया है। गाँव के जीवन विशेषताओं और अनुभवों को चित्रित करने वाले उपन्यास कहानियाँ और कविताएं है।

२. **ग्रामीण क्षेत्रों की समस्याओं का वर्णन**: भारतीय साहित्य ने बेरोजगारी, गरीबी भूमि अधिकार और जल संकट जैसे ग्रामीण मुद्दों को चित्रित किया है। लेखकों ने सामाजिक सुधारों की जरूरत को भी उजागर किया है।

३. **गाँवी संस्कृति और मान्यताओं का समर्थन** : भारतीय साहित्य ने गाँवी मान्यताओं संस्कृतियों और परंपराओं का समर्थन किया है। लेखकों ने गाँव की अदभुद सांस्कृतिक धरोहर की महत्वपूर्णता को दिखाया है।

४. **ग्रामीण जीवन के महत्वपूर्ण गुण**: भारतीय साहित्य में किसान और ग्रामीण महिलाओं जैसे महत्वपूर्ण व्यक्तित्वों का वर्णन हुआ है। लेखकों ने गाँव की प्राकृतिक सौंदर्य और गांव की परंपरा रूढ़िया भेदभाव आदि कई महत्वपूर्ण पहलुओं को प्रस्तुत किया है।

५. **ग्रामीण लड़ाई का चित्रण:** भारतीय साहित्य ने ग्रामीण समुदायों के संघर्षों संघर्षों और सामाजिक बदलावों को भी दिखाया है। जैसे - गोदान (प्रेमचंद)

**निष्कर्ष**: साहित्य मानव जीवन के उत्थान में एक आवश्यक साधन है। यह न केवल व्यक्तिगत विकास को बढ़ावा देता है बल्कि समाज में सामूहिक चेतना और सुधार की दिशा में भी कार्य करता है। साहित्य के माध्यम से हम अपने अनुभवों विचारों और संवेदनाओं को एक दूसरे के साथ साझा करते हैं जिससे हम एक बेहतर समाज की ओर अग्रसर होते हैं।

**संदर्भ-**

१.हिन्दी साहित्य के सन्दर्भ में पुरुष विमर्श : एक विवेचन
२.हिंदी व्याकरण उपसर्ग और प्रत्यय भाग-१
३.हिंदी व्याकरण उपसर्ग और प्रत्यय भाग-२
४.हिंदी व्याकरण उपसर्ग और प्रत्यय भाग-३
५.हिन्दी का भाषिक स्वरुप: हिन्दी का स्वनिम व्यवस्था खंड्य और खंड्येतर विराम चिह्न
६.सूरदास भ्रमरगीतसार (सं रामचंद शुक्ल - इकाई ५) पद संख्या २१- ७१ तक
७.हिंदी गद्य के उद्भव और विकास
८.अज्ञेय असाध्य वीणा (कविता)
९.मैथिलीशरण गुप्त साकेत नवम सर्ग (महाकाव्य-इकाई-५ )
१०.जयशंकर प्रसाद कृत चन्द्रगुप्त नाटक)
११.धर्मवीर भारती कृत अँधा युग (नाटक)
१२.कबीरदास सं० हजारीप्रसाद द्विवेदी पद सं १६०-२०९) इकाई-५
१३.शंकरशेष कृत नाटक एक और द्रोणाचार्य
१४.हिंदी की ऐतिहासिक पृष्ठभूमि: प्राचीन भारतीय आर्य भाषाएँ
१५.रामवृक्ष बेनीपुरी : माटी की मूरतें (रेखाचित्र)

**प्रा डॉ काझी तनवीर बेगम हाफिजोद्दिन**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# 'राघववेळ –' भुक आणि गरीबी याचे वास्तवदर्शन.

डॉ.प्रा.संदीप भुजंग शेकडे
आनंदराव धोंडे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कडा ,संशोधन केंद्र ता.आष्टी जि.बीड
DOI-10.5281/zenodo.15574860

नामदेव कांबळे यांची `राघववेळ` ही 1994 साली प्रकाशित झालेला दलित कादंबरी होय. या कादंबरीतून ग्रामीण भागातील वास्तव्यास असणाऱ्या दलित समाजातील मातंग कुटुंबाच्या व्यथा चित्रीत केल्या आहेत. `राघववेळ` ही कादंबरी ग्रामीण भागात हातावर पोट भरणाऱ्या माणसांची व्यथा आहे. त्यांच्याकडे शेती नाही की, पिढाजात चालत आलेला कोणताच उद्योग धंदा नाही. दोन वेळच्या जेवणासाठी करावे लागणारे काबाड कष्ट जीवघेणे आहेत.अठराविश्वे दारिद्र्यात वाट्याला आलेला दिवस मोठ्या हिमतीने, संयमाने काढावा लागतो. त्यातच त्यांचा दलित समाजात जन्म झाला आल्यामुळे सोसाव्या लागणारे द:ख, वेदना अंतर्मनाला होरपळून टाकणाऱ्या आहे. असे दलित समाजाला नाकारलेले जिणे राघववेळ कादंबरीतील रघुनाथ, वालंबी आणि त्यांचा एकूण मातंग समाज जावन जगत असतो. पोटाची आग विझवण्यासाठी करावी लागणारी ओढतान जीवघेणी असते. या कादंबरीतील वालंबीला ऐन तारुण्यात वैधव्य येते. अकाली वैधव्यमुळे कुटुंबाच्या पालन-पोषणाचा भारच तिच्या खांद्यावर येऊन पडतो. वालंबीही या संकटाला मोठ्या जिद्दीने सामोरे जाऊन आपल्या संसाराचा गाडा ओढते. कौसा, रघुनाथ, सिताराम ही तिची आपत्ये आहेत. या तिन्ही आपत्ये कडे पाहून वालंबी पती मेल्याचे दु:ख बाजूला सारते.ही कादंबरी जिवन जगण्यासाठी धडपडणाऱ्या व गावगाड्याशी प्रामाणिकपणे वागणाऱ्या मातंग कुटुंबाची जीवंत कथा होय.

गरिबीतही न डगमगता मोठ्या हिंमतीने वालंबी आपल्या संसाराचा गाडा ओढत असते. गरिबीविषयी तिची कुठलीच तक्रार करताना दिसत नाही; पण पर्याप्त परिस्थितीमध्ये नियोजनबद्ध जीवन जगण्याची तिच्या जवळ असलेली कला ही वाखानण्याजोगी आहे. आठराविश्वे दारिद्र्य पाचवीला पुजलेले. वालंबी च्या गरिबीचे चित्रण करणारा पुढील प्रसंग आवाक करणारा आहे, – ''यातलं पीठ व ऽऽऽ` ,`रघुला इचार त्यातलं पीठ काय झालं ते` तिने प्रश्नार्थक दृष्टीने रघूकडे पाहिल. तसा तो अपराधीपणे म्हणाला, `माये लय भूक लागली व्हती. रोज रोज भाजीची भाकर खाऊन कटाळा आल्यानं खाल्ली आम्ही त्याची भाकर करून` त्याच्या उत्तरान वालंबीला भडभडून आले. तिला वाटू लागले `काय करतीन लेकरं तरी?` तोंड मोडून नसन का आलं त्याह्यचं?''[1] यापेक्षा अजून वाईट परिस्थिती ती काय असू शकेल .अशा गरिबीने पिचलेल्या वालंबीच्या दु:खाची प्रखरता लेखक या प्रसंगातून करून देयला विसरत नाही. माणसाला अस्वस्थ करून टाकणारी पोटाची भूक आणि वाट्याला आलेले अठराविश्वदारिद्र्य कसे भयावह रूप धारण करते याचे वास्तवदर्शन `राघववेळ` कादंबरीतून सहजपणाने घडते. दारिद्र्यात जीवन जगताना सोसावे लागणारे गरिबीचे चटके वाचकांचे मन हेलावणारे आहेत.

एकटी वालंबी कणखरपणाने संसाराचा गाडा हाकलते. पाखरू वहारणी हे दोन्ही दांपत्य तिचे दीर व जाऊ आहेत. त्यांच्या आधारानेच ती आपल्या फाटलेल्या संसाराला ठिगळ देत आकार देताना दिसते. तिचा मुलगा रघुनाथ हा शाळेत हुशार असतो. त्यामुळे त्याने खूप शिक्षण घ्यावे व मोठे व्हावे ही दलित स्त्रीच्या अंतर मनातील इच्छा या कादंबरीमधून वालंबीच्या रुपाने प्रकटताना दिसते. आयुष्यभर दुसऱ्याच्या शेतात व घरादारात उदर निर्वाहासाठी केलेली कामे आपल्या मुलांच्याही वाट्यालायेऊ नयेत, म्हणून ती मुलांना शिक्षण देण्याच्या बाबतीत सजग असते. या कादंबरीविषयी प्रा. डॉ. तानाजी पाटील आपल्या 'मराठी कांदबरी समीक्षा' या ग्रंथात म्हणतात – ''राघववेळमध्ये कांबळे जीवनविषयक आशावादी दृष्टिकोन मांडतात. स्वातंत्र्यानंतर तळागाळातील माणसाला स्वत्वाचे भान आले आहे. सगळा समाज स्वत:च्या जीवनविषयक जाणिवांबद्दल हळूहळू जागृत होत आहे. शिक्षणाने संस्कारीत बनण्याची संधी

मिळाल्यान विविध क्षेत्रांत नोकरीची संधी मिळत आहे. नव्याने जीवन घडविण्याचे क्षितिज त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात आले आहे. ही एक सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रियाच कांबळे मांडतात.''[2] आधुनिक काळात शिक्षणविषयक आस्था सामान्य माणसांच्या कुटुंबात कशी रुजू पाहते आहे, याचे वास्तवदर्शी चित्रण आपणास या कादंबरीतून घडते. वालंबीच्या अंतर्मनातील घोळवत असलेले विचार रघूच्याही मनात बीज धरतात. त्यामुळे रघू शिक्षणाने संस्कारित होऊन जातीय व्यवस्थेच्या बेडया नेस्तनाबूत करण्यासाठी धडपडतो. लहानवयातच त्याला मानापमानाची प्रखर जाणीव होते. गावातील सार्वजनिक ठिकाणी मांगवाड्यातील मुलांचा जेवणासाठी त्यांचा केलेला अपमान अवमान तो विसरू शकत नाही. त्यामुळे गावातील पंगतीला जेवणासाठी तो जाताना दिसत नाही. त्याच्या ठिकाणी असलेली ही स्वाभिमानाची जाणीव आहे , जी लेखकाने ठळकपणे रेखाटली आहे. समाजातील सर्वच निच रुढींना तडा देण्यासाठीच तो उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करतो. ही आगळी वेगळी प्रेरणा रघूच्या माध्यमात नामदेव कांबळे यांनी निर्माण केलेली दिसून येते.

ग्रामीण भागात दलितांना आजही अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागतात. स्वातंत्र्यानंतर कालावधीत त्याचे स्वरूप काही प्रमाणात लवचिक झालेले जानवते. ग्रामीण समाजामध्ये दलित स्त्रीकडे ही आजही उपभोगची वस्तू म्हणून पाहण्याचा वाईट दृष्टिकोन वाढीस लागलेला जानवतो. याच वाईट दृष्टिकोनाची शिकार वालंबीची मुलगी कौसी बनते. माहेरी धनगराच्या प्रकाशने कचकचून दाबलेली कौसीची छाती आणि सासरी असताना सासूंच्या छुप्या पाठिंब्याने भुजंग देशमुखाच्या रूपाने घडवून आनलेला बलात्कार ही आजच्या दलितांना सहन कराव्या लागणाऱ्या आत्याचाराची वास्तव उदाहरणे आहेत. दलितत्वाचे व गरिबी वास्तव चटके सहन करताना दलित स्त्री मात्तबर लोकांच्या भोग वासनेच्या शिकार होतात याचे वास्तव चित्र `राघववेळ` या कादंबरीतून अधोरेखित केली आहे. आपते चारित्र्य जपण्यासाठी धडपणाऱ्या वालंबीलासुद्धा अशा वाईट पायवाटेवरून जाण्याची वेळ येते. अठराविश्वदारिद्र्य पाचवीला पुजलेले असल्यामुळे तिला पुन्हा-पुन्हा अशा वासनांध प्रवृत्तीच्या तालेवार लोकाच्या दारात परत जाण्याची वेळ येते; पण येथेही ती स्वत:ला सावरताना दिसते. ''मुलाच्या शिक्षणातील मॅट्रिकच्या परीक्षेसाठी लागणारे 45 रुपये तिच्याकडे नाहीत. हे पैसे तालेवार लोकांना मागायला गेले तर त्या पैशाच्या बदल्यात ते तिच्याकडे शरीरसुखाची मागणी करतील, याचीही तिला कल्पना खात्री आहे. एवढेच नाही तर गावातील चक्कीवाला पाटील तसे तिला स्पष्टपणे म्हणतो; परंतु ती त्याला दाद देत नाही.''[3] हे ग्राम जावनातील स्त्रीच्या वाट्याला आलेल्या दु:खाचे सावट सगळीकडेच कमी अधिक प्रमाणात पहायला मिळते.

जीवनामध्ये वेगवेगळया वळणांवर अनेक संकटांचा सामोरे जाताना वालंबीला सहन करावे लागणारे दु:खाचे चटके व्यथित करून टाकणारे आहे. ती थकते ,तिचे मन रक्ताळते; पण पुन्हा नव्या वाटेवरून मार्गक्रमण करण्यासाठी तेवढ्याच उत्साहाने ती धावताना अढळते. सुख-दु:खाच्या अथवा वाईट घटना घडल्या की तिला आपल्या नवऱ्याची कळणूची आठवण येत राहते. त्यावेळेला ती आपल्या अंतर्मनातील आवाजाने पतीशी संवाद साधते.तीच्या पतीच्या आठवणीचे वर्णना याविषयी डॉ. नागनाथ कोतापल्ले 'मराठी कांदबरी अस्वाद यात्रा' या ग्रंथात लिहितात,- ''विशेषत: महत्त्वाच्या प्रसंगी तिला नवऱ्याची आठवण येते, तिचे डोळे झरू लागतात. त्यामुळे तिला धूसर धूसर दिसायला लागते आणि तिला तिचा नवरा कळणू दिसायला लागतो. त्याच्याशी ती बोलायला लागते. तिचे बोलणे मोठे हृद्य असते. तिच्या वृत्ती - प्रवृत्ती प्रकट करणारे तर असतेच असते, पण तिच्या अंत:करणाची त्या क्षणीची भावावस्था प्रकट करणारेही असते. तिचे असे कळणूशी संभाषण या कादंबरीत अनेकवेळा होते. त्या ठिकाणी ही कादंबरी अधिक ह्युदयस्पर्शी होते[4]''. वालंबीच्या मनात सुरू असलेल्या भावांदोलनाचे वास्तविक चित्रण या कादंबरीतून चित्रीत होते. वालंबीचे स्त्रीमन नवऱ्याशी बोलतानां मुलांच्या काळाजीतही व्यस्त होताना दिसते तेव्हा तिच्यातील निश्चयाची कल्पना आपणास लक्षात येते.

या कादंबरीमध्ये ग्रामीण परिसरात राहणाऱ्या दलित समाज जीवनाचे चित्रण तर येतेच; पण दलितांच्या रूढी, परंपरा आणि रीती-भातीचेही चित्रण येते. त्याचबरोबर अशिक्षित व अज्ञानी असलेल्या मातंग समाजाची देव - देवतांवर कशी अंधश्रद्धा आहे यावरही प्रकाश पडतो. देवतेच्या श्रद्धेतून मातंगांनी कापलेला रेडा आणि

त्यामुळे त्यांना सहन करावी लागणरी कोर्ट कचेरीची डोकेदुखी याचे वर्णन कादंबरीत पाहावयास मिळते. तर दुसरीकडे या समाज व्यवस्थेला शह देण्यासाठी रात्र–दिंवस मेहनत करून अभ्यास करणारा अल्पवयीन रघुनाथ या कादंबरील मुख्य नायक ठरू पाहतो. शाळेमध्ये रघुनाथ हुशार आतो. हुशार असणारा रघुनाथ हा कष्टाळू, करारी स्वभवाचा व स्वाभिमानी वृतीचा आहे. ब्राह्मण शिक्षकांनी निर्माण केलेली जातीय भावना त्याला अस्वस्थ करून वेगळा विचार करायला भाग पाडते. अशा विविध मार्गानी ही कादंबरी विकसित होताना दिसून येते. मातंगांच्या घरात असलेली निरक्षरता व अंधश्रद्धा या वृत्ती या कादंबरीतून नामदेव कांबळेनी सकारात्मक दृष्टिने चित्रित केली आहे. कोर्टाच्या केसची अखेरची तारीख असल्याने अस्वस्थ झालेली पायरु व त्याचे सहकारी त्यांच्याकडे असलेल्या अडाणीपनाची साक्ष देत राहतात. याउलट प्रथम श्रेणीने दाहवी उत्तीर्ण झालेला रघूनाथ निरक्षरतेला जीवनातून व पर्याने दलित समाजातून हद्दपार करण्यासाठी धडपड करताना दिसून येतो. पायरू सुखरूपणे कोर्टातून परतल्यानंतरचा आनंद रघुनाथच्या सरळ व सालस स्वभावाचा प्रत्यय देतो. या प्रसंगामुळे वालंबी गहिवरून जाते आणि मोठ्या आनंदाने डोळयातून आनंदाश्रु गाळताना दिसून येते. कादंबरीचा शेवट सुखात्मक झालेला आहे. वालंबीच्या डोळयात सोनेरी पावलाने आलेले आनंद आश्रू कादंबरीचतील सुखात्मक स्वरूप व्यतीत करत असले तरी तिच्या जीवन दु:खाची गाथा मांडणे हाच एकच लेखकाचा मुख्य उद्देश आहे. दु:खात आणि संकटातही खंबीरपणाने पाय रोवून उभे ठाकणाऱ्या माणसांचीच यशोगाथा म्हणजे `राघववेळ` ही कादंबरी होय.

**संदर्भ–:**


1. कांबळे नामदेव, राघववेळ, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स), प्रा. लि. पुणे, पहिली आवृत्ती : 1994, पृ.क्र. 03
2. पाटील तानाजी ,मराठी कादंबरी समीक्षा , डायमंड प्रकाशन ,पुणे ,प्रथमावृत्ती ,2009 , पृ.क्र. 121
3. विभुते शंकर, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, पृ.क्र. 240
4. कोत्तापल्ले नागनाथ, मराठी कादंबरी आस्वाद यात्रा, (संपा.विजया राजाध्यक्ष), पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. मुंबई, पहिली आवृत्ती – 2008, पृ.क्र. 377


**डॉ.प्रा.संदीप भुजंग शेकडे**

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# बहुरुप्याची गीते व लोकसंस्कृती

**प्रा. डॉ. रमेश जयवंत खिळदकर**
मराठी विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा ता. आष्टी, जि. बीड
Email - rameshkhildkar7807@gmail.com

**DOI- 10.5281/zenodo.15574891**

महाराष्ट्रात लोकप्रिय असणारा बहुरुपी गुजरात आणि राजस्थानात 'भवय्ये' कर्नाटकात 'बहुरुपग्यारु' खानदेश आणि मराठवाडा या प्रदेशात 'रायंदर' या नावांनी ओळखला जातो. 'बहुरुपी' या कलावंताचा मुख्य व्यवसाय नाना रुपे धारण करुन सोंग काढणे व त्यावर स्वतःची उपजिविका करणे हा होय. एखाद्या गावी मुक्काम करुन नवीन सोंग आणावयाचे लोकांची करमणूक करायची व शेवटी गावकऱ्यांकडून धान्य, पैसा व कपडे गोळा करायचे अशी त्यांची पध्दत आहे.

विविध प्रकारची सोंगे आणून लोकांची करमणूक करणे हा बहुरुप्यांचा परंपरागत व्यवसाय आहे. सोंगाला साजेशी बतावणी करुन लोकांची करमणूक करतात. पाठीवर बसलेली बाई, बाळंतीण, हेडंबा, राक्षस, नंदी, शंकर-पार्वती, म्हातारी, वाघ, अस्वल इत्यादी सोंगे हुबेहुब आणि कौशल्याने करतात. अलीकडे बहुरुपी फौजदार, पोलीस, आयकर अधिकारी, निरनिराळया खात्यांचे तपासणीस अशी लौकिक सोंगे घेतांना आपणाला दिसतात. बोलकेपणा हा बहुरुप्याचा स्वभावगुण आहे. कधी बहुरुपी प्रेक्षकांना निवेदन करतो. तर कधी दोन बहुरुपी आपसात नाट्यात्मक संवाद करतात. कधी-कधी सरळ प्रेक्षकांशी संवाद करुन प्रेक्षकासाठी काही काळापुरते त्या लोकरंगभूमीचा क्रियाशील घटक बनवून टाकतात. म्हणूनच कालभूत पुरुषोत्तम म्हणतात. समृध्द भारतीय लोकतत्त्वांचा विलय होत असतांनाही आपल्या उपजत कलागुणांमूळे व चातुर्याने एक मोलाचा सांस्कृतिक ठेवा बहुरुप्यांनी जपून ठेवला आहे." हुबेहुब सोंगे, वेशांतराची कला, विविध पक्षी व प्राण्यांचे आवाजाचे कौशल्य या गुणांमुळे बहुरुप्यांचा आजही जनमानसावर विलक्षण प्रभाव असलेला आपणास दिसतो.

बहुरुप्यांची परंपरा बरीच जुनी आहे. त्यांच्यातील विविध कौशल्यामुळे इतिहासातील अनेक राजकर्त्यांनी त्यांचा हेरगीरीसाठी ही उपयोग करुन घेतलेला आहे. श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेत बहुरुप्याचा पुढील प्रमाणे उल्लेख आलेला आढळतो-

"बहुरुपे नटला नारायन
सोंग संपादून । जैसा तैसा " ।।

श्री संत एकनाथांच्या समकालीन जनी-जनार्दन या संत कवीच्या 'जानकी सैवंर' या काव्यात बहुरुप्याविषयी उल्लेख आलेला आढळतो.

"येकू बहुरुपी केली शक्ती नाना स्वांयी नाचविली मंगळा अमंगळा आकृती श्री रघुपती धरविती.

श्री समर्थ रामदासांनी बहुरुप्यावर एक भारुड रचले आहे.

"खेळतो एकला बहुरुपी रे ।
पाहता अत्यंत साक्षपी रे ।।धृ।।
सोंगे धरिता नाना परी रे ।
बहुताचि कळाकुसरी रे ।।
दाखवी अनेक धाता माता रे ।
फौजा सोंगाच्या दावितसे रे ।।
गातो नाचतो वाजवितो रे ।।
त्याग करितो देतो घेतो रे ।।
ऐसा हा भूमंडळी थोडा रे ।
पाहता तयासी नाही जोडा रे ।।
अखंड खेळतो प्रगटेना रे ।
पाहती उदंड तया दिसेना रे ।।
पाहों जातां अंतचि लागेना रे ।
दास म्हणे खेळता भागेना रे ।।

वरील विवेचनावरुन बहुरुप्याची परंपरा कित्येक वर्षापूर्वीची आहे. हे लक्षात येते. श्रीपती भट्टाच्या ज्योतीषरत्नमालेत 'स्वानुभव दिनकरा' मध्ये बहुरुप्याचे उल्लेख आलेले आढळतात.

बहुरुपी साजेसा असा वेशांतर करुन आपल्या अभिनयाद्वारे विनोदी गाणी गातो त्यातून लोकांचे मन उल्हासित करतो. रंजनप्रधानता हे त्याच्या गीताचे

वैशिष्ट्य आहे हे आपणाला दिसते. असा हा बहुरुपी जेंव्हा घरापुढील अंगणात उभा राहून गाणे गाऊन अबालवृध्दांना आपल्या गमती-जमतीने सुखावतो. असेच त्याचे लग्नाचे गीत सुपरिचित आहे.

"लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला
लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला ।।
साळूबाई, काळुबाई, मालनबाई
दगडाबाई, धोंडाबाई करा आता घाई ।।
लग्नाला चला तुम्ही लग्नाला
चला लेकरंबांधा खांबाला
नवरा घ्या काखेला
सासरा ठेवा वळचणीला
सासूला लटकवा खुंटीला
लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला'।।

या बहुरुप्याच्या गीतामधून शब्दचमत्कृती विसंगती आणि अतिशोक्तीच्या माध्यमातून बहुरुपी आपल्या गीतातून विनोद निर्मिती करतांना दिसतो. म्हणूनच डॉ. शरद व्यवहारे या बहुरुप्याविषयी म्हणतात "बहुरुप्याच्या नकला आणि गाणी म्हणजे विनोदाची मेजवानीच शेंबड्या पोरापासून ते म्हाताऱ्या आजीबाईपर्यंत साऱ्यांच्या गालावर हास्याची खळी खुलविणारा हा बहुरुपी मराठी लोकजीवनात बराच लोकप्रिय आहे."

बहुरुपी कधी-कधी नवीन 'मास्तरणीचे' सोंग आणतो-

"साळूबाई, काळूबाई, गोराबाई
करा करा घाई
शाळेची येळ होऊन गेली बाई
वळचणीचे पोर काढा आता बाहीर
नको पाटी नको दप्तर
पोर बाहेर काढा लवकर
तिथं काय शिकायचं नायी
तिथं काय वाचायचं नायी
लेहायच तर नावच नायी
पोराला घ्येतल्या बिगर मी काय जायाची नायी"।।"

वरील गीतातून मुलांना शाळेत पाठवण्याचा उपदेश आलेला दिसतो लोककलावंत असलेला 'बहुरुपी' अनेक लोककथांचा, दंतकथांचा नायक विषय बनलेला आहे. बहुरुप्याने हुबेहुब सोंग घेऊन अनेकांना चकविल्याचा विविध कथा सर्वदूर सांगितल्या जातात. ब्रिटीशांच्या काळात एकदा दोन बहुरुपी मामलेदार आणि त्याचा पट्टेवाला अशी सोंगे घेऊन टांग्यात एका दूरच्या खेड्यात गेले. तेथे त्यांनी गावच्या पाटलाकरवी गावातील प्रतिष्ठीत व्यापारी व शेतकरी अशा वजनदार आसामींना बोलाविले. सरकारने एक निधी सुरु केला आहे, असे सांगून बराच पैसा गावातून गोळा केला. शेवटी खुप वेळानंतर 'आपण बहुरुपी आहोत' असे सांगून त्यांनी आपली ओळख करुन दिली. आणि ज्याचा-त्याचा पैसा परत केला व पाटील व गावकऱ्यांकडून बक्षिसी मिळवली.

अकबर आणि बिरबलाच्या कथामध्येही बहुरुपी आलेला आहे. एकदा एका बहुरुप्याने अकबर बादशहाच्या दरबारात बैलाचे सोंग आणले. अवघा दरबार त्या सोंगावर खुष झाला. बिरबलाने मात्र या सोंगाची परीक्षा पाहण्यासाठी एक खडा बहुरुप्याच्या म्हणजे त्या सोंग आणलेल्या बैलाच्या अंगावर टाकला. त्याच बरोबर त्या बहुरुप्याने जेथे खडा टाकला तेथे आपल्या कातडीची थरथर करुन दाखविली. मग बादशहाने त्या वाघाचे सोंग आणावयास सांगितले. त्या प्रमाणे त्याने सोंग आणून त्याच्या दरबारातील शत्रूचे नरडे फोडले. त्यावर बादशहाने त्याला सतीचे सोंग आणावयास सांगितले. अकबराने अग्नी प्रज्वलित करुन त्या बहुरुप्याला चितेत उडी मारायला भाग पाडले. आणि त्याला आपल्या कर्माची शिक्षा दिली.

नवऱ्याच्या पाठीवर बसलेली बाळंतीणबाई, पोटातून आरपार तलवार घातलेला रायरंद, बायकोला खांद्यावर घेऊन आई-वडीलांना पायी चालायला लावणारे तीर्थयात्रेचे केवळ सोंग किंवा रंजनच करत नाही तर बहुरुप्याच्या कौशल्याबरोबर बदलत्या काळाच्या दर्शनाबरोबर समाज प्रबोधन आपणास घडविते.

बहुरुपी' उत्तम वाक्पटू असतो. अनुप्रासात्मक लयबध्द कृत्रिम पण सुंदर आणि प्रभावी भाषेमुळे बोलणे अत्यंत चातुर्यपूर्ण व हजरजवाबी पणाचे असते. व्यंगदर्शन, अतिशोक्ती, चातुर्य, प्रासंगिक घटनांचे हास्योत्पादक उपयोजन आणि भाविक विनोद इत्यादी गोष्टी बहुरुप्यांच्या गीतातून बोलण्यातून आढळतात. बहुरुप्याच्या या कलेसाठी नाट्यप्रयोगाच्या संहितेची गरज नसते. रंगमंच नसतो. सादरीकरणाची काळ-वेळ ठरलेली नसते. प्रेक्षकांना आपण 'प्रेक्षक' आहोत याची जाणीवही फारशी नसते. त्यामुळे बहुरुप्यांच्या कलाविष्कारात एक प्रकारचा मुक्तपणा आढळतो. बहुतेक लोककला ह्या धर्म संबंध पुजाविधीशी निगडीत आणि श्रध्दा, आस्थेच्या विषयाशी संबधीत असतात. बहुरुप्याचे असे अजिबातच नसते. त्यामुळे तो संबधित कलेनुसार सहज आणि उत्स्फुर्त भाष्य करतो. सामाजिक व्यंगावरही

तो बोट ठेवतो. प्रसंगी परिणामकारक ठरु शकेल इतक्या गंभीर आशयाचे उद्बोधनही तो करतांना दिसतो. 'तुंबडी' हे वाद्य साथीला घेऊन जेंव्हा बहुरुपी आपला प्रयोग करतो तेव्हा कुणाला प्रेक्षक म्हणून बोलवावे लागत नाही. त्याच्या सादरीकरणातच आवाहकता असलेली दिसते.

असा हा परंपरेने गौरविलेला बहुरुपी आज विरळ प्रमाणात दिसून येतो. आजही ग्रामव्यवस्था शहरीकरणाकडे झुकू लागल्यामूळे याचे महत्त्व कमी होऊ लागल्याचे आढळते. पुर्वी भिक्षेकऱ्याला सुपाने भरभरुन दान देण्याची प्रथा होती. बदलत्या काळात दानाची दानत राहिलेली दिसत नाही. म्हणून लोकांवर अवलंबून राहून पोट भरणार नाही या विदारक सत्याची जाणीव आज लोकसंख्येच्या प्रत्येक घटकाला झालेली आहे. त्यामूळे परंपरागत उद्योग सोडून नवा उद्योग शोधण्याचे आवाहन लोककलाकारांपुढे उभे आहे. अलिकडे शासनाच्या सहकार्याने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने बहुरुपी वाटचाल करीत आहेत. म्हणूनच आमचा सामाजिक सांस्कृतिक परंपरेचा आणि लोकरंगभूमी वरील लोककलांचा अविभाज्य घटक असणारा 'बहुरुपी' दुर्मिळ झालेला आहे.

**संदर्भ**

1.डॉ. ढेरे राची, लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६

2.डॉ. मांडे प्रभाकर लोकसाहित्याचे स्वरूप, सविता प्रकाशन औरंगाबाद.

3.डॉ.कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती १० जानेवारी २००७

4.डॉ. व्यवहारे शरद, लोकसाहित्य उद्गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९७९.

5.डॉ. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य मिमांसा (भाग २) प्रथम आवृत्ती २००६, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे.

6.डॉ. व्यवहारे विद्या, लोकसाहित्य लोकसंस्कृती, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ औदुंबर अपार्टमेंटस, नवा विष्णु चौक पुणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# ईदगाह कहानी में नैतिकमूल्य

**प्रो. डॉ. महेमूद पटेल**
हिंदी विभाग, आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा तह . आष्टी, जि. बीड
DOI-10.5281/zenodo.15574931

मूल्य समाज के वे आधारस्तंभ हैं, जिनपर समाज की सभ्यता एवं संस्कृति का भव्य भवन आधारीत है। इनकी धारणा किसी वस्तु के सत्व और सत्य की तात्विक धारणा हैऐसे सत्व या सार तत्व की ., जिससे वस्तु मूल्यवान बनती है।

साहित्य के जीवनमूल्य जीवन की मूल्यवत्ता का प्रतीक है, जिसे कोई युग सहर्ष स्वीकार करता है। बाबू गुलाबराव का कहना है साहित्य के मूल्य जीवन के मूल्य से भिन्न नहीं है। अतः यह बात सर्वमान्य है कि जिसका जीवन में मूल्य है। उसका " ।"साहित्य में भी मूल्य है[१]

कर्तव्य और सेवा भावना भी हमारे नैतिक कर्तव्य और नैतिक मूल्य है । जिससे बच्चों में समानता की भावना निर्माण होती है। वे जाति, धर्म, भाषा, क्षेत्र, सामाजिक तथा आर्थिक असमानता के बंधनों से मुक्त रहते हैं। उन्हें महसूस होता है कि मनुष्यजीवन परस्परपुरक है। उन्हें एक दुसरे के सहयोग की आवश्यकता होती है।

प्रेमचंद का जीवन ब्रिटीश सरकार की गुलामी और उसकी नीतियों की आलोचना में बीता है। उस समय जब देश गुलाम था और कुछ अपने ही लोग मुस्लिम भाईयों को बदनाम कर रहे थे। उसी वक्त प्रेमचंद की नजर सुफी कवियों के अंदाज में हामिद के संघर्षशील व्यक्तित्वपर पडी, प्रेमचंद को ही इस्लाम की उदारता की ताकद और उसकी नैतिकता का पता था।

ईदगाह कहानी में प्रेम, त्याग और निस्वार्थता जैसे नैतिक मूल्य को दिखाया गया है। हमीद के माध्यम से प्रेम और त्याग में वह दादी के लिए चिमटा खरीदता है क्योंकि वह जानता है की रोटी या पकाते समय दादी की उगलिया जल जाती है। निस्वार्थ हमीद स्वयं खिलौना न लेकर दादी जी की जरुरत पुरी करता है। हमीद में बडो के प्रति सन्मान है, मातृ प्रेम है। हमीद की कहानी हमें प्रेरित करती है कि हम प्रेम, त्याग और निस्वार्थता जैसे नैतिक मूल्य का पालन करे।

'ईदगाह' कहानी बालमनोवैज्ञानिक होते हुए भी लेखक ने बच्चों की मुँह से बड़ो के मनकी बातों को उगलवा दिया है। रमजान के तीस रोजों के बाद आज ईद आयी है। ईदगाह जाने की खुशी में बच्चे, बुढें सभी लोग खुश है। महमूद, मोहसिन, नूरे, सम्मी अपने पैसे गिन रहे हैं। लेकिन हामिद के पास दादी आमिना ने दिए हुए सिर्फ तीन पैसे हैं। फिर भी हामिद सबसे अधिक प्रसन्न है। उसके पिता हैजे की भेंट हो चुके है तो उसकी माँ पिलिया से दवा दारू के अभाव में चल बसी है। अमिनाने उसे कहा था कि उसके माँबाप अल्लाह मिय-ा के घर ढेर सारी खुशीयों लाने गये हैं। उसके पॉव में जूते नहीं है। फिर भी वह प्रसन्न है। उसके भीतर प्रकाश है, बाहर आशा। सवाल यह निर्माण होता है कि ऐसे निर्धन लोंगों के लिए यह निगोडी ईद क्यों आती है। अधिक विचार करे तो यह कहानी दरिद्रता की नहीं बल्कि आर्थिक विषमता की भी कहानी है। इस्लाम और दूसरे धर्मों के बराबरी भाईचारे जैसे थोथे दावोंपर एक कठोर व्यंग्य है।

शायद इस्लाम को ही ऐसे गरीब परिवारों की फिक्र थी, इसलिए तो जमिनदार, अमीर, पैसेवाले लोंगॉपर ही सदका, जकात, फितरा वगैरा अनिवार्य कर दिया है। सच में जकात का पैसा विधवा, अनाथों और गरिबों के लिए ही होता है। सच तो यह है की ईद के समय दादी अमिना के पास सिर्फ अठन्नी है। उसके सामने गवलन बैठी है, ईद के लिए दो पैसे का दूध जरूरी है। हामिद के खिलौने के लिए तीन पैसे और बचे पाँच पैसे अमिना के बटवे में। उपर से धोबन, नाइन, मेहतरानी और चुडिहारीन भी आयेगी क्योंकि ईद बारही .बार थोडे-के अर्थमंत्री भी अमिना आती है। यू लगता है की हमारे देश की इस अर्थनीति को देखते त ो भारत का भविष्य कुछ और होता। फिर भी अमिना आशा करती है कि ये दिन भी कट जायेंगे ।

जैसे ही शहर का दृश्य आता है, प्रेमचंद की कलम और पैनी हो जाती है। प्रेमचंद लिखते हैबडी -बडी" . इमारतें आने लगी, यह अदालत हैकालेज है यह ., यह क्लबघर है। इतने बडे कालेज में कितने लडके पढ़ते होंगे .? सब लडकें नहीं है जी बडे आदमी हैं-बडे !, सच उनकी बडीबडी मूँछे हैं। इतने बडे हो गये-, अभी तक पढने जाते हैं। न जाने कब तक पढ़ेंगें और क्या करेंगे इतना पढकर?"[२]

हामिद और उसके मित्र आगे चलने पर पुलिस लाईन दिखायी देती है। इसी पुलिस व्यवस्था पर प्रेमचंदजी भ्रष्टाचार का आरोप लगाते है। यह कानिसटिबल पहरा देते है? तभी तुम बहुत जानते हो । अजी हजरत, यही चोरी कराते हैं। शहर के जितने चोरडाकू है-, सब इनसे मिलें रहते है। रात को ये लोग चोरों से तो कहते हैंचोरी करो . और आप दूसरे मुहल्लो में जाकर जागते रहो । जागते रहो "पुकारते है। ![३] हामिद के कहने पर कि चोरी करने पर इन्हें कोई नहीं पकडता तब मोहसिन कहता है। लेकिन अल्लाह " इन्हें सजा भी खूब देता है। हराम का माल हराम में जाता है। थोडे ही दिन हुए, मामू के घर में आग लग गयी । सारी लेई पूँजी जल गयी, एक बरतन, तक न बचा, कई दिन पेड के नीचे सोये, अल्ला कसम पेड के नीचे।"[४]

हामिद और उसके मित्र आगे चलने पर घने वृक्षों की छाया में ईदगाह में पक्के फर्शपर जाजिम बिछा हुआ है। सभी नमाजी एक कतार में खड़े है । कई कतारे लगी है। यहा न कोई गरीब अमीर, उँचनीच-, छोटाबडा-, काला - गोरा बल्कि कंधे से कंधा लगाये खड़े हैं। इस्लाम की निगाह में सब बराबर है। कितना सुंदर संचलन है। कितनी सुंदर व्यवस्था| सब एकसाथ झुकते हैंएकसाथ खड़े हो जाते हैं। . लेकिन जैसे ही नमाज खत्म होती है, तो वही भाइचारे की दिवार टूट जाती है।

नमाज खत्म होते ही सभी बच्चे खिलौनों की तरफ झपट पड़ते है। महमूद सिपाही लेता है। मोहसिन को भिश्ती पसंद है। नुरे ने वकिल और समी ने धोबिन का खिलौना लिया है। लेकिन हामिदने तीन पैसे में एक लोहे का चिमटा खरीदा है। क्योंकि उसकी दादी के रोटीयां सेकते वक्त हाथ जलते है। हामिद ने यह चिमटा काफी तोलमोल कर और दुकानदार की घुडकिया सहकर लिया है। हामिद के मित्र चिमटे का मजाक उडाते हैं। तो हामिद उनके खिलौने की निंदा करता है।

कहानी में दो दल दिखायी देते हैं। एक खानेपीने - और मौजमस्ती करनेवाला दल और दूसरा हामिद जैसे बच्चों का दल जो अकेला हैफिर भी सहनशील और . शक्तिशाली है। ये बच्चे नहीं परााधीन भारत के चरित्र है, अपनीअपनी अच्छाईयों और बुराईयों के साथ-, लेकिन सर्वश्रेष्ठ हामिद ही है। जो अपने विचारों को अनुभवों एवं तर्कों से पुष्ट करता है। स्वाधीनता का मार्ग प्रशस्त करनेवाला हामिद अपनी बातों से बडे जन समुह को आकर्षित करके लोकनायक बन जाता है। हामिद के पास न्याय का बल है और निति की शक्ति। एक ओर मिट्टी है, दूसरी ओर लोहा जो इस वक्त अपने को फौलाद कह रहा है।

प्रेमचंद ने भारतीयों का एक ऐसा फौलादी चरित्र तैयार किया है, जो किसी भी दशा में टूटनेवाला नहीं है। 'ईदगाह' कहानी में प्रेमचंद चाहते तो शहरी बच्चे का भी चरित्र प्रस्तुत करते लेकिन शहरी लोंगोंपर उनका विश्वास कम है। हामिद का विवेक हमेशा उसके मन को नियंत्रित करता है। जैसेजैसे बच्चे गांव के करीब आते है-, वैसेवैसे - स करते हैं और हामिद की प्रतिभा अपने निर्णयपर अफसो को सलाम करते है। हामिद का वह चिमटा जो बहादूर है, अजेय हैरूस्तमें हिंद है ., फौलाद है। चिमटे का महत्व स्पष्ट करते हुए हामिद कहता है, "आग में बहादूर ही कुदते हैं, जनाब, तुम्हारे यह वकील, सिपाही और भिश्ती लौंडियों की तरह घर में घूस जायेंगे। आग में कूदना वह काम है जो रूस्तमे हिंद ही कर सकता है।"[५]

अंत में कहा जा सकता है कि हामिद के इसी चिमटे के भीतर उसके परिवार और देश के प्रति उसका अपना कर्तव्यबोध होता है। मानो बच्चे हामिद ने बुढे हामिद का पार्ट खेला है । कहानी मे मुख्य पात्र हमीद के चरित्र की अनेक विशेषताएँ ईदगाह के मेले मे ही प्रकट होती है। ईदगाह कहानी पढ़कर महसूस होता है की परिस्थिति या उमर नहीं देखती है और एक छोटा बालक भी विषम परिस्थितीयों में समय से पहले परिपक्व हो जाता है।

**संदर्भ :**

1. बाबु गुलाबराय साहित्य समीक्षा, पृ .18
2. संमहेंद्र कुलश्रेष्ठ प्रेमचंद कहानी का श्रेष्ठ ., पृ .104
3. वही, पृ .105
4. शोध दिशा 16: त्रैमासिक, अग्रवाल द्वय, पृ .72
5. सं महेंद्र कुलश्रेष्ठ .प्रेमचंद कहानी का श्रेष्ठ, पृ .112

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# लोकउपासक पोतराज - गीते व लोकसंस्कृती

**सविन तुकाराम मोकाशे**
संशोधक विद्यार्थी, पारगाव जोगेश्वरी, ताबीड . जिआष्टी .
**Email**:savinmokase4545@gmail.com

**DOI-10.5281/zenodo.15574957**

**सारांश**

'मरीआई' चा उपासक म्हणून पोतराजाला मराठी लोकजीवनात ले-वेगळे स्थान आहे. पोतराजाच्या कमरेभोवती हिरव्या खणाचा घागरा व घुंगराची माळ बांधलेली असते. पुरुष असूनही त्याच्या डोक्यावर स्त्री-प्रमाणे केस असतात. त्याचा तसाच अंबाडा बांधलेला असतो. कपाळावर हळद आणि कंकवाचा मळवट भरलेला असतो. हातात लक्ष्मीआईचा कोरडा आणि हलगी असते.पोतराजाची मरीआई आणि लक्ष्मीआई कुलदैवते असली तरी तुळजापुरची आई, कोल्हापुरची अंबाबाई, चतुःशृंगीची आई यांचीही ते मनोभावे भक्ती करतात. पोतराजाच्या गाण्याचे मरीआई, लक्ष्मी आई, पंढरपूरचा पांडुरंग, राजा हरिश्चंद्र, श्रावणबाळ, चांगुणा, सीतेचा वनवास इत्यादी विषय असतात. या विषयावर ते गीते गातात. पोतराजाची सर्वच गीते 'आईचे महात्म्य' गातांना दिसतात. मरीआईचा उपासक पोतराज दरवर्षी आषाढ महिन्यात खेड्यापाड्यात जातो त्यावेळी गावात मरीआईची किंवा लक्ष्मी आईची यात्रा काढतात.

अहमदनगर जिल्ह्यात आजही लक्ष्मी यात्रा उत्सव गेल्या तीस वर्षापासून साजरा केला जातो. महालक्ष्मीचा वारस म्हणून पोतराजाला यात्रेन विशेष महत्व आहे. 'मुलगी माझी तर मला, मुलगा झाला तर देवीला नवसपूर्ततेसाठी 'कारण' विधी करुन पोतराजाला देवीला सोडले जाते. वयाच्या आठव्या वर्षानंतर असा विधी करण्याची प्रथा आहे. नवरात्रीतील नऊ दिवस वगळून केंव्हाही हा 'कारण' विधी केला जातो. गावावर संकटे येऊ नयेत. रोगराई होऊ नये. म्हणून गावकरी मरीआईची शांती करण्यासाठी पोतराजाला बोलावतात. हे सर्व विधी पोतराजाच्या हस्ते होतात. इतर वेळी पोतराज देवीच्या नावाने भिक्षा मागतात. भिक्षा मागतांना एका विशिष्ट तालात हलगी वाजवून नाचतात. मरीआईच्या आगमनाची वर्दी देतात.

"आलीया मरीबाई,
तिचा कळेना अनुभऊ,
भल्याभल्यांचा घेतांजीवू !
अलीया मरीबाई
आलीया मरीबाई
हा का सुटला तुझा वारा,
दुनिया कामते थरथरा !
आलीया मरीबाई !

पोतराजाची गाणी, कथागीते, ओवीसदृश गीते, धुपार्तीच्या वह्या अशा तीन प्रकारे आहेत. पोतराजाचे नृत्य वाघ्या-मुरळी-वासुदेव यांच्यापेक्षा वेगळे असते. त्यांच्या पारंपारिक नृत्यात हलगी डफ व सनई या वाद्यामुळे रौद्रता आलेली असते. धुपात्रीच्या वह्या पोतराज सहसा पोतराजाच्या दीक्षाविधीच्या वेळी जळण-पूजन करण्यात येतात. होमाच्या वह्या म्हणत होमात आहुती टाकतात. होमानंतर धपात्री होते. यावेळी म्हटल्या जाणाऱ्या ध्यात्रीच्या वया म्हणजे पोतराजांचे विधीच्या वेळी म्हणावयाचे मंत्रच होत

"जळ नेमलं जळ थापलं
जळाच्या काठी, झोटींग झोटिंग
साती असरा, आठवा म्हँशासुरा,
जळात लक्ष्मी, जळात उभी राही
निरळवती हात देई, रेड्याबकऱ्याचं पुंजन घेई.
बाई, बाई, तुझं लेणं काई,
पांढरा फळा, पांढरी कंचुकी
लेईली सोन्याचं काजळ
तुजकार पोतराज,
मी धुपार्ती बाईची घडी घडी करी'

वरील गीतामधून मरीआईचा अवतार, गावात मरीआईचे वारे आल्यामुळे झालेला प्रलय असे वर्णन या धुपात्रीच्या वह्यामधून आलेले दिसते.

"अरकट मरी परकट मरी । मरी मता, तुझा रेडा
नगरीस घालून येला । येशीच्या दारी, पोतराज सोंगाडा ।
भरला लिंबा-नारळानं गाडा ।
लिंबाचं नेसणं, दहीभात शिपाडनं ।
रक्त रोडाचं खाणं, पाच सवाष्णीचं पुंजन ।
बाई बाई, तुझं लेनं काई ।
पांढरा फका, पांढरी कंचुकी, अशी या बाईचं लेनं ।
नाही मुक्ताफळं, लेईली सोनयाचं काजळ सप्तयान पाताळ।
तुजकार पोतराज, धुपार्ती बाईची घडोघडी करी।"

पोतराजाच्या वह्यामधून प्रामुख्याने मरीआईचे वर्णन केलेले असले तरी इतर देवतांची वर्णने देखील विपुल प्रमाणात असतात. पोतराज जागरण घालतात त्यावेळी कथागीते म्हणतात.

जागरणाच्या वेळी ज्या वह्या म्हणण्यात येतात, त्यात कधी-कधी प्रश्नोत्तरे असतात. या वह्या धुपात्री वह्यापेक्षा निराळया असून यात यमक साधलेले असते. वह्यांची भाषा तालबध्द असून त्या वह्या एका विशिष्ट तालात म्हटल्या जातात.

"मूळ रंभे शेवट अवघ्याचा करतार अनंत काळाचा
पिता सद्गुरु नाही कसे म्हणता त्याच्याविना पान हलेना,
का पडे अंता याचा शोध करा पुरता,
कोण्या ठिकाणी शक्ती नांदती सांगे निवांता,
शुक्रवार दिन आई साहेबाचा वारस कोट करुन या सूर्याचं तेज
वरखेड नगरी पानाफुलांचा आगर, नवस येतात ते अंत ना पार
नवलाख रेडा पडतो आईच्या मकानावर बसून शिरोजी
पोताजी करुन धुपार्तीचा आकार, शिदोजी बुआला आळवितो
तेहतीस कोटी दैवताला, नवलाख पोतराज खेळती देवीच्या म्होरं,
पाई पादमबळ, बेंबीहिरा, झालीया देवीची तयारी,
छबीना चाललाय मारुतीकडं नवलाख पोत खेळतोय
बाईच्या म्होरं केशवभगत लोटतोय मारुती चरणावर"

वरील वहीतून पोतराजाची परंपरा दिलेली आहे. गुरु आपल्या शिष्याला वही देतांना त्यात आपले नाव गोवतो. अशाच प्रकारे एकाकडून दुसऱ्याकडे वही दिली जाते. शिदोजी-पोताजी-केशव अशी परंपरा वहीत आहे. पोतराजाच्या गीतात विषयाची विविधता आलेली असते; पण गीतांची रचना मात्र सारखीच असते.

पोतराजांची सर्वच गीते स्त्रीगीतातील ओवीरचनेची असतात. त्यांचे 'गणबा मोगरा' हे गीत आशय आणि रचनेच्या दृष्टीने थोडासा वेगळेपणा दर्शविणारे आहे.

"गणबा मोगरा गणाची जाळी,
पाणी घालती कुवराबाई
या माय पाण्याच्या हेलाव्यानं,
जाई मोगरा हुपवला
कळया तोडून भारा आला
त्येचा मंग हार केला
आमच्या लिंबाची नखभर सावली
तिथ तांदली धुरपात माऊली"।।

अशा अनेक प्रकारच्या गीताबरोबरच पोतराजाच्या मौखिक शाब्दाविष्काराचे आणि मरीआईच्या उपासना विधी संबंधीत कलात्मक आविष्कारांचे स्वरुप पाहता मरीआई या देवतेची उग्र प्रकृती, तिचा रौद्र रुपातील उपासक अशी दोघांची एकत्रित छाप त्यांच्या एकूण आविष्कारावर पडलेली आहे. आणि हे स्वाभाविकच आहे. त्यातूनच या पोतराजांच्या गाणी व आविष्कारांची जडण-घडण होत असलेली दिसते.

म्हणूनच डॉ. शरद व्यवहारे पोतराजांविषयी आणि त्यांच्या आविष्काराविषयी म्हणतात "मराठी लोकधर्मातील भगतात पोतराज हा असा आगळा-वेगळा भगत त्याच्या पारंपारिक जीवनाचाही आविष्कार वेगळा आणि याचे मूळ त्याच्या उपास्यदैवतांच्या प्रकृतीत असल्याचे दिसते. मराठी लोकमानसात या दैवताला असलेल्या श्रध्दा त्यातून या दैवताच्या भगताला असलेले स्थान आपल्या लक्षात येते. जनमानसाची या दैवताकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यातून घडणारे धर्माचरण एका आगळया-वेगळया लोकजीवनाचे दर्शन घडविते." व्यवहारे याचं पोतराज आणि त्यांचा कलाविष्कार याबलचे मत योग्य आहे. कारण मराठी लोकरंगभूमीवरील पोतराजाचा हा कलात्मक आविष्कार एका वेगळया नाट्याचे दर्शन घडविणारा असा आहे.

**संदर्भ**


१) डॉ. व्यवहारे विद्या, लोकसाहित्य लोकसंस्कृती, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ औदुंबर अपार्टमेंटस, नवा विष्णु चौक पुणे.

२) डॉ. ढेरे राची, लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६

३) डॉ. मांडे प्रभाकर लोकसाहित्याचे स्वरूप, सविता प्रकाशन औरंगाबाद.

४) डॉ.कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती १० जानेवारी २००७

५) डॉ. व्यवहारे शरद, लोकसाहित्य उद्गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९७९.

६) डॉ. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य मिमांसा (भाग २) प्रथम आवृत्ती २००६, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# जात्यावरील ओवी गीतातून व्यक्त होणारे लोकसंस्कृतीचे दर्शन

**डॉ. राजाराम सोनटक्के[1] स्वाती शिवाजी चौधरी[2]**
[1]संशोधन मार्गदर्शक
[2]संशोधक विद्यार्थीनी
Email:- chaudhariswati99@mail.com
**DOI-10.5281/zenodo.15574982**

**प्रस्तावना**

लोकगीतातून व्यक्त होणारे जीवनानुभव आणि भावनानुभव आपल्या मनाची पकड घेतात. मानवी मनाच्या भावभावनांचे आणि विचारांचे प्रतिबिंब लोकगीतात पाहायला मिळते. माहेरच्या आंब्याच्या झाडाखाली बसून आनंदाने बालपणाचे सुख घेत लहानाची मोठी झालेली मुलगी तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना भावी स्वप्नात रमते. आपल्या मैत्रिणींबरोबर हसत खेळत गप्पा मारण्यात गुंग झालेली ही मुलगी लग्न होऊन सासरी जाताना माहेरच्या मायेच्या नात्याच्या वियोगाने व्यथित होते. सासर विषयी कुतूहल वाटणारी स्त्री सासू-सासरे नणंद ,जावा ,दिर यांची मर्जी सांभाळत आपल्या पतीविषयीच्या प्रेमामुळे हसत खेळत सासरी कष्ट उपसते सण उत्सव इत्यादी आनंदाच्या प्रसंगी नटून थटून फेर धरून पहाटे उठून जात्याच्या साक्षीने ओवी गाणारी स्त्री लोकगीतातून दिसून येते.

लोकगीतांची परंपरा ही अनेक शतकांपासून अखंडपणे चालू असलेली दिसते. लोकगीते मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुस ऱ्या पिढीपर्यंत चालत येत असतात. लोकगीतांचे वर्गीकरण करणे गुंतागुंतीचे असले तरी मराठवाड्याची लोकगीते, व ऱ्हाडी लोकगीते, खानदेशी लोकगीते, कोकणी लोकगीते असे त्याचे वर्गीकरण होते. या शोधनिबंधामध्ये नगर तालुक्यातील ओवीगीतांच्या अभ्यासाचा समावेश करण्यात आला आहे. लोकगीतांची निर्मिती ही लोकजीवनात होत असते. दळण कांडण करताना म्हटली जाणारी ओवीगीते श्रमपरिहारासाठी म्हटली जात असली तरी मनावरचा भार हलका करण्याचे साधन म्हणूनही हे गीत म्हटले जातात. मराठी लोकगीतामध्ये स्त्री ओवीगीतांची संख्या मोठ्या प्रमाणावर असलेली दिसून येते. या ओवी गीतांमधून कौटुंबिक जीवनाचे, घटना प्रसंगाचे जिव्हाळ्याचे चित्रण आलेले दिसून येते. ओवी गीतांचा आणि जात्याचा अतिशय जवळचा असा संबंध आहे. स्त्री जात्यावर दळण दळताना ज्या गतीने दळते त्या गतीनेच ओव्या म्हणते. तिच्या मनातील भाव-भावना, तरंग या ओवीगीतातून अवतरत असतात. मानवी मनातील भावभावना समर्थपणे व्यक्त करण्याचे ओवी एक महत्त्वाचे साधन आहे. मराठी लोकगीतातील ओवी हे स्त्रीला मिळालेले एक मौखिक धन आहे. अशिक्षित, अनाक्षर समजल्या जाणा ऱ्या स्त्रियांनी हे धन जिवापाड सांभाळले त्यात भर घातली.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्यात कलानुरूप बदल होत असतात.१९ व्या शतकात स्त्री शिक्षणामुळे ज्ञानाच्या वाटा खुल्या झाल्याने स्त्रियांना आत्मभान आले. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे व वर्तनामुळे स्त्रीच्या वाटेला आले हे दुःख, वेदना,शोषण,अन्याय,अत्याचार यामुळे स्त्रिया जागृत झाल्या. स्वतःच्या अस्तित्वाची त्यांना जाणीव झाली.स्वातंत्र्यपूर्वकाळात क्रांतीसुर्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय, विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला.

"रडू नको माझ्या जीवा, तुला रडायची र सव
रडू हासव रे जरा, त्यात संसाराची चव"

या बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतून संसारात पिचून गेलेल्या स्त्रीमनाची वेदना व्यक्त झालेली असून संसार सुखी करण्यासाठी धडपडणारी स्त्री यातून दिसून येते. मला भावना आहे मन आहे असा आक्रोश ती कवितेच्या माध्यमातून ओव्यांच्या माध्यमातून व्यक्त करते.

लोकसंस्कृती ही प्रवाही असते.काळानुरूपती बदल स्वीकारत असते. जशी मोट गेली इंजिन आलं मोटेवरची गाणी काळाच्या ओघात लुप्त झाली. गिरणीबाई आली आणि घराघरातून होत असलेली जात्याची घरघर थांबली .आणि घराघरातून गायली जाणारी जात्यावरची गाणी लुप्त होत चालली. लोकसाहित्यात अनेक संशोधकांनी या जात्यावरच्या गाण्यांची संकलन केलेले दिसते. जात्यावरील गीतामधून भारतीय मराठी परंपरेतील लोकसंस्कृतीचे दर्शन होते.

लोकसाहित्याची परंपरा ही मौखिक परंपरा आहे.स्त्रियांच्या भौतिक जीवनातल्या भावभावनांचा आविष्कार या ओवीगीतातून व्यक्त होतांना दिसतो. भारतीय स्त्रीच्या प्रचंड लोकसाहित्याचा भाग स्त्रीवेदनेचा उद्गार असलेल्या साहित्याने व्यापलेला आहे.लोकसाहित्याचा खूप मोठा भाग जात्यावरच्या ओव्यांनी व्यापलेला आपल्याला दिसून येतो. या जात्यावरील ओव्यांमधून कुटुंब व्यवस्थेचे नातेसंबंधांचे सांस्कृतिक दर्शन आपल्याला घडते.

जात्या तू ईश्वरा नको मला जड जाऊ |

बयाच्या दुधाचा सया पाहतात आनुभावू||

जात्याला ईश्वर मानून त्याला ओवी म्हणताना हे स्त्रीमन म्हणते की आईच्या दुधामुळे माझ्या अंगामध्ये बळ भरले आहे. आईच्या दुधाचा सार्थ अभिमान अनेक गीतांमधून आढळून येतो."माता माऊलीचं दूध मनगटी खेळतं" स्त्रीचे मनगट फक्त बांगड्या भरण्यासाठीच नाहीत .तर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे आपल्या कुटुंबातील घटकांची काळजी घेणे आपल्या कुटुंबातील लोकात प्रतिष्ठा मानणे. संस्कृतीची जोपासना करणे हाच या स्त्रीचा खरा धर्म आहे हे जात्यावरील ओवी गीतांमधून आपल्याला दिसून येते.

जातं हे वजनाला जड असतं .हे जातं ओढताना तिची दमछाक होते. तिला आतोनात कष्ट पडतात.जात्याच्या फिरणाऱ्या तळी बरोबर जात्यावर दळण दळणारी स्त्री संवाद साधत असते .आपल्या मनातलं हितगुज त्याच्याशी ती करत असते. म्हणजेच ती ओव्या म्हणते. या ओवीच्या गायनाने तिचे श्रम हलके होतात. स्त्रीच्या मनातील भावनांचा आविष्कार या ओवी गीतातून झालेला दिसून येतो.

"गरीब, दुबळा भाऊ बहिणीला असावा |

बांडी, भुरकी चोळी एका रातीचा विसावा ||"

परिस्थितीने गरीब असणारा का होईना भाऊ बहिणीला असला पाहिजे कारण सासुरवाशील स्री मनाला माहेराची सतत ओढ लागलेली असते. तिला सणाच्या निमित्ताने माहेरी जावसं वाटतं.तिच्या हक्काचं महत्त्वाचं घर म्हणजे माहेर. माहेरपणाला जायला या भगिनीला महत्त्वाचं निमित्त ते म्हणजे रक्षाबंधनचा सण आणि भाऊबीजेचा सण. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात अतिशय महत्त्वाचे मानले जातात. कारण आपल्या मनामध्ये जे गुज आहे ते कुणाला तरी सांगावं असं सतत तिला वाटत असतं, भावनांनी भरलेलं मन मोकळं करावं असं तिला वाटत असतं. आणि म्हणूनच या सणाची ती आतुरतेने वाट पाहत असते. एका रात्रीची विश्रांती घेण्यासाठी आपल्या भावाला राखी बांधण्यासाठी भावाच्या घरी ती जात असते. त्याची जशी परिस्थिती असेल ऐपत असेल तशी साडी चोळी हा भाऊ मला घेतो त्याचं तिला अप्रूप वाटतं. आजूबाजूच्या सर्वांना ती मोठेपणाने सांगते ही साडी मला माझ्या भावाने घेतली आहे. आणि आपल्या भावाला उदंड आयुष्य लाभावे यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करते की,

"आयुष्याची दोरी फेक पाठच्या भावाला |

माहेरीचा दीप सुखी असू दे इसाव्याला ||"

माझं जे आयुष्य आहे ते माझ्या बंधवाला मिळू दे त्याच्या सगळया मनोकामना पूर्ण होऊ दे .त्याला उत्तम यश मिळू दे. आणि माझ्या माहेरचा दीप असणारा हा भाऊराया त्याला सदैव सुखात ठेव अशी भावासाठी सतत प्रार्थना करत असते. भाऊ म्हणजे दुसरा बाबाच असतो. स्वार्थी दुनियेत भावाचं नातं निस्वार्थी आहे. आपलं दुःख जाणणारा भाऊच असतो.

"औक्ष ग चिंतीते हातच्या कंकणाला |

अशी ओव्या मी तर गाते पाठच्या बंधवाला ||"

ही बहीण आपल्या कुंकवाच्या धन्याला म्हणजे पतीराजाला दीर्घायुष्य लाभू दे अशी विनंती करते. पंचारतीने आपल्या बंधूच औक्षण करते. ही भगिनी आपल्या भावाला कपाळावर मध्यभागी टिळा लावते ओवाळते. या टिळा लावण्याचा अर्थ सर्वात महत्त्वाचा जसे भगवान शंकराला त्रिनेत्र असं म्हटलं जातं. कपाळावर मधोमध लावला जातो. हा भाऊ त्याच्या तिसऱ्या डोळयाने म्हणजेच ज्ञानचक्षुने आपल्या बहिणीचं रक्षण करत असतो.

**निष्कर्ष**

१) जात्यावरील ओवी मधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

२) लोकगीतांच्या क्षेत्रात स्त्रीगीतांची संख्या जास्त आहे.

३) लोकसंस्कृतीत मोठ्या प्रमाणात ओवीगीते गायली जातात.

४) लोकगीते ही मौखिक परंपरेने चालत आलेली असून त्यांचा कर्ता अनामिक असतो.

५) ओवी गीतांतून स्त्री जीवनातील विविध व्यापक पैलूंचे दर्शन घडते.

६) ओवीगीतांचा विविध सण,उत्सवांची जवळचा संबंध आहे.

७) स्त्रिगीतातून कौटुंबिक जीवनाचे भावपूर्ण चित्रण प्रकट झालेले दिसते.

८) स्त्रियांची ओवीगीते अर्थ प्रधान आहेत.

**समारोप**

ओवीगीतांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, ओवीगीतांमधून स्त्रीला गौण असे स्थान होते, तिच्या मनातील भावभावना, सुखदुःख तत्कालीन समाज व्यवस्थेने तिच्यावर लादलेली बंधने या ओवीगीतांच्या माध्यमातून समोर आलेली दिसतात. पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये चूल आणि मूल याच मर्यादित क्षेत्रात स्त्रीला गुरफटून ठेवण्यात आले. कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी धान्य साठवणे, निवडणे, टिपणे, दळण-कांडण करणे, कुटुंबातील लहान मुलांचे संगोपन करणे, वडीलधाऱ्यांची सेवा करणे कुटुंबातील धर्मविधी संस्कार विधी पाळणे इत्यादी जबाबदारी स्त्रीवरच असते. याचे चित्रण अनेक ओवी गीतातून आपल्याला पाहायला मिळते.

कष्टाच्या कामात गुतलेली स्त्री जेव्हा जात्यावर दळण दळायला बसते तेव्हा तिच्या नकळत तिच्या तोंडातून ओव्या शब्दबद्ध होताना दिसतात . तिच्या मनातील भाव सुखदुःख दळण दळताना जीवाभावाच्या जात्याजवळ आपलं मन मोकळं करते. या ओवी गीतांना कित्येक शतकाची परंपरा असलेली दिसून येते. लग्न होऊन सासरी गेलेली स्त्री अनेक सुखदुःखांचे अनुभव, अनेक नात्यांचे बंध या ओवीगीतातून उलगडले जातात.

**संदर्भ**

१) मराठी लोकगीत स्वरूप आणि विशेष - डॉ. शरद व्यवहारे, विश्वभारती प्रकाशन, नागपूर

२) लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा - डॉ.तारा भवाळकर मनोविकास प्रकाशन, पुणे

३) लोकसाहित्य संशोधन आणि समीक्षा - डॉ.विश्वनाथ शिंदे,कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

४) लोकसाहित्याचे स्वरूप - डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद

५) लोकसाहित्य संशोधन पद्धती - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

६) लोकसाहित्य व आधुनिक साहित्य - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# ग्रामीण भागातील आव्हाने व उपाय - शिक्षण

**डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख**
राज्यशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर
**Email** - satishrajedeshmukh@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15575012**

**सारांश**

ग्रामीण भागामध्ये मूलभूत गरजा बरोबरच पायाभूत सुविधा ही आव्हाने आहेत. अलीकडील काळामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आव्हाने हा ग्रामीण भागामध्ये अपणास दिसतात. अंधश्रद्धा, अज्ञान, कुपोषण, वेठबिगारी, बालकामगार, दारिद्र्य, बेकारी, रोजगार, बालमृत्यु, बालमातामृत्यु, महिला सक्षमीकरण, बालविवाह, शिक्षणात गळती, स्त्रीभ्रूणहत्या, हुंडा पद्धती, महिला हिंसाचार, अत्याचार, स्वच्छता, शेतीला पाणी, पिण्याचे पाणी, शेतरस्ते, पाणंद रस्ते, शिवरस्ते, हद्दरस्ते, पाऊलवाटा, निरक्षरता, राहणीमानाचा दर्जा, गुंडागिरी, खंडणी, हिंसाचार, बाल गुन्हेगारी, रोगराई, गरिबी, गुन्हेगारी, बेरोजगारी, कमी वेतन, शिक्षण, आरोग्य, विषमता, रस्ते अतिक्रमण, गायरान व वन जमिनीवर भांडवलदार लोकांच अतिक्रमण, इच्छाशक्तीचा अभाव, उदासिनता, लोकसहभाग कमी, शेतीमध्ये तंत्रज्ञान कमी, जलसिंचन, गृहनिर्माण, बेघरपणा, कर्जबाजारी, पथदिवे, सांडपाणीच्या नाल्या, कचरा विल्हेवाट, शेतकरी आत्महत्या, मुलींचे शिक्षणात प्रमाण कमी, नवउद्योजकाचा अभाव, शेतीमालाला उत्पादन खर्चावर दाम दुप्पट भाव मिळत नाही, शेतमजुराची समस्या, शेतीची यंत्रिक मशागत महागाई, शेती बांधावरून भाऊ-भावकीचे भांडणे, महिला आजाराबाबत जागृती नसणे इत्यादी ग्रामीण भारतामध्ये आव्हाने आहेत.

मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच पायाभूत सुविधा म्हटलं तर शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, पाणी ह्या आहेत. वरील सर्व (समस्या) आव्हाने मुळासगट नाहीसी करण्यासाठी एकमेव औषध म्हणजे ग्रामीण भागात दर्जेदार प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षणाशिवाय ग्रामीण भारताला तरणोपाय नाही. शिक्षण दर्जेदार नसल्यामुळे वरील सर्व आव्हाने भारतात 75 वर्षे स्वतंत्र होऊन ते टिकून आहेत. सर्व रोगाचे मुळ शिक्षणात आहे.

महात्मा फुले म्हणतात शिक्षण न घेतल्यामुळे सर्व अनर्थ होतात

"विद्ये विना मती गेलीच।
मतीविना निती गेली।
नीतीविना गती गेली।
गतीविना वित्त गेले।
वित्तविना शुद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।[1]

म्हणजे शिक्षणाचे महत्त्व किती आहे. शिक्षण घेतले नाही तर जीवन अंधकारमय आहे. शिक्षण घेऊन तेजोमय जीवन तयार होते.

डॉ. बाबासाहेबव आंबेडकर ही शिक्षणबाबत म्हणतात,

"शिक्षण हे वाघीनीचे दुध आहे,
ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय
राहणार नाही."[2]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्पष्ट म्हणतात शिक्षण नसेल तर माणूस गुलामगिरीत जगतो. शिक्षण घेतलेला माणूस हा ताट मानेने जगतो. भारताच्या ग्रामीण भागात शिक्षण हे ज्ञान, कौशल्य निर्माण करण्यास आणि ग्रामीण विद्यार्थ्यांचे भविष्य सुधारण्यास मदत करते. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गरीबी दूर होते.

पूर्वी लोक ग्रामीण विकासाला कृषी विकासाशी जोडत असत. केवळ वाढीव कृषी विकासावर लक्ष केंद्रीत करत असत. मूलभुत गरजा व पायाभुत सुविधा यांचा विचार सुरू झाला आहे. ग्रामीण विकासामध्ये ग्रामीण रहिवासींच्या जीवनमानात सुधारणा करण्याचे प्रयत्न सामाविष्ठ आहेत. भारताची अर्ध्याहून अधिक लोकसंख्या ही ग्रामीण खेड्यात राहत असल्यामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्था देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते. शिक्षणामुळे शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कामगार, महिला, अनेक कुटुंबाला याचा सकारात्मक फायदा होतो. शिक्षण विविध उद्देशासाठी काम करते. गरिबी, बेरोजगारी, असमानता, सामाजिक सुधारणा, ग्रामीण लोकांमध्ये हक्क व अधिकारांची जाणीव जागृती करते. व्यक्तीगत राहणीमान सुधारणे तसेच ग्रामीण लोकांना

नोकऱ्या आणि उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देणे याचा समावेश होतो. शिक्षणामळे ग्रामीण जीवनात संपूर्ण बदल होतो. शिक्षण देशासाठी आर्थिक परतावा देखील आणते. समाजाला शाश्वत शांतता व विकास साध्य करण्यासाठी मदत करते. सर्व मानवी हक्क साध्य करण्यासाठी शिक्षण ही गुरूकिल्ली आहे.

स्वातंत्र्याच्या अगोदर व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात विविध आयोग स्थापन करून देशाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा लेखाजोखा मांडण्यात आला आहे. विविध आयोगाकडून ज्या सुचना शिक्षणासाठी केल्या होत्या त्या काही सुचना सरकारने स्वीकार करून शिक्षण विषयक कायदे करून धोरणे निश्चित केली. समाजातील सर्व घटकापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे काम केले. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी भारत सरकारने बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 लागू केला आहे.

"प्रत्येक व्यक्तीला मानवी अधिकार हे निसर्गाकडून प्राप्त झालेले आहेत. जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकार हा जीवन जगण्याचा अधिकार कलम 21 मध्ये आहे. भारतीय राज्यघटनेचा मार्गदर्शक तत्त्वामध्ये कलम 45 मध्ये सरकारने मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी पाऊले उचलावीत असे सांगितले आहे. 2009 मध्ये भारतीय संसदेने कायदा करून नवीन कलम 21 (अ) निर्माण केले व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण वय 6 ते 14 वर्षांपर्यंत प्रत्येक बालाकांचा अधिकार आहे. हा हक्क प्राप्त झाला."[3]

ग्रामीण शिक्षण अजूनही प्रगती करत आहे. या ग्रामीण भागात शिक्षणाची सेवा मिळविण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागतो. शाळामध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता, प्रशिक्षण निकृष्ठ दर्जाचे, शिक्षकांना कमी पगार, विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण जास्त आहे व ग्रामीण भारतातील शिक्षण आणि साक्षरतेच्या दर्जा सुधारणासाठी ग्रामीण भागातील शाळांना प्रोत्साहन दिले जाते.

**उद्दिष्टे :**

1. ग्रामीण भागातील मुलांना मोफत दर्जेदार शिक्षण देणे.
2. मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी मदत करणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गळती थांबविणे.
4. ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार पायाभुत सुविधा मिळाल्या पाहिजेत.

"2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 1210 दशलक्ष (1 अब्ज 21 कोटी) होती. ज्यापैकी ग्रामीण लोकसंख्या 833.1 दशलक्ष, जी देशाच्या एकूण लोकसंख्या 64.84% होती. एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी, 118.7 दशलक्ष शेतकरी होते आणि 144.3 दशलक्ष शेतमजूर होते."[4] भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था खूप संथ आहे. तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. बहुतांश ग्रामीण लोकांची अवस्था दयनीय आहे. वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाढत असलेली संख्या आपल्या दयनीय आर्थिक स्थितीची साक्ष आहे. त्याच ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण कमी त्यामुळे अशिक्षितपणा जास्त आहे. निरक्षर लोक आधुनिक शेती करीत नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्या उत्पादनावर होतो.

"ग्रामीण विकासामध्ये सुशिक्षित, सुजान, जागृत, डोळस वृत्तीचा लोकांचा सहभाग आवश्यक असतो. परंतु ग्रामीण भागात शैक्षणिक सोयीचा अभाव असल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण लोक निरक्षर आणि अंधश्रद्धाळू आहेत. ग्रामीण मुलांना अधिकाधिक साक्षर बनविण्यासाठी अंगनवाडी, बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालयामार्फत शिक्षणाचा प्रसार करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्टे आहे. याबरोबरच ग्रामीण युवकांना साक्षर करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्टे आहे."[5] ग्रामीण शिक्षण हे विकासाचे एक प्रमुख साधन आहे. शिक्षण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. ग्रामीण भागात निम्मी लोकसंख्या भारतात राहते. शिक्षण हे तेथील व्यक्तींना सक्षम बनवते. साक्षरता दर, रोजगार दर, रोजगार क्षमता आणि आर्थिक वाढ करते, ग्रामीण भागांना शिक्षणाच्या माध्यमातून मजबूत बनविणे हे शासनाचे ध्येय आहे म्हणून पंचायतराज मध्ये प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात दर्जेदार मिळाले पाहिजे ही जबाबदारी टाकली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण दर्जेदार शिक्षण मिळविण्याचा अधिकार आहे. तो विद्यार्थ्यांचा पाया आहे.

पंचायतराज व्यवस्थेची स्थापना झाल्यापासून प्राथमिक शिक्षण ही बाब एक महत्त्वाची झाली आहे. "साहजिकच शिक्षणाचा प्रसार व त्यात इष्ट ते बदल घडवून आणण्यासाठी जबाबदारी पंचायतराज व्यवस्थेची मानली गेली आहे. याचे महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण भाग व दुर्गम भागामध्ये शिक्षणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी विविध योजना राबविल्याच्या पाहावयास मिळतात. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी गाव तेथे शाळा अशा योजनेची अंमलबजावणी करण्यावर शासनाने भर दिला आहे."[6] भारतातील ग्रामीण शिक्षण लाखोच्या मुलांना सेवा देते. तरी शिक्षण मिळविण्यासाठी ग्रामीण भागात आव्हाने देखील आहेत. पायाभूत सुविधेचा अभाव,

ग्रामीण भागात शिक्षकांची कमतरता, वाहतुकीच्या सोयी नाहीत, निधीची कमतरता आहे, ग्रामीण लोकांचा लोकसहभाग कमी, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रमाचा अभाव, पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह नसणे, चांगल्या शाळाचा अभाव, कमी प्रशिक्षित शिक्षक, तंत्रज्ञानाची मर्यादित उपलब्धता, यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण दर्जेदार मिळण्यास अडचणी निर्माण होतात.

"उद्योग क्षेत्र आणि शिक्षण क्षेत्र यांच्यात वैचारिक देवाण-घेवाण होऊन शिक्षणाची वाटचाल झाली पाहिजे. स्पर्धेच्या युगात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याची व पेलण्याची क्षमता शिक्षणात असायला हवी. शिक्षण हे आंनददायी व सर्जनशील असायला हवे. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी एक प्रयोगशाळा म्हणून शैक्षणिक संस्थेची कार्य करायला हवे. समाज परिवर्तन व राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षणाची भूमिका खूप महत्त्वाची आहे."[7]

"शिक्षण आणि आरोग्याचा विचार केल्यास सरकारने शिक्षणाच्या सोई खेड्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु शिक्षण व्यवस्था दर्जेदार स्वरूपाची निर्माण झालेली नाही. अनेक खेड्यात शाळा दुलर्क्षीत असतात. शिक्षक उपलब्ध नसतात. त्यामुळे शिक्षण सुद्धा ग्रामीण भागामध्ये पुरेशा प्रमाणात घेता येत नाही."[8]

गावातील अनेक शाळामध्ये पुरेशा पायाभूत सुविधांचा अभाव आहे. बसण्याची योग्य सोय नाही. फर्निचरच्या कमतरतेमुळे मुलींना जमीनीवर बसावे लागते. शाळेच्या इमारतीत दरवाजे व खिडक्या नसल्यामुळे वारा व प्राणी आत येऊ शकतात. ग्रामीण भागातील शिक्षकांना ग्रामीण गावात राहण्याची सोय नसते. शिक्षक गैरसोय होत असल्यामुळे ते असमानाधी असतात. वाहतुकीच्या सुविधाचा अभाव ही गावातील शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांना भेडसावणाऱ्या सर्वात गंभीर समस्यापैकी एक आहे. पुरेसे वाहतुकीचे पर्याय नसल्याने मुले शाळेत जाण्यासाठी लांब अंतर गाडीने जाणे पसंत करत नाहीत. ग्रामीण भागात शाळेची संख्या कमी आहे. मूलभूत सुविधाचा अभाव ग्रामीण भागात आहे. पिण्याचे पाणी, शौचालये या सेवेचा ही ग्रामीण भागात अभाव आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रमाचा अभाव आहे. ग्रामीण शाळामधील मुले □थलेटिक्स, सह अभ्यासक्रम उपक्रम किंवा स्पर्धा सारख्या अभ्यासक्रमाच्या शिवाय भाग घेऊ शकत नाहीत. कार्यक्रम व उपक्रमाच्या उद्देश मुलांच्या ग्रामीण सर्वांगीण विकासाला मदत करणे आहे. निधीची कमतरता ग्रामीण व्यवस्थेतील एक गंभीर अडथळा आहे. काही शाळामध्ये बेंच, ब्लॅकबोर्ड इत्यादी खरेदी करण्यासाठी निधी नाही. विद्यार्थी संख्यावर शिक्षक नियुक्ती ही पद्धत चुकीचे आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकार ग्रामीण भागात शिक्षण चांगले मिळावे यासाठी प्रयत्न करत आहे. एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विविध योजना आणल्या आहेत. ग्रामीण भागातील शिक्षण चांगल्या पद्धतीने होण्यासाठी ग्रामीण भागात शाळामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत. नवीन शाळा खोल्या बांधल्या जात आहेत. शाळेत आधुनिक फर्निचर दिले जात आहे. मुलांना बसण्यासाठी बेंच दिले जात आहेत. जुन्या शाळेचे नुतनीकरण करण्यात येत आहेत. दारे, खिडक्या व्यवस्थित केल्या जात आहेत. नवीन फर्निचर दिले जात आहे. गावातील लोकांचा लोकसहभाग वाढावा यासाठी प्रयत्न केले जात आहे. आदिवासी वाड्या, तांडे पाडे येथे शिक्षकांची नियुक्ती केली जात आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना स्कुलबस देखील शासनामार्फत पुरविली जात आहेत. वाड्या, तांडे, पाडे येथे एकही विद्यार्थी असला तरी एक शिक्षक नियुक्त केला पाहिजे, विद्यार्थी संख्याची अट शिक्षक नियुक्तीसाठी नसावी. शाळेमध्ये शौचालये, पिण्याचे पाणी सुद्धा पुरविण्याचे काम सरकार करत आहे.

विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी दुपारचे जेवण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत प्राथमिक शिक्षण मुलांना मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न केले जात आहे. सर्व शिक्षा अभियान केंद्रे, अशा ठिकाणी विकसित केली जातात की, ज्या ठिकाणी शाळा नाहीत. प्राथमिक स्तरावर मुलीच्या शिक्षणासाठी कस्तुरबा गांधी बालिक विद्यालय आणि महिला साक्षरता योजना आहेत. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमा अंतर्गत सर्व मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सुलभ करणे, शालेय वयाच्या मुलांना प्राथमिक शिक्षणाची सुविधा मिळावी. शैक्षणिक ध्येय साध्य करणे हे अंतिम पाऊल सरकारचे आहे.

"राजकीय विचारवंत प्लेटो म्हणतो, "शिक्षण देणे म्हणजे व्यक्तिच्या शारिरीक आणि मानसिक शक्तींना तिची जेवढी क्षमता असेल तेवढे पूर्णत्त्व व सौंदर्य प्राप्त करून देणे होय." म्हणजेच व्यक्तीला शारीरिक तसेच मानसिक सामग्री प्राप्त करून देण्याचे प्रभावी कार्य शिक्षण करीत असते."[9] ग्रामीण भागात शिक्षणाची सुविधा पुरविण्यात शासन प्रयत्नशील असेल तरी ग्रामीण भागामध्ये लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

**संदर्भ :**

1. राठी शुभांगी दिनेश, 2014, महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, पृ. क्र. 12.
2. कीर धनंजय, 2012, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, पान - 16.
3. कटके धर्मराज के. (2017), मानव संसाधन विकास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. 67.
4. कटार सिंह / अनिल शिशोदिया, (2017), ग्रामीण विकास तत्त्वे, धोरणे व व्यवस्थापन, सेग पब्लिकेशन, नई दिल्ली, पृ. क्र. 14
5. एम. ए. समाजशास्त्र अभ्यासक्रम, (2013), भारतातील ग्रामीण विकास, प्रकाशक कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. 6.
6. जे. बी. नाडे, (2016), पंचायतराज व ग्रामीण विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. 77.
7. डॉ. सतीश ठोंबरे, (2015), भारतातील शैक्षणिक प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. 11
8. प्रा. व्ही. एच., भास्कर (2012), ग्रामीण विकासाचा मार्ग, पंचायतीराज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृ. 76.
9. डॉ. दा. धो. काचोळे, (2014), ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. क्र. 463.

**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No. 33** **Mar-Apr 2025**

# १८ व्या शतकात भारतीय एकतेच्या विकासात भक्ती पंथाचे योगदान

**डॉ. सखाराम मारुती वांढरे**
इतिहास विभाग प्रमुख अँड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालय आष्टी
ता. आष्टी जि. बीड-४१४२०३
**Email-** smwandhare123@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.16028629**

**प्रस्तावना**

भारतातील १८ व्या शतकातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलत होती. याच कालखंडात भक्तीपंथांनी भारतीय समाजाच्या एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भक्ति आंदोलन हे मध्ययुगीन भारतातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणांसाठी एक प्रभावी साधन ठरले. या चळवळीने जातीभेद, धर्मभेद आणि समाजातील अन्याय दूर करण्यासाठी समतेचा संदेश दिला. संत तुकाराम, रामदास, एकनाथ, कबीर, गुरू नानक आणि अन्य संत-महंतांनी लोकांना प्रेम, भक्ती आणि मानवतेचा संदेश दिला.भक्तीपंथांनी केवळ धार्मिक पुनरुत्थान घडवले नाही तर समाजातील विषमता, अस्पृश्यता आणि विभाजन नष्ट करण्यासाठीही प्रयत्न केले. संतांच्या अभंग, दोहे आणि कीर्तनाद्वारे सामान्य जनतेला एकत्र आणले गेले आणि धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श निर्माण करण्यात आला. त्यांच्या शिकवणींमुळे लोकांमध्ये बंधुभाव निर्माण झाला आणि सामाजिक ऐक्य बळकट झाले.

**संशोधन विषयाचे महत्त्व:**

१. धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक समरसता – भक्ती चळवळीने जातीभेद, धर्मभेद आणि सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. विविध संतांच्या विचारांमुळे भारतीय समाजात एकात्मता निर्माण झाली.

२. राष्ट्रीय एकात्मतेचा पाया – १८ व्या शतकात इंग्रजांच्या प्रभावामुळे भारतात सामाजिक आणि राजकीय उलथापालथ सुरू होती. भक्तीपंथांनी लोकांना एकत्र आणून भारतीय एकात्मतेचा पाया मजबूत केला.

३. लोकभाषेतील प्रचार आणि प्रसार – संतांनी संस्कृतऐवजी मराठी, हिंदी, तमिळ, कन्नड यांसारख्या स्थानिक भाषांमध्ये कीर्तन, अभंग, दोहे आणि पदे रचली. त्यामुळे विविध प्रांतिक समाजात परस्परसंवाद वाढला आणि एकात्मतेला चालना मिळाली.

४. जातिभेदाच्या विरोधात विचारधारा – संत तुकाराम, रामदास, नामदेव, कबीर, गुरु नानक यांसारख्या संतांनी जातिभेद, अस्पृश्यता आणि वर्णव्यवस्थेच्या विरोधात भूमिका घेतली. यामुळे समाजातील सर्व स्तरांतील लोक एकत्र आले.

५. राजकीय आणि सामाजिक चळवळींना प्रेरणा – भक्ती चळवळीच्या विचारांमुळे नंतरच्या काळात स्वातंत्र्यलढ्याला सामाजिक आणि नैतिक आधार मिळाला. संतांचे विचार महात्मा गांधी आणि इतर राष्ट्रीय नेत्यांनी आत्मसात केले.

६. सांस्कृतिक एकता आणि कला-विकास – भक्ती संप्रदायांमुळे संगीत, नृत्य, साहित्य आणि चित्रकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची अभिव्यक्ती वाढली. विविध प्रांतांतील लोकांनी एकत्र येऊन सांस्कृतिक आदानप्रदान केले.

७. सामान्य लोकांमध्ये आत्मजागृती – भक्तीपंथांनी केवळ धार्मिक नाही तर सामाजिक सुधारणेसाठीही कार्य केले. यामुळे भारतीय समाजात आत्मजागृती निर्माण झाली

आणि सामाजिक सुधारणेच्या चळवळींना चालना मिळाली.

**भक्ती चळवळीचा उगम आणि विकास**:

१. भक्ती चळवळीचा उगम

भक्ती चळवळीचा उगम प्राचीन भारतातील धार्मिक आणि सामाजिक परिस्थितीशी संबंधित आहे. वैदिक धर्मातील कर्मकांडप्रधानता, जातीभेद आणि सामाजिक विषमता यामुळे सामान्य जनतेत असंतोष निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर भक्ती संप्रदायांचा उदय झाला. वैदिक परंपरेतील भक्तीचा उल्लेख – ऋग्वेदातील काही सूक्तांमध्ये भक्ती तत्वाचे प्राथमिक स्वरूप आढळते. उपनिषद व गीतेतील भक्ती संकल्पना – भगवद्गीतेत भक्तीला ज्ञान व कर्मयोगाइतकाच महत्त्वाचा स्थान देण्यात आला आहे. संगमकालीन तमिळ संतांची परंपरा – ६व्या शतकाच्या सुमारास अलवार (वैष्णव) आणि नयनार (शैव) संतांनी भक्तीमार्गाचा प्रचार केला. मठ आणि संप्रदाय – आठव्या-नवव्या शतकात शंकराचार्य, रामानुज आणि मध्वाचार्य यांनी भक्ती तत्वज्ञानाची व्याख्या केली.

**२. भक्ती चळवळीचा विकास**

भक्ती चळवळीचा विकास प्रामुख्याने दोन प्रमुख टप्प्यांत झाला:

(अ) दक्षिण भारतातील भक्ती चळवळ (६व्या – १२व्या शतकात)तमिळ अलवार (वैष्णव) आणि नयनार (शैव) संतांनी भक्ति तत्वज्ञानाचा प्रसार केला.त्यांनी संस्कृतऐवजी स्थानिक भाषांमध्ये रचना केली, ज्यामुळे सामान्य लोकांपर्यंत भक्ती संकल्पना पोहोचल्या.शंकराचार्य (अद्वैत वेदान्त), रामानुज (विशिष्टाद्वैत) आणि मध्वाचार्य (द्वैतवाद) यांनी वेगवेगळी तत्वज्ञानं मांडली.

(ब) उत्तर भारतातील भक्ती चळवळ (१३व्या – १७व्या शतकात)

इस्लामी शासनप्रणालीमुळे हिंदू-मुस्लीम संस्कृतींच्या संमिश्रणातून भक्ती चळवळीने वेगळा चेहरा घेतला.या चळवळीने जातिभेद, कर्मकांड, आणि धर्माधिकाऱ्यांचा विरोध केला.

**प्रमुख संत –**

ज्ञानेश्वर (१३व्या शतक) – त्यांनी मराठीत 'भावार्थदीपिका' (ज्ञानेश्वरी) लिहिली.नामदेव (१४व्या शतक) – त्यांनी हिंदू आणि मुस्लिम अनुयायांमध्ये समरसता निर्माण केली.कबीर (१५व्या शतक) – जातिभेदाचा विरोध केला आणि निर्गुण भक्ती संप्रदायाचा प्रचार केला.गुरू नानक (१६व्या शतक) – शीख धर्माच्या भक्ती तत्त्वज्ञानाची स्थापना केली.तुळसीदास, सूरदास, मीराबाई (१६-१७व्या शतकात) – त्यांनी कृष्ण आणि राम भक्तीचा प्रचार केला.एकनाथ, तुकाराम, रामदास (महाराष्ट्रातील संत) – त्यांनी सामाजिक सुधारणा आणि भक्ती संप्रदायाचा प्रसार केला.

**३. भक्ती चळवळीचा प्रभाव**

धार्मिक समता आणि सामाजिक सुधारणांचा प्रचार.स्थानिक भाषांचा विकास आणि धार्मिक साहित्यनिर्मिती.हिंदू-मुस्लिम ऐक्याची भावना निर्माण झाली.जातिभेद आणि कर्मकांडांविरुद्ध जनजागृती झाली.भक्ती पंथातील समाजसुधारकांचे योगदान महत्त्वाचे आणि दूरगामी परिणाम करणारे होते. त्यांनी भारतीय समाजातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले.

**१. संत नामदेव (१३व्या-१४व्या शतक)**

भक्ती मार्गाचा प्रचार करून जातीय भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या अभंगांमधून समतेचा आणि एकतेचा संदेश दिला.वारकरी संप्रदायाच्या विस्तारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**२. संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६)**

त्यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहून संस्कृतातील भगवद्गीता मराठीत अनुवादित केली, जेणेकरून सर्वसामान्य लोकांना धर्मग्रंथ समजावे.त्यांनी अध्यात्म आणि मानवतावादाचा संदेश दिला.

**३. संत तुकाराम (१६व्या-१७व्या शतक)**त्यांनी सामाजिक विषमता, कर्मकांड आणि अंधश्रद्धा यांचा विरोध

ला.त्यांच्या अभंगांमधून ईश्वरभक्ती, समता आणि प्रेम यांचे महत्त्व पटवले.

**४. संत एकनाथ (१५३३-१५९९)**

त्यांनी जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेला विरोध केला.त्यांनी भावार्थ रामायण लिहून जनसामान्यांना धर्माची माहिती दिली.

**५. संत रामदास (१६०८-१६८१)**

त्यांनी समाज संघटन, शारीरिक व मानसिक सशक्तीकरणावर भर दिला."सर्व धर्म समभाव" या तत्त्वाचा प्रचार केला.

**६. संत कबीर (१५व्या शतक)**

त्यांनी हिंदू आणि मुस्लिम धर्मातील कर्मकांड, पाखंडीपणा आणि भेदभावाचा विरोध केला.त्यांच्या दोह्यांमधून प्रेम, भक्ती आणि समता यांचे संदेश दिले.

**७. संत मीराबाई (१५व्या-१६व्या शतक)**

स्त्रियांना भक्तिमार्गात स्थान दिले आणि समाजात स्त्रियांच्या अधिकारांविषयी जागृती निर्माण केली.राजघराण्यात जन्मूनही संतवृत्ती स्वीकारून समाज सुधाराचे कार्य केले.

**८. गुरु नानक (१४६९-१५३९)**

शीख धर्माचे संस्थापक, त्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध केला आणि "एक देव" या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला.त्यांनी लंगर प्रथा (मोफत भोजन) सुरू करून समतेचा आदर्श ठेवला.

९. संत रैदास (१५व्या शतक)

अस्पृश्यतेचा विरोध केला आणि सामाजिक समतेचा प्रचार केला.त्यांनी "मन चंगा तो कठौती में गंगा" असे सांगत अंतःकरणाच्या स्वच्छतेला महत्त्व दिले.

**१०. संत चोखामेळा (१३व्या शतक)**

त्यांनी अस्पृश्य असूनही वारकरी संप्रदायामध्ये महत्त्वाचे स्थान मिळवले.त्यांनी समाजाला जातिभेद नष्ट करण्याचा संदेश दिला.भारतीय समाजात धार्मिक सहिष्णतेचा प्रसार हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रक्रियांच्या माध्यमातून झाला आहे.

**भारतीय समाजात धार्मिक सहिष्णुतेचा प्रसार:**

**1. प्राचीन काळातील सहिष्णुता:**

वेद, उपनिषदे आणि बौद्ध-जैन ग्रंथांमध्ये सहिष्णुतेचा विचार आढळतो.सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून सर्व धर्मांप्रती समान आदर बाळगण्याचे धोरण अवलंबले.गुप्तकालात हिंदू, बौद्ध, जैन संप्रदायांनी एकत्रितपणे सहजीवन साधले.

**2. मध्ययुगीन काळातील सहिष्णुता:**

भक्ती आणि सूफी चळवळ: संत कबीर, गुरु नानक, तुकाराम, रामदास, मीराबाई यांनी धार्मिक भेदभाव नाकारून समभावाचा संदेश दिला.अकबराचे दीन-ए-इलाही धर्म: विविध धर्मांच्या शिकवणींचा संगम साधून सहिष्णुतेचा प्रसार केला.मराठा साम्राज्य आणि सहिष्णुता: छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व धर्मांना सन्मान दिला.

**3. ब्रिटिशकालीन सुधारणा आणि सहिष्णुता:**

समाजसुधारकांचे योगदान: राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी यांनी सर्व धर्मांना समानतेचा संदेश दिला.स्वातंत्र्यलढ्यातील एकता: सर्व धर्मीय लोक एकत्र येऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढले.

**4. आधुनिक भारत आणि धार्मिक सहिष्णुता:**

भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे.धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर देशाचे प्रशासन चालवले जाते.विविध सण, उत्सव आणि धार्मिक समारंभांमध्ये सहभाग घेतल्याने सहिष्णुता वाढते.

**5. सामाजिक उपक्रम आणि सहिष्णुतेचा विस्तार:**

शिक्षण आणि सामाजिक जागरूकतेच्या माध्यमातून धार्मिक सहिष्णुतेचा प्रचार होत आहे.अनेक स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक गट धार्मिक एकतेसाठी कार्यरत आहेत.भारतीय समाज हा प्राचीन काळापासूनच धार्मिक सहिष्णुतेच्या मार्गाने चालत आला आहे. विविध धर्म, संप्रदाय आणि संस्कृती यांना एकत्र जोडून ठेवण्यात भारतीय परंपरेचा मोठा वाटा आहे. धार्मिक सहिष्णुता टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला परस्पर आदर, संवाद आणि समंजसपणाने वागण्याची गरज आहे.

**राजकीय परिस्थिती आणि भक्ती पंथाचे योगदान:**

**१. १८व्या शतकातील राजकीय परिस्थिती**

मुघल साम्राज्याच्या पतनानंतर भारतात अनेक प्रादेशिक सत्ता उदयास आल्या.मराठे, निजाम, अवध, बंगाल, पंजाब इत्यादी प्रांतांत स्वायत्त सत्ता स्थापन झाल्या.ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा प्रभाव वाढत होता.सामाजिक आणि राजकीय अस्थिरतेमुळे जनतेमध्ये असंतोष वाढत होता.

**२. भक्ती पंथाचे योगदान**

सामाजिक एकता: भक्ती पंथाच्या संतांनी जाती-पातीच्या भेदाभेदावर टीका केली आणि समानतेचा संदेश दिला.धर्मनिरपेक्षता: संतांनी धर्माच्या नावावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आणि सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली.

राजकीय चेतना: संतांनी अन्यायाविरोधात आवाज उठवला आणि शासकांच्या अत्याचारांवर टीका केली.

जनजागृती: त्यांनी आपल्या अभंग, कीर्तन, भजनाच्या माध्यमातून सामान्य लोकांमध्ये आत्मबळ निर्माण केले.मराठी आणि इतर प्रादेशिक भाषांचा प्रसार: संतांनी लोकभाषेत साहित्यनिर्मिती करून जनतेशी थेट संवाद साधला.

**३. मुख्य भक्ती संत आणि त्यांचे कार्य**

संत ज्ञानेश्वर: भगवद्गीतेवर 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ लिहून भक्तीचा प्रचार.

संत नामदेव: धार्मिक सहिष्णुतेचा संदेश पंजाबपर्यंत पोहोचवला.

संत एकनाथ: समाज सुधारणा आणि जातिभेदावर कठोर प्रहार.

संत तुकाराम: अभंगांच्या माध्यमातून भक्ती आणि सामाजिक समानता यांचा प्रचार.

संत रामदास: राजकीय चेतना आणि शिवाजी महाराजांना प्रेरणा.

भक्ती पंथाने केवळ धार्मिक नाही तर सामाजिक आणि राजकीय स्तरावरही मोठा प्रभाव टाकला. त्यांच्या शिकवणींमुळे सामाजिक सुधारणांना चालना मिळाली आणि पुढे स्वातंत्र्य चळवळीला देखील प्रेरणा मिळाली.

**भक्ती साहित्याचा अर्थ आणि स्वरूप**

भक्ती साहित्य म्हणजे धार्मिक आणि भावनिक श्रद्धेवर आधारित काव्य आणि ग्रंथ, जे विविध संतांनी आपल्या भाषेत रचले. यात संत नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, मीराबाई, कबीर, गुरुनानक, सूरदास, तुलसीदास यांसारख्या कवी-संतांचा समावेश होतो.

**भक्ती साहित्य आणि भारतीय संस्कृतीतील एकात्मकता:**

भक्ती साहित्याने संस्कृत, हिंदी, मराठी, बंगाली, पंजाबी, तमिळ, तेलगू आदी स्थानिक भाषांमध्ये रचना केली. त्यामुळे भारतभरातील लोकांना एकाच तत्वज्ञानाशी जोडण्याचे कार्य झाले.संत कबीर, रविदास, तुकाराम, नामदेव यांनी जातिव्यवस्थेचा विरोध करून समानतेचा प्रचार केला. त्यामुळे समाजात समरसतेची भावना निर्माण झाली.भक्ती साहित्याने हिंदू आणि इस्लाम यातील सांस्कृतिक समन्वय घडवला. कबीर, दादू, रसखान यांसारख्या कवींनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे संदेश दिल. स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक जीवनात स्थान मिळावे, यासाठी मीराबाई, बहिणाबाई यांनी कार्य केले. रामचरितमानस, अभंग, दोहे, गीते यांसारख्या भक्ती साहित्याने भारतीय संस्कृतीच्या मूल्यांची जपणूक केली आणि त्याला नवी दिशा दिली.भक्ती साहित्यामुळे भारतीय शास्त्रीय संगीत, कीर्तन, भजन, नृत्य यांना चालना मिळाली.भक्ती साहित्य हे केवळ धार्मिक ग्रंथ नव्हते, तर त्यांनी भारतीय संस्कृतीत सामाजिक एकात्मता, समता, सहिष्णुता आणि प्रेम यांचा संदेश दिला. त्यामुळे भारतीय संस्कृती अधिक मजबूत झाली आणि विविधतेत एकता ही संकल्पना दृढ झाली.

**भक्ती पंथाचे आर्थिक व सामाजिक योगदान:**

भक्ती संतांनी लोकांना दानधर्म, अन्नछत्रे आणि यात्रांसाठी निधी दान करण्यास प्रवृत्त केले. मंदिर, मठ आणि धर्मशाळांच्या उभारणीस भक्ती पंथामुळे चालना मिळाली. मूर्तीशिल्प, भित्तिचित्रे, कापड उद्योग आणि संगीत क्षेत्रात भक्ती पंथाच्या प्रभावाने आर्थिक उलाढाल वाढली. तीर्थयात्रे व धार्मिक मेळावे यामुळे स्थानिक व आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली.संतांनी श्रमाचा सन्मान करण्यावर भर दिला, त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली. संतांनी समानतेचा

प्रचार केला आणि अस्पृश्यतेच्या विरोधात आवाज उठवला.मीराबाई, बहिणाबाई यांसारख्या संतांनी महिलांच्या हक्कांचा पुरस्कार केला. संतांनी नीतिमत्ता, प्रामाणिकपणा आणि परोपकार यांचा प्रसार केला.हिंदू-मुस्लीम ऐक्याला प्रोत्साहन देत धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला. संतांनी मातृभाषेत कीर्तन, अभंग व भजनांच्या माध्यमातून शिक्षण प्रसार केला.भक्ती पंथाने आर्थिक स्थैर्य, सामाजिक एकता आणि सांस्कृतिक अभिवृद्धी घडवून भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**भक्ती चळवळ आणि आधुनिक भारतातील प्रभाव:**

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारतातील एक महत्त्वाची धार्मिक आणि सामाजिक चळवळ होती. तिचा प्रभाव आधुनिक भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांवरही स्पष्टपणे दिसून येतो.भक्ती संतांनी जात-पात आणि भेदभावाविरोधात आवाज उठवला. संत कबीर, रविदास, तुकाराम आणि बसवेश्वर यांसारख्या संतांनी समता आणि बंधुत्वाचे संदेश दिले, जे आधुनिक भारतातील समतावादी विचारसरणीला प्रेरणादायी ठरले. मीराबाई आणि बहिणाबाई यांसारख्या संतांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला, ज्याचा प्रभाव आधुनिक काळातील स्त्रीवादी चळवळींवर पडला.हिंदू-मुस्लीम ऐक्य आणि धार्मिक सहिष्णुतेचा विचार संतांनी मांडला. आधुनिक भारताच्या धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेवर भक्ती चळवळीच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. भक्ती चळवळीने कर्मकांड, अंधश्रद्धा आणि मूर्तिपूजेच्या रूढींना आव्हान दिले, ज्यामुळे नंतरच्या समाजसुधारणेच्या चळवळींना प्रेरणा मिळाली.स्वातंत्र्य चळवळीवरील प्रभाव: महात्मा गांधींच्या अहिंसा आणि सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वज्ञानावर भक्ती संतांच्या विचारांचा प्रभाव होता. गांधीजींनी तुकाराम, कबीर आणि नरसी मेहतांच्या शिकवणींना स्वीकारले.

समाजसुधारकांवर प्रभाव: जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पांडुरंग शास्त्री आठवले यांसारख्या विचारवंतांनी भक्ती संतांच्या शिकवणींमधून प्रेरणा घेतली.साहित्य आणि कला: भक्ती संतांचे अभंग, दोहे आणि भजन आजही भारतीय साहित्य, संगीत आणि नृत्यसंस्कृतीत महत्त्वाचे स्थान राखून आहेत.लोकसंस्कृती आणि परंपरा: वारकरी संप्रदाय, भजन-कीर्तन आणि धार्मिक यात्रा यांसारख्या लोकपरंपरांवर भक्ती चळवळीचा ठसा आहे.

भक्ती चळवळीने भारतीय समाजात मूलगामी परिवर्तन घडवले. समता, न्याय, धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक सुधारणा यांसाठी प्रेरणादायी ठरलेली ही चळवळ आजही आधुनिक भारताच्या विविध क्षेत्रांवर प्रभाव टाकत आहे.

**निष्कर्ष:**

अठराव्या शतकात भारतीय समाज अनेक सामाजिक, धार्मिक आणि राजकीय आव्हानांना सामोरा जात होता.भक्ती पंथाच्या संतांनी जातिभेद, अस्पृश्यता आणि धार्मिक कट्टरतेच्या विरोधात आवाज उठवला. त्यांनी "सर्वधर्मसमभाव" आणि "मानवतेचा धर्म" या तत्त्वांचा प्रसार करून भारतीय समाजात एकात्मतेची भावना रुजवली.भक्ती संतांनी स्थानिक भाषांमध्ये साहित्यनिर्मिती करून जनसामान्यांपर्यंत अध्यात्मिक आणि सामाजिक सुधारणा पोहोचवल्या. या चळवळीमुळे विविध प्रादेशिक भाषांमध्ये धार्मिक आणि सामाजिक संवाद वाढला, ज्यामुळे सांस्कृतिक ऐक्य वाढीस लागले.हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी भक्ती व सूफी संप्रदायांनी मोठी भूमिका बजावली. कबीर, गुरु नानक, दादू दयाळ यांसारख्या संतांनी सर्वधर्म समभावाचे संदेश दिले आणि भारतीय एकात्मतेला बळकटी दिली.

भक्ती चळवळीने समाजातील शोषित, स्त्रिया आणि दुर्बल घटकांना धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. संत तुकाराम, संत रामदास, संत एकनाथ, संत मीराबाई आदी संतांनी समाज सुधारणे आणि समतेचा विचार रुजवण्यासाठी कार्य केले.मराठा साम्राज्य, शीख

समाज आणि इतर स्थानिक सत्तांनी भक्ती विचारसरणीचा स्वीकार केला. धार्मिक-सामाजिक एकात्मतेने लोकांना एकत्र आणले, ज्यामुळे भारताच्या एकसंधतेला आधार मिळाला.भक्ती पंथाने अठराव्या शतकात भारतीय एकात्मतेच्या प्रक्रियेत मूलभूत योगदान दिले. सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि सांस्कृतिक ऐक्याच्या माध्यमातून भक्ती संतांनी समाजात एकतेचा संदेश दिला. त्यांनी धार्मिक भेदभाव कमी करून सर्वसमावेशक भारतीय संस्कृतीला बळकटी दिली. त्यामुळे भारतीय समाजात धार्मिक, सामाजिक आणि भाषिक स्तरांवर एकात्मतेची भावना वाढीस लागली, जी पुढील स्वातंत्र्यलढ्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरली.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. 'Indian Unity and Bhakti Tradition' – R. C. Majumdar
2. 'Cultural Unity of India' – Humayun Kabir
3. 'History of Indian Nationalism' – R. C. Majumdar
4. 'Bhakti Movement and Social Reform' – J. N. Farquhar
5. 'Maharashtra Bhakti Sahitya' – R. G. Bhandarkar
6. 6)'भक्ती चळवळीचा महाराष्ट्रातील प्रभाव' – द. वि. पोतदार
7. 'ज्ञानेश्वर आणि भारतीय संस्कृती' – पु. ग. सहस्रबुद्धे
8. www.wikipediya.com


**डॉ. सखाराम मारुती वांढरे**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No. 33 Mar-Apr 2025

# भारताचे शासन आणि प्रशासन (१९४७-१९५२): एक ऐतिहासिक अध्ययन

**डॉ. रमेश एकनाथ भारुडकर**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख अँड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालय आष्टी
ता. आष्टी जि. बीड-४१४२०३
E-mail- bharudkarr@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.16028916

**प्रस्तावना**

स्वतंत्र भारताचा इतिहास किंवा भारतीय प्रजासत्ताकाचा इतिहास १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये स्वतंत्र सार्वभौम राज्य बनले तेव्हापासून सुरू झाला. १८५८ मध्ये सुरू झालेल्या ब्रिटिशांच्या थेट प्रशासनाचा उपखंडाच्या राजकीय आणि आर्थिक एकीकरणावर परिणाम झाला . १९४७ मध्ये जेव्हा ब्रिटिश राजवट संपली तेव्हा उपखंड धार्मिक रेषांवर दोन स्वतंत्र देशांमध्ये विभागला गेला - बहुसंख्य हिंदू असलेला भारत आणि बहुसंख्य मुस्लिम असलेला पाकिस्तान . त्याच वेळी भारताच्या फाळणीमुळे ब्रिटिश भारताच्या वायव्य आणि पूर्वेकडील मुस्लिम बहुसंख्य भाग पाकिस्तानच्या अधिपत्यात विभागला गेला . फाळणीमुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये १ कोटींहून अधिक लोकसंख्येचे स्थलांतर झाले आणि सुमारे दहा लाख लोकांचा मृत्यू झाला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान बनले , परंतु स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित असलेले नेते महात्मा गांधी यांनी कोणतेही पद स्वीकारले नाही. १९५० मध्ये स्वीकारलेल्या संविधानामुळे भारताला संघराज्य आणि राज्य पातळीवर अनुक्रमे वेस्टमिन्स्टर शैलीतील संसदीय शासन प्रणाली असलेले लोकशाही प्रजासत्ताक बनवले . तेव्हापासून लोकशाही टिकून आहे. भारतातील शाश्वत लोकशाही स्वातंत्र्य जगातील नव्याने स्वतंत्र झालेल्या राज्यांमध्ये अद्वितीय आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताला संबोधित करताना, आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू .या देशाला धार्मिक हिंसाचार , नक्षलवाद , दहशतवाद आणि प्रादेशिक फुटीरतावादी बंडखोरींचा सामना करावा लागला आहे. भारताचे चीनशी न सुटलेले प्रादेशिक वाद आहेत जे १९६२ आणि १९६७ मध्ये युद्धात रूपांतरित झाले आणि पाकिस्तानशी १९४७ , १९६५ , १९७१ आणि १९९९ मध्ये युद्ध झाले . शीतयुद्धात भारत तटस्थ होता आणि अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीत तो आघाडीवर होता . तथापि, १९७१ पासून जेव्हा पाकिस्तान अमेरिका आणि चीनच्या पीपल्स रिपब्लिकशी संलग्न होता तेव्हापासून त्याने सोव्हिएत युनियनशी सैल युती केली .भारत हा एक अण्वस्त्रधारी देश आहे, ज्याने १९७४ मध्ये पहिली अण्वस्त्र चाचणी केली होती आणि त्यानंतर १९९८ मध्ये आणखी पाच चाचण्या केल्या होत्या . १९५० ते १९८० च्या दशकापर्यंत, भारताने समाजवादी -प्रेरित धोरणांचे पालन केले. अर्थव्यवस्थेवर व्यापक नियमन , संरक्षणवाद आणि सार्वजनिक मालकीचा प्रभाव होता, ज्यामुळे व्यापक भ्रष्टाचार आणि मंद आर्थिक वाढ झाली. १९९१ पासून, भारताने अधिक आर्थिक उदारीकरणाचा पाठपुरावा केला आहे . आज, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा आणि सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे.सुरुवातीच्या काळात तुलनेने संघर्ष करणारा देश असल्यानेभारतीय प्रजासत्ताक हा वेगाने वाढणारी G20 प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. भारताला त्याच्या मोठ्या आणि वाढत्या अर्थव्यवस्थे, लष्करी आणि लोकसंख्येमुळे कधीकधी एक महान शक्ती आणि संभाव्य महासत्ता म्हणून संबोधले जाते

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१) भारतीय शासन आणि प्रशासनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे .

२) भारतीय शासन आणि प्रशासनाच राजकीय अभ्यास करणे .

**१९४७-१९५० भारताचे अधिपत्य -**

कोणतेही संस्थान स्वतंत्र भारताच्या सैन्याविरुद्ध लष्करीदृष्ट्या विजय मिळवू शकत नाही. जानेवारी १९४७ मध्ये, नेहरू म्हणाले की स्वतंत्र भारत राजांचा दैवी अधिकार स्वीकारणार नाही . मे १९४७ मध्ये, त्यांनी जाहीर केले की संविधान सभेत सामील होण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही संस्थानांना शत्रू राज्य मानले जाईल. ब्रिटिश भारतात १७ प्रांत होते, जे ५६५ संस्थानांसह अस्तित्वात होते . फाळणीनंतर हे प्रांत भारत किंवा पाकिस्तानला देण्यात आले, दोन विशिष्ट प्रकरणांमध्ये - पंजाब आणि बंगाल . तथापि, संस्थानांच्या राजपुत्रांना स्वतंत्र राहण्याचा किंवा दोन्हीपैकी कोणत्याही अधिपत्यामध्ये सामील होण्याचा अधिकार देण्यात आला. अशा प्रकारे, भारताच्या नेत्यांना मुख्य भूमीवर विखुरलेल्या स्वतंत्र राज्ये आणि राज्यांसह एक तुकडा देश मिळण्याची शक्यता होती. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली , भारताच्या नवीन सरकारने राजकीय वाटाघाटी केल्या ज्याद्वारे केंद्र सरकारची आणि त्यानंतर तयार होणाऱ्या संविधानाची प्राथमिकता सुनिश्चित करण्यासाठी लष्करी कारवाईचा पर्याय (आणि अनेक वेळा वापर) समर्थित होता. सरदार पटेल आणि व्ही.पी. मेनन यांनी भारताच्या शेजारील संस्थानांच्या राज्यकर्त्यांना भारतात सामील होण्यास पटवून दिले. संस्थानांच्या राज्यकर्त्यांचे अनेक अधिकार आणि विशेषाधिकार, विशेषतः त्यांच्या वैयक्तिक मालमत्ता आणि खाजगी संपत्ती, त्यांना सामील होण्यास पटवून देण्यासाठी हमी देण्यात आली. त्यापैकी काहींना विलीन झालेल्या राज्यांचे राजप्रमुख (राज्यपाल) आणि उपराजप्रमुख (उपराज्यपाल) करण्यात आले. अनेक लहान संस्थानांचे विलीनीकरण करून सौराष्ट्र , पेप्सू , विंध्य प्रदेश आणि मध्य भारत अशी व्यवहार्य प्रशासकीय राज्ये तयार करण्यात आली. त्रिपुरा आणि मणिपूर सारखी काही संस्थाने १९४९ मध्ये नंतर सामील झाली.

इतरांपेक्षा तीन राज्ये एकत्रित करणे अधिक कठीण असल्याचे सिद्ध झाले:

**जुनागढ (मुस्लिम नवाब असलेले हिंदू बहुल राज्य) -** डिसेंबर १९४७ मध्ये झालेल्या जनमत चाचणीत ९९% लोकांनी भारतात विलीन होण्यासाठी मतदान केले, ज्यामुळे पाकिस्तानशी वादग्रस्त विलिनीकरण रद्द झाले, जे नवाबने राज्यातील हिंदू लोकांच्या इच्छेविरुद्ध केले होते आणि जुनागढ पाकिस्तानशी जोडलेले नसतानाही केले होते.

**हैदराबाद (मुस्लिम निजाम असलेले हिंदू बहुल राज्य) -** १३ ते २९ सप्टेंबर १९४८ दरम्यान झालेल्या वाटाघाटी अयशस्वी झाल्यानंतर पटेल यांनी भारतीय सैन्याला निजामाचे सरकार उलथवून टाकण्याचे आदेश दिले , ज्याचे सांकेतिक नाव ऑपरेशन पोलो होते. पुढच्या वर्षी ते भारताचे एक राज्य म्हणून समाविष्ट करण्यात आले.

**जम्मू आणि काश्मीर राज्य** (हिंदू राजा असलेले मुस्लिम बहुल राज्य) लवकरच वादाचे कारण बनले आणि त्यातून १९४७ ते १९४९ पर्यंत चाललेल्या पहिल्या भारत-पाकिस्तान युद्धात सुरुवात झाली . अखेर, संयुक्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली युद्धबंदी झाली ज्यामुळे वादग्रस्त प्रदेशाच्या दोन तृतीयांश भागावर भारताचे नियंत्रण राहिले. जवाहरलाल नेहरूंनी सुरुवातीला माउंटबॅटनच्या प्रस्तावाला सहमती दर्शवली की शत्रुत्व संपताच संपूर्ण राज्यात सार्वमत घ्यावे आणि १ जानेवारी १९४९ रोजी दोन्ही पक्षांनी संयुक्त राष्ट्रांच्या प्रायोजित युद्धबंदीवर सहमती दर्शविली. तथापि, राज्यव्यापी सार्वमत घेण्यात आले नाही कारण १९५४ मध्ये, पाकिस्तानला अमेरिकेकडून शस्त्रे मिळू लागल्यानंतर, नेहरूंनी आपला पाठिंबा काढून घेतला. २६ जानेवारी १९५० रोजी काश्मीरमध्ये भारतीय संविधान लागू झाले ज्यामध्ये राज्यासाठी विशेष कलमे होती.

**संविधान -**

भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते अंमलात आले. संविधानाने भारत सरकार कायदा १९३५ ची जागा देशाच्या मूलभूत शासकीय दस्तऐवज म्हणून घेतली आणि भारताचे अधिराज्य भारताचे प्रजासत्ताक बनले . संवैधानिक स्वायत्तता सुनिश्चित करण्यासाठी , त्याच्या रचनाकारांनी कलम ३९५ मध्ये ब्रिटिश संसदेच्या पूर्वीच्या कृती रद्द केल्या. संविधान भारताला सार्वभौम , समाजवादी , धर्मनिरपेक्ष, आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित करते, त्याच्या नागरिकांना न्याय , समानता आणि स्वातंत्र्याची हमी देते आणि बंधुत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करते . संविधानाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्व प्रौढांसाठी सार्वत्रिक मताधिकार , संघीय आणि राज्य पातळीवर वेस्टमिन्स्टर शैलीची संसदीय सरकार प्रणाली आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था. संविधानाने केंद्र सरकार आणि भारतातील राज्ये आणि प्रदेशांना "सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांसाठी" शिक्षण प्रवेश, रोजगार, राजकीय संस्था, पदोन्नती इत्यादींमध्ये विशिष्ट टक्केवारीने राखीव कोटा किंवा जागा निश्चित करणे आवश्यक होते. संविधान लागू झाल्यापासून त्यात 100 हून अधिक सुधारणा झाल्या आहेत.

**१९४७-१९४८ चे भारत-पाकिस्तान युद्ध -**

१९४७-१९४८ चे भारत-पाकिस्तान युद्ध १९४७ ते १९४८ पर्यंत काश्मीर आणि जम्मू या संस्थानांवरून भारत आणि पाकिस्तानमध्ये लढले गेले. हे दोन्ही नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमध्ये झालेल्या चार भारत -पाकिस्तान युद्धांपैकी पहिले युद्ध होते . स्वातंत्र्यानंतर काही आठवड्यांनी पाकिस्तानने वझिरीस्तानमधून आदिवासी लष्कर (मिलिशिया) लाँच करून युद्धाला सुरुवात केली काश्मीर सुरक्षित करण्याच्या प्रयत्नात, ज्याचे भविष्य अधांतरी होते. ५ जानेवारी १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने युद्धबंदी झाली.युद्धात भारतीयांचे एकूण नुकसान १,१०४ जण ठार आणि ३,१५४ जण जखमी झाले; पाकिस्तानी, सुमारे ६,००० जण ठार आणि १४,००० जखमी झाले. तटस्थ मूल्यांकनांनुसार भारत विजयी झाला कारण त्याने बहुतेक वादग्रस्त प्रदेशाचे यशस्वीरित्या रक्षण केले.

**शासन आणि राजकारण-**

१९५२ मध्ये संविधानानुसार भारताने पहिल्या राष्ट्रीय निवडणुका घेतल्या , जिथे ६०% पेक्षा जास्त मतदान झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले आणि जवाहरलाल नेहरूंनी पंतप्रधान म्हणून दुसरा कार्यकाळ सुरू केला. भारताच्या पहिल्या संसदेच्या निवडणूक मंडळाने राष्ट्रपती प्रसाद यांची दुसऱ्या कार्यकाळासाठी निवड केली . भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू . त्यांनी भारताचे वसाहतवादी राष्ट्रातून प्रजासत्ताक राष्ट्रात रूपांतर केले, तसेच बहुपक्षीय, बहुपक्षीय व्यवस्थेचे पालनपोषण केले . परराष्ट्र धोरणात, त्यांनी अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीत आघाडीची भूमिका बजावली आणि दक्षिण आशियातील भारताला प्रादेशिक वर्चस्व म्हणून सादर केले.

**नेहरू प्रशासन (१९५२-१९६४)-**

नेहरूंना आधुनिक भारतीय राज्याचे संस्थापक मानले जाऊ शकते. पारेख याचे श्रेय नेहरूंनी भारतासाठी मांडलेल्या राष्ट्रीय तत्वज्ञानाला देतात. त्यांच्यासाठी, आधुनिकीकरण हे राष्ट्रीय तत्वज्ञान होते, ज्याची सात उद्दिष्टे होती: राष्ट्रीय एकता, संसदीय लोकशाही, औद्योगिकीकरण, समाजवाद, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास आणि असंघटितता. पारेख यांच्या मते, तत्वज्ञान आणि त्यातून निर्माण झालेल्या धोरणांचा सार्वजनिक क्षेत्रातील कामगार, औद्योगिक घराणे आणि मध्यम आणि उच्च शेतकरी अशा समाजाच्या मोठ्या वर्गाला फायदा झाला. तथापि, ते शहरी आणि ग्रामीण गरीब, बेरोजगार आणि हिंदू कट्टरपंथींना फायदा किंवा समाधान देण्यात अयशस्वी ठरले . १९५० मध्ये वल्लभभाई पटेल यांच्या निधनामुळे नेहरू हे एकमेव प्रतिष्ठित राष्ट्रीय नेते राहिले आणि लवकरच परिस्थिती अशी बनली की नेहरू भारतासाठी त्यांचे स्वप्न कोणत्याही अडथळ्याशिवाय

साकार करू शकले. नेहरूंनी आयात प्रतिस्थापन औद्योगिकीकरणावर आधारित आर्थिक धोरणे लागू केली आणि मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला जिथे सरकार-नियंत्रित सार्वजनिक क्षेत्र खाजगी क्षेत्रासोबत सहअस्तित्वात असेल . त्यांचा असा विश्वास होता की मूलभूत आणि अवजड उद्योगांची स्थापना भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास आणि आधुनिकीकरणासाठी मूलभूत आहे. म्हणूनच, सरकारने प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख उद्योगांमध्ये - स्टील, लोखंड, कोळसा आणि वीज - गुंतवणूक निर्देशित केली आणि अनुदान आणि संरक्षणवादी धोरणांसह त्यांच्या विकासाला चालना दिली.

१९५७ आणि १९६२ मध्ये नेहरूंनी काँग्रेसला निवडणुकीत आणखी विजय मिळवून दिला. त्यांच्या कार्यकाळात, भारतीय संसदेने हिंदू समाजातील महिलांचे कायदेशीर अधिकार वाढवणारे व्यापक सुधारणा मंजूर केलेआणि जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध आणखी कायदे केले . नेहरूंनी भारतातील मुलांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक मजबूत पुढाकार घेण्याचा पुरस्कार केला आणि देशभरात हजारो शाळा, महाविद्यालये आणि प्रगत शिक्षण संस्था, जसे की भारतीय तंत्रज्ञान संस्था , स्थापन करण्यात आल्या. नेहरूंनी भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी समाजवादी मॉडेलचा पुरस्कार केला . भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, नियोजनाचे एक औपचारिक मॉडेल स्वीकारण्यात आले आणि त्यानुसार १९५० मध्ये पंतप्रधानांना थेट अहवाल देणारा नियोजन आयोग स्थापन करण्यात आला, ज्याचे अध्यक्ष नेहरू होते. सोव्हिएत मॉडेलनुसार केंद्रीकृत आणि एकात्मिक राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रमांवर आधारित आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्याचे काम या आयोगाला देण्यात आले होते - भारतीय शेतकऱ्यांसाठी कोणताही कर आकारणी नाही, ब्लू-कॉलर कामगारांसाठी किमान वेतन आणि फायदे आणि स्टील, विमान वाहतूक, जहाजबांधणी, वीज आणि खाणकाम यासारख्या जड उद्योगांचे राष्ट्रीयीकरण . गावातील सामाईक जमिनी जप्त करण्यात आल्या आणि व्यापक सार्वजनिक बांधकाम आणि औद्योगिकीकरण मोहिमेमुळे मोठी धरणे, सिंचन कालवे, रस्ते, औष्णिक आणि जलविद्युत केंद्रे आणि बरेच काही बांधण्यात आले.

**राज्य पुनर्रचना-**

१९५२ मध्ये आंध्र राज्याच्या मागणीसाठी पोट्टी श्रीरामुलु यांनी केलेले आमरण उपोषण आणि त्यानंतरच्या आमरण उपोषणामुळे भारतीय संघराज्याची मोठी पुनर्रचना झाली. नेहरूंनी राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती केली, ज्यांच्या शिफारशींनुसार १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना कायदा मंजूर करण्यात आला. जुनी राज्ये विसर्जित करण्यात आली आणि सामायिक भाषिक आणि वांशिक लोकसंख्याशास्त्राच्या धर्तीवर नवीन राज्ये निर्माण करण्यात आली. केरळ आणि मद्रास राज्यातील तेलुगू भाषिक प्रदेश वेगळे केल्याने तामिळनाडू हे एकमेव तमिळ भाषिक राज्य निर्माण झाले . १ मे १९६० रोजी, द्विभाषिक बॉम्बे राज्यातून महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्ये निर्माण करण्यात आली आणि १ नोव्हेंबर १९६६ रोजी, मोठे पंजाब राज्य लहान, पंजाबी भाषिक पंजाब आणि हरियाणवी भाषिक हरियाणा राज्यांमध्ये विभागले गेले .

**परराष्ट्र धोरण आणि लष्करी संघर्ष-**

नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे अलिप्त राष्ट्र चळवळीची प्रेरणा होती , ज्याचा भारत सह-संस्थापक होता. नेहरूंनी अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोन्ही देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आणि चीनच्या पीपल्स रिपब्लिकला जागतिक समुदायात सामील होण्यास प्रोत्साहित केले. १९५६ मध्ये, जेव्हा इजिप्त सरकारने सुएझ कालवा कंपनी ताब्यात घेतली, तेव्हा एका आंतरराष्ट्रीय परिषदेत इजिप्तविरुद्ध कारवाई करण्यासाठी १८-४ मतांनी मतदान झाले. इंडोनेशिया , श्रीलंका आणि यूएसएसआरसह भारत इजिप्तच्या चार समर्थकांपैकी एक होता . भारताने पॅलेस्टाईनची फाळणी आणि १९५६ मध्ये इस्रायल, युनायटेड किंग्डम आणि फ्रान्सने सिनाईवर केलेल्या आक्रमणाला विरोध केला होता , परंतु तिबेटवर चीनच्या थेट नियंत्रणाला आणि सोव्हिएत युनियनने हंगेरीमध्ये

लोकशाही समर्थक चळवळीचे दमन करण्यास विरोध केला नव्हता. जरी नेहरूंनी भारतासाठी अणु महत्त्वाकांक्षा नाकारल्या तरी, कॅनडा आणि फ्रान्सने वीजेसाठी अणुऊर्जा केंद्रांच्या विकासात भारताला मदत केली. १९६० मध्ये भारताने पाकिस्तानसोबत देशांनी वाटून घेतलेल्या सात नद्यांच्या पाण्याचा न्याय्य वापर करण्याबाबत करार केला. १९५३ मध्ये नेहरू पाकिस्तानला भेट देऊन गेले होते, परंतु पाकिस्तानमधील राजकीय अस्थिरतेमुळे काश्मीर वादावर कोणतीही प्रगती झाली नाही.

**निष्कर्ष-**

१९४७ ते १९५२ हा कालखंड भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या पाच वर्षांत भारताने एक सार्वभौम राष्ट्र म्हणून स्वतःला स्थिर करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली. नवीन संविधानाची निर्मिती, लोकशाही व्यवस्थेचा पाया रचना, प्रशासकीय सुधारणा आणि आर्थिक नियोजन या सर्व घटकांचा या काळात अंतर्भाव होतो. या संशोधन पत्रात भारताच्या शासन आणि प्रशासनाच्या स्थितीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही, प्रशासन, संविधान, आर्थिक सुधारणा आणि सामाजिक सुधारणांचा पाया घातला. या काळात देशाला अनेक आव्हाने होती, पण योग्य नेतृत्व आणि ठोस निर्णयांमुळे भारताने स्थिर शासन व्यवस्था निर्माण केली.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. भारतीय राज्यघटना – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
2. पंडित नेहरूंचे भारत – जवाहरलाल नेहरू
3. आधुनिक भारताचा इतिहास – बिपिन चंद्र
4. सरकारी दस्तऐवज आणि अहवाल.
5. www.wikipediya.com


**डॉ. रमेश एकनाथ भारुडकर**

**Chief Editor**
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India
***Email:*** *editor@ijaar.co.in* ***Mob-*** *8624946865*

**Editor**
**Dr. Tabassum Sheikh**
**Principal,**
**KMES,G.M.Momin Womens College Bhiwandi**

## Executive Editor

**Dr. Jayashree Thakre**
Head, Department of Chemistry, G.M.Momin Womens College Bhiwandi
**Dr. Mukesh Pimpliskar**
Head, Department of Biotechnology, G.M.Momin Womens College Bhiwandi
**Ms. Nupoor Telawane**,
Assistant Professor, Department of Interdisciplinary Studies, KMES,G.M.Momin Womens College Bhiwandi

## Editorial & Advisory Board

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. D. Shinde** | **Dr. M. B. Potdar** | **Dr. P. K. Pandey** |
| **Dr. L. R. Rathod** | **Mr. V. P. Dhulap** | **Dr. A. G. Koppad** |
| **Dr. S. B. Abhang** | **Dr. S. P. Mali** | **Dr. G. B. Kalyanshetti** |
| **Dr. M. H. Lohgaonkar** | **Dr. R. D. Bodare** | **Dr. D. T. Bornare** |